म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
सं. क्र. : ६७

REFBK-0005001

प्रस्तावना

ुमारें सोळा वर्षांपूर्वी प्रसंगानें उत्पन्न झालेल्या विमनस्क स्थितींत विरंगुळा न प्रस्तुत लेखक 'रघुवंश' महाकाव्य वाचीत बसला असतां "सुतौ ाणशत्रुघ्नौ सुमित्रा सुषुवे यमौ । सम्यगागमिता विद्या प्रबोधविनयाविव ॥" (१०, ७१) या श्लोकांतील सुंदर उपमेनें त्याला चटका लाविला आणि रा कालिदासानें शिक्षणाचें ध्येय व परिणाम मोजक्या शब्दांत किती ़मैकपणें ग्रथित केले आहेत हें पाहून त्याला मोठें कौतुक वाटलें. इतकेंच , तर त्या वेळीं असाहि विचार त्याच्या मनांत आला कीं, कालिदासाच्या ंत इतस्ततः विखुरलेले सर्व शिक्षणविषयक विचार एकत्र जुळविल्यास महाकवीच्या शिक्षणशास्त्रविषयक कल्पनांचें सुसंगत स्वरूप आपल्या त्पत्तीस येईल. या विचारास थोड्याच दिवसांत मूर्त स्वरूप येऊन तुत लेखकानें '**इंडियन् एज्युकेशन्**' नामक तत्कालीन इंग्रजी मासिकांत **ालिदासाचे शिक्षणविषयक विचार**' या नांवाचा निबंध लिहून प्रसिद्ध ा. हा निबंध लिहीत असतां कालिदासाच्या इतर विषयांवरील मार्मिक चारांकडेहि त्याचें सहजच लक्ष गेलें; व तदनुसार संगीत, चित्रकला, कारण, समाजशास्त्र, विनोद, कोट्या, वैद्यक इत्यादि विषयांसंबंधींच्या नांची जुळणी झाली. नंतर या विषयांवर वेळोंवेळीं प्रत्येकी स्वतंत्र निबंध ाठींत लिहून ते वेगवेगळ्या मराठी नियतकालिकांतून प्रसिद्ध करण्यांत ले. याच सुमारास '**लोकशिक्षण-लघुग्रंथमाले**'चे आस्थेवाईक संपादक गणेश गंगाधर जांभेकर यांनीं आपल्या मालेसाठीं म्हणून आखलेलें **ालिदास**' या विषयावरील पुस्तक लिहिण्याची कल्पना लेखकास अगत्य- क सुचविली; आणि विशेष हें कीं, त्यानें अनुमति देतांच अनेकप्रकारें ्पूर्वक साहाय्य करून त्याजकडून तें कसोशीनें लिहून घेतलें. एरवीं तच्या प्रतिकूल परिस्थितींत हा उद्योग इतपतहि तडीस गेला असता कीं ्र याचा वानवाच आहे. असो.

हें पुस्तक बुध्द्या 'लोकशिक्षण-लघुग्रंथमाले'साठीं स्वतंत्रपणें लिहिलें असल्यामुळें त्यांत लेखकाच्या उपर्युक्त निबंधांचें कित्येक ठिकाणीं सार तर कित्येक ठिकाणीं केवळ दिग्दर्शन आलें असून विषयाच्या सा विवेचनासाठीं अवश्य त्या दुसऱ्या अनेक गोष्टींचा त्यामध्यें अंतर्भाव केला आहे. वास्तविक कविकुलगुरु कालिदास हा आतां केवळ भारतीय महाकवि राहिला नाहीं, त्याला भूमंडळीय कीर्ति लाभलेली आहे. तेव्हां त्याच्यासंबंधीं सामान्य मराठी वाचकासदेखील थोडीबहुत माहिती असणें अत्यंत इष्ट आहे यांत शंका नाहीं. तथापि आश्चर्य हें कीं, अशा प्रकारचें आटपशीर, पण सर्वांगीण परिचय करून देणारें पुस्तक मराठी भाषेंत आजवर उपलब्ध नव्हतें. अर्थात्, प्रस्तुत लघुग्रंथानें ही उणीव भरून निघून कालिदासाचीं काव्यनाटकें त्याच्या काळाचें स्वरूप यांविषयींची स्थूल कल्पना वाचकांस आल्यास लेखक आपणास कृतार्थ समजेल.

के. ल. ओगले

विषयानुक्रमणिका

प्रकरण १– कालिदास-चरित्र (पृ.१-१३): प्रास्ताविक १; जन्मस्थान ...त्र २; कालिदासाचा काल, तत्संबंधीं दोन मुख्य पक्ष व निष्कर्ष ४; कुलवृत्तांत ...द्याव्यासंग १०; वृत्ति, स्वभाव इ. ११; उपास्य दैवत व अंतिम आकांक्षा १३.

टीपा (पृ. १४–१८)

प्रकरण २–कालिदासाची ग्रंथरचना व ग्रंथांचें पौर्वापर्य (पृ.१८-): पूर्वसूरींचा कालिदासकृत उल्लेख १८; कालिदासाच्या नांवावर मोडणारे ग्रंथ ...रें एकेचाळीस, पैकीं निःसंशय त्याचे सहाचः नाटकें–अनुक्रमें मालविकाग्निमित्र, ...क्रमोर्वशीय व शाकुन्तल; आणि काव्यें–कुमारसंभव, मेघदूत व रघुवंश; ऋतु-...हार संशयास्पद १९; प्रस्तुत सात ग्रंथांचा अनुमित कालानुक्रमः मालविकाग्निमित्र, ...तुसंहार, कुमारसंभव, विक्रमोर्वशीय, शाकुन्तल, मेघदूत व रघुवंश १९.

टीपा (पृ. २३–२५)

प्रकरण ३–कालिदासाचीं काव्यें (पृ. २५-४९): काव्य, दृश्य व श्रव्य; ...व्याचे पोटवर्ग महाकाव्य व खंडकाव्य; त्यांचें लक्षण २५; खंडकाव्यें: ऋतुसंहार ...६; मेघदूत २८; महाकाव्यें: कुमारसंभव ३२; रघुवंश ३६; पंचमहाकाव्यें व ...रवि, माघ, हर्ष यांच्याशीं, तसेंच बाणाशीं कालिदासाची तुलना ४६.

प्रकरण ४–कालिदासाचीं नाटकें (पृ.४९-७२): रूपक ऊर्फ नाटक ...त्याचें लक्षण ४९; मालविकाग्निमित्र ५०; विक्रमोर्वशीय ५३; शाकुन्तल ५९; ...लिदास व भासादि इतर प्रमुख संस्कृत नाटककार ६९; नाट्यविषयक सामान्य ...चार ७१.

प्रकरण ५–कालिदास आणि साहित्यशास्त्र (पृ. ७३-९७): भरत-...तं नाट्यशास्त्राशीं कालिदासाचा परिचय ७३; भामह, दण्डी व तदनंतरचे साहित्य-...कार यांनीं केलेला कालिदासकृत ग्रंथांचा उपयोग ७४; काव्याचें लक्षण व ...र ७५; रस ७६; नाट्य ७७; संधि ७८; वृत्ति ८०; राग ८१; प्रतिभा ८२; ...शास्त्र व कालिदासानें योजिलेलीं चाळिसांहून अधिक वृत्तें ८४; शब्दालंकार व

अर्थालंकार ८६; ‘ उपमा कालिदासस्य । ’ ९०, गुण, रीति व दोष ९२; स्वतंत्र वृत्ति ९३; विनोद व कोटिप्रियता ९४; व्युत्पत्ति ९५.

प्रकरण ६–कालिदासकालीन समाज (पृ. ९७-११०) : चातुर्वर्ण्यात्मक समाजरचना ९७; ब्राह्मण ९८ ; क्षत्रिय ९९; वैश्य १००; शूद्र १०१; चार आश्रम १०२; संस्कार व विवाह १०३; स्त्रियांची स्थिति १०५; समाजाचें धोरण १०८; करमणुकीचीं साधनें १०८; ऐषआरामाचे प्रकार १०९.

प्रकरण ७–कालिदासीय जीवितादर्श व तत्वज्ञान (पृ.१११-१२४): आशावाद हाच ग्रंथानुमित जीवितादर्श १११; कालिदासाच्या नीतिमत्तेची कल्पना : अभ्युदय व निःश्रेयस यांतील अविरोध ११३; समाजव्यवस्थेची किल्ली: वर्णाश्रमपरिपालन ११५; तडजोडीचें धोरण ११७; कालिदासीय तत्त्वज्ञानः उदारमतवादी शिवोपासक ११८; अंतिम ध्येय मोक्ष व त्याचीं साधनें १२१; नीलमत व पंडित लक्ष्मीधर कल्ला यांचें अनुमानः कालिदास प्रत्यभिज्ञापंथी होता काय ? १२३.

प्रकरण ८–भारतीय व जागतिक वाङ्मयांत कालिदासाचें स्थान (पृ १२५-१३२) : युगप्रतिनिधि कालिदास १२५; बाणप्रभृति प्राचीन कविपंडितांनीं केलेली कालिदासाची प्रशंसा १२६; एतद्देशीय अर्वाचीनांनीं करून दिलेला कालिदासीय परिचय १२८; सर वुइल्यम् जोन्सकृत शाकुन्तलाचें इंग्रजी भाषांतर (इ. स. १७८९) व कालिदासाचा जागतिक कविमंडळांत प्रवेश १२८; शेक्सपियर व कालिदास १२९; गटेप्रभृति पाश्चात्त्य कविपंडितांचे प्रशंसोद्गार १३०; सुप्रसिद्ध जागतिक कवींशीं कालिदासाची तुलना व त्याचें असामान्यत्व १३१.

परिशिष्टः कालिदासीय सुभाषितें (पृ. १३३–१४४)

कालिदासीय संदर्भसाहित्य (पृ. १४५–४७)

शुद्धिपत्र (पृ. १४८)

नं. ५५२
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५.३१२
५००१

कविकुलगुरु कालिदास

प्रकरण पहिलें

चरित्र

१ प्रास्ताविक

रसिकांचें कौतुकस्थान अशा कविताकामिनीचा विलासभूत जो कवि-कुलगुरु कालिदास त्याच्या संबंधानें व्यक्तिगत असा निश्चित वृत्तांत आजमितीस कांहींच उपलब्ध नाहीं. त्यानें रचिलेल्या काव्यनाटकादि ग्रंथांतील उल्लेखांवरूनहि त्याची जन्मभूमि, कुलपरंपरा, मातापितरें इत्यादि गोष्टींचा थांग लागणें कठीण आहे. " माझ्या कवित्वाची परीक्षा करावयाची तर मीं कोठें, कोणत्या आईबापांच्या पोटीं, केव्हां जन्मास आलों, कोणाच्या पदरीं होतों, इत्यादि गोष्टींची उठाठेव तुम्हांला कशाला पाहिजे ? " असें म्हणूनच जणूं काय त्यानें आपले ग्रंथ मात्र लोकांपुढें ठेवून स्वतः अदृश्य राहण्याचें ठरविलें असावें ! त्याच्या संबंधानें कित्येक दंतकथा प्रसिद्ध आहेत. उदाहरणार्थ, लहानपणीं तो अगदीं अप्रबुद्ध होता व पुढें काली देवीच्या प्रसादानें त्याला बुद्धिमत्ता व कवित्वस्फूर्ति मिळाली, अशी कथा सांगण्यांत येते;[१] पण ऐतिहासिकदृष्ट्या असल्या गोष्टींना कांहींच महत्त्व नाहीं. तात्पर्य, कालिदासासंबंधीं विचार करावयाचा तर त्याचे ग्रंथ घेऊन वाचावे आणि त्यांत मिळणारा आनंद लुटावा हेंच एकंदरींत श्रेयस्कर !

असें जरी आहे तरी सुतानें स्वर्गास जावें त्याप्रमाणें कालिदासाविषयीं त्याच्या ग्रंथांतील कित्येक प्रसंगांवरून त्याच्या जीवितक्रमाविषयीं कांहीं अनुमानें काढण्याचा चिकित्सकांनीं प्रयत्न केलेला आढळतो. या बाबतींत प्रथम एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, कालिदास नांवाचे लेखक या देशांत एकाहून अधिक झालेले आहेत. कालिदास या नांवावर विकणारे सुमारें लहानमोठे चाळीस ग्रंथ प्रसिद्ध किंवा नाममात्रानें माहीत असे आहेत. इसवी सनापूर्वींच्या पहिल्या शतकापासून अकराव्या शतकापर्यंत अनेक कालिदास होऊन गेले असून राजशेखरानें (दहावें शतक) तीन कालिदासांचा उल्लेख " एकोऽपि जीयते हंत कालिदासो न केनचित् । शृङ्गारे ललितोद्गारे कालिदासत्रयी किमु ॥ " या श्लोकांत केलेला आढळतो. आपल्याला जो कालिदास अभिप्रेत आहे, तो शाकुन्तल व रघुवंश या सुप्रसिद्ध ग्रंथांचा कर्ता होय.

२ जन्मस्थान व नांव

कालिदासाचें जन्मस्थान त्याच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून ठरविण्याचा प्रयत्न कित्येकांनीं केला आहे. पण त्याला सिद्धांतरूप येणें कठीण दिसतें. डॉ. भाऊ दाजी यांनीं कालिदासाचें जन्मस्थान काश्मिरांत असावें असें ठरविलें होतें. त्यांच्या अनुमानाला आधार असा कीं, कालिदासानें केशराच्या झाडांवरील ताज्या फुलांचा उल्लेख केला आहे व तसा दुसऱ्या कोणत्याहि कवीनें केलेला नाहीं.[२] अलीकडे कित्येक वर्षे कांहीं बंगाली पंडितांनीं कालिदासाचें जन्मस्थान बंगाल्यांतील भरतपूर ठाण्यांतील गोड्डा हें गांव ठरवून तेथें त्याचा उत्सवहि करण्याचा उपक्रम केला आहे; परंतु त्या स्थानाला सर्वमान्यता तर राहिलीच, पण बहुमान्यताहि मिळालेली नाहीं. कालिदासाचें जन्मस्थान निश्चित करण्याचा त्यानंतरचा विशेष प्रयत्न दिल्लीचे पंडित लछ्मीधर कल्लाशास्त्री यांनीं केला असून काश्मिरांतील भूतेश्वराजवळील गंगा नदीच्या कांठचें मायाग्राम म्हणजे प्रस्तुत मनिगाम नांवानें प्रसिद्ध असलेलें ठिकाण हें त्याचें मूलस्थान होय असें ठरविलें आहे. कालिदासाच्या

ग्रंथांत इतस्ततः दिसून येणारें हिमालयप्रेम, काश्मिरांतील तीर्थें, सरोवरें, इतर स्थलें, चालीरीती, पिकें, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादि गोष्टींचें बुद्ध्या केलेलें किंवा सहजोद्गारांच्या रूपानें आलेलें अभिमानपूर्वक वर्णन इत्यादि गोष्टींच्या आधारावर पंडित कह्ला यांचें अनुमान उभारलेलें आहे.[३] कालिदासाच्या मूलस्थानासंबंधानें निश्चित असें आज कांहींच सांगतां येत नाहीं. पण तें मूलस्थान कोणतेंहि असलें तरी कालिदासाचें पुढील बरेंच आयुष्य उज्जयिनी येथें गेलें असेल, असें मेघदूतांत त्यानें त्या नगरीचें जें वर्णन केलें आहे त्यावरून व परंपरागत समजुतीवरून दिसून येतें.

कालिदास हें मूळचें नांव नसून टोपणनांव असावें, म्हणजे काली देवीचा भक्त तो कालिदास असें तें अन्वर्थक असावें, असें कित्येकांचें मत आहे. तसें असेल तर शाकुन्तल-रघुवंशादि रमणीय ग्रंथांच्या कर्त्याचें खरें नांव सांपडणें कठीणच दिसतें. कालिदास या नांवाचा पर्याय शोभेल असें मातृगुप्त हें त्याचें खरें नांव असें कोणी म्हणतात. मातृगुप्त नांवाचा काश्मीरचा एक राजा होता व त्याच्या नांवावर कांहीं ग्रंथनामेंहि प्रसिद्ध आहेत. परंतु कालिदास आणि मातृगुप्त या व्यक्ति स्वतंत्र असल्याचें प्रो. र. ना. आपटे[४] यांनीं आपल्या कालिदासविषयक निबंधांत दाखविलें आहे. कालिदासाच्या नांवा-संबंधानें आणखी एक मौजेचा प्रकार आढळून येतो. भवभूतीच्या उत्तर-रामचरित्रावर घनश्याम[५] नांवाच्या टीकाकाराची टीका असून तींत कुमार-संभव-रघुवंश-शाकुंतलांच्या कर्त्याला मतृमीढ आणि ईश्वरकृष्ण अशीं नांवें दिलीं आहेत. घनश्यामानें कालिदासाच्या नांवाचाहि उल्लेख केला आहे; पण तो कालिदास अकराव्या शतकांतील भोजराजाच्या पदरीं असलेला अर्वाचीन कालिदास असला पाहिजे, असें तद्विषयक वर्णनावरून दिसतें. अशा रीतीनें आपल्या कविकुलगुरूच्या नांवाविषयीं हा वाद असला तरीं कालिदास हें त्याचें नांव सर्वप्रसिद्ध असून त्याच्या नाटकांच्या प्रस्तावनांत[६] तेंच आलेलें आहे.

३ कालिदासाचा काल

आजवर प्रसिद्ध झालेल्या संशोधनकार्यावरून कालिदासाचा काल इ. सनाच्या पूर्वी पहिल्या शतकापासून इ. स. ४०० पर्यंत केव्हां तरी असला पाहिजे, एवढेंच निश्चितपणें म्हणतां येतें. भारतीय परंपरागत समजूत अशी आहे कीं, कालिदास हा विक्रमशककर्त्या उज्जयिनीच्या विक्रमादित्य राजाच्या आश्रयाला होता व तदनुसार त्याचा काल इ. सनापूर्वीचें पहिलें शतक होय. पण उज्जयिनीला विक्रमादित्य नांवाचे राजे अनेक होऊन गेले असून त्यांतील एकहि इ. सनापूर्वीच्या पहिल्या शतकांतील नाहीं, असें म्हणून बऱ्याच संस्कृत पंडितांनीं कालिदास हा इ. स. ३२० ते ६०६ पर्यंत म्हणजे गुप्त-राजघराण्याच्या राजवटींत, बहुधा कुमारगुप्त किंवा स्कंदगुप्त यांच्या वेळीं होऊन गेला असला पाहिजे, असें ठरविलें आहे. कालिदासकालनिर्णयांत आजमितीस असे दोन पक्ष असून ते दोन्ही सामान्यतः समबल आहेत; आणि दोन्ही पक्षांत भारतीय व युरोपीय अशा उभयविध पंडितांचा समावेश होतो. असें जरी आहे तरी परंपरागत मतालाच दिवसानुदिवस अधिक पाठिंबा मिळत आहे. फर्ग्युसन्, व्हिन्सेन्ट स्मिथ, मॅक्सम्युल्लर, केर्न, कीथ, विंटरनिट्झ, प्रो. पाठक, का. कृ. लेले, इत्यादिकांनीं गुप्तसम्राटाशीं कालिदासाची गांठ घालून दिली आहे व डॉ. पीटर्सन्, प्रो. र. ना आपटे, चिं. वि. वैद्य, क्षेत्रेशचंद्र चट्टोपाध्याय, शारदारंजन राय इत्यादि पंडितांनीं त्याला इ. सनापूर्वीच्या पहिल्या शतकांत होऊन गेलेल्या विक्रमादित्याचा आश्रित ठरविलें आहे.

इसवी सनापूर्वीच्या पहिल्या शतकांतील विक्रमादित्यावर विरोधी पक्षाचे जे मुख्य आक्षेप आहेत ते असेः–(१) उज्जयिनी येथें क्रि. पू. पहिल्या शतकांत विक्रमादित्य असा कोणी झालाच नाहीं. (२) विक्रमशक ज्याला म्हणतात तो वस्तुतः इ. स. ५४४ या वर्षी चालू झाला व त्याला बळेंच ६०० वर्षे मागें ढकलून इ. स. पूर्वी ५७ या वर्षावर नेऊन बसविण्यांत आलें. (३) ज्योतिर्विदाभरण नांवाच्या मुहूर्तविषयक ज्योतिषग्रंथांत "धन्वन्तरिः क्षपणकोऽमरसिंहशङ्कु"[७] इत्यादि जो श्लोक आहे त्यांत

विक्रमाच्या पदरीं असलेल्या नऊ पंडितांचा उल्लेख असून त्यांत कालिदासाचा समावेश केलेला आहे. त्यांतील वराहमिहिर हा ज्योतिषी असून त्याचा काल इ. स. सहाव्या शतकांतील आहे. अर्थात् कालिदास हा त्याचा समकालीन असल्यामुळें त्याचाहि काल तोच धरला पाहिजे. पण या आक्षेपांचें निरसन आतां झालेलें आहे. जैन वाङ्मयांत तसाच राजतरंगिणीनामक काश्मिरच्या इतिहासांत क्रि. पू. विक्रमादित्याचा उल्लेख असून उज्जयिनी येथून शकांना हांकून लावून तो आपल्या पित्याच्या सिंहासनावर बसला, असें सांगितलें आहे. विक्रम संवताचें वर्ष ५२९ (इ. स. ४७२) ज्यावर आहे असा प्रत्यक्ष प्राचीन लेख, मंदसोर येथें सांपडल्यापासून विक्रम संवताचा आरंभ इ. स. पूर्वी ५७ या वर्षापर्यंत म्हणजे ६०० वर्षे मागें ढकलण्यांत आला. पण खरोखर तो इ. स. ५४४ मध्यें चालू झाला, हें म्हणणें अर्थात् निराधार ठरलें. तिसऱ्या आक्षेपाचा विचार करतां त्यांत सांगितलेल्या नऊ रत्नांची मोट एकत्र बांधण्यांत केवढी गंमत केलेली आहे हें पाहिलें म्हणजे तो सहज फोल ठरतो. वराहमिहिर हा ज्योतिषी असल्यामुळें त्याचा काल निश्चितपणें काढतां येतो व ' भारतीय ज्योतिःशास्त्र 'कार दीक्षितांनीं तो शक ४२७ म्हणजे इ. सन ५०५ पूर्वी जन्मलेला असला पाहिजे असें ठरविलें आहे. वराहमिहिराबरोबर अमरसिंहाचा उल्लेख असून त्याचा काल इ. स. चौथें शतक हा आहे. नऊ रत्नांची मोट बांधणारा हा श्लोक देणाऱ्या या ग्रंथांत "गतकलि ३०६८ म्हणजे विक्रमसंवत् २४ (इ. स. पूर्वी ३३ वर्षे) या वर्षी या ग्रंथास आरंभ झाला " असें म्हटलें आहे ! अर्थात् तो विश्वसनीय असेल तर कालिदास इ. स. पूर्वी होऊन गेला असेंच ठरेल परंतु मग वराहमिहिर व अमरसिंह यांची काय व्यवस्था करावयाची ? त्यांनाहि क्रि. पू. पहिल्या शतकांतच बसवावयाचें की काय ? बरें, कालिदासाचा काल नंतरचा असेल तर हा ग्रंथच अविश्वसनीय ठरतो. पण या ग्रंथाची अविश्वसनीयता अनेक रीतींनीं दिसत असून दीक्षितांनीं ती स्पष्टपणें दाखविली आहे व तो ग्रंथ शक ११६४ च्या सुमारास झाला असला पाहिजे असें ठरविलें आहे.

याप्रमाणें क्रिस्तपूर्वकालावरील आक्षेप दूर होत असल्यामुळें तो काल परंपरागत म्हणून ग्राह्य मानणें उचित होतें आणि इतर अनेक गोष्टींवरूनहि त्याला दुजोरा मिळतो तो असा: —

१ कालिदास व भारवि यांचीं नांवें प्रसिद्ध कवि म्हणून इ. स. ६३४ या वर्षाच्या ऐहोळे[८] येथील लेखांत सांपडतात. भारवीच्या काव्याच्या १५व्या सर्गावर दुर्विनीत नामक राजाची टीका असल्याचा उल्लेख गुम्मरेडिपूर येथील एका प्राचीन लेखांत आलेला असून दुर्विनीताचा काल इ. स. ४८२ ते ५२२ असा आहे.* म्हणजे भारवीचा काल इ. स. ५ व्या शतकाच्या अलीकडे येऊं शकत नाहीं. कालिदास हा भारवीच्या पूर्वी बराच काल होऊन गेला असला पाहिजे, असें दोघांच्या भाषासरणींतील भेदावरून सहज दिसून येण्यासारखें आहे.

२ मंदसोर येथील इ. स. ४७२मधील लेखाचा लेखक वत्सभूति यानें आपल्या लेखांत कालिदासाच्या ग्रंथांतून कित्येक कल्पना उचललेल्या आढळून येतात. ही उसनवारी कोणीं केली असावी याविषयीं शंका घेण्याचें कारण नाहीं. एखाद्या किरकोळ लेखांतून कालिदासासारखा महाकवि उसन्या कल्पना घेईल असें मानणें अयुक्त होय. अर्थात् कालिदास इ. स. ४७२त चांगला कवि म्हणून विख्यात झालेला होता व त्याचेंच अनुकरण वत्सभूतीनें केलेलें असलें पाहिजे.

३ बुद्धचरित व सौन्दरानन्द या काव्यांचा कर्ता अश्वघोष याच्या ग्रंथांत व कालिदासाच्या काव्यांत अशीं किती तरी समान स्थलें आढळतात कीं, त्यांवरून कोणीं तरी कोणाची उसनवारी केली असली पाहिजे, हें उघड होतें. ही उसनवारी कालिदासानें केली असें समजून अश्वघोषानंतर कालिदास होऊन गेला असें त्याला गुप्तसाम्राज्यकालीन समजणाऱ्या पंडितांचें म्हणणें

---

* " किरातार्जुनीयपञ्चदशसर्गटीकाकारदुर्विनीतनामा "—एपिग्रॅफिका कर्नाटिका, ग्रंथ १२, लेख २३.

आहे. पण या प्रश्नाचा बारीक विचार करून आणि रघुवंश व सौन्दरानन्द आणि कुमारसंभव व बुद्धचरित या जोड्यांची तुलनात्मक सूक्ष्म छाननी करून श्री. क्षेत्रेशचंद्र चट्टोपाध्याय यांनीं कालिदासावरूनच अश्वघोषानें कल्पना घेतल्या असें साधार दाखविलें आहे. तें मान्य केल्यास अश्वघोषाचा काल इ. स. ७८च्या सुमाराचा असल्यामुळें कालिदास त्याच्या पूर्वी शें-दीडशें वर्षें होऊन गेला असें म्हणणें युक्तच ठरतें.

४ कालिदासानें चोरीच्या अपराधाला वधाची शिक्षा सांगितली असून ती मनु-आपस्तंबांसारख्या प्राचीन (क्रिस्तपूर्व दुसरें शतक) धर्मशास्त्र-कारांना धरून आहे. पण इ. सनाच्या पहिल्या शतकांत होऊन गेलेल्या बृहस्पतीनें चोरीला दंडाची शिक्षा सांगितली आहे. धर्मशास्त्राचा विचार करतां चोरीविषयींची शिक्षा क्रमानें सौम्य होत आलेली दिसते. अर्थात् कालिदास बृहस्पतीच्या पूर्वी होऊन गेलेला असला पाहिजे.

५ कालिदासानें जे ज्योतिषविषयक उल्लेख केलेले आहेत, त्यांवरूनहि तो ज्योतिषसिद्धांतकारांच्या बराच पूर्वी झालेला असला पाहिजे असें ठरतें. उदाहरणार्थ, उत्तरायण म्हणजे वसंत ऋतूपासून शरद् ऋतूपर्यंतचा काल व दक्षिणायन म्हणजे शरद् ऋतूपासून वसंतापर्यंतचा काल असें त्यानें ध्वनित केलें आहे. ही कल्पना प्राचीन असून चौथ्यापांचव्या शतकांत ठरलेल्या ज्योतिषपरिभाषेहून निराळी आहे. त्या परिभाषेंत उत्तरायण म्हणजे मकर-संक्रमणापासून कर्कसंक्रमणापर्यंतचा काल होय.[१]

६ मेघदूतांत कालिदासानें उज्जयिनीचें वर्णन करतांना तेथील लोकांना उदयन राजाच्या कथा अतिशय परिचित होत्या असें म्हटलें आहे. हा परिचयहि क्रिस्तपूर्वकालाचाच द्योतक आहे.

७ कालिदासानें मालविकाग्निमित्र नाटकाच्या भरतवाक्यांत अग्निमित्राचा जो गौरवपर उल्लेख केलेला आहे, त्यावरून त्याचा अग्निमित्राविषयीं चांगलाच आदरभाव दिसून येतो. इतकेंच नव्हे तर त्या उल्लेखाची ऐट असें दाखविते कीं. कालिदास हा अग्निमित्राचा. निदान त्याच्या निकटच्या वंशजाचा

ऋणानुबंधी असला पाहिजे. " आशास्यमभ्यधिगमात्प्रभृति प्रजानां संपद्यते न खलु गोप्तरि नाग्निमित्रे। " म्हणजे " अग्निमित्र राजा आहे तों प्रजेला इच्छित गोष्ट प्राप्त होत नाहीं असें घडतच नाहीं. " असें तो म्हणतो. असें गौरव कोणा फार पूर्वी होऊन गेलेल्या राजासंबंधानें करण्याचें कारण नव्हतें. या गौरवपर वाक्यावरून कालिदासाचा अग्निमित्राशीं किंवा त्याच्या घराण्याशीं निकट आलेला संबंध दिसून येतो.

८ कालिदासाच्या रघुवंशाला समकालीन इतिहास व भूवर्णन यांची भूमिका आहे व तीवरून त्याच्या कालनिर्णयाला कांहीं साधनें मिळूं शकतील, ही गोष्ट पुष्कळांनीं मान्य केलेली आहे. तिला अनुसरून रघूचा दिग्विजय हा समुद्रगुप्ताच्या दिग्विजयावर उभारला असावा, असें कालिदासाला क्रिस्तोत्तरकालीन म्हणणाऱ्या पक्षाचें मत आहे. पण समुद्रगुप्ताच्या दिग्विजयांत त्यानें पंजाबांतील लोकांकडून खंडणी घेतल्याचें दिसून येतें व कामरूप प्रांतीं म्हणजे आसामाकडे तो गेलेला नव्हता. या दोन्ही गोष्टी रघूच्या दिग्विजयवर्णनाशीं विसंगत आहेत. " कुमारकल्पं सुषुवे कुमारम्। " (र. ५, ३६) इत्यादि स्थळीं जो कुमार शब्द आहे तो कुमारगुप्ताला अनुलक्षून असावा, असा या मतवाद्यांचा अंदाज आहे; पण तोहि दुर्बळच आहे. कालिदासानें रघुवंशांत हूणांचा उल्लेख केला आहे (" तत्र हूणावरोधानां भर्तृषु व्यक्तविक्रमम्। कपोलपाटलादेशि बभूव रघुचेष्टितम्॥ " र. ४, ६–" तेथें म्हणजे काश्मिरांत हूणांवर रघूनें गाजविलेला पराक्रम त्यांच्या स्त्रियांच्या कपाळावरून व्यक्त होत होता. ") त्याचा संबंध काश्मिरांत सहाव्या शतकांत राज्य चालविणाऱ्या हूणांशीं लावून कालिदासाला सहाव्या शतकापर्यंत प्रो. पाठकादि पंडितांनीं ओढिलें आहे. पण हूणांचा उल्लेख महाभारतांतहि असून शिवाय क्रिस्तापूर्वी हूणांचें राज्य प्राचीन हिंदुस्थानच्या सरहद्दीला लागून असलेल्या बॅक्ट्रियांत होतें हेंहि विसरतां कामा नये. हा हूणांचा उल्लेख काश्मिरालाच धरून आहे असेंहि म्हणवत नाहीं. कारण, " सिन्धुतीरविचेष्टनैः " असा पाठ घेऊन मल्लिनाथानें जरी सिन्धु म्हणजे काश्मिरांतील एक नदी असें म्हटलें

आहे, तरी ' सिन्धू 'बद्दल प्राचीन पाठ ' वंक्षू ' असा असून त्यामुळें पूर्वोक्त उल्लेख काश्मिराला अनुलक्षून नसून इराणाला अनुलक्षून आहे, असें म्हणावें लागतें. या नदीच्या तीरावर रघूच्या घोड्यांच्या अंगाला केशराचीं फुलें लागल्याचें वर्णन कालिदासानें केलें तें काश्मिरालाच उद्देशून असलें पाहिजे, असेंहि म्हणण्याची आवश्यकता नाहीं. कारण, इराणांतहि केशराचें पीक येतें (एन्सायक्लोपीडिया ब्रिटॅनिका—केशर). तात्पर्य, हूणविषयक कालिदासाचा उल्लेख त्याच्या क्रिस्तपूर्व कालाला मुळींच विरोधी नाहीं.

९ कालिदासानें दिग्विजय व विश्वजित् यज्ञ यांचा उल्लेख समुद्रगुप्ताचा दिग्विजय व त्याचा अश्वमेध यांना अनुलक्षून केला असावा असें म्हणण्यास कसा विरोध येतो हें दाखविल्यावर हा उल्लेख अग्निमित्राचा पिता पुष्यमित्र अथवा पुष्पमित्र यानें केलेल्या अश्वमेधाला व त्यासाठीं आपला नातू जो वसुमित्र त्याच्याकडून करविलेल्या दिग्विजयाला अनुलक्षून आहे असें म्हणण्यास जागा होते; आणि तदनुसार कालिदास गुप्तपूर्वकालीन म्हणण्यास बाध येत नाहीं.

१० कालिदासाच्या ग्रंथांत वैदिक यज्ञयागासंबंधीं जे जोरदार उल्लेख आहेत, त्यांचा विचार केल्यास त्यांत त्याच्या वेळीं प्रसृत होणाऱ्या बौद्ध-मताचा निषेध करण्याचा प्रयत्न दिसून येतो. त्यानें रघुवंशांत व इतरत्र गीतावचनाचा (पुढें प्रकरण ५ पाहा) अनेक प्रसंगीं अप्रत्यक्ष वा प्रत्यक्ष आधार घेऊन जे विचार प्रकट केले आहेत त्यांवरूनहि तीच गोष्ट दिसून येते; आणि हें सर्व कालिदासाच्या क्रिस्तपूर्वकालीनत्वाला अविरोधी आहे. शुंग घराण्याचा उदय मौर्य घराण्याला पादाक्रांत करून झाला. मौर्य हे बौद्ध झाले होते हें प्रसिद्धच आहे. त्यांच्या विरुद्ध कारवाई करावयाची तर विरोधी अशा वैदिक पक्षाचें आनुकूल्य मिळविलें पाहिजे. बृहद्रथ मौर्याचा सेनापति पुष्यमित्र शुंग यानें तसें करून बृहद्रथाला ठार केलें आणि त्याचें सिंहासन बळकावून दिग्विजय केला आणि त्याचा द्योतक असा अश्वमेधहि केला. कालिदास त्या घराण्याचा पक्षपाती होता हें उघड दिसतें. अर्थात् शुंगांनीं पुनः रूढ केलेल्या यज्ञयागादिकांचें प्रत्यक्ष दर्शन कालिदासाला होत

असल्यामुळें त्या विषयाचे उल्लेख उपमादृष्टांतादिरूपानें कालिदासानें वारंवार केले असणें स्वाभाविक होय.

तात्पर्य, कालिदासाला गुप्तकालीन मानण्यास बलवत्तर आधार नसल्यामुळें व त्याचा परंपरागत काल जो क्रिस्तपूर्व पहिलें शतक तो इतिहासाला व स्वतः त्याच्या ग्रंथांतील उल्लेखांना कोणत्याहि रीतीनें विरोधी नसल्यामुळें तोच प्रस्तुत गृहीत धरून चालणें युक्त होय. कालिदासाचा स्थलकाल ठरविण्याच्या दृष्टीनें निःसंदेह असा पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नाहीं.

४ कुलवृत्तान्त व विद्याव्यासंग

कालिदासाचीं मातापितरें, गुरु इत्यादिकांसंबंधीं कांहींच सांगतां येत नाहीं. त्याच्या पत्नीचें नांव कमला असावें असें डॉ. भाऊ दाजींनीं ठरविलें आहे ! कालिदासाच्या काव्यांत त्याच्या चरित्रांतील प्रसंग कित्येक ठिकाणीं मूल-भूमिका म्हणून घेतलेले आहेत असें कित्येकजण मानितात आणि तें कांहीं अशक्य नाहीं. त्याच्या मेघदूतावरील वल्लभ नांवाच्या टीकाकारानें त्या काव्यांतील विप्रलंभ म्हणजे स्त्रीवियोग त्याच्या स्वतःच्या चरित्राला अनुलक्षून असून त्यांत त्याचें स्वतःचें हृद्गत प्रतिबिंबित झालें आहे असें म्हटलें आहे. हेंच अनुमान पुढें ढकलल्यास रघुवंशांतील इन्दुमतीचें मरण आणि तदनुसारी अजविलाप यांवरून कालिदासाची पत्नी अकस्मात् मरण पावली असावी असेंहि म्हणतां येईल. त्याला प्रथम बराच काळ अपत्य नसावें. आपल्या काव्यनाटकांत त्यानें संततीविषयींची जी आतुरता अनेक पात्रांच्या ठायीं उत्कटतेनें दाखविली आहे तीवरून असें अनुमान करावेंसें वाटतें. कालि-दासाच्या गुरूसंबंधानें कांहीं समजत नसलें तरी त्याचें अध्ययन काश्मिरांतच झालें असलें पाहिजे. व्याकरण, चाणक्याचें अर्थशास्त्र, भरताचें नाट्यशास्त्र, मनूचें धर्मशास्त्र, छंदःशास्त्र, वैद्यक, संगीत, चित्रकला, भारत, रामायण, तत्वज्ञान, पुराणकथा इत्यादि विषयांचें कमीअधिक अध्ययन त्यानें केलें होतें. काश्मीरचा इतिहास सांगणाऱ्या राजतरंगिणींत ज्या 'नीलमत'[१०] नांवाच्या पुराणग्रंथाचा उल्लेख केला आहे त्यांतीलहि बऱ्याच गोष्टींचा परिचय

सं. नि नं. ८०४ ता. ०३९२

कालिदास काश्मीरवासी होता असें दिसतें. शाकुन्तलांतील मालिनी नदी, अप्सरस्तीर्थ, रघुवंशांतील कुमुदनाग, कुमारसंभवांतील सिन्धु नदी इत्यादि स्थळें नीलमतांतहि सांगितलीं आहेत. कश्यपाश्रम म्हणजेच काश्मीर असेंहि त्यांत म्हटलें आहे. कालिदासाचें तत्त्वज्ञान काश्मिरांतील प्रत्यभिज्ञानसंप्रदायाचें होतें, असें श्री. लछमीधर कल्ला यांचें म्हणणें आहे.

कालिदासानें तत्कालीन भरतखंडांत बराच प्रवास केलेला दिसतो. रघूच्या दिग्विजयाचा प्रसंग, तसेंच मेघाला अलकेला जाण्याचा यक्षानें सांगितलेला मार्ग इत्यादि निमित्तांनीं त्यानें भरतखंडांतील अनेक स्थानांचें व तेथील विशिष्ट गोष्टींचें जें वर्णन केलें आहे तें पुस्तकी ज्ञानावरून केलेलें दिसत नाहीं, तीं प्रत्यक्ष पाहणाऱ्यानें केलेलें उघड दिसतें. कालिदासासारख्या विद्वान् व प्रतिभासंपन्न कवीला राजाश्रय मिळणें कठीण नव्हतें; व तसा तो उज्जयिनी येथील विक्रमादित्याकडून त्याला मिळाला होता. हा विक्रमादित्य क्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला आणि त्यानें आपल्या नांवानें प्रचलित केलेला शक अद्यापि भरतखंडांत मोठ्या प्रमाणावर चालू आहे.

कालिदासानें ऋतुसंहार व मेघदूत हीं खंडकाव्यें, कुमारसंभव व रघुवंश हीं महाकाव्यें, आणि मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय व शाकुन्तल हीं नाटकें रचिलेलीं प्रसिद्ध आहेत. या काव्यनाटकांनीं त्याची सर्वत्र प्रसिद्धि झाली व ती आजहि तशीच आहे.

५ वृत्ति, स्वभाव इत्यादि

उज्जयिनीस येऊन विक्रमाच्या आश्रयास राहण्यापूर्वी कालिदासाचा संबंध शुंग घराण्यांतील शेवटच्या राजाशीं असला पाहिजे, असें मालविकाग्निमित्रावरून दिसतें. राजाश्रयाशिवाय विद्वानांना शोभा नाहीं हें जसें खरें, तसें त्या आश्रयामुळें थोडेंसें मिंधेपणहि मनुष्याच्या अंगीं येतें. अग्निमित्र राजा वाईट नव्हता, पण प्रजाहितदाक्षिण्य त्याच्या अंगीं किती होतें याचें गमक त्याच्या धारिणी राणीच्या तोंडीं कालिदासानें "यदि राजकार्येषु ईदृशी निपुणता आर्यपुत्रस्य स्यात् तर्हि शोभनं भवेत्" (मा. १) असें जें वाक्य

घातलें आहे त्यांत चांगलें मिळतें. असें असतांहि कालिदासानें "आशास्यमभ्याधिगमात्प्रभृति प्रजानां संपद्यते न खलु गोतरि नाग्निमित्रे ॥" असें त्याचें स्तोत्र (मा. ५, भरतवाक्य) गायिलें आहे ! राजसभेंतील नित्याच्या भानगडी त्याला चांगल्या परिचित असत.

कालिदासाला राजाश्रय असला तरी प्रथम प्रथम त्याला कांहीं चटके बसलेले असले पाहिजेत. विक्रमोर्वशीय लिहून होईपर्यंत तरी त्याला विशेषशी सुस्थिति लाभलेली नसावी. म्हणून त्या नाटकाच्या भरतवाक्यांत त्यानें "परस्परविरोधिन्योरेकसंश्रयदुर्लभम् । संगतं श्रीसरस्वत्योर्भूतयेऽस्तु सदा सताम् ॥" अशी प्रार्थना केली आहे. पुढेंहि त्याच्यावर कांहीं आपत्ति आलेल्या असाव्या असें अनुमान मेघदूतांतील यक्षाच्या पात्रावरून कित्येकजण करितात.

कालिदासाच्या ठायीं मुलांविषयीं उत्कट प्रेम असावें. "स्पृहयामि खलु दुर्ललितायास्मै ।" असें म्हणून "अंकाश्रयप्रणयिनस्तनयान्वहन्तो धन्यास्तदंगरजसा मलिनीभवंति ॥" (शा. ७, १७) असे उद्गार काढणाऱ्या दुष्यन्ताच्या शब्दांवरून आणि "सर्वांगीणः स्पर्शः सुतस्य" (वि. ५, ११) या पुरूरव्याच्या वचनावरून तसें अनुमान होतें.

कालिदास गृहस्थाश्रमाचा पुरस्कर्ता दिसतो. गृहस्थाश्रमाला तो "सर्वोपकारक्षम" (र. ५, १०) असा आश्रम म्हणतो. स्त्रियांविषयीं त्याचे विचार सामान्यतः औदार्यपूर्ण व दाक्षिण्यात्मक आहेत. त्याचे सारे नायक गुलहौशी असले व त्यांचें प्रेम बहुतेक फुलपाखरासारखें असलें तरी त्यांपैकीं कोणीहि स्त्रियांचा अनादर बुद्धिपुरस्सर करीत नाहीं. स्त्रिया रागावल्या असतां ते सारे कावरेबावरे होतात. हंसपदिका राणीनें गाण्याच्या निमित्तानें दुष्यन्ताला टोमणा मारिला असतां त्यानें मनाशीं आपली चूक मान्य केली व तिचें वरकरणीं कां होईना समाधान करण्याचा यत्न केला (शा. ५). अग्निमित्राचा एवढा खटाटोप मालविकेच्या प्राप्तीसाठीं चालला असतां पहिल्या राण्यांना न दुखवावें म्हणून तो तितकाच जपत असतो. कालिदास

स्त्रीशिक्षणाचा पुरस्कर्ता होता व तदनुसार त्यानें बहुतेक महत्त्वाचीं स्त्रीपात्रें लिहिणारीं, वाचणारीं व नृत्यगायनादिकलाकुशल अशीं दाखविलीं आहेत.

कालिदासाला ललितकलांची विशेष आवड दिसते. संगीत व चित्रकला यांत तो चांगला मार्मिक होता. ललितकलांबरोबर शिकारीसारखे मर्दानी खेळ व व्यायाम यांचाहि तो शौकी असावा. लोक शिकारीला व्यसन म्हणोत, पण तिच्यासारखें विनोदाचें दुसरें साधनच नाहीं असें त्यानें म्हटलें आहे (शा. २, ५).

६ उपास्य दैवत व अंतिम आकांक्षा

कालिदास शिवोपासक होता. त्याच्या नाटकांच्या सर्व नांद्या शिवस्तुतिपर आहेत. ब्रह्मा, विष्णु, महेश हे तत्त्वतः एकच असें तो म्हणतो (कु. ७,४४), तरी शिवाविषयींचा त्याचा आदर विशेष आहे. ब्रह्मदेव व विष्णु यांचेंहि वर्णन व स्तोत्रगायन त्यानें मोठ्या गौरवानें केलें आहे, तथापि त्याच्याहून शिव श्रेष्ठ असें तो प्रसंगानें सांगतो (कु. २, ५८); आणि त्याचा वैयक्तिक संबंध शिवाशींच आहे. रघुवंशाच्या आरंभीं शिवपार्वतींनाच त्यानें वंदन केलें असून मेघदूतांत शंकराच्या साऱ्या गणगोताचें वर्णन अत्यंत भक्तिभावानें त्यानें केलें आहे (पूर्वमेघ). जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होणें ही कालिदासाची भारतीय तत्त्वज्ञानानुसार अंतिम आकांक्षा असून ती पुरावी म्हणून शाकुन्तलाच्या भरतवाक्यांत शिवाचीच प्रार्थना त्यानें केली आहे. त्याचा शिवाविषयींच्या भक्तीचा उमाळा " या नः प्रीतिर्विरूपाक्ष त्वदनुध्यानसंभवा । सा किमावेद्यते तुभ्यमन्तरात्मासि देहिनाम् ॥ " (कु. ६,२१) या श्लोकांत उत्तम रीतीनें दिसून येतो.

टीपा

(१) ही कथा अशी आहे:—कालिदास हा मूळ ब्राह्मणपुत्र असून त्याचे आईबाप तो लहान असतांच निवर्तल्यामुळें एका वंजाऱ्यानें त्याला आपला मुलगा म्हणून वाढविलें. तो मोठा झाला तरी त्याला शिक्षणसंस्कार नव्हता; पण जात्याच तो उमदा व सुरूप होता, त्यामुळें काशीराजाच्या मंत्र्याच्या साह्यानें त्याचा काशीराजाच्या कन्येशीं विवाह घडून आला. ही राजकन्या विदुषी होती. अर्थात् कालिदासाचें पूर्ण अज्ञान तिच्या दृष्टीस आल्याबरोबर तिनें त्याची कानउघाडणी केली व त्याला कालीदेवीची उपासना करावयास सांगून तिच्यापासून विद्या संपादावयास लाविलें. त्याप्रमाणें काली प्रसन्न होऊन तिनें त्या वंजारीपुत्राला विद्वत्ता व काव्यस्फूर्ति दिली आणि त्यामुळें त्यानें कृतज्ञतेनें कालिदास हें नांव धारण केलें.

दुसऱ्या एका कथेप्रमाणें कालिदास हा कुमारदासनामक लंकेशाचा मित्र होता; व त्या राजाच्या नगरींत तो राहत असतां एका वेश्येनें त्याचा वध केला.

कालिदासाची सांगड भवभूतीशीं घालून त्यांना कित्येकांनीं समकालीनहि केलेलें आढळतें. पण कालिदास अनेक होते हें लक्षांत ठेविलें म्हणजे या सर्वांचा उलगडा होतो.

(२) "विनीताध्वश्रमास्तस्य सिन्धुतीरविचेष्टनैः।
दुधुवुर्वाजिनः स्कन्धाल्लग्नकुङ्कुमकेसरान्॥"—र. ४, ६७

(३) **The Birthplace of Kalidasa** by Pandit Laxmidhar Kalla Shastri, Delhi, 1926. वसिष्ठाश्रम-वंगठ, कश्यपाश्रम-काश्मीर, भूतेश्वरतीर्थ, अमृतह्रद, मालिनी नदी, सप्तर्षितीर्थ, ब्रह्मसर, कुमुदनाग, गौरीशिखर, अप्सरस्तीर्थ, सिन्धु इत्यादि कालिदासाच्या ग्रंथांत आलेलीं सारीं ठिकाणें व तीर्थादिकांचीं नांवें काश्मीरवर्णनात्मक अशा 'नीलमत' नांवाच्या ग्रंथांत सांगितलेलीं आहेत. तसेंच भाताच्या पिकाचें कालिदासाचें वर्णन, सूर्योपासना, त्याचीं धर्मविषयक व तत्त्वज्ञानविषयक मतें यांचा संबंध काश्मिराशीं आहे, असें पं. कल्लाशास्त्री यांनीं आपल्या निबंधांत सविस्तर दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

(४) **Date of Kalidas and a Historic Survey of His Works**–Bombay University Prize Essay by Prof. R. N. Apte, M.A., LL.B., गोपाल रघुनाथशास्त्री नंदर्गीकर यांची रघुवंशाच्या इंग्रजी आवृत्तीला जोडलेली विस्तृत प्रस्तावना.

(५) प्रो. पां. वा. काणे यांची उत्तररामचरित्राची आवृत्ति. या आवृत्तींत घनश्यामाची टीका आहे. या घनश्यामानें कालिदासाच्या शाकुन्तलावरहि टीका लिहिली असून तिचा उल्लेख उत्तररामचरित्रावरील टीकेंत अनेक ठिकाणीं आढळतो. घनश्यामानें कुमारसंभव, रघुवंश व शाकुन्तल या ग्रंथांतील उतारे आपल्या टीकेंत घेऊन ते भर्तृमीढ आणि ईश्वरकृष्ण यांच्या माथीं मारिले आहेत. ' न विदीर्ये कठिनाः खलु स्त्रियः । ' इति कुमारसंभवे (४, ५) ईश्वरकृष्णमिश्रस्यैवं दयनीयः; ' गङ्गाप्रपातान्तविरूढशष्पम् । ' (र. २. २६) इति ईश्वरकृष्णमिश्रः, ' शक्यमरविन्दसुरभिः ' । (शा. ३, ५) इति भर्तृमीढश्च; ' अनुष्ठितानन्तरजा ' (र. ७, ३२) इति भर्तृमीढप्रयोगवत्; ' शैत्यं हि यत् सा प्रकृतिर्जलस्य ' (र. ५, ५४) इति भर्तृमीढः, ' शैत्यं हि या सा प्रकृतिर्जलस्य ' इति ईश्वरकृष्णमिश्रः; ' तस्मिन्विप्रकृता काले ' (कु. सं. २,१) इति ईश्वरकृष्णमिश्रः। या उताऱ्यांत ' शैत्यं हि यत् ' या वचनाचा तर दोनदां उल्लेख असून एकदां तो भर्तृमीढाचा तर दुसऱ्या वेळीं तो ईश्वरकृष्णाचा असें घनश्याम म्हणतो !

घनश्याम कालिदास या नांवाचा उल्लेख करतो; पण तो कोणत्या कालिदासाचा हा प्रश्न आहे. भवभूतींसंबंधीं लिहितांना तो म्हणतो, ' अथ कालिदाससमानकालीनः भोजराजाश्रयः श्रीकण्ठनामा " साम्बा पुनातु भवभूतिपवित्रमूर्तिः " इति श्लोकनिर्माणवेलागुणवशादानन्दभरितेन राज्ञैव भवभूतिरिति ख्यापितः कविः । ' यांत घनश्यामानें कालिदास व भवभूति यांना समकालीन करून भोजराजाचे आश्रित मानिलें आहे. तसेंच आणखी एका ठिकाणीं ' अन्तर्मुखेऽप्युच्छृंखलवृत्तौ कालिदासकवौ ' असेंहि कालिदासाविषयीं तो म्हणतो. हीं दोन्ही वर्णनें भोजप्रबंधाला धरून आहेत व त्यांत घनश्यामानें चिकित्साबुद्धि फारशी दर्शविलेली दिसत नाहीं. इंग्लंडांतील आर्थरराजा व त्याचे गोलमंचाभोंवतीं बसणारे सहायक वीर यांच्या अद्भुत कथा, फ्रान्समधील शार्लमेनच्या कथा व आमच्याकडील भोजराजा व कालिदास यांच्या कथा एकाच माळेंत बसण्यासारख्या आहेत.

'उपमा कालिदासस्य' या सुप्रसिद्ध वचनाचाहि घनश्याम उल्लेख करतो. पण त्यांतहि शाकुन्तलादिकांचा कर्ताच त्याला अभिप्रेत आहे असें म्हणवत नाहीं. अतएव 'सुभगमपराद्धं युवतिषु' इत्यस्मद्व्याख्यातशाकुन्तले (३, ७), तसेंच आणखी 'वयं तत्त्वान्वेषात्' इत्यस्मद्व्याख्यातशाकुन्तले, (१, २०), 'स्वप्नो नु माया' इत्यस्मद्व्याख्यातशाकुन्तलश्लोकानुकारिणमिव (६, १०), 'किमिवहि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम्' इत्यस्मद्व्याख्यातशाकुन्तले, (१, १७) इत्यादि शाकुन्तलवचनांचा उल्लेख करतांना तो कालिदासाचें नांव घेत नाहीं. तात्पर्य, घनश्याम हा रघुवंशशाकुन्तलादिकांच्या कर्त्याला कालिदास हें नांव देत नसून त्याचा कालिदास म्हणजे भोजराजाचा आश्रित असा उच्छृंखल वृत्तीचा कोणी कवि होय. त्याच्या मतें शाकुन्तलादिकांच्या कर्त्याचें नांव भर्तृमेंढ किंवा ईश्वरकृष्ण असें होतें.

(६) "अभिहितोऽस्मि विद्वत्परिषदा कालिदासग्रथितवस्तु मालविकाग्निमित्रं नाम नाटकमस्मिन्वसन्तोत्सवे प्रयोक्तव्यमिति ।" (मा. १); "सोऽहमद्य कालिदासग्रथितं विक्रमोर्वशीयं नामापूर्वं नाटकं प्रयोक्ष्ये ।" (वि. १); "अद्य खलु कालिदासग्रथितवस्तुनाभिज्ञानशाकुन्तलनामधेयेन नवेन नाटकेनोपस्थातव्यमस्माभिः ।" (शा. १).

(७) "धन्वन्तरिः क्षपणकोऽमरसिंहशंकुवेतालभट्टघटकर्परकालिदासाः । ख्यातो वराहमिहिरो नृपतेः सभायां रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य ॥" हा श्लोक ज्योतिर्विदाभरण नामक एका ज्योतिषग्रंथांतील आहे. यांत गोंविलेल्या रत्नांतील कित्येक रत्नांविषयीं असाच दुसरा श्लोक पाहा:—

"ब्राह्मण्यामभवद्वराहमिहिरो ज्योतिर्विदामग्रणी । राजा भर्तृहरिश्च विक्रमनृपः क्षत्रात्मजायामभूत् ॥ वैश्यायां हरिचन्द्रवैद्यतिलको जातश्च शंकुः कृती । शूद्रायाममरः षडेव शबरस्वामिद्विजस्यात्मजाः ॥" (प्रो. काणे यांचा उत्तरमीमांसेवरील लेख) या श्लोकांत वराहमिहिर, भर्तृहरि व विक्रम हे राजे, हरिचंद्र, शंकु व अमरसिंह हे मीमांसाभाष्यकार शबरस्वामीचे निरनिराळ्या वर्णांच्या स्त्रियांपासून झालेले पुत्र होत असें म्हटलें आहे. असल्या श्लोकांवरून कांहीं अनुमान काढणें म्हणजे केवळ जलताडन होय.

(८) ऐहोळेच्या दुसऱ्या पुलकेशीच्या ताम्रलेखांत "येनायोजि न वेश्म स्थिरमर्थविधौ विवेकिना जिनवेश्म । स जयतां रविकीर्तिः कविताश्रितकालिदास-

भारविकीर्तिः । ” असा कालिदासाचा उल्लेख आहे. हा ताम्रलेख शके ५५६ म्हणजे इ. स. ६३४ मधील आहे.

(९) हें विधान कालिदासानें कुमारसंभव, रघुवंश इत्यादि ठिकाणीं केलेल्या वसंतवर्णनांतील गोष्टींवरून केलेलें आहे. शंकर ज्या आश्रमांत तप करीत होता तेथें इन्द्राच्या आज्ञेवरून मदन आला असतां त्याला साह्य करण्यासाठीं वसंतानेंहि तिकडे धांव घेतली. त्याबरोबर रवि दक्षिण दिशा सोडून उत्तर दिशेंत गेला असा तात्पर्यार्थ “ कुबेरगुप्तां दिशमुष्णरश्मौ गन्तुं प्रवृत्ते समयं विलंघ्य । दिग्दक्षिणा गन्धवहं मुखेन व्यलीकनिश्वासमिवोत्ससर्ज ॥ ” (कु. ३,२५) या श्लोकांत आला आहे. म्हणजे दक्षिण दिशा सोडून रवि उत्तर दिशेला गेला असतां वसंत ऋतु चालू होतो असें झालें. त्याबरोबर दक्षिण दिशा कष्टी होऊन निःश्वास टाकूं लागली, म्हणजे उत्तरायण चालूं होऊन दक्षिण वायु वाहूं लागला. अर्थात् दक्षिणायनाचा अंत व वसंताचा आरंभ हे एक होत, असें कालिदास व त्याचा टीकाकार मल्लिनाथ यांच्या मतें ठरलें. परंतु ज्योतिषसिद्धान्तग्रंथांत सांगितलेलें दक्षिणायन मकरसंक्रमणाबरोबर संपतें व वसंताच्या म्हणजे मेष-संक्रांतीच्या आरंभीं अर्धें उत्तरायण होऊन जातें.

हाच अर्थ पुनः “ जिगमिषुर्धनदाध्युषितां दिशं रथयुजा परिवर्तितवाहनः । दिनमुखानि रविर्हिमनिग्रहैर्विमलयन्मलयं नगमत्यजत् ॥ ” या श्लोकांतहि (र. ९, २५) आला आहे. वसंत ऋतु चालू होण्याच्या सुमारास दशरथाला मृगया करण्याची इच्छा झाली, त्या वेळचें हें वर्णन आहे. उत्तर दिशेकडे आपले घोडे वळवीत सूर्यानें हिमाचा निग्रह करून प्रातःकाळचा समय स्वच्छ केला आणि मलय पर्वताचा म्हणजे दक्षिण दिशेचा त्याग केला. तात्पर्य, दक्षिण दिशेचा त्याग, उत्तर दिशेंत प्रवेश, थंडी नाहींशी होणें व वसंताचा आरंभ या गोष्टी समकालीन झाल्या.

या निर्देशासमवेत दुसरीहि पोषक वचनें आढळतात. उदाहरणार्थ, दक्षिणायनाला कालिदास ‘ अगस्त्यचिह्न ’ अयन (र. १६, ४४) म्हणतो. कारण, अगस्त्याच्या उदयापासून त्याला आरंभ होतो किंवा अगस्त्याची तारा ज्या दिशेंत आहे त्या दिशेंत सूर्य त्या अयनांत असतो. यावरून दक्षिणायन व उत्तरायण याविषयींच्या कालिदासाच्या कल्पना स्पष्ट होतात.

(१०) 'नीलमत' हा काश्मीरचा प्राचीन दंतकथात्मक इतिहास व त्यांतील तीर्थक्षेत्रादिकांचें वर्णन करणारा पुराणग्रंथ असून त्याचें प्रस्तुत स्वरूप इ. स. ६व्या शतकापूर्वीचें नाहीं. त्यांत बुद्धाला विष्णूचा अवतार मानून त्याच्या उत्सवांचा उल्लेख आढळतो ('बुद्धार्चास्थापनं कार्यम्।' श्लो. ८१३), यावरून डॉ. बुह्लर यानें तसें अनुमान काढलें आहे. त्याचें मूळ त्याहून प्राचीन असलें पाहिजे; कारण त्याचें पुनर्लेखन झालेलें होतें (नीलमत श्लो. १०४२). नील हा नाग होता व त्यानें पूर्वी सांगितलेलें मत 'कालदोषसमुच्छिन्न' झालें, पण तें सर्व आतां माझ्या सांगण्याप्रमाणें कर, असें बृहदश्वानें गोनन्द राजाला सांगितल्याचें त्यांत वर्णन आहे.

प्रकरण दुसरें

कालिदासाची ग्रंथरचना व ग्रंथांचें पौर्वापर्य

कालिदासानें आपलीं काव्यें व नाटकें लिहिण्यापूर्वी सामान्य विद्यांसमवेत पूर्वींचीं नाटकें व काव्यें यांचा अभ्यास केला होता. पूर्व ग्रंथकारांपैकीं नाट्यशास्त्रकार भरत, नाटककार भास-सौमिल्ल-कविपुत्रादि, रामायणकार वाल्मीकि, यांचा त्यानें आपल्या ग्रंथांत नामनिर्देश केला असून योगविद्या-विशारद जैमिनि (र. १८,३३.), इतर नाटककार आणि पूर्वसूरि यांचा मोघम उल्लेख केला आहे. प्रथम त्यानें मालविकाग्निमित्र हें नाटक लिहिलें. त्या वेळीं तो अर्थात् कवि म्हणून प्रसिद्ध नव्हता. त्या नाटकाच्या प्रस्तावनेंत, " प्रथितयशसां भाससौमिल्लकविपुत्रादीनां प्रबन्धानतिक्रम्य वर्तमानकवेः कालिदासस्य क्रियायां कथं...बहुमानः ।" म्हणजे " सुप्रसिद्ध अशा भास, सौमिल्ल, कविपुत्र आदिकरून नाटककारांचीं नाटकें मागें सारून चालू कवि

जो कालिदास त्याच्या नाटकाला कसा मान मिळेल ?" असा पूर्वपक्ष करून "जुनें तेवढें सगळेंच चांगलें असें नाहीं आणि काव्य नवें असलें म्हणजे निंद्य असतें असेंहि नाहीं, यास्तव सुज्ञ लोक योग्य परीक्षा करून कोणतें ग्राह्य तें ठरवितात, मूर्ख मात्र दुसऱ्याच्या निर्णयावर विसंबून चालतात," असा जो उत्तरपक्ष केला आहे त्यावरून मालविकाग्निमित्र ही कालिदासाची पहिली कृति होती असें दिसून येतें.

कालिदास या नांवावर सांप्रत सुमारें एकेचाळीस लहानमोठे विविध विषयांवरील ग्रंथ प्रत्यक्ष किंवा नांवानें माहीत आहेत[१]. परंतु त्यांतील कविकुलगुरु पदवी पावलेल्या कालिदासाचे निःसंशय असे सहाच होत. ते म्हणजे मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय व शाकुन्तल हीं नाटकें आणि कुमारसंभव, मेघदूत आणि रघुवंश हीं काव्यें. ऋतुसंहार हें ऋतुवर्णनपर शृंगारमय खंडकाव्य सर्वच पंडित त्या कालिदासाचें मानीत नाहींत. तथापि बाबु अरविंद घोष, कविवर्य रवीन्द्रनाथ ठाकुर, कीथ, मॅक्डोनेल इत्यादि मोठमोठे भारतीय व पाश्चात्य पंडित त्याला कविकुलगुरूचेंच मानीत असल्यामुळें त्याचाहि समावेश येथें केला आहे. हें खंडकाव्य त्याचेंच धरिल्यास तें मालविकाग्निमित्रानंतर लिहिलें कीं आधीं लिहिलें हें सांगणें कठीण आहे. पण कांहीं झालें तरी तें इतर पांच ग्रंथांच्या पूर्वीचें मात्र असलें पाहिजे व बहुधा मालविकाग्निमित्रानंतरचें तें असावें.

मालविकाग्निमित्रावरून कालिदासाची नाटककार म्हणून थोडीबहुत प्रसिद्धि झाली तेव्हां त्यानें विक्रमोर्वशीय हें दुसरें नाटक लिहिलें. मालविकाग्निमित्रांतील पात्रें तत्कालीन समाजांत प्रत्यक्ष वावरणाऱ्या माणसांतून घेतलेलीं आहेत. पण विक्रमोर्वशीयांत अतिमानुष सामर्थ्याचीं पात्रें घेतलीं असून उच्च अशा काल्पनिक वातावरणांत भराऱ्या मारण्याचा यत्न कालिदासानें केला आहे. या नाटकाच्या प्रस्तावनेंत त्याला अपूर्व नाटक म्हटलेलें असून त्याचा कर्ता कालिदास प्रेक्षकांना विश्रुत असलेला असा दाखविला आहे. "सावधान मनानें ही कालिदासाची कृति ऐका"—"श्रुणुत मनोभिरवहितैः क्रियामिमां

कालिदासस्य। " असे त्यांतील शब्द आहेत. मालविकाग्निमित्रांत घेतल्याप्रमाणें या नाटकांत कालिदासाच्या नवीनपणाविषयीं कांहीं आक्षेप घेतलेला नाहीं.

या दोन नाटकांनीं कालिदासाचें प्रतिभासंपन्नत्व स्थापित झालें, तेव्हां यानें तिसरें अभिज्ञानशाकुन्तल हें नाटक लिहिलें. शाकुन्तलाच्या प्रस्तावनेंत कवीच्या नांवाचा इतका सहज उल्लेख केलेला आहे कीं, त्यावरून त्याची पूर्वप्रसिद्धि चांगलीच लक्षांत येते. "आज म्हणाल तर कालिदासानें रचिलेल्या कथानकाचें जें अभिज्ञानशाकुन्तल नामक नवें नाटक त्याचा प्रयोग करून श्रोत्यांची सेवा करावयाची आहे"–"अद्य खलु कालिदासग्रथितवस्तुनाभिज्ञानशाकुन्तलनामधेयेन नवेन नाटकेनोपस्थातव्य-मस्माभिः।" अशा शब्दांनीं या नाटकाची ओळख करून दिली आहे. शाकुन्तलांतील वातावरण पहिल्या दोन नाटकांतील वातावरणांपेक्षां निराळ्या प्रकारचें असून फार उच्च व पवित्र आहे. तिन्ही नाटकांत शृंगाररसच प्रधान असला तरी त्याचें स्वरूप उत्तरोत्तर उदात्त होत गेलें आहे व त्यावरूनहि या नाटकांचा आतां लाविला असाच कालानुक्रम लागतो.

काव्यांचा विचार करतां ऋतुसंहार, कुमारसंभव, मेघदूत व रघुवंश असा कालिदासाच्या या कृतींचा कालानुक्रम लावितां येतो. मालविकाग्निमित्र ही याची पहिली कृति, ऋतुसंहार ही दुसरी व त्यानंतर कुमारसंभवाचा क्रम लागतो. कुमारसंभवांतील कथानकाचा उल्लेख कालिदासानें या दोन ग्रंथां-शिवाय इतर सर्वांत केलेला आहे, त्यावरून त्या दोहोंनंतर व इतरांच्या पूर्वीं कुमारसंभवाची रचना झालेली असली पाहिजे.[२]

कुमारसंभवांत कुमाराचा म्हणजे कार्तिकेयाचा सेनापत्याभिषेक हा एक महत्वाचा विषय असून त्याचा उल्लेख विक्रमोर्वशीयांत मोठ्या खुबीनें केलेला आहे. पुरूरव्याचा पुत्र आयु याचा यौवराज्याभिषेकसमारंभ पाहून नारद म्हणतो, "तुझा पुत्र आयु याचें हें यौवराज्यवैभव पाहून इंद्रानें शिवपुत्र महासेनाला देवसेनापत्याचा अभिषेक केला त्याची आठवण होते"–"आयुषो यौवराज्यश्रीः स्मारयत्यात्मजस्य ते। अभिषिक्तं महासेनं सैनापत्ये मरुत्वता॥"

(वि. ५, २३). या उल्लेखावरून असें दिसतें कीं, कुमारसंभवांतील हा प्रसंग विक्रमोर्वशीय लिहितांना कालिदासासमोर होता.

विक्रमोर्वशीयानंतर शाकुन्तल व मेघदूत यांचा क्रम लागतो. कालिदासाच्या पहिल्या म्हणजे मालविकाग्निमित्र नाटकाचें स्थळ उत्तरेकडे मगध आणि दक्षिणेकडे विदर्भ म्हणजे वऱ्हाड यांमधील दशार्ण नांवाच्या देशाची राजधानी जी विदिशा तें होय. विक्रमोर्वशीयांतील मुख्य स्थळ गंगायमुनांच्या संगमावरील प्रतिष्ठान नांवाचें नगर म्हणजे प्रस्तुतचें प्रयाग हें होय. शाकुन्तलाचें स्थळ हस्तिनापुर म्हणजे सांप्रतच्या दिल्लीच्या जवळचें प्राचीन नगर व तेथून पांचसहा तासांच्या पायवाटेवरील मालिनी नदीच्या कांठीं असलेला कण्वाश्रम हें आहे. कुमारसंभवाचें हिमालय पर्वतावरील प्रदेश हे होत. कालिदास मूळचा काश्मीरवासी होता व नंतर तो कांहीं काळ शुंग घराण्याचा आश्रय करून पुढें माळव्यांत उज्जयिनी येथें विक्रमादित्याचा आश्रित झाला, असें धरिल्यास तेवढ्या अवधींत झालेल्या प्रवासांत दृष्टीस पडलेल्या ठिकाणांबाहेरील स्थलांचा उल्लेख मालविकाग्निमित्र, कुमारसंभव, विक्रमोर्वशीय व शाकुन्तल यांत नसल्यामुळें हे ग्रंथ व तेवढा प्रवास यांची सांगड घालणें योग्य दिसतें. दुसऱ्याहि एका गोष्टीमुळें शाकुन्तलानंतरच मेघदूत व रघुवंश यांची रचना झाली असें दिसतें. ऋतुसंहार व उपर्युक्त चार ग्रंथ यांत कवीची सर्वत्र उल्लसित वृत्ति दिसून येते. विक्रमोर्वशीय व शाकुन्तल हीं मध्यंतरीं गंभीर प्रसंग घालूनहि त्यानें आनंदपर्यवसायी केलीं. पण पुढें कालिदासाच्या मनावर कोणत्या तरी कारणानें उद्विग्नतेची छटा उमटलेली दिसते; आणि ती मेघदूत व रघुवंश यांतून दृग्गोचर होते. हीं दोन्ही काव्यें दुःखपर्यवसायी आहेत. या उद्विग्नतेचें कारण बहुधा पत्नीविरह व नंतर तिचें मरण असें कांहीं तरी असावें. या उद्विग्न मनःस्थितीचें बीज मूळ त्याच्या आश्रयदात्या राजाच्या अवकृपेनें पेरलेलें असलें पाहिजे व त्याचें दिग्दर्शन शाकुन्तलाच्या भरतवाक्यांत आढळून येतें. " प्रवर्ततां प्रकृतिहिताय पार्थिवः । " म्हणजे " राजा प्रजेच्या हितासाठीं झटो " आणि " सर-

स्वती श्रुतमहतां महीयसाम् । " म्हणजे " सरस्वती विद्येनें मोठपणा मिळविलेल्या कवींचें कल्याण करो " असें त्यानें त्या वाक्याच्या प्रथमार्धांत म्हटलें आहे. असें म्हणण्याचें कारण काय? कवीच्या मनाला कांहीं आंच लागलेली असल्याशिवाय असे उद्गार त्यानें कां काढावे? मालविकाग्निमित्रांतील आशा-वादी भरतवाक्याची या शाकुन्तलांतील भरतवाक्याशीं तुलना केल्यास त्यांत दिसून येणारें महदंतर काय दाखवितें? कवीवर राजाचा रोष झालेला होता व त्यामुळें त्याच्यावर कांहीं आपत्ति ओढवणार आहे असें सूचित करून शाकुन्तलांतील भरतवाक्यांत ती आपत्ति टळो अशी प्रार्थना केली आहे आणि ती टळली नाहीं आणि तींतच मृत्यु आला तर या " जन्म-मरणाच्या बंधनांतून शिवस्वरूपी परमेश्वर माझी मुक्तता करो " असें मागणें शेवटीं कालिदासानें मागितलें आहे. " ममापि च क्षपयतु नीललोहितः । पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभूः ॥ "

शाकुन्तलाच्या समाप्तीनंतर त्याजवर कांहीं काळ स्त्रीविरहाचा प्रसंग आला. हा प्रसंग त्यानें मेघदूतांत गोंविला आहे असें वल्लभनामक टीका-कारानें ध्वनित केल्याचें प्रथम प्रकरणांत सांगितलें आहे. मेघदूतावरून कालिदास या निबंधांत रा. मोडक यांनींहि असाच एक तर्क काढला आहे. हा स्त्रीविरहाचा अवधि संपल्यावर कालिदासानें रघुवंश हें काव्य लिहिलें. हें काव्य लिहिल्यावर त्याच्या हातून आणखी कांहीं ग्रंथरचना झाली नाहीं.

मेघदूत लिहिण्यासारखा जो कालिदासावर प्रसंग आला, त्यामुळें बहुधा त्याच्याकडून तीर्थाटनाच्या निमित्तानें भरतखंडाच्या सर्व भागांत प्रवास घडून आला. या प्रवासांत त्यानें टिकटिकाणच्या परिस्थितीचें निरीक्षण करून जो ज्ञानसंग्रह केला, त्यांचा त्यानें रघुवंशांत उपयोग केलेला दिसून येतो. या प्रवासांतील त्याचें निरीक्षण व मिळविलेलें भरतखंडाचें भौगोलिक ज्ञान रघुवंशांत चौथा, सहावा व तिसरा या सर्गांत योग्य प्रसंग साधून त्यानें संगृहीत केलेलें आढळतें. अशा रीतीनें कालिदासाच्या सात ग्रंथांचा काला-

नुक्रम १ मालविकाग्निमित्र, २ ऋतुसंहार, ३ कुमारसंभव, ४ विक्रमोर्वशीय, ५ शाकुन्तल, ६ मेघदूत व ७ रघुवंश असा लावतां येतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि नं. ५६२
ता.
ठाणें.

टीपा

(१) कालिदास या नांवावर ज्ञात असलेल्या ग्रंथांची नामावली:—
१ शाकुन्तल, २ विक्रमोर्वशीय, ३ मालविकाग्निमित्र, ४ रघुवंश, ५ कुमारसंभव, ६ मेघदूत, ७ कुन्तेश्वरदौत्य, ८ ऋतुसंहार, ९ अम्बास्तव, १० कल्याणस्तव, ११ कालीस्तोत्र, १२ काव्यनाटकालंकाराः, १३,१४ गंगाष्टकें, १५ घटकर्पर, १६ चण्डिकादण्डकस्तोत्र, १७ चर्चास्तव, १८ ज्योतिर्विदाभरण, १९ दुर्घटकाव्य, २० नलोदय, २१ नवरत्नमाला, २२ पुष्पबाणविलास, २३ मकरन्दस्तव, २४, २५ मंगलाष्टकें, २६ महापद्मषट्क, २७ रत्नकोश, २८ राक्षसकाव्य, २९ लक्ष्मीस्तव, ३० लघुस्तव, ३१ विद्वद्विनोदकाव्य, ३२ वृन्दावनकाव्य, ३३ वैद्यमनोरमा, ३४ शुद्धिचंद्रिका, ३५ शृंगारतिलक, ३६ शृंगाररसाष्टक, ३७ शृंगारसारकाव्य, ३८ श्यामलादंडक, ३९ श्रुतबोध, ४० सप्तश्लोकी रामायण, ४१ सेतुबंध (मो. रा. काळे यांच्या प्रस्तावना).

(२) कुमारसंभवांतील कथानकांचे उल्लेखः—**शाकुन्तलः** "अद्यापि नूनं हरकोपवह्निस्त्वयि ज्वलत्यौर्व इवाम्बुराशौ । त्वमन्यथा मन्मथ मद्विधानां **भस्मावशेषः** कथमेवमुष्णः॥"(३, २). **मेघदूतः** " तत्र स्कन्दं नियतवसतिं पुण्यमेधीकृतात्मा पुष्पासारैः स्नपयतु भवान्व्योमगंगाजलार्द्रैः । रक्षाहेतोर्नवशशिभृता वासवीनां चमूनामत्यादित्यं **हुतवहमुखे संभृतं तद्धि तेजः** ॥ " १, ४५. **विक्रमोर्वशीयः** " अभिषिक्तं महासेनं सैनापत्ये मरुत्वता । " ५, २३. **रघुवंशः** " उमावृषांकौ शरजन्मना यथा । " ३, २३; " कुमारकल्पं सुषुवे कुमारम् । " ५, ३६; " यो हेमकुम्भस्तननिःसृतानां स्कन्दस्य मातुः पयसां रसज्ञः । " २, ३६; "अथैनमद्रेस्तनया शुशोच सेनान्यमालीढमिवासुरास्त्रैः । " २, ३७; " अथोपयन्त्रासदृशेन युक्तां स्कन्देन साक्षादिव देवसेनाम् । " ७, १; "रतेर्गृहीतानुनयेन कामं प्रत्यर्पितस्वांगमिवेश्वरेण ।" ६,२; "नगरन्ध्रकरौजसः।"

९, २; “ स्थाणुदग्धवपुषस्तपोवनम् । ” ११, १३; “ षडाननापीतपयोधरासु नेता चमूनामिव कृत्तिकासु । ” १४, २२ इत्यादि.

(३) हे सर्व ग्रंथ एकाच कालिदासाचे होत कीं नाहीं याविषयीं कित्येक वर्षांपूर्वी पाश्चात्य संस्कृतज्ञांस शंका होती. पण आतां ऋतुसंहाराशिवाय त्या बाबतींत वाद राहिलेला दिसत नाहीं. प्रो. अश्वत्थामाचार्य गजेन्द्रगडकर यांनीं आपल्या ऋतुसंहाराच्या आवृत्तींत जोहानेस नोवेल यांच्या याविषयींच्या विरुद्ध मताचा उल्लेख करून ऋतुसंहार हें कालिदासाचेंच काव्य होय असें प्रतिपादिलें आहे. मालविकाग्निमित्रासंबंधाच्या संशयाचें निरसन शं. पां. पंडित यांनीं त्या नाटकाच्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत केलें आहे.

कालिदासाच्या या उपरिनिर्दिष्ट ग्रंथांत परस्परसदृश अशीं स्थळें अनेक प्रकारांनीं आठवत असून त्यांवरून त्यांचें एककर्तृकत्व व्यक्त होतें. स्थलाभावीं त्यांतील कित्येकांचा मात्र येथें उल्लेख करितों.

(१) **मालविकाग्निमित्र** व **शाकुन्तलः** मालविकाग्निमित्राच्या पहिल्या अंकांतील गणदास व हरदत्त यांचीं राजाचीं वर्णनें व शाकुन्तलाच्या पांचव्या अंकांतील वैतालिकांचीं वर्णनें. (२) **विक्रमोर्वशीय** व **शाकुन्तलः** एकावलि वेलीच्या जाळीला अडकल्याचें मिष करून राजाकडे पाहत उर्वशी म्हणते, “ अहो लताविटप एकावली वैजयन्तिका मम लग्ना । चित्रलेखे मोचय तावदेनाम् ॥ ” शाकुन्तलेच्या अशाच स्थितीचें वर्णन “ दर्भाङ्कुरेण चरणः क्षत इत्यकाण्डे तन्वी स्थिता कतिचिदेव पदानि गत्वा । आसीद्विवृत्तवदना च विमोचयन्ती शाखासु वल्कलमसक्तमपि द्रुमाणाम् ॥ ” (शा. २, १२) असें दुष्यन्त करतो. (३) **मालविकाग्निमित्र** व **रघुवंशः** “ संतः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते । ” (मा. १, २); “ उपदेशं विदुः शुद्धं सन्तस्तमुपदेशिनः । श्यामायतेन युष्मासु यः काञ्चनमिवाग्निषु ॥ ” (मा. २,९); “ तं सन्तः श्रोतुमर्हन्ति सदसद्व्यक्तिहेतवः । हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा ॥ ” (र. १,१०). “ नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य ” इ० (मा. १, ४); “ भिन्नरुचिर्हि लोकः ” (र. ६,३०). (४). **शाकुन्तल** व **रघुवंशः** “मृगानुसारिणं साक्षात् पश्यामीव पिनाकिनम् ॥ ” (शा. १, ६); “ विद्रुतक्रतुमृगानुसारिणं येन बाणमसृजद्वृषध्वजः ।” (र. ११, ४४); “ अयं स बलभित्सखो दुष्यन्तः ।” (शा. ५);

" बलभित्सखः " (र. ११, ५१); " अनतिक्रमणीयानि श्रेयांसि " (शा. ७); " प्रतिबध्नाति हि श्रेयः पूज्यपूजाव्यतिक्रमः । " (र. १. ७९). (५) **कुमारसंभव व शाकुन्तल:** "पूर्वापरौ तोयनिधीवगाह्य" (कु. १, १); "पूर्वापरसमुद्रावगाहः सानुमान्" (शा. ७). (६) **कुमारसंभव व रघुवंश:** या उभयतांच्या सातव्या सर्गांत शिवपार्वती व अज-इन्दुमती यांच्या विवाह-वर्णनांत तर कित्ती तरी श्लोक तेच तेच असून कित्येक अर्थ व चरणें अवश्य तेवढ्या भेदानें तींच तींच आलीं आहेत. उदाहरणार्थ, " चित्रार्पितारंभ इवावतस्थे " (कु. ३, ४२; र. २, ३१); " धनुष्यमोघं समधत्त बाणम् ।" (कु. ३. ६६); " धनुष्यमोघं समधत्त सायकम् ।" (र. , ३, ५३); " समीरणो नोदयित भवेति व्यादिश्यते केन हुताशनस्य ।" (कु. ३, २१); " स्वयमेव हि वातोऽग्नेः सारथ्यं प्रतिपद्यते। " (र. १०, ४०) इ०

प्रकरण तिसरें

कालिदासाचीं काव्यें

संस्कृत साहित्यशास्त्रांत काव्याचे दृश्य व श्रव्य असे दोन वर्ग केलेले असून दृश्य काव्य म्हणजे नाटक होय. श्रव्य काव्याला सामान्यतः काव्य म्हणण्याचा परिपाठ असून त्याचे खंडकाव्य व महाकाव्य असे दोन पोटवर्ग केलेले आहेत. महाकाव्य हें नांवाप्रमाणें मोठें तर पाहिजेच, पण त्यांत कित्येक गोष्टींचा समावेश झाला पाहिजे. महाकाव्यांत येणाऱ्या अनेक गोष्टीं-पैकीं एखादीच घेऊन तिचें वर्णन करणारें काव्य म्हणजे खंडकाव्य होय.

आधुनिक गद्यात्मक ललितवाङ्मयांत कादंबरी व लघुकथा यांत जो भेद करण्यांत येतो, त्याच स्वरूपाचा भेद महाकाव्य व खंडकाव्य यांत आहे असें म्हणतां येईल.

प्रस्तुत उपलब्ध असलेले अगदीं प्राचीन साहित्यशास्त्रावरील ग्रंथ कालिदासाच्या नंतरचे होत. भरताचें नाट्यशास्त्र हा ग्रंथ मूळ स्वरूपांत कालिदास-पूर्वकालीन आहे. पण कालिदासापूर्वी ज्याअर्थी नाटकें व काव्यें होत होतीं त्याअर्थी त्यांची थोडीबहुत चिकित्सा तेव्हां होत असली पाहिजे आणि तिचा अंतर्भाव करणारे ग्रंथहि त्या वेळीं झाले असण्याचा संभव आहे. कालिदासाचीं काव्यें तत्कालीन नियमांना धरून असतीलच, पण उपलब्ध ग्रंथांतील नियमांच्याहि फारशीं बाहेर तीं गेलेलीं नाहींत; कारण, त्या काव्यांकडे दृष्टि ठेवूनच कदाचित् पुढील साहित्यशास्त्रकारांनीं आपले ग्रंथ लिहिले असतील. पद्यमय श्रव्य काव्यांत महाकाव्य व खंडकाव्य असे जे भेद केलेले आहेत, त्यांपैकीं महाकाव्यांत कालिदासाचीं कुमारसंभव आणि रघुवंश हीं काव्यें पडतात व ऋतुसंहार आणि मेघदूत हीं खंडकाव्यांत मोडतात.

खंडकाव्यें

१ ऋतुसंहार

महाकाव्यांत जे विषय यावे असें साहित्यशास्त्रकारांनीं सांगितलें आहे, त्यांत ऋतुवर्णन हा एक आहे. एखाद्या धीरोदात्त नायकाचें विस्तृत चरित्र त्यांतील विविध प्रसंगांसह वर्णन करणें, किंवा त्यांतील एखादा विशेष महत्त्वाचा प्रसंग त्याच्या अंगोपांगांसह सांगणें हें महाकाव्याचें कार्य आहे. पण असल्या विविध प्रसंगांपैकीं किंवा अंगोपांगांपैकीं एखाद्याचेंच वर्णन करणें हें खंडकाव्याचें काम आहे. धीरोदात्त पुरुषाच्या चरित्रांत त्याचा जन्म, शिक्षण, विवाह, स्त्रीसमागम, स्त्रीविरह, त्यावरील आपत्ति, त्यानें गाजविलेले पराक्रम, त्यानें साधिलेलें महत्कार्य, इत्यादि विषय येत असल्यामुळें दिवस, रात्र व त्यांच्या निरनिराळ्या भागांचीं वर्णनें, सूर्योदय, सूर्यास्त, चंद्रोदय, चंद्रास्त,

वसंतादि ऋतु, वादळें, पूर, सैन्याच्या हालचाली, मिरवणुकी, युद्धें, वाद-विवाद, दूतप्रेषण, इत्यादिकांचीं वर्णनें यथाप्रसंग स्वाभाविकपणेंच येतात व तदनुसार हे विषय महाकाव्यांत यावे असें साहित्यकारांनीं शास्त्र सांगितलें. महाकाव्याच्या या अंतरंगाच्या नियमांबरोबर त्याच्या बहिरंगाविषयींसुद्धां शास्त्रकारांनीं नियम सांगितले आहेत. त्यांतील पहिला म्हणजे महाकाव्य सर्गबन्ध असलें पाहिजे हा होय. त्यानंतर ते सर्ग आठांहून कमी नसावे, प्रति-सर्गांत एक मुख्य वृत्त असून शेवटचे श्लोक त्यांहून वेगळ्या वृत्तांत असावे, एखाद्या सर्गांत अनेक वृत्तें योजिलेलीं असावीं, मुख्य रस शृंगार, वीर किंवा शांत असून इतरांचाहि यथाप्रसंग सहायभूत म्हणून समावेश व्हावा, आरंभीं इष्टदेवतानमन, कथानकनिर्देश किंवा आशीर्वाद असें कांहींतरी असावें, अशा आशयाचे हे बहिरंगविषयक नियम घातलेले आहेत. या उभयविध नियमांना सामान्यतः धरून अशींच कालिदासाचीं महाकाव्यें आहेत. विशेष एवढाच कीं, महाकाव्याचा नायक कोणी एकच थोर पुरुष असतो—मग तो देव, मोठा राजा, कुलीन व सद्गुणी गृहस्थ यांपैकीं कोणीहि असो—असें सामान्यतः आढळून येतें; पण रघुवंशांत अनेक नायक वर्णिले आहेत. तथापि याहि गोष्टीचा महाकाव्याच्या लक्षणांत पुढें 'साहित्यदर्पण'कार विश्वनाथानें समावेश करून कालिदासाचीं काव्यें सर्व लक्षणानुसार उतरतील असें केलें आहे. विश्वनाथ म्हणतो, "एका वंशांतील कुलीन असे पुष्कळ राजेहि नायक असले तरी चालेल" ("एकवंशभवा भूपाः कुलजा बहवोऽपि वा।" ६, ३१६). रघुवंश पुढें ठेवूनच जणूं हें लक्षण विश्वनाथानें दिलें असावें.

याप्रमाणें महाकाव्यांत अन्तर्भूत होणाऱ्या अनेक विषयांपैकीं ऋतुवर्णन हें स्वतंत्रपणें करणारें कालिदासाचें खंडकाव्य ऋतुसंहार हें होय. त्याचे सहा सर्ग असून एकंदर श्लोक १५३ आहेत आणि निदाघापासून म्हणजे ग्रीष्म ऋतूपासून आरंभ करून एकेका सर्गांत एकेका ऋतूचें वर्णन करीत वसंत-वर्णनानें काव्य संपविलें आहे. प्रत्येक ऋतूंत सृष्टीमध्यें दिसून येणाऱ्या प्रमुख घडामोडींचें वर्णन तरुण युवयुवतींच्या प्रेमाच्या दृष्टीनें यांत केलेलें असून

त्यावरून प्राण्याचें मन आणि सृष्टीचें अंतरंग यांतील परस्परानुषंगिकत्वच जणूं दाखविलें आहे. हें काव्य खरोखर कालिदासाचें असेल, तर त्यावरून त्याच्या प्रतिभेनें केलेल्या सृष्टिवर्णनाबरोबर तत्कालीन सुखवस्तु समाजाच्या राहणीचीहि बरीच कल्पना येईल. ग्रीष्मांतील उष्णतेचा परिणाम म्हणून अनेक विरोधी गोष्टींची सांगड पडते व विपत्तींत कित्येक वेळां नित्याच्या शत्रुमित्रभावाचें विस्मरण होऊन सर्प मोराच्या छायेला बसतो (" फणी मयूरस्य तले निषीदति ॥ " १, १३), हत्ती सिंहालाहि भीत नाहींत (" न दन्तिनो केसरिणोऽपि बिभ्यति । " १, १५), असे चमत्कार होतात. या ऋतुवर्णनांत कवीनें पशुपक्षी, वृक्षलता, जलयंत्रमंदिरासारख्या सोई, चंदनी पाण्यानें भिजविलेल्या पंख्याचा वारा (" सचंदनाम्बुव्यजनो-द्भवानिल " १, ८), स्त्रीपुरुषांचीं अनेकविध वस्त्रें व अलंकार, इत्यादि अनेक गोष्टींचा समावेश करून ऋतूचें स्वरूप व तदनुसार जीवसृष्टीचें वर्तन यांचें अनुबंधित्व दाखविलें आहे. या काव्याचें मूळ कवीच्या प्रतिभेंतच आहे.

२ मेघदूत

मेघदूत हें कालिदासाचें दुसरें खंडकाव्य होय. याचे पूर्वमेघ व उत्तरमेघ असे दोन भाग असून पहिल्याचे ६६ व दुसऱ्याचे ५५ मिळून १२१ श्लोक मंदाक्रान्ता वृत्तांत आहेत.

मेघदूतकाव्य महाराष्ट्रकविवर्य मोरोपंतांच्या केकावलीप्रमाणें केवळ प्रतिभा-निर्मित असून त्यांत कथाभाग असा नाहींच म्हटलें तरी चालेल. कुबेराची अवकृपा झाल्यामुळें त्याच्या तैनातींतील एका यक्षावर एक वर्ष वनवास भोग-ण्याचा प्रसंग येऊन त्याची प्रिय पत्नीपासून ताटातूट झाली. त्याला त्या अव-धींत रामगिरीवर राहण्याची आज्ञा होती. तीप्रमाणें तेथें तो वनवासाचा काळ कंठीत असतां आठ महिने पुरे होण्याच्या वेळीं त्याचें मन अगदीं अस्वस्थ झालें व त्या स्थितींत पावसाळा लागून मेघदर्शन झाल्यामुळें तो जवळजवळ भ्रमिष्ट झाला. तेव्हां आपली वार्ता आपल्या पत्नीला कळवून तिच्या व्यथित अन्तःकरणाचें सान्त्वन करण्याची कल्पना त्याला सुचली; आणि तसें करण्या-

साठीं त्यानें वार्ताहर म्हणून एका मेघाचीच योजना केली. मग त्या मेघाची गौरवपूर्वक प्रार्थना करून त्यानें आपल्या राहण्याच्या ठिकाणीं, म्हणजे अलकापुरीस जाण्याचा मार्ग त्या मेघाला आंखून दिला आणि वाटेंत लागणाऱ्या स्थळांची त्याला माहिती सांगितली. त्या खाणाखुणांना अनुसरून अलकानगरीस पोहोंचल्यावर तेथें आपलें घर कसें ओळखावें, घरीं गेल्यावर आपल्या स्त्रीची ओळख कशी करून घ्यावी व तिला विरहि स्थितींत बरें वाटेल अशी हांक मारून तिला काय संदेश सांगावा, हेंहि यक्षानें मेघाला सांगितलें; आणि पुनः एकदां त्याच्या सौजन्याची व परोपकारी स्वभावाची स्तुति करून आपलें एवढें काम अंगावर घेऊन पार पाडण्याची विनंति केली व स्वतःवर आलेल्या स्त्रीविरहासारखा दुःखमय प्रसंग त्याच्यावर केव्हांहि न येवो अशी आशा करून त्याची त्यानें रवानगी करून दिली.

या काव्यांतील " आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श " (१,२) आणि " मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्तिचेतः । " (१,३) या शब्दांवरून कालिदासाच्या काळीं आषाढाचा पहिला दिवस मेघदर्शनाचा म्हणजे वर्षाकाळाचा आरंभ समजून त्यावरून कालिदासाचा काळ स्थूल मानानें ठरविण्याचा प्रयत्न श्री. चिंतामण विनायक वैद्य यांनीं केला आहे. पण त्यांनीं ठरविलेला काळ दुसऱ्या प्रमाणांनीं ठरविलेल्या काळाशीं म्हणजे क्रिस्तपूर्व पहिलें शतक याशीं जुळत असला तरी प्रस्तुत वाक्यांवरून तसें अनुमान काढण्यांत अडचणी आहेत व तीं वाक्यें तशा कामीं उपयोगी पडण्यासारखीं नाहींत. या काव्यांत उज्जयिनीसंबंधानें कालिदासानें विशेष प्रेम दाखविलें असून रामगिरीपासून अलकेपर्यंतच्या सरळ मार्गावर ती नसतांहि मुद्दाम थोडें आडवळण पत्करून देखील तेथें जाऊन तेथील प्रेक्षणीय स्थलांचें व वस्तूंचें दर्शन घेण्याची यक्षानें मेघाला कळकळीची विनंति केली आहे (" वक्रः पन्था यदपि भवतः " इ० १, २७). त्या नगरींतील मोठमोठे वाडे व त्यांतील नागरिक स्त्रियांचें सौंदर्य हीं न पाहतां जाणें म्हणजे डोळ्यांना चकवणेंच होय.

पूर्वमेघांतील २७–३७ या श्लोकांत कालिदासानें उज्जयिनीचें वर्णन इतक्या आपलेपणानें केलें आहे कीं, तें वाचून त्याचें त्या नगरीवरील उत्कट प्रेम लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं. तिचें विशाला हें दुसरें नांव, वत्सराज उदयनाच्या वासवदत्ताहरणादि कथांनीं तिला आलेलें ऐतिहासिक महत्त्व, क्षिप्रातीराकडून प्रातःकाळीं वाहणारा सुगंधशीतल श्रमहारी वायु, श्रीमंत लोकांच्या वाड्यांतील आरामाच्या व सुखोपभोगाच्या व्यवस्था, चंडीश्वर महाकालाचें मंदिर, स्त्रियांची नदींतील जलक्रीडा, विलासी स्त्रीपुरुषांचे विलासप्रकार इत्यादि गोष्टी त्यानें बारकाईनें सांगितल्या असून त्यांवरून त्या नगरीशीं असलेला आपला दीर्घकालीन निकट परिचय त्यानें व्यक्त केला आहे.

ऋतुसंहार काव्यांत शृंगाररस आहे व सृष्टिवर्णन त्याच दृष्टीनें केलेलें आहे; पण मेघदूतांत शृंगार म्हटला तर विप्रलंभशृंगार असल्यामुळें त्याचा साहाय्यक जो करुणरस त्याचा उत्तम परिपोष त्यांत झाला आहे. या छोट्या काव्यांत सृष्टिवर्णन उत्तम आहे, त्याबरोबर मनुष्यस्वभावाचेंहि सूक्ष्म निरीक्षण आहे व त्या दोहोंच्या साहाय्यानें विप्रलंभानुगत करुण रसाचा उठाव केलेला आहे. " 'कान्ताविरहगुरुणा शापेनास्तंगमितमहिमा, " " कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः ", " दयिताजीवितालम्बनार्थी " असा तो यक्ष तिला खुशालीचा निरोप पाठविण्यासाठीं मेघाचें स्वागत करून त्याला विनंति करतो; हें त्या करुणरसाचें बीज असून, मध्यंतरींचे 'विरहामध्यें स्त्रिया आशेवर जगतात,' इत्यादि उद्गार, आपल्या पत्नीच्या मनोभावांचा नदीरूपी मेघपत्न्यांवर आरोप इत्यादि अंकुर त्याला फुटले आहेत व शेवटीं " मा भूदेवं क्षणमपि च ते विद्युता विप्रयोगः " या आशीर्वादानें यक्षानें आपल्या दुःखी अंतःकरणाची परिणत स्थिति ध्वनित केली आहे.

या काव्यांत " याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा। " (१, ६), " रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय। " (१, २०), " मंदायन्ते न खलु सुहृदामभ्युपेतार्थकृत्याः । " (१, ४०), " आपन्नार्ति-

प्रशमनफला संपदो ह्युत्तमानाम्। " (१, ५५), " के वा न स्युः परिभवपदं निष्फलारंभयत्नाः। " (१, ५६), " प्रायः सर्वो भवति करुणावृत्ति-राद्रान्तरात्मा। " (२, ३३), " नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण।" (२, ४९), " इष्टे वस्तुन्युपचितरसाः प्रेमराशीभवन्ति। " (२, ५२), " प्रत्युक्तं हि प्रणयिषु सतामीप्सितार्थक्रियैव। " (२, ५४) इत्यादि सुंदर अर्थान्तरन्यास इतस्ततः विखुरलेले आहेत.

मेघदूतांत योजिलेल्या वृत्ताविषयीं म्हणजे मन्दाक्रान्तेविषयीं " प्रावृट्-प्रवास-व्यसने मन्दाक्रान्ता विराजते। " म्हणजे वर्षाकाळ, प्रवास किंवा संकट यांच्या वर्णनांत मदाक्रान्ता खुलून दिसते असें म्हटलेलें असून कालिदासाच्या या वृत्ताच्या रचनेविषयीं " सुवशा कालिदासस्य मन्दाक्रान्ता प्रवल्गति। सदश्वदमकस्येव काम्बोजतुरगांगना॥ " म्हणजे " खंद्या स्वाराच्या हातीं जशी पाणीदार घोडी तशी मन्दाक्रान्ता कालिदासाच्या हातीं तो सांगेल तशी नाचते " असें वर्णन केलेलें आढळतें.

या मेघदूत काव्याची कल्पना कालिदासाला रामायणांतील रामानें सीतेला मारुतीबरोबर पाठविलेल्या संदेशावरून सुचली असावी असें म्हणतात. पुढें कालिदासाचें अनुकरण होऊन पवनदूत, नेमिदूत, उद्धवदूत, हंसदूत इत्यादि काव्यें अस्तित्वांत आलीं. जिनसेन नांवाच्या जैन कवीनें आपलें पार्श्वाभ्युदय नांवाचें चतुःसर्गात्मक काव्य मेघदूताच्या श्लोकांतील एक एक ओळ किंवा कांहीं ठिकाणीं दोन दोन ओळी समस्या म्हणून घेऊन लिहिलें असून त्यांत अशा समस्यापूरणरूपानें सर्व मेघदूताचा समावेश केलेला आहे. यानंतरच्या प्रयत्नांवरून कालिदासाचें मेघदूत किती लोकप्रिय झालें होतें याची कल्पना येण्यासारखी आहे. त्यांतील प्रासादिक भाषासरणि, मधुरध्वनियुक्त शब्द-रचना, प्रतिभेचे विहार आणि कल्पनेची भव्यता यांनीं वाचकांचें मन मोहून गेल्यास नवल नाहीं.

मेघदूतांत कालिदासाच्या प्रतिभेनें ज्या कल्पनेवर झडप घातली, तीच कल्पना जर्मन कवी शिलर यानें आपल्या ' मारिया स्टुअर्ट ' या काव्यांत

उपयोजिलेली दिसून येते. त्यांत बंदिशाळेंत पडलेल्या स्कॉट राणीनें दक्षिणेकडे जाणाऱ्या मेघांना आपल्या यौवनपरिचित देशाचें अभिनंदन करण्याची विनंति केलेली आहे. जर्मन महाकवी व तत्त्वज्ञ गटे यालाहि हें काव्य प्रिय झालें होतें.

मेघदूताचें कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं केलेलें मराठी पद्यात्मक भाषांतर विशेष प्रसिद्ध आहे.

महाकाव्यें

कुमारसंभव

महाकाव्याचें लक्षण कालिदासादिकांच्या काव्यांवर दृष्टि ठेवून पुढील साहित्यकारांनीं केलें असावें असें म्हणून तें लक्षणहि पूर्वी दिलें आहे. कुमारसंभव व रघुवंश हीं काव्यें महाकाव्यें म्हणून पुढील साहित्यशास्त्रकारांनीं सांगितलीं असून अर्थात् तीं त्या लक्षणांशीं जुळेशींच आहेत. आज उपलब्ध असलेलें कुमारसंभव १७ सर्गांचें आहे व त्यांत प्रथम शिवपार्वतीच्या विवाहाची कथा, नंतर कुमाराचा म्हणजे कार्तिकेयाचा जन्म, त्याचा सेनापत्याभिषेक, तारकासुराचें व त्याचें युद्ध आणि तारकासुराचा वध करून कार्तिकेयानें देवराज इन्द्राची स्वर्गसिंहासनावर केलेली पुनःस्थापना असे विषय आहेत. हें संपूर्ण काव्य घेतल्यास त्यांतील मुख्य रस वीर असून करुण व शृंगार हे गौण होत.

ब्रह्मदेवापासून वर मिळाल्यामुळें तारकासुर उन्मत्त झाला आणि देवांना त्यानें अत्यंत त्रस्त करून सोडिलें. तेव्हा सर्व देव इन्द्राला पुढें करून ब्रह्मदेवाकडे गेले असतां त्या असुराचा वध करण्यास शंकराच्या पुत्राशिवाय दुसरा कोणी समर्थ नाहीं असें ब्रह्मदेवानें देवांना सांगितलें व तदनुसार देव शंकराचें लग्न जुळवून आणण्याच्या खटपटीस लागले. इकडे शंकराची पहिली पत्नी दक्षकन्या सती देहत्याग करून पुनः हिमालयाच्या मेना नामक पत्नीच्या पोटीं पार्वती नांवानें जन्मास आली व मोठी झाल्यावर नारदाच्या सांगण्या-

प्रमाणें शंकरच पुनः पति मिळावा म्हणून तपस्वी शंकराची परिचर्या करीत त्याला प्रसन्न करून घेण्याच्या यत्नांत ती होती. शंकराचें मन तिजकडे वळविण्याच्या कामावर मदनाची नेमणूक देवेंद्रानें केली. पण त्या खटाटोपांत मदनाला शंकराच्या नेत्रोद्भव अग्नीनें दग्ध व्हावें लागलें आणि पार्वतीची निराशा झाली. मदनपत्नी रति शोकाकुल होऊन सहगमन करण्याच्या विचारास लागली; पण इतक्यांत आकाशवाणी झाली कीं, शंकर जेव्हां पार्वतीचें पाणिग्रहण करतील तेव्हां मदनाला पुनः देहप्राप्ति होईल. या वचनावर विसंबून रति स्वस्थ राहिली.

इकडे भग्नमनोरथ झालेली पार्वती शंकरच पति मिळावा म्हणून माता-पित्यांची अनुज्ञा घेऊन गौरीशिखरावर उग्र तपश्चर्या करूं लागली. तपाच्या कडकपणांत तिनें मोठमोठ्या तपस्व्यांना मागें टाकिलें. तेव्हां तिची थोडी कसोटी पाहण्यासाठीं ब्राह्मणबटूचें रूप घेऊन शंकर तिच्याकडे गेला आणि तिच्या तपश्चर्येचें कारण शंकर पति मिळविण्याची इच्छा आहे, हें समजून घेतल्यावर वरकरणीं त्यानें तिला वेड्यांत काढून व शंकराच्या स्थितीचें भडक रंगांत बीभत्स चित्र रेखाटून तिचें मन वळविण्याचा प्रयत्न केला; पण त्यामुळें पार्वतीचें मन तर परावृत्त झालें नाहींच, उलटपक्षीं ती त्या बटूवर रागावली आणि 'तुझ्याशीं बोलण्याचीहि माझी इच्छा नाहीं,' असें त्याला स्पष्ट सांगून तोंड फिरवून आपल्या कामाला लागली. या तिच्या निष्ठेनें शंकर प्रसन्न झाला व आपलें खरें स्वरूप प्रकट करून 'आजपासून मी तुझा दास झालों आहें,' असें त्यानें तिला अभिवचन दिलें.

हें वचन पुरें करण्यासाठीं लगेच त्यानें सप्तर्षींना नऊ वर्षांनीं हिमालयाकडे पाठवून त्याच्यापाशीं पार्वतीसाठीं मागणी घातली व हिमालयानेंहि पत्नीच्या संमतीनें ती मान्य केली. नंतर शंकर-पार्वतींचा रीतसर विवाह झाला आणि थोड्या काळानें कार्तिकेयाच्या जन्माची सिद्धता झाली.

इतक्या कथानकानें कुमारसंभव काव्याचे आठ सर्ग घेतले असून येथपर्यंत-चाच भाग कालिदासाचा होय, असें बहुतेक चिकित्सकांचें मत आहे. यापुढील

नऊ सर्गांत कार्तिकेयाचा जन्म, त्याचा सैनापत्याभिषेक व तारकवध हे विषय आले असून तो भाग मागाहून कोणा कवीनें रचिला असावा असें म्हणतात. पहिल्या आठच सर्गांवर मल्लिनाथाची टीका आहे, ही गोष्ट लक्षांत घेतां तसें असणें शक्य आहे असें वाटतें. पुढील सर्गांवर सीताराम पर्वणीकर याची टीका असून ती अगदीं अलीकडची, म्हणजे संवत् १८७० अथवा सन १८१३ या वर्षींची आहे. म्हणजे मल्लिनाथानंतर १८१३ पर्यंत केव्हां तरी हे सर्ग लिहिण्यांत आले असले पाहिजेत. हा पुढील सर्गांचा लेखक कोणीतरी महाराष्ट्र कवि असावा असें प्रो. एच्. याकोबी या जर्मन् पंडिताचें मत आहे. कविकुलगुरु कालिदासाची भाषा व या सर्गांची भाषा, तसेंच त्यांची वृत्तरचना व व्याकरणविशेष यांची तुलना करून पंडित याकोबीनें कुमारसंभवाचे १–८ हे सर्ग व पुढील ९ सर्ग यांचे लेखक भिन्न होत असें दाखविण्याचा यत्न केला आहे.

शेवटच्या नऊ सर्गांचा लेखक कालिदास नसेल तर हें काव्य त्याच्या हातून कांहीं तरी अडचणीमुळें पुरें झालें नाहीं असें म्हणावें लागतें. कारण, आठ सर्गांत झालें तरी कुमाराचा संभव म्हणजे जन्म झालेला नाहीं व पुढील कथाभाग कालिदासाच्या डोक्यांत नित्य खेळत होता, हें कार्तिकेयविषयक जे अनेक उल्लेख त्यानें आपल्या इतर ग्रंथांत केले आहेत त्यांवरून उघड होतें. ही अडचण काय होती, हें सांगणें कठीण आहे. कुमारसंभवांत प्रथम सर्गांतील हिमालयाचें वर्णन, दुसऱ्यांत देवकृत ब्रह्मदेवस्तुति, तिसऱ्यांत अकाल वसंताचें व मदनदहनाचें वर्णन, चौथ्यांतील रतिविलाप, पांचव्यांतील वटु-पार्वतीसंवाद, सहाव्यांतील वाङ्निश्चय आणि सातव्यांतील सविस्तर विवाहवर्णन हे भाग महत्त्वाचे आहेत. आठव्यांत शृंगारविलास विस्तारानें वर्णिला असून तसें करणें साहित्यशास्त्रकारांनीं दोषावह मानिलें आहे. शृंगारवर्णनाच्या बाबतींत कालिदासानें नाटकांत जसा सावधपणा दाखविला आहे, तसा तो काव्यांत दाखविलेला नाहीं. तरुण मुलांमुलींच्या समोर निःसंकोचपणें वाचणें कठीण जाईल अशीं कांहीं वाक्यें त्याच्या सर्व काव्यांत आढळतात.

याविषयीं लिहितांना 'ध्वन्यालोक'कार आनंदवर्धन म्हणतो कीं, देवदेवींचा शृंगार रेखाटणें हें औचित्यभंगाचें लक्षण असलें तरी कालिदासासारख्या महाकवीच्या हातून अतिप्रसंग होत नसल्यामुळें तें इतकें जुगुप्साविषय होत नाहीं.

कुमारसंभवाचें कथानक पुराणकथांतून घेतलेलें आहे. शंकर-पार्वतींच्या पुत्राचें नांव कुमार असें प्रसिद्ध असून त्यावरूनच या काव्याला 'कुमारसंभव' असें नांव कवीनें योजिलेलें आहे. कुमाराच्या उत्पत्तीची किळसवाणी कथा पुराणांत व रामायणांतहि सविस्तर वर्णिलेली आहे. याच विषयावर पुढें 'अलंकारसारसंग्रह'-कार उद्भट यानें 'कुमारसंभव' नांवाचेंच संक्षिप्त काव्य अनुष्टुभ् छंदांत रचिलें असून त्याचा उपयोग आपल्या साहित्यग्रंथांतील विवेचनांत उदाहरणांसाठीं केला आहे व त्याचें कथानक कालिदासाच्या कुमारसंभवाला अगदीं धरून आहे; इतकेंच नव्हे, तर दोहोंत ठिकठिकाणीं निकट शब्दसादृश्यहि आढळतें. असेंच शब्दसाम्य व कल्पनासाम्य विषय वेगळे असतांहि कालिदासकृत 'कुमारसंभव' व अश्वघोषाचें 'बुद्धचरित' यांतहि आढळतें. कालिदासाचें अनुकरण करण्याच्या प्रवृत्तीचाच हा परिणाम होय.

दृष्टान्त, निदर्शना व अर्थान्तरन्यास यांच्या योगानें विवेचनाला चटकदारपणा आणण्यांत कालिदास मोठा कुशल असून कुमारसंभवांतहि त्यांचीं अनेक उदाहरणें आढळतात. "विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः।" (१,५९), "शाम्येत्प्रत्यपकारेण नोपकारेण दुर्जनः।" (२,४०), "विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम्।" (२,५५), "प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः।" (३,२८), "न हीश्वरव्याहृतयः कदाचित् पुष्णंति लोके विपरीतमर्थम्।" (३,६३), "स्वजनस्य हि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते।" (४,२६), "प्रियेषु सौभाग्यफला हि चारुता।" (५,१), "क ईप्सितार्थस्थिरनिश्चयं मनः पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत्।" (५,५), "न धर्मवृद्धेषु वयः समीक्ष्यते।" (५,१६), "शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्।" (५,३३), "न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत्।" (५,४५),

' मनोरथानामगतिर्न विद्यते ।" (५,६४), " न कामवृत्तिर्वचनीयमीक्षते ।" '(५,८२), " क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ।" (५,८६), इत्यादि कुमारसंभवांतील वाक्यें सर्वप्रसिद्ध असून म्हणीवजा झालेलीं आहेत.

कालिदासाचें उपास्य दैवत शंकर होय हें पूर्वी दाखविलेंच आहे. त्याचें माहात्म्य केव्हांतरी विशेषेंकरून वर्णावें असें त्याला वाटणें स्वाभाविक होतें; व ' कुमारसंभव ' हें काव्य त्यामुळेंच कालिदासानें लिहिलें असलें पाहिजे. दैवत या दृष्टीनें कालिदासानें शंकराचा इतर देवांहूनचा श्रेष्ठपणा अगदीं स्पष्ट शब्दांनीं कुमारसंभवांत व्यक्त केला आहे. याविषयीं अधिक विवेचन पुढील एका प्रकरणांत करूं.

रघुवंश

कालिदासाच्या काव्यांतील उत्कृष्ट असें काव्य म्हणजे ' रघुवंश ' हें होय. याचे एकोणीस सर्ग आहेत व त्यांत सूर्यवंशांतील दिलीपनामक राजापासून अग्निवर्ण नांवाच्या राजापर्यंत तीस राजांचें वृत्त कोठें विस्तारानें तर कोठें अगदीं संक्षिप्त असें वर्णिलेलें असून प्रसंगाप्रसंगानें अनेक विषय आणिलेले आहेत.

सूर्यवंशांतील पहिला राजा मनु. त्याच्या वंशांत पुढें दिलीप नांवाचा राजा झाला. त्याला संतति नसल्यामुळें तिच्या अभावाचें कारण व तें दूर करण्याचा उपाय विचारण्याकरितां तो आपल्या सुदक्षिणा नांवाच्या पट्टराणीसह वसिष्ठाकडे गेला. वसिष्ठानें विचार करून सांगितलें कीं, कामधेनूचा अपमान घडल्यामुळें तिनें जो शाप दिला तो संततीच्या अभावाचें कारण होय. तें कारण दूर करावयाचें तर कामधेनूनेंच सांगितल्याप्रमाणें तिच्या कन्येची, म्हणजे नंदिनीनामक गाईची, ती प्रसन्न होईपर्यंत सेवा केली पाहिजे. राजानें ती गोष्ट मान्य करून पत्नीसह नंदिनीची सेवा करण्यास आरंभ केला. एकनिष्ठपणें तिची सेवा एकवीस दिवस झाल्यावर नंदिनीच्या मनांत राजाची कसोटी पाहावी असें आलें. म्हणून तिनें राजाचें चित्त क्षणमात्र आपल्याकडे नाहीं अशी संधि साधून मायावी सिंह उत्पन्न करून आपल्या मानेवर बसविला

च किंकाळी फोडिली. राजा दचकून तिच्याकडे वळला व सिंहाला बाण मारूं लागला; परंतु त्याचा हात स्तंभित होऊन बाणच सुटेना. मग दिलीप व सिंह यांचा संवाद होऊन गाईला न सोडण्याचें स्पष्ट सांगितल्यावरून राजानें शेवटचा उपाय म्हणून गाईच्या जागीं आपला बळी देण्याची सिद्धता दाखविली. नाहीं, होय म्हणतां सिंहानें तें मान्य केलें व राजा मरावयास सिद्ध झाला. तेव्हां तो कसोटीला उतरला असें पाहून नंदिनी त्याजवर प्रसन्न झाली आणि माया दूर करून तिनें त्याला वर माग म्हणून सांगितलें. राजानें पुत्रप्राप्तीचा वर मागितला व तदनुसार कालक्रमानें सुदक्षिणा राणी गर्भवती होऊन तिला पुत्र झाला. त्याचें नांव रघु. दिलीपानें रघूला उत्तम प्रकारचें धार्मिक, नैतिक व शारीरिक शिक्षण योग्य गुरूकडून दिलें आणि तो वयांत आल्यावर त्याच्या साहाय्यानें नव्याण्णव पुरे व एक अपुरा असे अश्वमेध केले. शेवटच्या अश्वमेधाच्या वेळीं इन्द्रानेंच स्वतः अश्व पळविल्यामुळें त्याचा व रघूचा युद्धप्रसंग झाला व अश्व न मिळतांच रघु परत आला. नंतर त्याला यौवराज्याभिषेक करून दिलीप वानप्रस्थ झाला.

रघु सिंहासनारूढ झाल्यावर त्यानें भरतखंडांत व बाहेरहि दिग्विजय करून आपलें अधिराज्य स्थापित केलें आणि तत्प्रीत्यर्थ विश्वजित् यज्ञ करून सर्वस्व ब्राह्मणांना दान दिलें. अशा स्थितींत त्याच्याकडे वरतन्तु मुनीचा शिष्य कौत्स गुरुदक्षिणेसाठीं द्रव्य मागावें म्हणून आला. राजाजवळ कांहींच राहिलेलें नाहीं असें पाहून तो परत जावयाला निघाला; पण रघूनें त्याला दोन तीन दिवस राहावयास सांगून कुबेरावर चाल करून जाण्याचें ठरविलें. त्यानें प्रस्थान ठेविलेलें पाहून कुबेर घाबरला व रघूचें कोशागार त्यानें द्रव्यानें भरून टाकिलें. कौत्साला अवघे चौदा कोटि रुपये पाहिजे होते; पण रघूनें तें सारेंच द्रव्य त्याच्याकडे पोहोंचतें केलें. कौत्स अगदीं संतुष्ट झाला आणि ‘ तुझ्यासारखाच तुला पुत्र होईल, ’ असा राजाला आशीर्वाद देऊन निघून गेला.

कौत्साच्या आशीर्वादाप्रमाणें रघूला पुत्र झाला. त्याचें नांव त्यानें अज असें ठेविलें. अज मोठा झाल्यावर त्याला सुशिक्षित करून रघूनें त्याला

युवराजपदवी दिली. इतक्यांत विदर्भ देशाच्या इंदुमतीनामक राजकन्येचा स्वयंवर उभारून रघूकडे निमंत्रण आलें व तदनुसार त्यानें अजाला स्वयंवरासाठीं विदर्भास पाठविलें. अज तिकडे जात असतां वाटेंत त्याला एक मत्त हत्ती आढळला. त्यावर त्यानें बाण टाकतांच तो हत्तीचें रूप टाकून गंधर्व झाला आणि अजाशीं त्यानें सख्य करून 'संमोहन' नांवाचें अस्त्रहि त्याला दिलें. अज बलवान् होऊन विदर्भास पोंचला.

स्वयंवराला भरतखंडांतील अनेक राजे आले होते. पण त्यांतील अजालाच इंदुमतीनें माळ घातली व नंतर दोघांचा यथाविधि विवाहसोहळा झाला. सर्व उत्सव समाप्त झाल्यावर विदर्भराजाच्या अनुज्ञेनें अज इंदुमतीसह स्वदेशीं जाण्यास निघाला. इंदुमतीनें न वरल्यामुळें इतर राजे रुष्ट झाले होते. अजाला वाटेंत गांठून इंदुमतीला पळवून नेण्याचा त्यांनीं विचार ठरविला आणि त्याप्रमाणें अज कांहीं अंतर गेल्यावर ते त्याच्यावर तुटून पडले. पण 'संमोहन' अस्त्राच्या साह्यानें अजानें त्या सर्वांचा चांगला समाचार घेतला व घाबरून गेलेल्या इंदुमतीला उत्साहानें धीर देऊन ऐटीनें तो आपल्या राजधानीस परत आला.

रघूनें अजाची योग्यता जाणून त्याच्यावर राज्यभार सोंपविला व स्वतः तो नगराबाहेर तपस्वी होऊन राहिला. अज राज्यकारभार पाहत असतां तो एक दिवस इंदुमतीसह एका उद्यानांत विहारार्थ गेला. तेथें तीं दोघें बसलीं असतां वरून आकाशमार्गानें जाणाऱ्या देवर्षि नारदाच्या वीणेवरील पुष्पमाला वाऱ्यानें उडून खालीं इंदुमतीच्या अंगावर पडली व लगेच तिचें प्राणोत्क्रमण झालें! हा आकस्मिक घाला पाहून अज शोकविह्वल झाला. वसिष्ठानें तत्त्वज्ञानपूर्ण असा संदेश पाठवून त्याचें समाधान करण्याचा यत्न केला; पण व्यर्थ! अजाचा शोक अनावर होऊन त्याचें शरीर क्षयी झालें; आणि आपला पुत्र दशरथ राज्यभारक्षम होईपर्यंत कशींबशीं त्यानें आठ वर्षे काढिलीं. त्यानंतर प्रायोपवेशनपूर्वक गंगायमुनांच्या संगमांत देहविसर्जन करून अज देवलोकीं अक्षय्य सुख भोगण्यास निघून गेला.

दशरथानें कारभार हातीं घेऊन तो उत्तम रीतीनें चालविला. त्याच्या राज्यातील लोक सुखी होते. एकदां मृगया करण्यासाठीं तो अरण्यांत गेला असतां नदीवर हत्ती पाणी पितो आहे असा ध्वनि ऐकून त्यानें त्यावर शब्दाच्या अनुरोधानें बाण टाकिला. लगेच ' हा तात ! ' अशी दुःखाची हाक त्याला ऐकूं आली व धावत जाऊन तो तेथें पाहतो तों एक तरुण आपल्या बाणानें विद्ध होऊन पडला आहे. त्या तरुणाचीं वृद्ध मातापितरें वाटेच्या कडेला होतीं; तेथें दशरथानें त्याला नेलें पण लगेच तो मरण पावला ! वृद्धांनीं पुत्रशोकाकुल होऊन " आमच्याप्रमाणेंच वृद्धपणीं तुला पुत्रशोकानें मरण येईल," असा दशरथाला शाप दिला; तथापि मुळांतच पुत्र नसल्यामुळें तो एकदाचा होणार या कल्पनेनेंच दशरथ आनंदित झाला व मिळाला हा शाप नसून वरच होय असें म्हणत घरीं आला.

रघुवंशाच्या पहिल्या नऊ सर्गांत इतकें वृत्त आलें असून पुढील सहा सर्गांत रामायणकथेला अनुसरून रामाचें चरित्र संक्षेपानें कालिदासानें वर्णिलें आहे. रामाचा वडील पुत्र कुश हा रामाच्या मागून सिंहासनावर आला. लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांचे पुत्रहि ठिकठिकाणीं राजे झाले. कुशानें आपली राजधानी कुशावती येथें केली, तेव्हां अयोध्येनें त्याच्याकडे गाऱ्हाणें केल्यामुळें तो पुनः अयोध्येस आला. पाताळचा नागराज कुमुद याची बहीण जी कुमुद्वती तिच्याशीं त्याचा विवाह झाला व तिच्यापासून त्याला अतिथि नांवाचा पुत्र झाला. या अतिथीनें फार उत्तम रीतीनें कारभार चालवून राज्याची भरभराट केली. त्याच्या मागून निषध, नल, नभस्, पुण्डरीक, क्षेमधन्वा, देवानीक, वशी, अहिनगु, पारियात्र, शिल, उन्नाभ, वज्रणाभ, शंखण, व्युषिताश्व, विश्वसह, हिरण्यनाभ, कौशल्य, ब्रह्मिष्ठ, पुत्र, पुण्य, ध्रुवसन्धि, सुदर्शन व अग्निवर्ण असे राजे झाले. ध्रुवसन्धि हा मृगयाप्रिय होता. तरुणपणींच एकदा मृगया करीत असतां तो सिंहाच्या हातून मरण पावला; तेव्हां त्याच्या अल्पवयी अशा सुदर्शननामक पुत्राला राज्यावर बसवून प्रधानमंडळानें राज्य चालविलें. सुदर्शन मोठा झाल्यावर त्यानें चांगल्या रीतीनें

राज्य केलें आणि त्याच्या मागून त्याचा पुत्र अग्निवर्ण राजा झाला. सुदर्शनानें राज्याची घडी फार उत्तम बसविलेली असल्यामुळें अग्निवर्णाला सुखोपभोगाशिवाय कामच राहिलें नाहीं असें वाटलें; व तदनुसार तो केवळ विषयोपभोगाच्या मागें लागून व्यसनी बनला. त्याचीं सर्व प्रकारचीं व्यसनें चळावत जाऊन त्यांमुळें तो अकालवृद्ध झाला व क्षयरोगाला बळी पडून कष्टावस्थेंत मरण पावला. मरणसमयीं त्याची स्त्री गरोदर होती. तिच्या गर्भाला प्रधानमंडळानें राज्याभिषेक केला व त्याच्या नांवानें राणीनें प्रधानमंडळाच्या तंत्रानें चालून राज्यकारभार चालविला.

'रघुवंश' हें महाकाव्य कालिदासानें कां लिहिलें? या प्रश्नाचें उत्तर त्यानें स्वतःच दिलें आहे कीं, "तद्गुणैः कर्णमागत्य चापलाय प्रचोदितः ॥" (र. १, ९.). रघुवंशांतील राजे इतके गुणवान् होते कीं, त्यांच्या त्या गुणांनीं कवीच्या एकसारखें कानीं लागून त्याला तें काव्य लिहावयास लाविलें. तात्पर्य, रघुवंशांतील राजांचें गुणवर्णन करणें हा रघुवंशाचा विषय होय. हे गुण सामान्यतः त्यानें "सोऽहमाजन्मशुद्धानाम्" इत्यादि चार श्लोकांत सांगितले असून त्यांच्या स्पष्टीकरणार्थ दिलीपादि राजांच्या चरित्रांतील कित्येक प्रसंग घेऊन त्यांचें विवेचन केलेलें दिसतें. कालिदासानें आपल्या इतर काव्यांना 'वस्तुनिर्देशो वाऽपि तन्मुखम्' या न्यायानें एकदम आरंभ केलेला आहे; पण रघुवंशांत तसें न करतां पुढोल महाराष्ट्र कवींच्या पद्धतीप्रमाणें देवतानमन, श्रोतृप्रार्थना, विषयनाम इत्यादि प्रास्ताविक गोष्टी दहा श्लोकांत देऊन अकराव्या श्लोकापासून काव्यवस्तूला आरंभ केला आहे. ही दशश्लोकात्मक प्रस्तावना फार महत्त्वाची आहे. रघुवंशासारखें मोठें काव्य लिहिण्याचें त्याच्या मनांत आल्यापासून तें प्रत्यक्ष घडेपर्यंतचा त्याचा इतिहास या प्रस्तावनेंत आढळून येतो. हें कार्य कठीण, त्याला सामग्री बरीच लागणार, त्यासाठीं वाचन केलें पाहिजे, प्रवास केला पाहिजे, आणि दुसऱ्या पुष्कळ गोष्टी जमविल्या पाहिजेत. त्यानें 'पूर्वसूरीं'चे ग्रंथ वाचल्यावर त्याला बराच धीर आला आणि त्यांतून अवश्य ती सामग्री मिळण्यासारखी आहे,

हें पाहून त्यानें रघुवंशलेखनास हात घातला. ह्या पूर्वसूरींपैकीं एक अर्थात् 'रामायण'-कार वाल्मीकि आहे. वाल्मीकिरामायणाच्या आधारानें रघुवंशाचे नऊपासून पंधरापर्यंतचे सर्ग त्यानें लिहिले. रामायणाला इतिहास अशी पारिभाषिक संज्ञा असली तरी त्यांत थोड्याशा इतिहासावर कल्पना व दंतकथा यांचेंच जंजाळ पुष्कल माजलेलें आहे. रामायणाचा नायक राम हा सूर्यवंशी असला तरी सर्व सूर्यवंशाचा वृत्तान्त त्यांत आलेला नाहीं हें उघड आहे. पण सूर्यवंश हा प्रत्यक्ष सूर्यापासून आलेला नसला तरी प्राचीन कालापासून त्या नांवाचें घराणें भरतखंडांत सुप्रसिद्ध असून त्याला ऐतिहासिक महत्त्वहि आलेलें आहे. अर्थात् रामायणांत जसा त्यांतील रामाचा सविस्तर वृत्तान्त आला आहे, तसा इतरांचा वृत्तान्त दुसऱ्या कांहीं ग्रंथांत किंवा लोकांच्या आठवणींत लौकिक कथारूपानें त्या वेळीं प्रसिद्ध असला पाहिजे. दहापासून पंधरापर्यंतच्या सर्गांशिवाय इतरत्र सर्गांत वर्णिलेल्या राजांचा म्हणजे दिलीप, रघु, अज व कुशापासूनचे चोवीस राजे यांचा वृत्तान्त कालिदासानें इतर ग्रंथ व लौकिक कथा यांतूनच घेतलेला असला पाहिजे. रघुवंशांतील रामेतर राजांच्या गोष्टींतील बऱ्याच गोष्टी सांप्रतच्या विष्णुपुराणांत, वायुपुराणांत व विशेषतः पद्मपुराणांत आढळतात. पण या पुराणांचें आज जें रूप आहे तें इ. स. पूर्वीपासून आहे कीं काय असा प्रश्न आहे; आणि त्याचें उत्तर नाहीं असेंच साऱ्या चिकित्सक तज्ज्ञांनीं दिलें आहे. सांप्रतचीं पुराणें बरींच अर्वाचीन आहेत यांत शंका नाहीं व त्यांतील कथा कालिदासाच्या ग्रंथांवरूनहि त्यांत गोविलेल्या असण्याचा संभव आहे. कालिदासानें रघुवंशासाठीं घेतलेला आधार म्हणजे रामायण व पुराणें होत, असें जेव्हां सामान्यतः म्हणण्यांत येतें तेव्हां त्याचा अर्थ कालिदासकालीं त्यांचीं जीं स्वरूपें होतीं तीं पुढें ठेवून कालिदासानें लिहिलें एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे. रघुवंशांत दिलीपापासून अग्निवर्णापर्यंतचेच राजे दिले आहेत. पण त्यांचीं नांवें रामायणांतील वंशावळीशीं फारशीं जमत नाहींत. रघुवंशांतील वंशावळ सांप्रतच्या विष्णुपुराणांतील वंशावळीशीं बहुतेक जुळते. कालिदासानें दिलीपापूर्वीच्या राजांचें वृत्त

दिलेलें नाहीं. पण त्यांपैकीं कित्येकांचा म्हणजे मनु, इक्ष्वाकु, पुरंजय किंवा ककुत्स्थ, सगर, भगीरथ इत्यादिकांचा उल्लेख त्यानें प्रसंगोपात्त केलेला आहे. दिलीपाचें रघुवंशांतील वृत्त पद्मपुराणाच्या उत्तरकांडांतील वृत्ताशीं बहुतेक जुळतें. पण रघु आणि अज यांच्या कथांचा पत्ता पुराणांत लागत नाहीं. तथापि कालिदासकालीं त्या गोष्टी प्रचलित असल्या पाहिजेत. सामान्यतः पुराणांचा काल व कालिदासाचा काल जवळजवळचा म्हणजे गुप्त साम्राज्य-कालांतील ब्राह्मणी विद्येच्या पुनरुज्जीवनाचा प्रसंग होय, असें जें पाश्चात्य संस्कृतज्ञांचें व त्यांना अनुसरणाऱ्या भारतीय पंडितांचें मत आहे, त्याला उत्तर या विसंवादांत सांपडण्यासारखें आहे. पुराणें गुप्तकालांत सांप्रतचें रूप पावलीं असलीं तरी त्यांतील पुष्कळसा मथितार्थ अगदीं प्राचीन आहे; आणि कालिदास गुप्तांपूर्वीं कांहीं शतकें होऊन गेला होता. म्हणजे सांप्रतचीं पुराणें आणि कालिदासाचीं कथानकें यांचें मूळ एक होतें. म्हणून दोघांमध्यें पुष्कळ अंशीं साम्य व क्वचित् भिन्नता अशीं दिसून येतात.

सोळाव्या सर्गापुढील कथाभागांतील कित्येक गोष्टीहि सांप्रतच्या पुराणांत सांपडत नाहींत. उदाहरणार्थ, सोळाव्यांतील कुशाचा कुमुद्वतीशीं झालेल्या विवाहाचा प्रसंग. पण त्या गोष्टींतील कुमुदनागादिकांचे उल्लेख नीलमतांत (श्लो. १०८९) असल्याचें पंडित कल्ला यांनीं दाखविलें असून त्यावरून ती कथा पूर्वीं काश्मिरांत प्रसिद्ध होती असें दिसतें. सतराव्या सर्गांतील अतिथीच्या नमुनेदार राज्यकारभाराच्या वर्णनावर चाणक्याच्या अर्थशास्त्राचा ठसा चांगला उमटलेला दिसतो. या विषयाचें सविस्तर विवेचन के. बालसुब्रह्मण्य अय्यर यांनीं एका स्वतंत्र निबंधांत केलें आहे.

कालिदासानें रामायणांतून रामाचें कथानक घेतलें आहे. सूर्यवंशांत रघू-शिवाय इतरहि महापराक्रमी राजे झालेले आहेत. उदाहरणार्थ, मनु, इक्ष्वाकु, ककुत्स्थ, सगर, भगीरथ, दशरथ, राम इत्यादि. पण यांपैकीं कोणाचेंहि नांव या वंशाला न देतां 'रघुवंश' हेंच दिलें, त्याअर्थीं रघूचा इतरांहून विशेष असा कांहीं पराक्रम असेल. परंतु मूळ रामायणावरून अथवा रघुवंशावरून तो

काय तें समजत नाहीं. तथापि रामायणांतहि "रघुवंशस्य चरितं चकार भगवान्मुनिः।" असें म्हटलें असून तेंच नांव कालिदासानेंहि उचलिलें. "रघूणामन्वयं वक्ष्ये" अशी प्रतिज्ञा कालिदासानें करून रामाला 'रघुवंश-प्रदीप' (र. १०, ६८), 'रघुवंश-केतु' (र. १४, ७) अशीं विशेषणें देऊन रघूचें प्राधान्य दाखविलें आहे. रामाला रघुनंदन, रघूत्तम, राघव, अशा तत्सदृश इतरहि संज्ञा दिलेल्या नित्य आढळतात. कोठें कोठें त्याला ऐक्ष्वाक, काकुत्स्थ, दाशरथि, अशाहि संज्ञा देतात. पण त्यांत राघव या संज्ञेचें पारडें फार जड आहे, मग कारण कांहींहि असो.

रघुवंशाचे सांप्रत एकोणीस सर्ग आहेत. ते पंचवीस होते, अशी एक दंतकथा आहे; आणि कोणी तर आजच्या एकोणिसांपैकींहि शेवटचे दोन कालिदासाचे नव्हत असें म्हणतात. पण असें म्हणणें सामान्य विचाराला सोडून होय, असें मत प्रो. कीथनें दिलें आहे. एकोणिसाव्या सर्गानें ग्रंथाची पूर्ति झाली असें वाटत नाहीं. कारण, अग्निवर्णानंतर त्याच्या वंशांत अनेक राजे होऊन गेले असें पुराणांवरून दिसतें, असें म्हणून कालिदासाच्या मृत्यूमुळें त्याला पुढील सर्ग लिहितां आले नाहींत, असें कित्येकांनीं प्रतिपादिलें आहे. तेंच कारण खरें मानिल्यास आणखी अनेक ग्रंथ कालिदासाच्या मनांतून लिहावयाचे राहिले असेंहि म्हणतां येईल.

'रघुवंश' हें काव्य भरतखंडांत अत्यंत लोकप्रिय झालेलें असून पूर्वीच्या संस्कृताच्या अध्ययनांत रूपावलि-समासचक्रांनंतर त्याच्या दुसऱ्या सर्गाला प्रथम हात घालीत. पहिल्या सर्गांत दिलीपाला कामधेनूचा शाप झाल्याचें वृत्त असल्यामुळें तो प्रथम शिकविण्यास घेत नसत. ह्या काव्याच्या प्रतिसर्गांत कांहीं तरी विशेष चटकदार असा भाग आढळतोच. पहिल्याच सर्गांत रघुवंशीय राजांचें स्थूल मानाचें स्तोत्र, दिलीपाच्या वसिष्ठाश्रमापर्यंतच्या प्रवासाचें वर्णन, वसिष्ठाश्रमाचें वर्णन यांकडे लक्ष गेल्याशिवाय राहत नाहीं. दुसऱ्यांत दिलीप व सिंह यांचा संवाद मोठा मनोवेधक आहे. तिसऱ्यांत रघु व इंद्र यांचा खटका हृदयंगम असून चौथ्यांत शरदृतूचें सूचक वर्णन

आणि रघूच्या दिग्विजयाच्या निमित्तानें केलेलें भरतखंडांतील विविध देश व सीमेवरील प्रांत यांचें धावतें वर्णन हुबेहूब व चटका लावणारें झालें आहे. पांचव्यांत रघु व कौत्स यांचा गंभीर संवाद असून त्यांत रघूचें औदार्य उत्कटतेनें दाखविलेलें आहे. याच सर्गांतील भाटांच्या तोंडीं घातलेलें प्रातः-कालाचें वर्णन सर्वतोपरि सुंदर आहे. सहाव्यांत सुनन्देनें केलेलीं निरनिराळ्या राजांचीं वर्णनें वाचून कालिदासाच्या विनोदप्रियतेची साक्ष पटते. आठव्यांतील अजाचा राज्यकारभार व रघूचा चतुर्थाश्रम यांचें जोडवर्णन रमणीय असून त्याच्यापुढील अजविलाप वाचकाला चटका लावणारा आहे. कुमारसंभवांतील रतिविलाप व रघुवंशांतील अजविलाप यांत तुलना करतां रतिविलाप अधिक नैसर्गिक वाटतो, आणि अजासारखा पुरुष स्त्रीविषयीं इतका शोक करतो हें अस्वाभाविक व दौर्बल्याचें लक्षण असून अबलाजातीय रतीविषयीं जशी सहानुभूति उत्पन्न होते तशी ती पुरुषजातीय अजाविषयीं होत नाहीं, असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण त्यांत अर्थ नाहीं. तसें प्रतिपादणें म्हणजे मनुष्य-स्वभावाविषयीं अज्ञान प्रकट करणें होय. सामान्यतः पुरुषजात स्त्रीजातीपेक्षां निष्ठुर असेल; तथापि दोहींकडे अपवाद असणारच. आणि पुरुषांचा निष्ठुर-पणा म्हणजे काय? त्यांना दुःख होत नाहीं असें थोडेंच आहे? पुष्कळ प्रसंगीं तें सारें गिळून त्यांना व्यवहारप्रवृत्त होणें अवश्य असतें व तसें सामान्यतः घडतेंहि. परंतु दुःखाच्या आघाताचा परिणाम होऊन झिजूं लागल्याचींहि पुरुषांचीं उदाहरणें सांपडतात. अजाचें तसें झाल्याचें कालिदासानें दाखविलें आहे. शिवाय दुःखावेगांत अजानें आपलें कर्तव्य सोडलें असेंहि नाहीं. दशरथ मोठा होईपर्यंत त्यानें टेकीनें दिवस काढले व पुत्रविषयक आपलें कर्तव्य बजाविलें, असेंच कालिदासाचें वर्णन आहे; आणि त्यांत कांहींच वावगें नाहीं. अज व इंदुमती हीं पतिपत्नी माणसें होतीं व त्यांमध्यें अकृत्रिम व उच्च प्रकारचें प्रेम होतें. "गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ। करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां वद किं न मे हृतम्॥" (र. ८, ६७) असे पत्नीविषयीं उद्गार काढणाऱ्या व तिजविषयींच्या

दुःखानें झुरून मृत्यु पावणाऱ्या अजाचें प्रेमच तसें होतें, असें म्हणावयाचें सोडून त्याविषयीं सहानुभूति उत्पन्न होत नाहीं असें म्हणणेंच अनैसर्गिक नाहीं काय? उलट, रति व मदन या काल्पनिक असल्यामुळें मदनाविषयीं रतीनें कितीहि शोक केलेला दाखविला तरी त्यामुळें वाचकाच्या मनावर काय परिणाम होणार? तात्पर्य, रतिविलाप हाच कृत्रिम असून अजविलापच नैसर्गिक होय असें म्हणणें उचित होईल.

नववा सर्ग म्हणजे कालिदासाला चित्रकाव्याची जी थोडीशी हौस होती तीं प्रकट करण्याचें स्थान होय. यांत आरंभींच्या बऱ्याच श्लोकांत प्रतिचतुर्थ चरणांत तीन अक्षरी यमक साधलेलें असून शेवटचे अनेक श्लोक भिन्न भिन्न वृत्तांत रचिलेले आहेत. पुढील सर्गांत अकराव्यांतील राम-भार्गवसंवाद विशेष चित्तवेधक असून तेराव्यांतील विमानप्रवासाच्या वर्णनांत कालिदासाची उच्च कल्पनाशक्ति चांगलीच प्रतीत होते. "एषा विदूरीभवतः समुद्रात्सकानना निष्पततीव भूमिः।" (र. १३, १८) हें वर्णन कोणालाहि पटण्यासारखें आहे. तसेंच पुढें शुभ्रजलवाहिनी गंगा आणि कृष्णजलवाहिनी यमुना यांच्या प्रयाग येथील संगमाचें वर्णन हृदयंगम आहे. चौदाव्यांतील सीतेनें लक्ष्मणाबरोबर रामाला पाठविलेला संदेश व वाल्मीकीनें केलेलें तिचें सान्त्वन यांचा सरसपणा वर्णावा तितका थोडाच होईल. "मां लोकवादश्रवणादहासीः श्रुतस्य किं तत्सदृशं कुलस्य।" (र. १४, ६१) म्हणजे "केवळ लोकप्रवाद ऐकून त्वां माझा त्याग केला हें तुझ्या ज्ञानाला आणि कुळाला साजेसें आहे ना?" असा धीटपणें प्रश्न विचारणारी सीता सर्व दोष पुनः आपल्यावरच घेते, आणि अशा स्थितींत जिवाचा कंटाळा आला असतांहि केवळ कर्तव्यबुद्धीनें प्रसूतिकालापर्यंत थांबण्याचा निश्चय करते व तितक्या अवधींतहि "भूयो यथा मे जननान्तरेऽपि त्वमेव भर्ता न च विप्रयोगः।" (र. १४,६६) म्हणजे, "जन्मान्तरीं पुनः तूंच पति मिळून वियोग मात्र होऊं नये" म्हणून सूर्याकडे म्हणजे रामाच्या घराण्याच्या मूळ पुरुषाकडे ध्यान लावून तपश्चर्या करण्याचा निश्चय करते, हा प्रसंग निःसंशय हृदयाला थराऱ्न

सोडणारा आहे. पुढील भागांत ओसाड अयोध्येचें वर्णन चित्तवेधक असून सतराव्यांतील अतिथीच्या राज्यकारभाराचें वर्णन अत्यंत बोधप्रद आहे.

कालिदासाला नांवावर कोट्या करण्याची आवड असून तिचा कडेलोट त्यानें अठराव्या सर्गांत केला आहे. या सर्गांत निषधापासून सुदर्शनापर्यंतच्या बावीस राजांचें झटपट वर्णन आलें आहे व त्यांपैकीं बहुतेकांच्या नांवांवर त्यानें ज्या कोट्या लढविल्या आहेत त्या कंटाळवाण्या वाटतात.

कालिदासाच्या काव्यांचा विचार करतां एकंदरींत रघुवंशाचा सरसपणा दिसून येतो; पण एकेक विशिष्ट गुण घेतला तर तेवढ्यापुरती तुलना एकेका काव्याला उपकारक होईल हेंहि खरें आहे. उदाहरणार्थ, कुमारसंभवाच्या कथानकांत एकच मुख्य बाब असल्यामुळें तें अधिक सुसंघटित झालेलें दिसतें. नीटनीटकेपणा व सफाई यांचा विचार केला तर मेघदूताची सरशी होईल. तथापि तेवढ्यावरून रघुवंशाची योग्यता कमी होत नाहीं. त्याची सरळ व प्रासादिक भाषासरणि, वेंचक प्रसंग निवडून ते चटकदार रीतीनें मांडण्याची हातोटी, उपमा, दृष्टान्त, उत्प्रेक्षा, अर्थान्तरन्यास इत्यादि अलंकारांचें समर्पकत्व इत्यादि गोष्टींमुळें तो आज शेंकडों वर्षें लोकप्रिय होऊन राहिला आहे व त्याच्या मागून दुसऱ्या अनेक कवींनीं स्पर्धेनें म्हणा अथवा काव्यस्फूर्तीनें म्हणा, जरी अनेक काव्यें रचिलीं व तेणेंकरून चांगलें नांव मिळविलें, तरी रघुवंशाची पदवी कोणालाहि हिरावून घेतां आलेली नाहीं.

संस्कृत भाषेंत जीं अनेक काव्यें आज प्रसिद्ध आहेत, त्यांत कालिदासाचीं 'कुमारसंभव' व 'रघुवंश,' भारवीचें 'किरातार्जुनीय,' माघाचें 'शिशुपालवध' आणि हर्षाचें 'नैषधचरित' हीं 'पंचमहाकाव्यें' म्हणून विशेष प्रसिद्ध आहेत. कालिदासाचा काळ क्रिस्तपूर्व धरिल्यास हीं पंचमहाकाव्यें सुमारें बाराशें वर्षांचा अवधि आक्रमितात. भारवि व माघ यांचीं काव्यें हीं भामहाचा 'काव्यालंकार' व दंडीचा 'काव्यादर्श' यांतील महाकाव्याच्या लक्षणांशीं तंतोतंत मिळतात, किंबहुना तीं त्या लक्षणांशीं मिळावींत अशीच कवींची योजना दिसते. परंतु कालिदासानें लक्षणें पाहून आपलीं काव्यें लिहिलीं असें

नसून त्याचीं काव्यें पाहून मग शास्त्रकारांनीं लक्षणें बांधलीं, असें म्हणणें अधिक शोभेसें आहे व कालानुक्रम पाहतां तें खरेंहि आहे.

या दृष्टीनें विचार करितां कालिदासाच्या काव्यांत विविध प्रसंगांचा जो स्वाभाविकपणा दिसतो तो पुढील कवींत दिसत नाहीं. भारवीचें ‘ किराता-र्जुनीय ’ व माघाचें ‘ शिशुपालवध ’ हीं एकाच ठशाचीं काव्यें असून कृत्रिमपणांत माघानें भारवीला मागें सारिलें आहे. रघुवंशांतील दशरथाचा मृगयापूर्व विलास (सर्ग ९) आणि कुशाची जलक्रीडा (सर्ग १६) यांची व किरातार्जुनीयांतील अप्सरांची जलक्रीडा, कंदुकक्रीडा इत्यादिकांची तुलना केल्यास रघुवंशांतील प्रसंग स्वाभाविकपणें आणून थोडक्यांत आटोपते घेतलेले आढळतात, तर पुढील काव्यांत ते प्रसंग मुद्दाम खेंचून आणल्यासारखे असून लांबचलांब झाल्यामुळें कंटाळवाणे होतात. चित्रकाव्याच्या दृष्टीनें हाच प्रकार आढळून येतो. कालिदासानें केवळ शब्दालंकारावर फारच थोडा भर दिला आहे, तर भारवि व माघ यांनीं शब्दालंकार व निरनिराळे बंध यांना मुद्दाम हाका मारून ओढून आणिलें आहे. भारवीनें पंधरावा सर्ग व माघानें एकोणिसावा सर्ग चित्रबंधरचनेला दिले आहेत. तसेंच विविधवृत्तांसाठींहि त्यांनीं स्वतंत्र सर्गांची योजना केलेली आहे. परंतु कालिदासानें या दोन्ही गोष्टी बहुतेक टाळल्या असून रघूच्या नवव्या सर्गांत उगीच कोठें त्यांची छटा दाखविली आहे. माघानें तर ऋतुवर्णनाच्या बाबतींत पराकाष्ठेचा कृत्रिमपणा दाखविलेला दिसतो; म्हणजे सर्व ऋतूंचीं वर्णनें प्रसंगाप्रसंगानें केल्यावर तीं जणूं काय अपुरीं आहेत असें वाटून त्यानें पुनः एका स्वतंत्र सर्गांत साऱ्या ऋतूंचीं वर्णनें केलीं आहेत. भारवीनें प्रतिसर्गाच्या अंतिम श्लोकांत ‘ श्री ’ हें अक्षर आणिलेलें असून माघानें ‘ लक्ष्मी ’ हा शब्द आणिला आहे. कालिदास असल्या फंदांत कोठें पडलेला नाहीं. कालिदासाची भाषा साधी व ओघवती आहे. तींत लांबलांब समास, अगदीं अप्रसिद्ध शब्द, व्याकरणाच्या नियमांनी सिद्ध होणारीं तथापि रूढ नसलेलीं शब्दांचीं रूपें क्वचित्च योजिली असतील. पण भारवि-माघांनीं प्रयत्नपूर्वक कठीण शब्द व रूपें घालून आपली

भाषा क्लिष्ट केली आहे. कालिदासाची भाषा दोन सुशिक्षित माणसांच्या संभाषणांत यावी तशी आहे; तर माघ-भारवींची भाषा एकमेकांचा पाडाव करून शब्दयुद्धांत विजयी होऊं पाहणाऱ्या वादपटु वीरांची आहे. कालिदासाचे संवाद थोडक्यांत संपणारे तर माघ-भारवींचे लांबलचक वक्तृत्वाचे नमुने असे आहेत. माघ-भारवींविषयी जें सांगितलें तें हर्षाच्या नैषधचरिताला अधिक लागू आहे. हें महाकाव्यांविषयीं झालें. माघ-भारवींचीं खंडकाव्यें असलींच तर तीं उपलब्ध नाहींत.

" उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् । दण्डिनः पदलालित्यं माघे सन्ति त्रयो गुणाः ॥ " या श्लोकांतील पदलालित्यावर भर देणाऱ्या दण्डीची तुलना कालिदासाशीं योग्य रीतीनें करतां येत नाहीं. दण्डीनें काव्य असें लिहिलेलें प्रसिद्ध नाहीं. 'दशकुमारचरित' हा त्याचा अद्भुतकथात्मक ग्रंथ कालिदासाच्या कोणत्याच ग्रंथाशीं लावतां येण्यासारखा नाहीं. " कुमाराः सुकुमारा माराभिरामाः " अशी पदरचना करून दण्डीनें पदलालित्य साधलें आहे, पण तें लवकरच कंटाळवाणें होतें. दण्डीच्या कथांत मनुष्यस्वभावहि सामान्यतः एकाच धोरणाचे व रेखल्यासारखे दाखविले आहेत. कालिदासाच्या नायकांप्रमाणें त्याच्या पात्रांत स्वभावपरिपोष दाखविण्यासारखे सुसंबद्ध प्रसंग दाखविण्याला वांवच नाहीं.

दण्डीचे गुण पूर्णत्वास नेणारा बाणभट्ट घेतला तर त्याच्या ग्रंथांवरहि भाषेच्या कृत्रिमपणाचें दाट आवरण पडलेलें आढळून येतें. श्लेष व लांब-लचक समास म्हणजे बाणाच्या भाषेचा आत्मा, तर कालिदासाची भाषा म्हणजे वाटेंत भेटल्यास ' कसें काय? बरें आहे ना? ' एवढें त्यांना म्हणून तेथून चटकन् निसटून जाणारी आहे. पण भाषापद्धतींतील हा भेद सोडल्यास बाणाची विद्वत्ता, भाषाप्रभुत्व, कल्पनागांभीर्य, स्वभावपरिपोष इत्यादि गुण कालिदासाच्या तत्सदृश गुणांशीं चांगलीच स्पर्धा करतील. रसपोषाच्या बाबतींतहि दोघांची झटापटच लागेल यांत संशय नाहीं. निसर्गाशीं तादात्म्य पावण्याची अपूर्व कला उभयतांस सारखीच अवगत होती. सगद्गद कंठानें

शंकराचें गुणगान करून किन्नरकन्यकांना रडविणारी कालिदासाची पार्वती (कु. ५, ५६) वीणानादावर महाकालापुढें गायन करून सर्व सृष्टीला सद्गदित करणाऱ्या तपस्वी महाश्वेतेची जोडीदारीणच आहे. तथापि वर्णनाचें भव्यत्व पाहिलें तर बाणभट्ट निःसंशय कालिदासाला मागें टाकील. बाणभट्टाच्या अच्छोदवर्णनाचा भव्यपणा कालिदासाच्या कोणत्याहि वर्णनांत नाहीं. पार्वतीची कसोटी पाहणाऱ्या शंकरस्वरूपाच्या बीभत्स वर्णनाला बाणभट्टाचें चांडालवाटिकावर्णन केव्हांच मागें सारील. परंतु कालिदासाचा साधेपणा बाणभट्टांत नसल्यामुळें ‘ हर्षचरित ’ व ‘ कादंबरी ’ हीं रघुवंश-शाकुन्तलां-प्रमाणें लोकप्रियहि होणें शक्य नाहीं.

प्रकरण चौथें

कालिदासाचीं नाटकें

१ प्रास्ताविक

मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय आणि अभिज्ञानशाकुन्तल हीं कालिदासाचीं तीन नाटकें उपलब्ध आहेत. मराठींतील नाटक या सामान्य शब्दाचा संस्कृत पर्याय रूपक हा असून त्याचे नाटक, प्रकरण, भाण, प्रहसन इत्यादि उपप्रकार साहित्यशास्त्रांत उक्त असतात. नाटकांत पांचपासून दहांपर्यंत अंक असावे, त्याचें संविधानक प्रसिद्ध असावें, त्याचा नायक धीरोदात्त असावा, त्यांत शृंगार किंवा वीररस मुख्य असून इतर रस गौण असावेत इत्यादि लक्षणें साहित्यशास्त्रकार सांगतात. कालिदासाचीं नाटकें या लक्षणांना जुळतील अशींच बहुतांशीं आहेत. संस्कृतांतील उपलब्ध साहित्यग्रंथांत

नाटकाचा सविस्तर विचार करणारा कालिदासापूर्वीचा ग्रंथ म्हटला म्हणजे भरतप्रणीत ' नाट्यशास्त्र ' हा एकच होय. धनंजयाचें ' दशरूपक,' विद्यानाथाचें 'प्रतापरुद्रीय,' विश्वनाथाचें ' साहित्यदर्पण ' इत्यादि ग्रंथ कालिदासानंतर बऱ्याच शतकांनीं झालेले होत. अर्थात् त्यांच्या ग्रंथांतील रूपकाचें लक्षण पूर्वी काव्यविचारांत म्हटल्याप्रमाणें कालिदासाच्या नाटकांना धरून असल्यास नवल नाहीं. पण कालिदास झाला तरी कांहीं संस्कृतांतील आद्य नाटककार नव्हे. भास, सौमिल्ल, कविपुत्रादि पूर्वकालीन नाटककारांचीं नांवें स्वतः कालिदासानेंच सांगितलीं आहेत. अर्थात् त्याच्या वेळीं नाटकाचें स्वरूप निश्चित झालेलें होतेंच व त्याला अनुसरूनच त्यानें आपलीं नाटकें लिहिलीं, हें उघड आहे.

२ मालविकाग्निमित्र

कालिदासाचें पहिलें नाटक 'मालविकाग्निमित्र' होय, हें पूर्वी सांगितलेंच आहे. मगध देशांत पाटलिपुत्र येथें राज्य करणाऱ्या मौर्य घराण्यांतील बृहद्रथ नांवाचा राजा क्रिस्तपूर्व १८४ वर्षांच्या सुमारास सिंहासनावर होता. त्या वर्षी त्याचा सेनापति पुष्यमित्र यानें त्याला ठार करून त्याचें राज्य बळकाविलें. पुष्यमित्राच्या घराण्याला शुंग घराणें म्हणत. त्याचा पुत्र अग्निमित्र दक्षिणेकडे विदिशा येथें राहून दशार्ण प्रांताची व्यवस्था पाहत असे. हा अग्निमित्र मालविकाग्निमित्राचा नायक होय. दशार्णाच्या दक्षिणेस विदर्भ देश असून तेथें यज्ञसेन नांवाचा राजा राज्य करीत होता. यज्ञसेनाचा चुलतभाऊ माधवसेन याचा ओढा अग्निमित्राकडे होता व तदनुसार आपली बहीण मालविका त्याला द्यावी असा त्याचा विचार होता. त्याप्रमाणें तो तिला घेऊन अग्निमित्राकडे यावयास निघाला असतां वाटेंत सीमेवर यज्ञसेनाच्या संरक्षक सैन्याच्या तुकडीनें त्याच्यावर छापा घालून त्याला बंदिवान केलें. या गडबडींत माधवसेनाचा सुमति नांवाचा कारभारी मालविका, तिच्या मैत्रिणी व आपली बहीण कौशिकी यांना एकीकडे काढून थोड्याशा सैनिकांसह विदिशा नगरीकडे निघाला. पण पुनः त्यांच्यावर चोरांच्या टोळीची धाड

पडली आणि त्या चकमकींत सुमति मारला जाऊन सर्वांची पांगापांग झाली. चोर मालविकेसह लूट घेऊन पळाले. कौशिकी मात्र निसटली ती भिक्षुणीच्या वेषानें विदिशेला जाऊन अग्निमित्राच्या आश्रयास राहिली.

इकडे विदिशा प्रांताच्या सीमेवर अग्निमित्राचा मेहुणा वीरसेन सेनाधिकारी होता. चोरांची टोळी मालविकेसह पळून जात असतां वीरसेनाच्या तावडींत ती सांपडली. तेव्हां मालविका ही चांगली उमदी मुलगी असून आपल्या वहिणीजवळ राहण्यास योग्य आहे असें पाहून वीरसेनानें तिला तिच्याकडे, म्हणजे अग्निमित्राच्या धारिणी नामक राणीकडे पाठवून दिलें. तेथें ती अग्निमित्राच्या दृष्टीस पडूं नये म्हणून धारिणी जपत असतांहि चित्ररूपानें एकदा ती राजाला दिसली व तिचें नांव मालविका आहे असेंहि त्यास कळलें. चित्रांतील तिचें रूप पाहून ती प्रत्यक्ष पाहावी अशी त्याला इच्छा झाली व आपला विदूषक मित्र जो गौतम त्याच्या हिकमतीनें ती दृष्टीस पडेल असा थाट त्यानें घडवून आणिला. त्यानंतर उभयतांचें उभयतांवर प्रेम बसलें. तेव्हां पहिल्या राण्यांचा रोष न होईल अशा रीतीनें तिची प्राप्ति कशी करून घ्यावी असा विचार राजा करूं लागला व ती कामगिरी त्यानें गौतमावर सोंपविली. गौतम नुसता विदूषक नसून कारस्थानी होता. त्यानें अनेक लटपटी करून राजाची व मालविकेची भेट करविली; आणि शेवटीं मालविका खरोखर माधवसेनाची बहीण म्हणजे राजकन्या आहे असें जेव्हां धारिणीला कळलें, तेव्हां तिनेंहि आपली संमति दिल्यामुळें मालविकेचा अग्निमित्राशीं रीतसर विवाह झाला. पण हें घडून येईपर्यंत मालविकेला बरेच कष्ट भोगावे लागले.

मालविकाग्निमित्राच्या कथानकाला याप्रमाणें मूळ आधार इतिहासाचा आहे. या नाटकांत अग्निमित्राच्या प्रेमकथेशिवाय पुष्यमित्राचा अश्वमेध, मेध्य अश्वाबरोबर गेलेल्या वसुमित्राचा पराक्रम, विदर्भावरील स्वारी, विदर्भराज यज्ञसेनाचा पराभव होऊन झालेल्या सामानुसार यज्ञसेन व माधवसेन यांमध्यें विदर्भराज्याची अग्निमित्रानें केलेली वांटणी यांचाहि उल्लेख आला

आहे. या सर्व गोष्टींचा विचार करतां मालविकेचा अग्निमित्राशीं झालेला विवाह हा मूळ राजकारणी विवाह होता असें दिसून येतें.

या नाटकांतील महत्त्वाचें पात्र म्हणजे विदूषक गौतम हें होय. अग्निमित्र हा नायक, पण त्याचा सूत्रधार गौतमच. अग्निमित्राच्या पहिल्या दोन राण्या धारिणी व इरावती अशा होत्या. धारिणी जरा गंभीर स्वभावाची व इरावती अधिक तापट अशा त्या दाखविल्या आहेत. पंडितकौशिकीचें पात्रदेखील महत्त्वाचेंच आहे. मालविकेचा विवाह अग्निमित्राशीं व्हावा अशाविषयींचीं तिचीं कारस्थानें गौतमाच्या कारस्थानाला अनुकूल झालीं. या कारस्थानांत कांहीं दासीनाहि घेतलेलें असल्यामुळें निवळ दासीपेक्षां त्यांचें काम अधिक महत्त्वाचें झालेलें आहे. या कारस्थानांनींच नाटकाचें बहुतेक संविधानक बनलेलें आहे. अग्निमित्र हा उल्लू प्रकृतीचा राजा असून राजकारणापेक्षां प्रेमकारणांतच त्याचें अधिक लक्ष होतें व त्याबद्दल धारिणी राणीनें त्याला एकदा चांगला टोमणाहि मारिलेला आढळतो.*

'मालविकाग्निमित्र' नाटक विनोदगर्भ आहे. त्याचा नायक जो अग्निमित्र त्यावर दुःखाचा प्रसंगच आलेला नाहीं. नायिका मालविका हिला धारिणी व इरावती यांच्या स्वाभाविक मत्सरामुळें थोडे कष्ट भोगावे लागले; पण त्यांना फारसें गंभीर स्वरूप कधींच आलें नाहीं. त्यामुळें ते विनोदाला पोषक झालेले आहेत. यांतील विनोदाचा रोख दोन्ही राण्यांवर आहे. त्यांचे प्रयत्न उलथून पाडणें हें केवळ अधिकाराच्या जोरावर राजाला करतां आलें असतें. पण तो उल्लू असला तरी हलकट नव्हता. त्यामुळें राण्यांच्या पुढें त्याची स्थिति केविलवाणी होई व तीतून त्याला बाहेर काढण्यासाठीं गौतमाला कांहींतरी क्लृप्ति काढावी लागे.

या नाटकावरून कालिदासाच्या काळीं प्रत्यक्ष कशा प्रकारचीं माणसें वावरत असत हें दिसून येतें. त्याच्या सगळ्या संविधानकांत दिव्य किंवा

* "यदि राजकार्येष्वपि ईदृशी निपुणता आर्यपुत्रस्य तदा शोभनं भवेत्।" मा. १, २०

अतिमानुष असा एकहि प्रकार नाहीं. सर्व गोष्टी सरळ, मानवी व्यवहाराच्या आहेत. त्यामुळें कालिदासकालीन समाजाचें खरें चित्र त्यांत पाहावयास मिळतें. शिक्षणकला व संगीतशास्त्र यांचा कालिदासाचा परिचयहि या नाटकांत विशेष दिसून येतो.

३ विक्रमोर्वशीय

कालिदासाचें दुसरें नाटक 'विक्रमोर्वशीय' हें होय. सोमवंशांतील तिसरा पुरुष पुरूरवा याचें उर्वशी नामक अप्सरेवर प्रेम जडलें आणि उलट उर्वशी-चेंहि पुरूरव्यावर जडलें. परंतु उर्वशी इंद्रसभेंतील अप्सरा असल्यामुळें त्या प्रेमांत मोठाच अडथळा होता. तो अकल्पित कारणांनीं दूर होऊन त्यांची गांठ पडली आणि मध्यतरीं कांहीं काळ तशाच अकल्पित कारणानें त्यांचा वियोग होऊन पुनः आकस्मिक कारणामुळें त्यांची गांठ इन्द्रानें कायमचीच घालून दिली, असें या नाटकाचें थोडक्यांत संविधानक आहे. या संविधानकांत यथोचित प्रसंगांची भर घालून कवीनें नाटकाची उभारणी केली आहे.

उर्वशी कुबेराची सेवा करून मैत्रिणींसह कुबेरभवनाहून परत जात असतां केशी दानव तिला पळवून नेतो त्यांची आरोळी ऐकून पुरूरवा वेगानें त्या शब्दानुरोधानें जाऊन उर्वशीची सुटका करितो. या खटपटींत एकमेकांची दृष्टादृष्ट होऊन त्यांचें एकमेकांवर प्रेम बसतें. उर्वशी कष्टानें स्वर्गीं जाते व राजा तितक्याच कष्टानें आपल्या राजधानीस येतो.

राजाची बदललेली चित्तवृत्ति त्याच्या औशीनरी नामक राणीच्या लक्षांत येते व ती त्याचें कारण उर्वशी होय, ही गोष्ट आपल्या चतुर दासीच्या द्वारा राजाचा मित्र जो मूर्ख विदूषक त्याच्याकडून काढून घेते. राजाच्या भेटीची उर्वशीलाहि उत्कंठा लागलेली असते व त्यामुळें ती आपल्या सखीसह प्रति-ष्ठानीं राजवाड्याशीं येते. तेथें क्षणभर त्यांची गांठ पडते तों नाट्याचार्य भरताचें बोलावणें येऊन 'लक्ष्मीस्वयंवर' नांवाच्या नाटकांत लक्ष्मीची भूमिका करण्यासाठीं ती तशीच परत निघून जाते. नाटकाचें काम चाललें असतां आयत्या वेळीं उर्वशीच्या तोंडून "पुरुषोत्तमावर माझें प्रेम आहे" या शब्दांच्या

जागीं, पुरूरव्याचें नांव तिच्या मनांत घोळत असल्यामुळें “ पुरूरव्यावर माझें प्रेम आहे ” असे शब्द येऊन गेले. त्यामुळें नाट्याचार्य भरतमुनि साहजिकच रागावले व “ जा, मृत्युलोकीं जाऊन पड ! ” असा तिला त्यांनीं शाप दिला. हा शाप अर्थात् उर्वशीच्या पथ्यावरच पडला.

उर्वशी इन्द्राच्या संमतीनें रीतसर राजाची झाली. पण राजाला पुत्रमुखदर्शन होईपर्यंतच ती तेथें राहावयाची होती. या कामीं औशीनरीचा कांटा आडवा होता. पण ती काय करते बापडी ? तिनें बायकी हत्यार प्रथम पाजळलें; पण शेवटीं अगतिक होऊन तिनें त्या प्रेमग्रंथीला आपण होऊनच एक वळसा दिला आणि पुरूरव्याची अडचण दूर केली ! उर्वशी व पुरूरवा यांना आनंद होऊन तीं दोघें हिमालयावरील गंधमादन टेकडीवर अभिनव सृष्टिसौंदर्याच्या आगरांत मौज मारण्यासाठीं निघून गेलीं. तेथें एकदा उर्वशी राजावर रुसून रागानें दूर गेली असतां कुमारवनांत शिरतांच एक वेल होऊन पडली ! राजा तिच्या मागोमाग गेला, पण उर्वशी कोठें दिसेना. शोध करूनहि ती सांपडेना तेव्हां तो भ्रमिष्ट झाला व “ माझी उर्वशी कोठें आहे ! ” असें दुःखानें भेटेल त्या पशुपक्ष्यालासुद्धां विचारीत भटकूं लागला ! भटकतां भटकतां एक लाल मणि त्याला दिसला. “ उर्वशीच्या केसांत तो चांगला शोभेल, पण काय उपयोग ! ” असें म्हणून तो तेथून चालला असतां, “ अरे, हा संगमनीय मणि होय. हा जवळ असला म्हणजे प्रियजनाची लवकर गांठ पडते” असें त्याला कोणींतरी सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें तो घेतला व पुढें जाऊन एका वेलीला ती जणूं उर्वशीच आहे असें वाटून तो कवटाळूं लागला, त्याबरोबर वेल नाहींशी होऊन तिच्या जागीं उर्वशीच उभी राहिली ! दोघेंहि आनंदित होऊन प्रतिष्ठानीं परत आलीं. गंधमादनप्रदेशीं असतां उर्वशीला पुत्र झाला. पण पुरूरव्याच्या दृष्टीस तो पडला तर लगेच त्याला सोडून आपल्याला स्वर्गी जावें लागेल, या भीतीनें तिनें तो जन्मतांच च्यवन ऋषीच्या आश्रमांत नेऊन दिला. तेथें च्यवनानें त्याचें पालनपोषण करून त्याला शिक्षणहि दिलें.

इकडे प्रतिष्ठानीं एकदा एक गिधाड तो संगमनीय मणि घेऊन उडून गेलें आणि राजाचीं माणसें त्याच्या मागें लागलीं तरी तो मणि सांपडेना. परतु थोड्या वेळानें तें गिधाड कोणाचा तरी बाण लागून भूमीवर पडलें असतां एका किरातीला दिसलें व तिनें तसेंच्या तसेंच मणि-बाणांसह त्याला राजाकडे आणून दिलें. याप्रमाणें मणि सांपडला आणि बाण तपासून पाहतात तों त्यावर " पुरूरव्याचा पुत्र आयु याचा हा बाण आहे " अशा अर्थाचीं अक्षरें दिसलीं. इतक्यांत च्यवनाश्रमांतील एक तापसी एका सुंदर मुलाला घेऊन राजाकडे आली व "च्यवनमुनींनीं हा महाराजांचा पुत्र महाराजांच्या स्वाधीन करण्यासाठीं पाठविला आहे" असें तिनें सांगितलें. राजा आश्चर्यचकित झाला. तेव्हां उर्वशीनें सारें वृत्त सांगितलें आणि पूर्वीच्या ठरावाप्रमाणें राजाला पुत्रदर्शन झालेलें पाहून ती स्वर्गी जावयास निघाली. पुनः राजाचा विरस झाला! त्यानें आयूला यौवराज्याभिषेक करून आपण स्वतः वानप्रस्थ होण्याचें ठरविलें.

परंतु ही वार्ता इन्द्राला कळतांच त्यानें नारदाबरोबर राजाला निरोप पाठविला कीं, देव-दानवांचें युद्ध लवकरच जुंपणार आहे व त्या प्रसंगीं त्याचें साह्य आपल्याला पाहिजे असल्यामुळें त्यानें वानप्रस्थ होऊं नये. उर्वशी त्याच्याजवळ आजन्म राहील. अशा रीतीनें पुरूरवा आणि उर्वशी यांची कायमची ग्रंथि जडली.

पुरूरवा आणि उर्वशी यांच्या कथेचें मूळ फार प्राचीन आहे. पुरूरव्याचें नांव ऋग्वेदांत आलेलें असून दहाव्या मंडळांतील ९५व्या सूक्तांत त्या दोघांचा संवादहि आला आहे. शतपथ ब्राह्मणांत त्या सूक्ताचें विवरण आलें असून महाभारत व विष्णु, भागवत, पद्म इत्यादि पुराणें यांतहि ही कथा आढळते. पण कालिदासाच्या या नाटकांत तिचें जें स्वरूप आढळतें, तसें जवळजवळ मत्स्य पुराणांत मात्र दिसून येतें. अर्थात् त्या स्वरूपांतहि नाटकदृष्टीनें कांहीं अभिनव प्रसंग कालिदासानें कल्पनेनें घातले असून त्याचा शेवट गोड केला आहे. मूळ गोष्टींत औशीनरी राणीचा संबंध आलेला नाहीं.

पण कालिदासानें तिला पुरूरव्याची पहिली राणी कल्पून तिच्या मत्सरामुळें संविधानकाला रमणीयत्व आणिलें आहे. भरताचा उर्वशीला शाप, संगमनीय मण्याची कथा व इन्द्रानें आपली पहिली अट बदलून पुरूरव्याला संतुष्ट करून त्याचें साह्य व्हावें म्हणून त्याला उर्वशी कायमची देऊन टाकणें, याहि गोष्टी कविकल्पनेच्याच होत.

विक्रमोर्वशीयांतील बरींच पात्रें सामान्य माणसांतील नसून दिव्य आहेत. पण त्यांचें वर्तन मात्र तसें दिव्य नाहीं. पुरूरवा व उर्वशी एकमेकांच्या दृष्टीनें प्रेमळ असलीं तरी तिऱ्हाइतामध्यें त्यांना पाहून विशेष आदर उत्पन्न होईल अशीं तीं नाहींत. यांतील विदूषक शाकुन्तलांतील गौतमाहून फारच कमी प्रतीचा व बावळट आहे. औशीनरी राणी थोडी मानी स्वभावाची असली तरी पतीपुढें उपाय नाहींसा होऊन तिला हार खावी लागते व आल्या प्रसंगाला खुषीनें तोंड देण्यास सिद्ध होऊन वाचकांच्या दयेस पात्र होते. इन्द्रानेंहि प्रथम उर्वशीला पुरूरव्याकडे पाठविण्यांत विशेष औदार्य दाखविलेलें नसून पुत्रमुखदर्शनाची अट घालण्यांत उर्वशीच्या हातीं निष्ठुर होण्याचें शस्त्रच जणूं दिलें. या कोणत्याहि पात्रांत खरा उमदेपणा कोठेंच दिसून येत नाहीं. तीं केवळ व्यवहार जाणतात, उच्च तत्त्वाला सर्वच सारखीं पारखीं आहेत, उर्वशी सोडून जाते असें पाहून पुरूरवा वानप्रस्थ होऊं पाहतो; परंतु त्या वेळीं बिचाऱ्या औशीनरीची त्याला मुळींच आठवण होत नाहीं! तो केवळ आपल्यापुरतें पाहणारा आहे. तात्पर्य, हीं पात्रें ध्येयात्मक नसून व्यवहारांतील माणसें जशीं खरोखर असतात, तशींच दाखविण्याचा कालिदासानें प्रयत्न केला आहे.

' विक्रमोर्वशीय ' म्हणजे विक्रमानें किंवा पराक्रमानें प्राप्त करून घेतली आहे उर्वशी ज्यांत तें नाटक, असा अर्थ सामान्यतः करण्यांत येतो. कित्येक-जण विक्रम हें पुरूरव्याचेंच अपरनांव समजतात, तर दुसऱ्या कोणाला त्यांत कालिदासाच्या आश्रयदात्या विक्रमाचें प्रतिबिंब दिसतें. " दिष्ट्या महेन्द्रोप-कारपर्याप्तेन विक्रममहिम्ना वर्धते भवान्। " (वि. १।१४) किंवा "अनुत्सेकः

खलु विक्रमालंकारः।" (वि. १,१६) अशीं जीं वाक्यें यांत पुरूरव्याला उद्देशून आलीं आहेत, त्यांतहि त्याच्या आश्रयदात्याच्या नांवाचा प्रच्छन्न उल्लेख आहे असा समज आहे.

या नाटकांतील चौथा अंक विशेष प्रकारचा आहे. उर्वशीचें वेलींत रूपान्तर झाल्यावर राजा शोकाकुल होऊन तिचा शोध करीत फिरत आहे असा त्यांतील देखावा असून तो अत्यंत करुणात्मक आहे. रामायणांतील सीताहरणानंतर रामानें केलेला तिचा शोध हा प्रसंगहि असाच असून त्यावरूनच कालिदासानें आपला प्रसंग कल्पिला असला पाहिजे.

या नाटकांत निसर्गाचें वर्णन बरेंच असून तें सरस वठलें आहे. कालिदासाला हिमालयाची फार आवड होती. अनेक ठिकाणीं त्यानें त्याचें वर्णन केलेलें आढळतें. कुमारसंभवांत दोन ठिकाणीं (सर्ग १ व ६), तशीच मेघदूत व रघुवंश यांतहि त्यानें हिमालयवर्णनाची संधि साधिलेली आहे. मालविकाग्निमित्रांत निसर्गवर्णनाचा संबंधच फारसा नाहीं. त्यांतील स्थळ विदिशा नगरींतील अग्निमित्राचा वाडा व त्याला लागून असलेलीं उद्यानें यांच्या बाहेर नाहीं. पण विक्रमोर्वशीयाचा आरंभच हेमकूट आणि त्यावरील अंतरिक्ष प्रदेश यांत असून पुढें हिमालयांतील गंधमादन प्रदेशांतहि कवीनें आपलीं पात्रें नेलीं असल्यामुळें सृष्टिवर्णनाला सहजच वांव मिळाला आहे. गंगायमुनांचा संगम व त्यांत प्रतिबिंबित झालेले प्रतिष्ठान नगरींतील राजवाडे यांच्याहि सौंदर्याची जाणीव कालिदासानें या नाटकांत करून दिलेली आहे.

मालविकाग्निमित्रापेक्षां विक्रमोर्वशीयांत कालिदासाचें भाषासौष्ठव अधिक खुलून आलेलें दिसतें. मालविकाग्निमित्रांत सारा भर क्षुद्र कारस्थानांवर आहे, तर विक्रमोर्वशीयांत पुष्कळशा गोष्टी अदृष्टावर सोंपविल्या आहेत. मालविकाग्निमित्रांत मालविकेच्या पादस्पर्शानें अशोकाला फुलें येणें व तेणेंकरून धारिणीचा तिच्याविषयींचा कोप कमी होणें ही एकच गोष्ट मनुष्यशक्तीच्या बाहेरील आहे. मालविका व अग्निमित्र यांचा एकदा रीतसर संगम झाला तो कायमचा, पण विक्रमोर्वशीयांत कालिदासाच्या मनांतून प्रेमाला

जरा उच्च पदवीस चढवावयाचें होतें. उर्वशी ही बोलूनचालून अप्सरा, किंवा मानवी भाषेंत बोलावयाचें तर केवळ वेश्या. तेव्हां तिचें प्रेम अळवावरच्या पाण्यासारखेंच असावयाचें. परंतु तिला जिवावरच्या प्रसंगांतून पुरूरव्यानें वांचविल्यामुळें तिच्यांत तात्कालिक उत्पन्न झालेल्या प्रेमांत कृतज्ञतेच्या सात्त्विक भावाची प्रथमपासूनच भर पडली होती. तरी खरें प्रेम म्हणजे वाटेवरची गोष्ट नव्हे, ही गोष्ट उर्वशीला चांगली जाणवून तिच्या प्रेमाला खरें सात्त्विक बनवावें असा कालिदासाचा मानस असल्यामुळें त्यानें तिच्या मानीपणाबद्दल तिला चांगली अद्दल घडेल असें केलें व कांहीं काळ तिला वेलीच्या रूपानें राहावयास लाविलें. वेलीच्या रूपानें राहून तिची बरीच शुद्धि जणूं झाली व त्यामुळें आणखी एक घटना घडवून दोघांची ताटातूट होणार नाहीं असें कवीनें करून दाखविलें. हे सारे प्रसंग सजवून व एकांत एक बरोबर बसवून देण्यांत कालिदासाची चांगली करामत दिसून येते.

मालविकाग्निमित्राच्या मानानें विक्रमोर्वशीयाची योग्यता काव्यदृष्ट्याहि अधिक आहे. भाषेची सफाई, कल्पनांचें प्राचुर्य व भव्यपण, इत्यादि कविगुणहि यांत अधिक विकसित झालेले दिसतात. मालविकाग्निमित्रांतील कारस्थानी प्रेम आणि प्रेमाचीं कारस्थानें हीं विक्रमोर्वशीयांत आढळत नसून त्यांतील प्रेमाला खरा जिह्वाळा असलेला दिसून येतो; आणि अपत्यदर्शनामुळें त्या जिह्वाळयाला सहजच अधिक मार्दवहि आलेलें आहे. मालविकाग्निमित्रांत शृंगाराला हास्यविनोदाची मुख्य जोड दिलेली आहे, तर विक्रमोर्वशीयांत ती करुणरसाची दिली आहे. विनोद त्यांत अगदीं मागें राहिला आहे.

मालविकाग्निमित्रांत अर्थान्तरन्यास किंवा म्हणीवजा होणारीं वचनें थोडींच आहेत; विक्रमोर्वशीयांत त्यांचें प्रमाण अधिक आहे. “ अतिस्नेहः खलु कार्यदर्शी। ” (२, ९), “ नास्त्यगतिर्मनोरथानाम् । ” (२, १२), “तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम् । ” (२, १६), “ न खल्वक्षिदुःखितोऽभिमुखे दीपशिखां सहते । ” (२, २३), “ परावृत्तभागधेयानां दुःखं दुःखानु-

वन्धि । " (४, ३), " राजा कालस्य कारणम् । " (४, ४), " महदपि परदुःखं शीतलं सम्यगाहुः । " (४, १३), " स्वार्थात्सतां गुरुतरा प्रणयिक्रियैव । " (४, १५) इत्यादि सुभाषितसदृश वाक्यें यांत बरींच असून त्यामुळें भाषेला चटकदारपणा अधिक आलेला आहे.

४ शाकुन्तल

कालिदासाच्या नाटकग्रंथांत सर्वश्रेष्ठ, विद्यमान संस्कृत नाट्यवाङ्मयांत पहिल्या प्रतीचें आणि जगांतील कोणत्याहि उत्तम नाटकाच्या बरोबरीनें बसण्याची पात्रता असलेलें असें ' शाकुन्तल ' हें कवीचें तिसरें नाटक होय.

याची मूळ कथा महाभारताच्या आदिपर्वांतील शकुन्तलोपाख्यानांत आली आहे. परंतु निवळ आराखड्यापलीकडे त्यांतून कालिदासानें फारसें कांहीं घेतलेलें नाहीं. दुष्यन्त राजा शिकारीला गेला असतां सैन्यापासून दूर गेला आणि एका हरिणाच्या मागें लागत मालिनीतीरावरील कण्वाश्रमापाशीं आला. राजा त्यावर बाण टाकणार इतक्यांत कांहीं तपस्व्यांनीं "हा आश्रममृग आहे, त्याला मारूं नये" अशी विनवणी केल्यावरून त्यानें बाण मागें घेतला; आणि त्यांच्याच सूचनेवरून राजानें कण्वाश्रमांत प्रवेश केला. त्या समयीं कण्वमुनि आश्रमांत नव्हते; आपल्या शकुन्तलानामक धर्मकन्येला आश्रमाची व्यवस्था सांगून ते तिच्यासाठीं कांहीं अनुष्ठान करण्याकरितां नुकतेच सोमतीर्थी गेले होते.[१] तेथें दोन सख्यांसह शकुन्तला वृक्षलतांना पाणी घालीत असलेली राजाला दिसली. त्या मुलींनीं त्याचें स्वागत केलें आणि मग त्यांचें जें संभाषण झालें त्यांत शकुन्तला ही कण्वाची धर्मकन्या असून विश्वामित्राला मेनकानामक अप्सरेपासून झालेली असल्यामुळें क्षत्रियकन्या आहे, असें दुष्यन्ताला कळून आलें; आणि तिचें रूप व वय पाहून तो तिच्यावर मोहित झाला. उलट शकुन्तलेच्या मनावरहि तसाच परिणाम झाला. राजाला आश्रमांतून

---

१. " **वैखानसः**—इदानीमेव दुहितरं शकुन्तलामतिथिसत्काराय नियुज्य दैवमस्याः प्रतिकूलं शमयितुम् सोमतीर्थं गतः ।" शा. १, १४

जावेंसें वाटेना; पण अधिक काळ तेथें राहण्याला त्याला कांहीं तरी कारण पाहिजे होतें. त्याला शिकारींतहि आतां मौज वाटेनाशी झाली. आपला मित्र विदूषक याला त्यानें आपल्या मनांतील विचार सांगितला. तेव्हां करवसुलीच्या निमित्तानें आश्रमांत पुनः जाण्याचा सल्ला त्यानें राजाला दिला. पण हा सल्ला केवळ विदूषकी असल्यामुळें राजाला तो मानवणें शक्य नव्हतें.

इतक्यांत अचानक रीतीनें हा प्रश्न सुटला. कण्वमुनि आश्रमांत नसल्यामुळें तेथील यज्ञयागांना उपद्रव देणाऱ्या राक्षसांचें फावलें होतें. अशा संधीस राजा ससैन्य आश्रमाजवळ तळ देऊन राहिलेला पाहून ऋषींनीं त्याचें साहाय्य मागितलें व तें देण्याचें त्यानें तत्काळ मान्य केलें. पण त्याला बरोबरची सारी मंडळीहि तेथें नको होती. त्यांना कसें घालवावें अशा विचारांत तो पडला असतां राजधानीहून राजमातेचा निरोप घेऊन एक मनुष्य आला. तेव्हां आतां दोन ठिकाणचीं दोन कामें एकदम कशीं करावीं अशी वरकरणीं विवंचना दाखवून दुष्यन्तानें विदूषकाला आपल्या मातेचें कार्य करण्यासाठीं आपल्या वतीनें ससैन्य परत पाठविलें; व तो स्वतः आश्रमांत राक्षसपीडानिवारणार्थ एकटाच राहिला. पण आपला मूर्ख मित्र शकुन्तलेसंबंधाचें वृत्त राजवाड्यांत बोलून घोटाळा उत्पन्न करावयाचा हें जाणून तो केवळ थट्टेचा प्रकार आहे, खरोखर शकुन्तलेवर आपलें मन जडलेलें नाहीं, असें त्यानें विदूषकाला निक्षून सांगितलें. भोळ्या विदूषकाला तेंहि खरेंच वाटलें व त्या बाबतींत तो अगदीं स्तब्ध राहिला.

ऋषींच्या विनंतीप्रमाणें दुष्यन्त यज्ञरक्षण करीत कांहीं दिवस आश्रमांत राहिला. शकुन्तलेची प्राप्ति होणें कठीण, असें तो जाणत असतांहि त्याची तिच्याविषयींची इच्छा अधिकाधिक दृढ होऊं लागली. तो अस्वस्थ झाला. चित्ताच्या अस्वस्थतेचा परिणाम त्याच्या शरीरावरहि दिसूं लागला. शकुन्तलेची सुद्धा तशीच स्थिति होत चालली. होतां होतां तिचें म्लान वदन तिच्या मैत्रिणींच्या लक्षांत आलें. त्यांनीं तिला त्याचें कारण विचारिलें. प्रथम ती सांगेना. पण त्यांनीं पुनः पुनः खोदून खोदून सूचक प्रश्न विचारल्यामुळें तिनें

आपली मन:स्थिति त्यांना कळविली. तेव्हां आतां कसेंहि करून तिला दुष्यन्ताची भेट करवून देणें अगत्याचें आहे असें त्यांनीं ठरविलें; व तदनुसार तिच्याकडून दुष्यन्ताकडे पाठविण्यासाठीं कमलपत्रावर प्रेमपत्रिका लिहून घेतली. हा प्रकार मालिनीतीरावरील उद्यानांत घडला. दुष्यन्तहि मनोरंजन करून काळ कंठण्याकरितां तेथें आला असतां त्या तिघींना तेथें पाहून त्यांचें भापण लपून ऐकत राहिला. शकुन्तलेची अस्वस्थता ही आपल्याला उद्देशूनच आहे, असें प्रत्यक्ष तिच्या तोंडून ऐकिल्यामुळें त्याला मोठें समाधान वाटलें; आणि प्रेमपत्रिका लिहून शकुन्तला निराशेचे उद्गार काढीत, म्हणजे "दुष्यन्तासारखा राजा आपल्यासारख्या आश्रमांतील गरीब मुलीला काय म्हणून विचारील?" असें म्हणत ती पत्रिका मैत्रिणींच्या हातीं कांकू करीत देत आहे तोंच तो पुढें आला आणि शकुन्तलेची शंका त्यानें दूर केली. इष्ट तेंच अनायासें झालें, हें पाहून शकुन्तलेच्या मैत्रिणी राजाला चार समयोचित शब्द सांगून व दोघांना एकत्र सोडून कांहींतरी निमित्त सांगत दूर गेल्या. तेव्हां आतां काय करावें असा शकुन्तलेपुढें प्रश्न उभा राहिला. पण शेवटीं हो, ना करतां करतां तिनें दुष्यन्ताशीं गांधर्व विवाह केला. नंतर कांहीं दिवसांनीं यज्ञ-संरक्षणाचें कार्य पुरें झालेंसें पाहून दुष्यन्त शकुन्तलेचा निरोप घेऊन व तिला न्यावयासाठीं लवकरच माणसें पाठविण्याचें वचन देऊन राजधानीस परत आला.

दुष्यन्त निघून गेल्यावर शकुन्तलेला करमेनासें झालें. ती नित्य त्याचाच विचार करूं लागली. अशा स्थितींत दुर्वासाची स्वारी तेथें आली व "कोण आहे आश्रमांत?" असें त्यानें विचारिलें. तेव्हां शकुन्तलेचें मन जाग्यावर नसल्यामुळें तिला ती हांकच ऐकूं आली नाहीं. शीघ्रकोपी दुर्वासानें लगेच तिला शाप दिला कीं, "ज्याचें ध्यान करीत तूं माझा अनादर केलास तोच मुळीं तुला विसरून जाईल; आणि आठवण देण्याचा तूं कितीहि प्रयत्न केलास तरी तो व्यर्थ जाईल." शाप ऐकतांच प्रियंवदा व अनुसूया यांच्या पोटांत धस्स झालें! अनुसूया तर दुर्वासाकडे धावत गेली आणि त्याचे पाय धरून तिनें शकुन्तलेच्या वतीनें क्षमा मागितली व त्याच्यापासून उःशाप मिळविला कीं,

"कांहीं खुणेचा अलंकार दाखविल्यास मात्र राजाला तिची आठवण होईल." दुष्यन्तानें शकुन्तलेला आपल्या नांवाची अंगटी दिली होती. तेव्हां थोडीशी अडचण आली तरी एकंदरींत कांहीं भीतीचें कारण नाहीं, असें समाधान मानून त्या मैत्रिणींनीं शकुन्तलेला शापाचें वृत्त कळविलें नाहीं.

कण्वऋषि कांहीं महिन्यांनीं आश्रमांत परत आल्यावर त्यांना हा सर्व प्रकार आकाशवाणीच्या द्वारें कळून आला; आणि झालें तें बरेंच झालें, असें म्हणून त्यांनीं शकुन्तलेला पतिगृहीं पाठविण्याची सिद्धता केली. दोन शिष्य व गौतमी नांवाची एक वडीलधारी तपस्विनी यांना समागमें देऊन शकुन्तलेची त्यांनीं पाठवणी केली. तसें करतांना त्यांचें कोमल हृदय दाटून आलें व कंठ भरून आला. दुष्यन्ताला सुंदर संदेश व शकुन्तलेला हितकर उपदेश देऊन अत्यंत प्रेमळपणानें कण्वानें तिला निरोप दिला; आणि थोड्या अंतरापर्यंत तिच्या बरोबर जाऊन इतर सर्व मंडळी माघारी फिरली. "दुसऱ्याच्या धनाची ठेव त्याला परत केली म्हणजे जसा जीव मोकळा होतो, तसें मला शकुन्तलेला पतिगृहीं पाठविल्यानें झालें" असे उद्गार कण्वानें त्या प्रसंगीं काढिले.

राजा शकुन्तलेला विसरला व त्यानें वचन दिल्याप्रमाणें माणसेंहि पाठविलीं नाहींत; आणि तशांत दुर्वासाचा शापहि झालेला. म्हणून शकुन्तलेला निरोप देतांना तिच्या मैत्रिणींनीं "बोटांतल्या अंगठीकडे मात्र चांगलें लक्ष ठेव हो" असें तिला मोघम, पण बजावून सांगितलें.

ही मंडळी हस्तिनापुरीं आल्यावर दुष्यन्ताला भेटली व कण्वाचा अभिनंदनात्मक संदेश कळवून "आपल्या धर्मपत्नीचा स्वीकार कर" असें त्यांनीं त्याला सांगितलें. पण दुष्यन्ताला त्यांतलें कांहींच समजेना. शकुन्तला घाबरली; तिनें त्याची खात्री करून देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण व्यर्थ. त्याच्या डोक्यांत कांहींच प्रकाश पडेना. शेवटीं गौतमीबाईनें "आतां तरी अंगठी दाखव" असें तिला सांगितलें. तेव्हां शकुन्तलेनें बोट चांचपलें; पण अंगठी केव्हां तरी गळून पडली होती! याप्रमाणें दुष्यन्ताची खात्री करण्याचा सारा उपाय थकला. तो तिचा स्वीकार करीना आणि कण्वशिष्य तर तिला परत

आश्रमीं येऊं देईनात! अशा स्थितींत पुष्कळ बोलाचाली होऊन एकमेकांनीं एकमेकांचीं उणीं देखील काढिलीं; परंतु त्यानें निर्णय कांहीं झाला नाहीं. शेवटीं दुष्यन्ताच्या पुरोहितानें सांगितलें कीं, शकुन्तलेनें प्रसूतीपर्यंत आपल्या घरीं राहावें. तिला होणारा पुत्र दुष्यन्ताचा असेल, तर त्याच्या अंगावर चक्रवर्तिचिह्नें असतील. तसें असल्यास राजानें तिचा स्वीकार करावा; अन्यथा तिची वाट तिला मोकळी राहील. ही पुरोहिताची कल्पना सर्वांना मानवली व शकुन्तला खिन्न अंतःकरणानें पुरोहिताच्या घरीं गेली. पण तिला तेथें फार वेळ राहावें लागलें नाहीं. मेनकेला हा सर्व वृत्तान्त कळल्याबरोबर ती तेथें आली व तिनें आपल्या कन्येला उचलून घेऊन आकाशमार्गानें हेमकूटावरील मारीचाश्रमांत नेऊन ठेविलें. राजाच्या मनाची चलबिचल झाली. शकुन्तलेचें म्हणणें खरें असावें कीं काय असा त्याला संशय येऊं लागला.

कांहीं काळ असा गेला. मग एक दिवस शक्रावतारतीर्थावरील एक कोळी हस्तिनापूरच्या बाजारांत अंगठी विकीत असतां नगररक्षकांना आढळला. " कोळ्याजवळ अंगठी कोठली ? तो कोणी चोर असावा " असें म्हणून रक्षकांनीं त्याला पकडलें; आणि राजाच्या नांवाची ती अंगठी घेऊन ते चोराला काय शिक्षा करावी म्हणून विचार करण्यासाठीं राजाकडे गेले. अंगठी पाहतांच राजाला पूर्वीचा सर्व वृत्तांत आठवला व शकुन्तलात्यागानें आपल्या हातून भयंकर पाप घडलें असें वाटून तो अत्यंत खिन्न झाला. त्यानें ती अंगठी ठेवून घेतली व कोळ्याला बक्षीस देऊन सोडून दिलें. ही अंगठी शकुन्तलेच्या हातून वाटेंत शचीतीर्थावर गळून पडली, ती एका रोहित माशानें गिळली. तो मासा कोळ्याच्या जाळ्यांत आला आणि कोळी त्याला घरीं आणून चिरीत असतां त्याच्या पोटांत ती त्याला सांपडली!

दुष्यन्ताच्या खिन्नतेची वार्ता सर्वत्र पसरली. त्याला स्वतःला तर अगदींच चैन पडेनासें झालें. तेव्हां शकुन्तलेचें चित्र काढून त्याच्याकडे पाहून मनाचें समाधान करावें असें त्यानें ठरविलें. त्याप्रमाणें चित्र काढून त्याकडे पाहत्त असतां राजाला शकुन्तलाच आपल्यापुढें उभी असून कण्वाश्रमांतील प्रथम

भेटीचा देखावाच जणूं घडत आहे असें वाटलें. हा प्रकार मेनकेची मैत्रीण सानुमती अप्सरा दुरून पाहत होती. दुष्यन्ताला शकुन्तलेचें स्मरण झालें असून तो तिच्यासाठीं हळहळतो आहे, असें पाहून तिला बरें वाटलें; व शकुन्तलेच्या कानावर ही गोष्ट घालण्याचें तिनें ठरविलें. राजा चित्र पाहत असतां दुःखानें बेहोष झाला.

इकडे इन्द्राचें दुर्जन दानवांशीं स्वर्गांत युद्ध जुंपलें. तेव्हां दुष्यन्ताचें साह्य पाहिजे म्हणून त्यानें आपला सारथि जो मातलि त्याला दुष्यन्ताला बोलावून घेण्यासाठीं रथ घेऊन जावयास सांगितलें. मातलि येऊन पाहतो, तों राजा युद्धाला प्रवृत्त होण्याच्या स्थितींत नाहीं! तेव्हां त्याला चेतवून त्याच्या अंगीं वीरश्री आणण्यासाठीं मातलीनें विदूषक वाड्याच्या गच्चीवर बसला होता, त्याला अदृश्य रूपानें चोप दिला! विदूषक मार मिळाल्यामुळें आरोळ्या मारूं लागला, त्या ऐकून दुष्यन्त भानावर आला व धनुष्यबाण घेऊन विदूषकाला सोडवावयास गेला. राजाला पाहतांच मातलि प्रकट झाला व इन्द्राचा निरोप सांगून धनुष्यबाणांसह रथावर बसण्याची त्यानें त्याला विनंती केली. ती मान्य करून व तदनुसार प्रधानाला सूचना देऊन दुष्यन्त इन्द्राच्या साहाय्यार्थ निघून गेला.

दुष्यन्ताच्या साह्यानें दानवांचा वध करून इन्द्र विजयी झाला. राजाचा त्यानें अतिशय बहुमान केला व आपल्या गळ्यांतील मंदारमालाहि त्यानें त्याच्या गळ्यांत घातली. मग मोठ्या प्रेमानें त्याची अनुज्ञा घेऊन दुष्यन्त आपल्या राजधानीस यावयास निघाला. वाटेंत हेमकूटाशीं रथ आला, तेव्हां तेथें मारीचाश्रमांत थोडा वेळ थांबून व मारीच आणि अदिति यांचें पवित्र दर्शन घेऊन पुढें जावें असें त्यानें ठरविलें. तेथें गेल्यावर एक पांचसहा वर्षांचा मुलगा सिंहाच्या छाव्याला नकोनकोसें करून सोडतो आहे, असें त्याला आढळलें. त्या मुलाला पाहून त्याच्याविषयीं त्याला मोठें कौतुक वाटलें. त्याला संभाळणाऱ्या बायांपाशीं चौकशी करतां त्याच्या आईचें नांव शकुन्तला हें असून तिच्या दुष्ट पतीनें तिचा त्याग केल्यामुळें ती त्या आश्रमांत राहत

आहे असें त्याला समजलें; व हा सर्व प्रकार आपल्याशींच येऊन भिडतो, असेंहि त्याला वाटलें. आणखी प्रश्नोत्तरें होत आहेत, इतक्यांत मुलाच्या गळ्यांतील संरक्षक ताईत खालीं पडला व दुष्यन्तानें तो उचलला. आईबापां-शिवाय कोणीं परक्यानें उचलल्यास तो ताईत सर्प होऊन त्याला डसावा अशी योजना मारीचानें केली होती. परंतु तसें कांहीं या वेळीं झालें नाहीं. अर्थात् हा गृहस्थ मुलाचा बाप दुष्यन्तच असला पाहिजे, असें निश्चित समजल्यामुळें त्या बाया तें वृत्त शकुन्तलेला कळवावें म्हणून तिजकडे गेल्या व तिला तेथें घेऊन आल्या. दुष्यन्त-शकुन्तलांची ओळख पटली. त्यानें तिची क्षमा मागितली आणि तिनेंहि ती नम्रतापूर्वक दिली. दोघांचेहि नेत्र पाण्यानें भरून आले. नंतर मारीच व अदिति यांच्याकडे त्यांना नेण्यांत आलें व तेथें सर्व खुलासा होऊन दुर्वासाच्या शापामुळें एवढा हा सारा गोंधळ उडाला व शकुन्तलेला अतिशय कष्ट सहन करावे लागले, असें समजल्यावर उभयतांचें निरपराधित्व स्थापित होऊन कोणालाच कोणाविषयीं साशंक राहण्याचें कारण उरलें नाहीं. कण्वालादेखील हें वर्तमान कळविण्यांत आलें आणि मारीचानें दुष्यन्त व शकुन्तला यांस आशीर्वाद देऊन त्यांना पुत्रासह हस्तिनापुरीं जाण्यास अनुज्ञा दिली.

शाकुन्तलाचें हें नुसतें संक्षिप्त कथानक पाहिलें तरी त्यावरून कालिदासाच्या दुसऱ्या दोन नाटकांच्या मानानें तें किती श्रेष्ठ आहे याची कल्पना येईल. या नाटकाचें सगळें सूत्र खुणेच्या (अभिज्ञान) अंगठींत असल्यामुळें त्याचें नांव 'अभिज्ञानशाकुन्तल' असें कवीनें ठेविलें असून त्यावरून लिहिलेल्या गोष्टींना व त्याच्या भाषान्तरांना 'हरवलेली अंगठी' अशा अर्थाचें नांव दिलेलें आढळतें. काश्मिरांत प्रचलित असलेल्या तत्त्वज्ञानाचा 'प्रत्यभिज्ञान' संप्रदाय हाहि या नाटकाच्या नांवामागें असला पाहिजे, असें पं. लक्ष्मीधर कल्ला यांचें मत आहे.

शाकुन्तलांतील मुख्य रस कालिदासाच्या इतर नाटकांप्रमाणें शृंगारच आहे. पहिल्या तीन अंकांत प्रेमाचें बीज पेरून व त्याला अवश्य त्या पोषक गोष्टी जोडून संभोगशृंगाराचा परिपोष केला आहे. परंतु केवळ वैषयिक प्रेमाच्या

म्हणजे लौकिक शृंगाराच्या क्षेत्रांतून निघून कालिदासाला उच्चतम अथवा दिव्य अशा सात्त्विक प्रेमाकडे, म्हणजे एकप्रकारच्या शांतरसाकडे जावयाचें होतें. त्यासाठीं त्यानें मोठ्या कुशलतेनें दुष्यन्ताचा शाप, शचीतीर्थांत शकुन्तलेच्या हातांतील अंगठी गळून पडणें, एरव्हीं कोणतेंहि रहस्य मनांत जपून न ठेवणाऱ्या विदूषकानें दुष्यन्ताचे शब्द खरे मानून शकुन्तलेचा त्यानें त्याग केलेला प्रत्यक्ष पाहत असतांहि तोंडावाटें त्या संबंधानें अवाक्षर न काढणें, इत्यादि योग्य प्रसंग उत्पन्न करून दुष्यन्त-शकुन्तलांची बराच काळ ताटातूट करविली. विक्रमोर्वशीयांतहि कालिदासानें असाच प्रयत्न केला. परंतु त्यांतील मूळ पात्रेंच जरा हिणकस असल्यामुळें त्याला पाहिजे होतें तेवढें उच्च वातावरण त्यांत उत्पन्न करतां आलें नाहीं. म्हणूनच जणूं त्यानें ती कामगिरी ‘ शाकुन्तल ’ नाटक लिहून पुरी केली असें म्हणावयास हरकत नाहीं. या कामीं अर्थातच करुणरसाचा परिपोष होत असतो. शाकुन्तलांत असे करुण प्रसंग पांचव्या व सहाव्या अंकांत आले आहेत. पांचव्या अंकांत शकुन्तलेच्या परिस्थितीनें करुणा उत्पन्न होते, तर सहाव्यांत ती दुष्यन्ताच्या परिस्थितीनें होते. सहाव्या अंकांत करुणरसपरिपोषार्थ शकुन्तलेच्या चित्राचा प्रसंग मुख्यतः आणिला असून कांहीं अवान्तर गोष्टींनींहि तो साधिला आहे. उदाहरणार्थ, धनमित्र व्यापाऱ्याचा मृत्यु व त्या संबंधानें त्याच्या मंत्र्यानें दिलेला धर्मशास्त्रानुसार निर्णय. धनमित्राला संतति नसल्यामुळें त्याचें सारें द्रव्य नियमाप्रमाणें खरोखर राजकोशांत जावयाचें; परंतु दुष्यन्ताचें आत्मनिरीक्षण चालू होऊन त्याचा सात्त्विक भाव वाढत जाऊं लागल्यामुळें त्यानें आपल्या मंत्र्याचा मामुली निर्णय फिरविला आणि धनमित्राची स्त्री गरोदर असल्यास चौकशी करून तिला होणाऱ्या संततीकडे त्याची सर्व संपत्ति जावी असें ठरविलें. स्वतःची अनपत्यता व तिचे परिणाम जाणवल्यामुळें त्याच्याहातून असा उदार निर्णय झाला, हें उघड आहे.

असल्या प्रसंगांनीं दुष्यन्ताची शुद्धि झाल्यावर मारीचाश्रमासारख्या अत्यंत पवित्र अशा दिव्य स्थानीं त्याची शकुन्तलेशीं भेट घडवून आणिलेली आहे.

पण या भेटीनंतरहि शकुन्तलेच्या मनांत दुष्यन्ताविषयीं थोडा संशय राहणें शक्य होतें. कारण, आपला त्याग त्यानें विस्मरणामुळें केला हें जरी तिला पटलें, तरी इतका तो विस्मरणशील तरी कसा, असें तिला वाटणें साहजिक होतें. तेव्हां ह्याहि किन्तु काढून दोघांचें मन एकमेकांविषयीं पूर्ण शुद्ध होऊन परस्परांना दिव्य प्रेमाचा आस्वाद मिळावा व तेणेंकरून वाचकांचें मनहि उदात्त व्हावें, म्हणून, दुष्यन्ताच्याहातून घडलेला प्रकार हा दुर्वासाच्या शापाचा परिणाम होय, त्यानें जाणूनबुजून कांहीं शकुन्तलेचा अवमान केला नाहीं, ही गोष्ट मारीचानें दोघांनाहि सांगितली व उभयतांच्या मनांत एकमेकांविषयीं कांहींच किल्बिष न राहतां तीं अगदीं स्वच्छ व्हावीं असें केलें. ही सारी घटना करण्यांत कालिदासाचें अनुपम कौशल्य दिसून येतें.

कालिदासाची प्रतिभा या नाटकांत अत्यंत विकसित झालेली आढळते. आरंभींच दुष्यन्त मागें लागल्यामुळें घाबरून जीव घेऊन पळत सुटलेल्या हरिणाचें ‘ ग्रीवाभङ्गाभिरामं ’ इत्यादि वर्णन पाहा कीं, रथवेगामुळें डोळ्यांना होणाऱ्या भासाचें ‘ यदा लोके सूक्ष्मं ’ इत्यादि स्वरूप सांगणारा श्लोक घ्या, किंवा शकुन्तलेचें साधें व निर्व्याजमनोहर रूप सांगणारा ‘ सरसिजमनुविद्धं ’ (शा. १, २०) हा श्लोक वाचा, नाहींतर स्वर्गाहून वेगानें खालीं येणाऱ्या रथांतून दिसणारा पृथ्वीचा ‘ शैलानामवरोहतीव शिखरात् ’ (७, ८) हा देखावा पाहा, त्यांत कवीची सूक्ष्म निरीक्षणशक्ति व तिजवरून सुचलेली कल्पना यथोचित शब्दांनीं हुबेहूब व्यक्त करण्याची विलक्षण हातोटी सर्वत्र दिसून येते. विनोदाचें संभाषण, तडकाफडकीचे खटके, चिंताजनक प्रसंगींचें खल्बत इत्यादि रमणीय प्रसंग यांत उचित स्थलीं घातलेले असून एकंदर वातावरण उदात्त ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आढळून येतो. सामान्यतः कालिदासाची कथारचना निर्दोषच असते; परंतु त्यांतहि शाकुन्तलांत ती विशेष आहे. कोणती अगदीं लहानशी गोष्टसुद्धां निरर्थक अशी त्यांत मिळावयाची नाहीं. प्रथमांकांतील भुंग्यांचा प्रसंग, द्वितीयांकांत शेवटीं दुष्यन्तानें शकुन्तलेविषयींचा सगळा प्रकार केवळ थट्टा होय असें विदूषकाला

सांगणें इत्यादि गोष्टी त्या त्या ठिकाणीं तर उपयुक्त आहेतच, पण शिवाय त्यांचा पुढेंहि रसपरिपोषासाठीं चांगला उपयोग करून घेतलेला आहे. सहाव्या अंकांतील शकुन्तलेच्या चित्रानें या निरीक्षणांत मुग्यांचा संबंध आणिला असून दुष्यन्ताची करुणावस्था त्यामुळें विशेष तीव्रतेनें दाखवितां आली आहे. विदूषकाला जर दुष्यन्त-शकुन्तलांचें प्रेम खरें आहे असें माहीत असतें, तर पांचव्या अंकांतच नाटकाची परिसमाप्ति झाली असती. एखाद्या उत्तम यंत्रांत ज्याप्रमाणें ठिकठिकाणीं बसविलेले भाग जेथल्या तेथें तर नीटनेटकेपणा आणितातच, पण एकंदर यंत्रहि सुसंबद्ध करण्यासाठीं जसा त्यांचा उपयोग असतो, तसा कालिदासाच्या प्रत्येक प्रसंगाचा व प्रत्येक वाक्याचा उपयोग येथें दिसून येतो.

कालिदासाची भाषाहि शाकुन्तलांत अगदीं सरळ, सुटसुटीत, प्रसादयुक्त आणि भारदस्त झालेली आहे. कृत्रिमपणाचा लवलेशहि तींत आढळत नाहीं. सुभाषितें, शोभतील व सहज अर्थबोध होईल अशीं वाक्यें आणि म्हणी हीं या नाटकांत मोठ्या प्रमाणावर विखुरलेलीं आढतात. ‘ अतिस्नेहः पापशंकी ।’ (शा. ४,२०). ‘ अर्थो हि कन्या परकीय एव ।’ (४,२२), ‘ उत्सवप्रियाः खलु मनुष्याः । ’ (६, ५), ‘ किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् । ” (१, १७). ‘ गण्डस्योपरि पिटकः संवृत्तः ।’ (२, १),’ ‘ गुर्वपि विरहदुःखमाशाबन्धः साहयति ।’ (४, १६), ‘ छाया न मूर्च्छति मलोपहतप्रसादे शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा । ’ (७, ३२), ‘ ज्वलति चलितेन्धनोऽग्निर्विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते । प्रायः स्वं महिमानं क्षोभात्प्रतिपद्यते जन्तुः ॥ ” (६, ३१), ‘ न खलु धीमतां कश्चिदविषयो नाम । ’ (४, १८), ‘ बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः । ’ (१, २), ‘ भवन्ति नम्रास्तरवः फलागमैः । ’ (५. १२), ‘ लभेत वा प्रार्थयिता न वा श्रियं श्रिया दुरापः कथमीप्सितो भवेत् ।’ (३, १२), ‘ विकारं खलु परमार्थतोऽज्ञात्वाऽनारंभः प्रतीकारस्य । ’ (३, ८), ‘ सहजं किल यद्विनिन्दितं न खलु तत्कर्म विवर्जनीयम् ।’ (६, १), ‘ सिध्यन्ति कर्मसु महत्स्वपि यन्नियोज्याः संभावना-

गुणमवेहि तमीश्वराणाम् ।' (७, ४), ' स्निग्धजनसंविभक्तं हि दुःखं सह्य-वेदनं भवति ।' (३, ९), 'हंसो हि क्षीरमादत्ते तन्मिश्रा वर्जयत्यपः ।'(६, २८) इ० कितीतरी शाकुन्तलसुभाषितें सामान्य संस्कृतज्ञांच्या तोंडीं नित्य आढळतात. कालिदास आद्य नाटककार नव्हे, हें मालविकाग्निमित्राच्या आरंभीं त्यानें स्वतःच आपल्या पूर्वींच्या भास, सौमिल्ल, कविपुत्रादि नाटककारांचा जो उल्लेख केला आहे त्यावरून स्पष्ट आहे. त्याच्यानंतरहि भवभूति, श्रीहर्ष, विशाखदत्त, भट्टनारायण इत्यादि नाटककार होऊन गेले असून ' मृच्छकटिक 'कार शूद्रकहि त्यांतच घालावयास हरकत नाहीं. यांपैकीं भासाचीं नाटकें म्हणून जीं आज प्रसिद्ध आहेत तीं कालिदासानें उल्लेखिलेल्या भासाचींच आहेत कीं काय या-विषयीं विद्वानांत मोठा मतभेद आहे. पण तीं कोणत्याहि भासाचीं असलीं तरी त्यांची संख्या बरीच मोठी, म्हणजे तेरा इतकी आहे; व कित्येकांनीं तर त्यांच्या कर्त्याला कालिदासाहून श्रेष्ठ प्रतीचा कवि ठरविलें आहे. तथापि तेरा नाटकें लिहिणारा कवि तीन नाटकें लिहिणाऱ्या कवीपेक्षां संख्यादृष्टीनें जरी वरचढ झाला, तरी शाकुन्तलाच्या कर्त्यापेक्षां तो नाटककार म्हणून श्रेष्ठ आहे, असें म्हणणें धाडसाचेंच होईल. या नूतनोपलब्ध त्रयोदश नाटकगणाचा कर्ता कालिदासानें उल्लेखिलेला भासच असेल तर त्याच्या नाटकांचा प्रत्यक्ष नाहीं तर अप्रत्यक्ष तरी परिणाम कालिदासाच्या ग्रंथांवर घडला असणें शक्य आहे व तसा तो घडला आहे, असें कीथप्रभृति पाश्चात्य पंडितांचें मत आहे. या मताच्या पुष्ट्यर्थ " सव्व सोहनीअम् सुरूअम् नाम (सर्वं शोभनीयं सुरूपं नाम)।" —प्रतिमा नाटक १, या भासाच्या वचनावरून कालिदासाला " किमिव हि मधुराणाम् मण्डनं नाकृतीनाम् । " (शा. १. १७), ही ओळ सुचली असावी असें त्याचें अनुमान आहे. स्वप्नवासवदत्तांतील उदयनाची वीणा हरवणें व शाकुन्तलांतील शकुन्तलेची अंगठी हरवणें, अविमारकांतील चण्डभार्गवाचा शाप आणि शाकुन्तलांतील दुर्वासाचा शाप इत्यादि जोडीच्या गोष्टीहि त्यांनीं या बाबतींत आणखी पुढें केल्या आहेत. पण कोटिक्रमासाठीं ही गोष्ट जरी मान्य केली आणि कालिदासानें भासापासून कांहीं कल्पना उचलल्या असें

समजलें, तरी शेवटीं शिष्यानें गुरुवर ताण करून गुरूचें नांव कित्येक शतकें तरी लुप्तप्राय करून सोडिलें, यावरून कालिदास व भास यांमधील कविदृष्टीच्या तुलनेचा निर्णय सहज दिसून येणारा आहे.

इतर संस्कृत नाटककारांपैकीं शूद्रक व भवभूति हे कालिदासाशीं स्पर्धा करणारे आहेत. कालिदासाच्या नाटकांत खलपुरुष नाहीं. परंतु शूद्रकानें शकाराच्या रूपानें तो मृच्छकटिकांत घातला असून त्यामुळें नाट्यरचनेंत रसवैचित्र्य आणिलें आहे. शूद्रकाचीं सर्व पात्रें प्रत्यक्ष मनुष्यसमाजांत वावरणारीं बरींवाईट माणसें आहेत. पण कालिदासाच्या नाटकांतील पात्रें मालविकाग्निमित्राशिवाय इतरत्र मनुष्यस्वभावाचीं असलीं तरी परिस्थितीच्या दृष्टीनें फार उच्च वातावरणांतील आहेत. त्यांचा संचार स्वर्गापासून भूमीपर्यंत अविच्छिन्नपणें चालतो त्यामुळें सामान्य माणसांहून तीं निराळीं भासतात. या दृष्टीनें भवभूतीशीं कालिदासाची तुलना अधिक शोभते. भवभूतीचें 'मालतीमाधव' मालविकाग्निमित्राप्रमाणें प्रत्यक्ष समाजचित्र आहे, तशीं त्याचीं 'महावीरचरित' व 'उत्तररामचरित' हीं नसून 'विक्रमोर्वशीय' व 'शाकुन्तल' यांप्रमाणें तीं दिव्य समाजाचीं चित्रें आहेत. भवभूतीची प्रतिभा कालिदासाच्या प्रतिभेसारखीच तरतरीत आहे. परिणामकारक प्रसंगांची उठावणी दोघेहि सारख्याच कौशल्यानें करितात, पण दोघांमध्यें भाषादृष्टीनें बराच भेद दिसतो. कालिदासाची भाषासरणि साधी, अप्रसिद्ध शब्दयोजना शक्य तितकी टाळणारी, पात्रानुरूप शब्दरचना करणारी, म्हणजे एकंदरींत अकृत्रिम अशी दिसते. भवभूतीनें स्त्रीपात्रांच्या तोंडीं देखील मोठमोठाले समास घालून आपलें ओजप्रियत्व दाखविलें आहे, तसें कालिदासानें कोठें केलेलें नाहीं. भवभूतीचीं मालतीमाधवांतील लांबलचक भाषणें आणि कालिदासाचीं सर्वत्र आढळणारीं बेतसूद भाषणें हींहि ताडून पाहण्यासारखीं आहेत. कालिदास पुष्कळ वेळां एखादा परिणाम ध्वनित करितो, तर भवभूति तो स्पष्ट शब्दांनीं सांगून टाकतो. कालिदास हा लोकप्रिय होता व तशी स्थिति भवभूतीची नव्हती असें म्हणून त्याच्या सिद्ध्यर्थ भवभूतीच्या मालतीमाधवांतील " ये

नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम् " इत्यादि श्लोकाकडे बोट दाखविण्यांत येतें. पण या बाबतींत भवभूतीनें जें उघड सांगून टाकिलें आहे तेंच थोड्या आडपडद्यानें "पुराणमित्येव न साधु सर्वम्" इत्यादि श्लोकांत सांगितलें आहे. पहिल्या प्रथम दोघांची स्थिति एकाच प्रकारची होती असें यावरून दिसतें.

इतर नाटककारांपैकीं श्रीहर्ष, विशाखदत्त आणि नारायणभट्ट हेहि चांगल्या प्रतीचे आहेत; व विशेषतः विशाखदत्तानें राजकारणी कथानक घेऊन नाटकाला निराळें वळण लाविल्याचें आढळतें. परंतु काव्यदृष्ट्या त्यांच्या नाटकांना शाकुन्तलाच्या बरोबरीनें केव्हांहि स्थान देतां येणार नाहीं हें उघड आहे.

५ सामान्य विचार

नाटक कसें असावें, याविषयीं कालिदासाचें स्वतःचें मत ' मालविकाग्निमित्र ' (अं. १), ' कुमारसंभव ' (७, ९१), इत्यादि ठिकाणीं दिसून येत असून त्याचा विचार पुढील प्रकरणांत यथोचित स्थलीं येणार आहे. विक्रमोर्वशीयांत त्यानें ' लक्ष्मीस्वयंवर ' नामक नाटकाचा उल्लेख केला असून मालविकाग्निमित्रांत शर्मिष्ठाकृत एक भावगीत मालविकेकडून साभिनय गावून दाखविलें आहे. या ललितवाङ्मयकृति खऱ्या कीं काल्पनिक हें सांगतां येणार नाहीं; पण त्यावरून कालिदासाच्या कल्पना समजून येण्यासारख्या आहेत. नाटकाचे प्रयोग हे उत्सव, यात्रा, विवाहसमारंभ अशा प्रसंगीं करण्यांत येत असत. त्या प्रयोगांत स्त्रियांनीं स्त्रियांच्या भूमिका घेण्याचा परिपाठ दिसतो. लक्ष्मीस्वयंवरांत लक्ष्मीची भूमिका उर्वशीनें व लक्ष्मीच्या सख्यांच्या भूमिका इतर अप्सरांनीं घेतल्याचें कालिदास सांगतो.

पाश्चात्य साहित्यशास्त्रांत ग्रीक लोकांपासून तों आतांपर्यंत नाटकग्रंथांचे पुष्कळ प्रकार झालेले असून त्यांच्या स्वरूपांत वेळोवेळीं बदल झालेला आढळून येतो. उदाहरणार्थ, ग्रीक नाटकांत दुःखात्मक नाटकांवर विशेष भर असून स्थलैक्य, वस्त्वैक्य व कालैक्य अशीं तीन ऐक्यें (three unities) पाळणें अवश्य असे. सुखान्त नाटकांत दुःखाचा संबंध नसावा व दुःखान्त नाटकांत सुखाचा संबंध नसावा असाहि नियम असे. परंतु सर्व जगाला रंगभूमि

समजणाऱ्या शेक्स्पियरला हा कडकपणा न मानवून त्यानें मानवजीविताचें प्रत्यक्ष दिसणारें सुखदुःखात्मक स्वरूपच आपल्या नाटकांत दाखविलें.* संस्कृत नाटकांत ऐक्यांचा नियम नाहीं, पण ग्रीक नाटकांप्रमाणें दुःखात्मक नाटकेंहि नाहींत; व त्या बाबतींतील नियम संस्कृत नाटककारांनीं कसोशीनें पाळलेला आढळतो. या संबंधांत कालिदासानें शेक्स्पियरइतका स्वतंत्र बाणा दाखविलेला नाहीं व त्यामुळें शेक्स्पियरच्या नाटकांचे जसे (१) विनोदगर्भ किंवा सुखात्मक, (२) दुःखात्मक, आणि (३) मिश्र असे प्रकार झाले आहेत, तसे प्रकार कालिदासाच्या नाटकांत नाहींत. तीं सर्व सुखान्त आहेत; परंतु त्यांतहि विनोदगर्भ व मिश्र हे प्रकार दिसतात. ' मालविकाग्निमित्र ' हें निवळ विनोदगर्भ (comedy) असून दुसरीं दोन नाटकें सुखदुःखात्मक, गंभीर स्वरूपाचीं (tragi-comedy) होत. नाटकविषयक कल्पनांचा सर्व बाजूंनीं विकास व्हावयाला जी समाजाची मनःस्थिति लागते तिचा अभावच आज हजार-बाराशें वर्षें हिंदुस्थानांत दिसून येतो. त्यापूर्वीं येथील नाटकांत वैचित्र्य उत्पन्न होऊं लागलें होतें, हें 'मृच्छकटिक,' 'मालतीमाधव,' 'मुद्राराक्षस,' 'वेणीसंहार' इत्यादिकांच्या स्वरूपांवरून दिसून येतें. नाटक सुखान्तच पाहिजे या नियमाच्या येथील कडकपणामुळें विविधतेला बराच आळा पडलेला दिसतो. तो नियम कडक नसता तर 'विक्रमोर्वशीय,' 'उत्तररामचरित,' 'वेणीसंहार' हीं दुःखान्तहि झालीं असतीं व दुसरींहि तशीं निर्माण झालीं असतीं.

---

* " All the world's a stage."—*As You Like It*, Act II, Sc. VII

प्रकरण पांचवें

कालिदास आणि साहित्यशास्त्र

'काव्यमीमांसा'नामक साहित्यशास्त्रविषयक ग्रंथाचा कर्ता राजशेखर यानें कालिदास नांवाच्या साहित्यशास्त्रावरील ग्रंथकाराचा उल्लेख केला आहे. कालिदास नांवाचे कवि राजशेखरापूर्वी (दहाव्या शतकाचा आरंभ) अनेक होऊन गेले होते. तथापि शाकुन्तल-रघुवंशादिकांचा कर्ताच त्याला अभिप्रेत होता. कारण, त्याच कालिदासाच्या ग्रंथांतून त्यानें अनेक पद्यें उदाहरणार्थ उद्धृत केलीं आहेत. परंतु कालिदासाचा साहित्यग्रंथ असलाच तरी तो अद्यापि उपलब्ध नाहीं. कालिदास या टोपणनांवावर विकणाऱ्या अनेक लहानसहान ग्रंथांत 'काव्यनाटकालंकार'नामक एका पुस्तकाचा उल्लेख आढळतो; पण त्याचीहि माहिती मिळत नाहीं. तथापि 'रघुवंश'कार कालिदास हा साहित्य-शास्त्रकार नसला तरी साहित्यशास्त्रविशारद होता यांत संशय नाहीं.

उपलब्ध साहित्यशास्त्रीय ग्रंथांतील पहिला ग्रंथ जो भरतप्रणीत 'नाट्यशास्त्र' त्याचा कालिदासाला परिचय दिसतो. विक्रमोर्वशीयांत त्यानें नाट्याचार्य भरताचा उल्लेख केला आहे:—"मुनिना भरतेन यः प्रयोगो भवतीष्वष्टरसाश्रयो नियुक्तः। ललिताभिनयं तमद्य भर्ता मरुतां द्रष्टुमनाः सलोकपालः॥" (वि. २, १८). या पद्यांत नाट्यप्रयोगाला 'अष्टरसाश्रय' म्हटलें असून अप्सरांकडून त्याचा प्रयोग करविल्याचें सांगितलें आहे व भरताच्या नाट्य-शास्त्रांतील विवेचनाशीं हें अगदीं जुळतें आहे. नाट्यशास्त्रांत आठ रस व अप्सराकृत नाट्यप्रयोग यांचें वर्णन सहाव्या अध्यायांत आलेलें आहे. नाट्या-संबंधीं भरतानें जें सामान्यतः सांगितलें आहे त्याला धरूनच कालिदासाची नाटकें लिहिलेलीं असून त्यांतील महत्त्वाच्या विचारांचा अनुवादहि त्यानें मालविकाग्निमित्राच्या प्रथमांकांत केला आहे. भरत नाट्यशास्त्राला 'नाट्यवेद'

म्हणतो (" नाट्यवेदं ततश्चक्रे चतुर्वेदाङ्गसंभवम् । "), तसेंच कालिदास त्याला ' चाक्षुषयज्ञ ' म्हणतो. नाट्याची महती " सर्वशास्त्रार्थसंपन्नं सर्वशिल्पप्रदर्शनम् । " अशी भरतानें गायिली असून " देवानामिदमामनन्ति मुनयः कान्तं क्रतुं चाक्षुषम् " इत्यादि श्लोकांत (मा० १, ४) कालिदासानें तिचाच अनुवाद केला आहे. नाटकाचा 'निर्वहणसंधि' म्हणजे शेवट आनंददायी असला पाहिजे, या नाट्यशास्त्रांतील नियमाला अनुसरून वस्तुतः दुःखपर्यवसायी असणारें विक्रमोर्वशीयाचें कथानक बदलून कालिदासानें आनंदपर्यवसायी केलें आहे.

कालिदासाचा भरताच्या नाट्यशास्त्राशीं असलेला परिचय मालविकाग्निमित्रांतील पहिल्या व दुसऱ्या अंकांवरूनहि उघड दिसून येतो. पण त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, भरताचार्य हा कोणी थोड्या काळापूर्वीं होऊन गेलेला लौकिक ग्रंथकार होय असें कालिदास मानीत नसून तो त्याला स्वर्गांत राहणारा व अप्सरांना नाट्यकलेचें शिक्षण देणारा असा प्राचीन दिव्य मुनिच समजतो; व हें विक्रमोर्वशीयांतील भरतविषयक उल्लेखांवरून स्पष्ट आहे. भरताचें ' नाट्यशास्त्र ' हा ग्रंथ आज ज्या स्वरूपांत उपलब्ध आहे, त्याच संपूर्ण स्वरूपांत तो कालिदासाला माहीत होता असें निश्चित म्हणतां येत नसलें, तरी कालिदासाच्या नाटकांवरून एवढें म्हणतां येईल कीं, नाट्यशास्त्राचें स्वरूप आज जसें दृष्टीस पडतें तसें सामान्यतः तें कालिदासाच्या वेळींहि असावें. शाकुन्तलावरील राघवभट्टाच्या अर्थद्योतनिका नामक टीकेंत नाट्यशास्त्रांतील वचनें उद्धृत करून कालिदासाची कृति त्यांना धरून असल्याचें अनेक प्रसंगीं दाखविलेलें आहे.

साहित्यशास्त्रावरील उपलब्ध ग्रंथांतील नाट्यशास्त्रानंतरचे जुने ग्रंथकार जे भामह आणि दण्डी त्यांच्या 'काव्यालंकार' आणि ' काव्यादर्श ' या साहित्यशास्त्रीय ग्रंथांत पुढील साहित्यशास्त्रकारांनीं घेतल्याप्रमाणें इतरांच्या काव्यांतील श्लोक उदाहरणासाठीं म्हणून बहुधा घेतलेले नाहींत. त्यामुळें कालिदासाच्या काव्यादिकांतील श्लोकहि या साहित्यग्रंथांत उद्धृत केलेले नाहींत. तथापि

" इन्दोरिन्दीवरद्युति । लक्ष्म लक्ष्मीं तनोतीति प्रतीतिसुभगं वचः ॥ " (१, ४५), या काव्यादर्शांतील प्रसादगुणाच्या उदाहरणांत " मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति । " (शा. १, १७), या शाकुन्तलांतील चरणाची छाया दिसून येते. तसेंच भामह आणि दण्डी या उभयतांनीं प्रेयोऽलंकाराचें उदाहरण म्हणून "अद्य या मम गोविन्द जाता त्वयि गृहागते कालेनैषा भवेत्प्रीतिस्तवैवागमनात्पुनः ॥ ", असा जो श्लोक दिला आहे तो " या नः प्रीतिर्विरूपाक्ष त्वदनुध्यानसंभवा । सा किमावेद्यते तुभ्यमन्तरात्मासि देहिनाम् ॥ "* (कु. ६, २१), या कुमारसंभवांतील श्लोकाशीं समानार्थक दिसतो. पण हे प्राचीन ग्रंथकार सोडून दिले तरी पुढील अनेक साहित्य-ग्रंथांच्या कर्त्यांनीं कालिदासाच्या काव्यनाटकांतील श्लोकांचा व प्रसंगांचा साहित्यशास्त्रविषयक अनेक गोष्टींच्या स्पष्टीकरणार्थ उपयोग केलेला आढळतो. या दृष्टीनें कालिदासाच्या ग्रंथांनीं साहित्यशास्त्रनिर्मितीला बराच हातभार लाविला हें उघड आहे. उद्भट या प्राचीन अलंकारशास्त्रकाराच्या कुमारसंभवाचा उल्लेख पूर्वीं केला आहेच. हें अनुष्टुभ् श्लोकमय ' कुमारसंभव' काव्य कालिदासाच्या कुमारसंभवाची छोटी रूपान्तरित आवृत्तिच वाटते. यानंतर वामन, आनंदवर्धन, राजशेखर, 'वक्रोक्तिजीवित'-कार कुन्तल, महिमभट्ट, भोज, मम्मट, विश्वनाथ इत्यादिकांनीं आपल्या साहित्यशास्त्रीय ग्रंथांत कालिदासाच्या काव्यनाटकांतील पुष्कळ श्लोक उद्धृत केले आहेत.

काव्याचें लक्षण व स्वरूप

काव्याची व्याख्या " शब्दार्थौ सहितौ काव्यम् " (भामह १, १६), अशी भामहानें केली असून तींतील कल्पनेचा अनुवाद पुढें राजशेखर, 'वक्रोक्तिजीवित'-कार इत्यादिकांनीं केला आहे.† साहित्य हा शब्द किंवा

---

* विदुर व कृष्ण यांच्या उद्योगपर्वांतील भेटीच्या प्रसंगांचा म्हणून " या प्रीतिः पुण्डरीकाक्ष तवागमनकारणात् । सा किमाख्यायते तुभ्यमन्तरात्मासि देहिनाम् ॥ " असा श्लोक महाभारतांतहि आढळतो (अ. ८९, २४).

† प्रो. पां. वा. काणे—'संस्कृत साहित्यशास्त्राचा इतिहास,' पृ. २७२

काव्याची ही व्याख्या यांत अन्तर्भूत झालेली शब्द आणि अर्थ यांच्या जोडगोळीची कल्पना कालिदासानें " वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये।" या रघुवंशाच्या प्रथम श्लोकांत, तशीच " तमर्थमिव भारत्या सुतया योक्तुमर्हसि।" (६, ७९), या कुमारसंभवांतील श्लोकांत ग्रथित केलेली दिसते. काव्याचे दृश्य आणि श्राव्य असे जे दोन भेद त्यांचीं उदाहरणें कालिदासानें मालविकाग्निमित्रादि नाटकें म्हणजे दृश्य काव्यें व कुमारसंभवादि श्राव्य काव्यें लिहून कृतीनेंच दिली आहे. सर्गबन्ध असें महाकाव्य व लघुस्वरूपाचें खंडकाव्य यांचेंहि स्पष्टीकरण त्यानें 'कुमारसंभव' आणि ' रघुवंश ' हीं सर्गबन्ध मोटीं काव्यें व 'ऋतुसंहार' आणि 'मेघदूत' हीं लघुकाव्यें लिहून केलें आहे. काव्याचा आरंभ कसा करावा याविषयींचे निरनिराळे प्रकार " आशीर्नमस्क्रियावस्तुनिर्देशो वाऽपि तन्मुखम्।" (काव्यादर्श १, १४) असे दण्डीनें जे दिले आहेत त्यांचें स्वरूपहि कालिदासानें दाखविलें आहे. नाटकांच्या आरंभीं नान्दीरूप आशीर्वचनें, 'रघुवंशा'च्या आरंभीं पार्वती-परमेश्वरांना वंदन आणि 'ऋतुसंहार' 'कुमारसंभव' व 'मेघदूत' यांच्या आरंभीं एकदम कथानिर्देश असे प्रकार त्यानें केले आहेत. तात्पर्य, काव्याचें लक्षण, त्याचे भेद, त्यांतील अंगें व उपांगें ठरविण्याच्या कामीं साहित्यशास्त्रकारांनीं कालिदासाच्या काव्य-नाटकांचा नमुने म्हणून उपयोग केलेला असणें स्वाभाविकच होय.

रस

कालिदास रस आठ मानितो, हें भरतानें अप्सरांना पढविलेल्या नाट्यप्रयोगाला त्यानें ' अष्टरसाश्रय ' म्हटलें आहे (वि. २, १८), त्यावरून उघड आहे; म्हणजे, नऊ रस मानणारे शांतरसाचा जसा त्यांत समावेश करितात तसा कालिदास करीत नाहीं. शृंगाररसाचें प्राधान्य त्यानें आपल्या नाटकांत दाखविलें असून इतरहि रस यथाप्रसंग आणिले आहेत. मालविकाग्निमित्रांत हास्यरस हाच शृंगाराचा सहायक आहे. कुमारसंभवांत कुमारोत्पत्तीपर्यंत मुख्य रस शृंगार असून मदनदहनाच्या प्रसंगानें करुणरस आलेला आहे व कुमाराच्या सैनापत्याभिषेकापासून वीररसाचा प्रादुर्भाव झालेला आहे. त्याचप्रमाणें

शाकुन्तलांत दुष्यन्त मागें लागला असतां जीव घेऊन पळणाऱ्या मृगाच्या वर्णनांत भयानक, रघुवंशाच्या शेवटच्या सर्गांत अग्निवर्णाच्या अत्याचारवर्णनप्रसंगानें बीभत्स, शाकुन्तलाच्या पांचव्या अंकांत आतां पुढें काय करावें अशा विवंचनेंत शकुन्तला पडली असतां तिला कोणी स्त्रीरूप ज्योतीनें उचलून नेल्याच्या वृत्तान्तांत अद्भुत, पुढें सहाव्या अंकाच्या शेवटीं गुप्तरूपानें विदूषकाला चोपणाऱ्या मातलीचें पारिपत्य करण्यासाठीं रागानें धनुष्यबाण घेऊन त्या गुप्त भूताला आह्वान करणाऱ्या दुष्यन्ताच्या वर्णनांत रौद्र, अशा रसांच्या छटा कालिदासानें दाखविलेल्या आढळतात. शांतरस तो स्वतंत्र मानीत नसला तरी शाकुन्तलाच्या सातव्या अंकांतील मारीचाश्रमाचें वर्णन वाचून उत्पन्न होणारी मनोवृत्ति शांतरसमयीच होय.

साहित्यशास्त्राचें एक अंग जें नाट्य त्याविषयीं कालिदासानें मार्मिक विवेचन केलेलें आढळतें. मालविकाग्निमित्रांतील "भावाविव शरीरिणौ" (मा. १, १०), म्हणजे मूर्तिमंत जणूं भावच, अशी नाट्याचार्य हरदत्त व गणदास यांच्यावर केलेली उत्प्रेक्षा, परीक्षक या नात्यानें पंडितकौशिकीनें केलेलें मालविकेच्या अभिनयाचें वर्णन (अं. २), इत्यादि गोष्टींवरून त्याचा नमुना कळून येईल. नाटकासंबंधीं त्याचा अभिप्राय थोडक्यांत पाहावयाचा असेल तर कुमारसंभवांत तो सांपडतो. शिव-पार्वतींचा विवाह झाल्यावर त्यांच्या मनोरंजनासाठी अप्सरांनीं एक नाटकप्रयोग करून दाखविला. त्या आद्य प्रयोगांत म्हणजे नाटकांत संधींना अनुसरून वृत्तिभेद दाखविला होता, विविध रसांच्या अनुरोधानें रागांची योजना केली होती, आणि पात्रांचे हावभाव व अंगविक्षेपहि सुंदर होते. या वर्णनांतील संधि, वृत्ति, रस, राग, प्रयोग, अंगहार हे शब्द पारिभाषिक असून नाट्यशास्त्राशीं असलेला आपला परिचय दाखविण्यासाठींच कीं काय कालिदासानें योजिलेले दिसतात.* प्रस्तुत नाटकाच्या वर्णनापूर्वी सरस्वतीनें शिव-पार्वतीची स्तुति

---

* "तौ संधिषु व्यंजितवृत्तिभेदं रसान्तरेषु प्रतिबद्धरागम् ।
अपश्यतामप्सरसां मुहूर्तं प्रयोगमाद्यं ललिताङ्गहारम् ॥" कु. ७, ९१

केल्याचें जें सांगितलें आहे, त्यांतहि साहित्यशास्त्राचा संबंध आणिलेला असून त्या स्तुतीला दोन प्रकारची असें म्हटलें आहे. त्यांतील पहिला प्रकार ' संस्कारपूत ' म्हणजे व्याकरणशुद्ध असून तो शिवासाठीं होता; आणि दुसरा ' सुखग्राह्यनिबन्धन ' म्हणजे ज्यांतील शब्दांचा अर्थ अगदी सहज कळण्यासारखा आहे असा असून त्याची योजना पार्वतीसाठीं केलेली होती (कु. ७, ९०). व्याकरणशुद्ध म्हणजे संस्कृत आणि सुबोध म्हणजे प्राकृत असा अर्थ मल्लिनाथानें केला असून त्यावरून नाट्यशास्त्रांत पात्रविशेषाप्रमाणें भाषाभेद असावा असा जो नियम सांगितला आहे, त्याचा अनुवाद कालिदासानें केला असावा असें वाटतें.

नाटकांतील संधि म्हणजे मुखसंधि, प्रतिमुखसंधि, गर्भसंधि, अवमर्शसंधि व निर्वहण किंवा उपसंहारसंधि हे असून संविधानकाची जुळणी करण्याच्या त्या पायऱ्याच होत. या संधींत आणखी मुखसंधीचीं बारा, प्रतिमुखाचीं तेरा, गर्भसंधीचीं बारा, अवमर्शाचीं तेरा आणि निर्वहणाचीं चौदा अशी एकूण चौसष्ट अंगें असतात. नाटकाचें जें अंतिम ध्येय तें ज्या भागांत सिद्ध केलेलें असतें त्या भागाला ' निर्वहणसंधि ' असें म्हणतात. उदाहरणार्थ, कालिदासाच्या तिन्ही नाटकांत नायक नायिकांची कायमची गांठ घालून देणें हें पर्यवसान असून तें मालविकाग्निमित्रांत शेवटच्या अंकांत पूर्वी दाखविलेल्या अडचणी दूर करून व मालविका आणि अग्निमित्र यांचा संगम करून सिद्ध केलें आहे. विक्रमोर्वशीयांत आयत्या वेळीं इन्द्राचा निरोप घेऊन नारद आला व उर्वशी पुरूरव्याजवळ आजन्म राहावी असें ठरलें, अशा रीतीनें केलें असून शाकुन्तलांत दुष्यन्त-शकुन्तलांची मारीचाश्रमांत भेट करवून आणि दुर्वासाच्या शापामुळें झालेला खास घोंटाळा उलगडून दाखवून तें साधिलें आहे. या पर्यवसानाला म्हणजे निर्वहणसंधीला जुळेल अशा रीतीनें कथानकाची सुसूत्र जुळणी करण्यांत कवीचें कौशल्य असतें. 'मालविकाग्निमित्र' किंवा ' विक्रमोर्वशीय ' यांप्रमाणें 'शाकुन्तला'चें पर्यवसान केवळ नायक-नायिकांची कायमची गांठ घालून देणें एवढेंच नाहीं, तर त्याबरोबर

दुष्यन्ताला वारस देऊन त्याच्या मनाची तद्विषयक तळमळ दूर करणें हेंहि आहे. या दृष्टीनें पाहिल्यास पहिल्या दोन नाटकांचा मुख्य रस जसा शृंगार तसा शाकुन्तलाचाहि मुख्य रस शृंगारच म्हणावा लागतो. स्थायिभावावरून जर रस ठरवावयाचा, तर एकंदर नाटक वाचून पुस्तक खालीं ठेविल्यावर वाचकाच्या मनावर कसला ठसा उमटला हें पाहिलें पाहिजे. तसें केल्यास शाकुन्तलाच्या वाचनानंतर एकप्रकारची शांत, म्हणजे पर्यायानें आनंदाचीच वृत्ति उत्पन्न होते– शकुन्तलेशीं गुजगोष्टी बोलत शृंगाररसांत गटंगळ्या खाणारा तिसऱ्या अंकाच्या अखेरचा दुष्यन्त मनश्चक्षूपुढें उभा न राहतां, पुत्रदर्शनामुळें आतां आपल्यामागें पितरांना पिंडोदक न मिळण्याची भीति नष्ट झालेला व त्याबरोबर एका साध्वीचा आपल्या हातून झालेला छळ हा आपल्या दुर्बुद्धीमुळें झालेला नसून ऋषीच्या शापामुळें झाला हें समजून आल्यामुळें पश्चात्ताप-दग्ध होऊन नंतर समाधान पावलेला दुष्यन्त उभा राहतो. या दृष्टीनें शाकुन्तलाच्या मुखसंधीला प्रथमांकांतील ऋषींच्या आशीर्वादानें आरंभ होतो. नंतर आश्रमाशीं गेल्यावर उजवा डोळा लवणें, आंत गेल्यावर शकुन्तला दृष्टीस पडणें, ती उपवर असून क्षत्रियकन्या असल्यामुळें आपल्याला अप्राप्य नाहीं असें दुष्यन्ताला समजून येणें आणि त्याबरोबर शकुन्तलेचेंहि मन दुष्यन्ताला पाहिल्यापासून अस्वस्थ होणें, इत्यादि गोष्टी मुखसंधींत येतात. यापुढची पायरी म्हणजे उभयतांचा एकमेकांच्या प्राप्तीचा प्रयत्न व तो यशस्वी होऊन त्यांचा गांधर्व विवाह होणें ही होय. हा भाग म्हणजे 'प्रतिमुखसंधि.' ऋषींनीं यज्ञरक्षणार्थ दुष्यन्ताला आश्रमांत राहावयाची विनंती करणें, दुष्यन्ताच्या मातेकडून व्रताचें उद्यापन करण्यासाठीं नगरास यावें असा निरोप येऊन ऋषिकार्याच्या निमित्तानें विदूषक माढव्याला ससैन्य तिकडे लावून देणें, शकुन्तलेच्या अस्वस्थतेच्या कारणाची चिकित्सा करून तदनुसार शकुन्तलेकडून तिच्या सख्यांनीं प्रेमपत्रिका लिहविणें, दुष्यन्त-शकुन्तलांची भेट करवून दुष्यन्ताकडून शकुन्तलेच्या पुत्रालाच राज्य मिळेल असें वचन घेऊन मग त्यांचा गांधर्व विवाह लावून देणें, इत्यादि गोष्टींचा यांत अन्तर्भाव होतो.

यापुढील 'गर्भसंधी'त शकुन्तलेला दुर्वासाचा शाप होणें, त्यामुळें दुष्यन्ताकडून तिला मूळ न आल्यामुळें तिच्या सख्यांना चिंता उत्पन्न होणें, कण्वमुनि आश्रमांत येऊन त्याला सर्व प्रकार कळल्यावर त्यानें शकुन्तलेची दुष्यन्ताकडे रवानगी करून देणें, राजानें तिचा स्वीकार न केल्यामुळें डोक्यावर आकाश कोसळल्याप्रमाणें तिला होणें, नंतर तिला उर्वशीनें मारीचाश्रमांतील अत्युच्च नैतिक वातावरणांत नेऊन ठेवणें, कोळ्याकडून अंगठी परत मिळाल्यामुळें शापनिवृत्ति होऊन दुष्यन्ताला शकुन्तलेचें स्मरण होऊन पश्चात्ताप होणें व त्याची वार्ता उर्वशीला कळणें, या गोष्टी येतात. 'अवमर्शसंधी'त शकुन्तलेच्या प्राप्तीविषयीं पूर्णपणें निराश झालेल्या दुष्यन्ताला मातलीनें विदूषकाला चोप देऊन त्याच्या किंकाळ्यांमुळें चेव आणणें, इन्द्राच्या आज्ञेवरून दुष्यन्तानें देवलोकीं जाऊन त्याला युद्धांत साह्य करणें व अशा रीतीनें दुष्यन्ताला विरंगुळा देणें, परत येतांना वाटेंत शांत वृत्तीच्या मारीचाश्रमांत त्यानें उतरणें, तेथें सर्वदमनाची भेट होऊन त्याची माता शकुन्तला व पिता दुष्यन्त असें त्याला कळून येणें व त्यामुळें त्याच्या मनांत आशेचा अंकुर उत्पन्न होणें, अशा गोष्टींचा अंतर्भाव झालेला आहे. अशा रीतीनें एकंदर मधल्या प्रकाराला कलाटणी मिळाल्यावर सर्वदमनाच्या गळ्यांतील ताईत खालीं पडला असतां दुष्यन्तानें तो उचलल्यावर त्याचा सर्प न झाल्यामुळें सर्वदमन हा आपलाच पुत्र व त्याची माता शकुन्तला ही आपलीच शकुन्तला, अशी राजाची निश्चिति होऊन पुढें दोघांची भेट होणें व सर्व रहस्याचा उलगडा मारीचानें केल्यावर उभयतांनीं आपल्या राजधानीस पुत्रासमवेत परत येणें, या गोष्टींनीं उपसंहार म्हणजे 'निर्वहणसंधि' सविला आहे. 'संधि' म्हणजे कथानकाच्या जुळणीचे सांधे. हे दाखविण्यांत अर्थात् कित्येक ठिकाणीं मतभेद होईल हें सांगावयास नको.

पारिभाषिक गोष्टींपैकीं वृत्तींची म्हणजे कैशिकी, आरभटी इत्यादिकांचीं नांवें कालिदासानें दिलेलीं आढळत नाहींत. आठ रसांपैकीं त्यानें शृंगार आणि हास्य या दोहोंचे उल्लेख केले आहेत. शृंगाराचा उल्लेख उर्वशीच्या वर्णनांत

" शृंगार हा एकमेव रस ज्याचा आहे असा मदनच हिचा जनक आहे कीं काय?" (वि. १, ८), असा केला असून हास्याचा उल्लेख कुमारसंभवांत "प्रमथमुखविकारैर्हासयामास" (कु. ७, ९५), या शब्दांनीं केला आहे. भरताच्या नाट्यशास्त्रांत हास्यरसाला 'प्रमथदैवत' म्हटलें असून तोच शब्द कालिदासापुढें असावा असें दिसतें.

रसाचें विवेचन करतांना मेघदूतांत रस कोणता याचाहि विचार केला पाहिजे. या खंडकाव्याचा रस विप्रलंभशृंगार होय असें सामान्यतः मानितात. परंतु आमच्या मतें तो विप्रलंभशृंगारावर आधारलेला करुणविप्रलंभ होय; आणि हा रस येथें प्रत्यक्ष रडण्याच्या रूपानें दाखविला नसून ध्वनित केला आहे. पहिल्याच श्लोकांत " कान्ताविरहगुरुणा शापेनास्तंगमितमहिमा " असें यक्षाचें वर्णन करून पुढें त्याला "कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः" (मे. १, २), म्हणजे " कृश झाल्यामुळें ज्याच्या मनगटावरील सोन्याचें कडें कोपरापर्यंत गेलें आहे" असा म्हटलें आहे. हा देखावा करुणाजनक आहे. पुढें त्या यक्षाची चित्तवृत्तीहि ठिकाणावर नाहीं; आणि ती इतकी कीं, तो मेघाला जिवंत प्राणी समजून त्याच्याबरोबर पत्नीला संदेश पाठवीत आहे, असें दाखविलें आहे! हा प्रकार सहृदय वाचकाच्या मनांत कालवाकालव उत्पन्न करील असा असून शेवटीं तर " माभूदेवं क्षणमपि च ते विद्युता विप्रयोगः ।"(मे. २, ५५) म्हणजे, " हे मेघा, माझा जसा पत्नीपासून विरह झाला आहे, तसा तुझा विद्युल्लतेपासून केव्हांहि विरह न होवो " अशी जी इच्छा त्यानें प्रकट केली आहे, तीवरून त्याच्या अंतस्थ दुःखाची तीव्रता ध्वनित होऊन वाचक करुणामय स्थितींत बुडून जातो. असो.

रसानंतर रागाचा विचार करतां असें आढळतें कीं, कालिदासानें जशीं षड्ज[1] व मध्यम[2] या स्वरांचीं नांवें सांगितलीं आहेत, तशीं रागांचीं नांवें

१ "षड्जसंवादिनीः केकाः"–र० १, ३९

२ "...मध्यमस्वरोत्था मायूरी मदयति मार्जना मनांसि ॥"–मा० १, २१

(भूप, भैरव, भैरवी इ०) त्यानें कोठेंहि सांगितलेलीं नाहींत. पण "तवास्मि गीतरागेण हारिणा प्रसभं हृतः । एष राजेव दुष्यन्तः सारंगेणातिरंहसा ॥" (शा. १, ५), या उपमेंतील राग व सारंग हे शब्द श्लिष्ट† धरिल्यास मात्र सारंग या रागाचा उल्लेख कवीनें केला आहे असें म्हणतां येईल.

कुमारसंभवांतील पूर्वोक्त सर्ग ७, श्लोक ९१ यावरून कालिदासाचा भरताच्या नाट्यशास्त्राशीं किंवा तशाच दुसऱ्या साहित्यग्रंथाशीं असलेला परिचय चांगला व्यक्त होतो. भरताच्या नाट्यशास्त्रांत संधि व त्यांचीं अंगें (अ० १९), वृत्ति (अ० २०), रस (अ० ६, ७), राग (अ० २८) इत्यादि विषयांचें सविस्तर विवेचन आहेच.

प्रतिभा

उत्तम कवि होण्याला प्रतिभा, व्युत्पत्ति आणि अभ्यास या तिहींची अवश्यकता असते असें साहित्यशास्त्रकार सांगतात.* त्यांपैकीं प्रतिभा§ ही नैसर्गिक असते आणि व्युत्पत्ति म्हणजे शास्त्रपरिशीलन व काव्यांचा अभ्यास ही श्रमसाध्य असते. कालिदासाच्या ठिकाणीं या तीनहि गोष्टी उत्तम रीतीनें सांढविलेल्या होत्या. 'ऋतुसंहार' व 'मेघदूत' हीं काव्यें वगळतां त्याच्या ग्रंथांचीं कथानकें प्राचीन ग्रंथांतून घेतलेलीं असलीं तरी त्यांना रंगविण्यासाठीं त्यानें जे अनेकविध प्रसंग निर्माण केले आहेत त्यांत त्याची प्रतिभा चांगली दिसून येते. शेक्स्पियरसारख्या सर्वश्रेष्ठ नाटककारानेंहि आपल्या नाटकांचीं कथानकें जुन्या गोष्टी व इतिहास यांवरूनच घेतलीं आहेत. पण तसें असलें म्हणून त्याच्या प्रतिभाशक्तीला त्यामुळें मुळींच कमीपणा कोणी देत नाहीं.

---

† ही कल्पना आमचे मित्र प्रो. ह. दा. वेलणकर, एम्.ए., यांनीं सुचविली.

* "प्रतिभा कारणं तस्य (काव्यस्य) व्युत्पत्तिस्तु विभूषणम् । इ०"
—वाग्भटालंकार १, ३

"शक्तिर्व्युत्पत्तिरभ्यासः ।" रुद्रट—काव्यालंकार १, १४

§ "नैसर्गिकी च प्रतिभा ।" दण्डी—काव्यादर्श १, १०३

सं. नं. ता. ग्रा. ग्रं.

उलट, जुन्या गोष्टी घेऊन त्यांना मनोहर नेपथ्य चढवून जें त्यांचें नाटक स्वरूप रसिकांपुढें त्यानें ठेविलें त्याबद्दल त्याचें गौरवच करण्यांत येतें. कालिदास, शूद्रक, भवभूति इत्यादि पौरस्त्य नाटककारांनाहि तोच नियम लागू होतो. केवळ जुनें कथानक आहे म्हणून त्यांत कविप्रतिभेला वाव मिळत नाहीं असें कधींच होत नसतें. " रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम् ।" (रं. गं.), या जगन्नाथपंडिताच्या काव्यलक्षणांत ज्या रमणीयकत्वावर भर दिलेला आहे, तें रमणीयकत्व कालिदासाच्या काव्यनाटकांत भरपूर असल्यामुळें तीं प्रतिभा-निर्मित होत हें उघड आहे. तथापि कांहीं झालें तरी प्रतिभा ही केवळ प्रेरक शक्ति आहे. त्या शक्तीचा योग्य तो उपयोग करून तिला इष्ट मार्गानें वाहावयास लावण्याला व्युत्पत्तीची अवश्यकता असते. प्रतिभेच्या जोडीला ही व्युत्पत्ति जितकी व्यापक असेल तितकी काव्यनिष्पत्ति अधिक सरस होते. मेघदूताचा आधार केवळ प्रतिभा होय. पण मेघाच्या गगनमार्गाचें वर्णन करतांना यक्षाच्या तोंडून कवीनें जे पौराणिक, ऐतिहासिक इत्यादि कथांचे निर्देश करविले आहेत, त्यांच्या योगानें त्या वर्णनाला अधिक मनोहरत्व आलें आहे. मालविकाग्निमित्रांतील धारिणी राणी पंडितकौशिकीबरोबर येतांना पाहून " त्रयी विग्रहवत्येव सममध्यात्मविद्यया ।" (मा. १, १४) अशी जी समर्पक उपमा राजाच्या तोंडीं कालिदासानं घातली आहे तें व्युत्पत्तीचें फळ होय. शाकुन्तलांतील " दिष्ट्या शकुन्तला साध्वी सदपत्यमिदं भवान् । श्रद्धा वित्तं विधिश्चेति त्रितयं तत्समागतम् ॥ " (शा. ७, २९), या श्लोकांत आलेली उपमा शास्त्राध्ययनरूपी व्युत्पत्तीचाच परिणाम होय हें उघड आहे. कालिदासाची प्रतिभा शाकुन्तलांत फारच श्रेष्ठ स्वरूपांत आढळून येते. हरिणाच्या मागें लागलेल्या निपुत्रिक दुष्यन्तानें ऋषींच्या विनंतीवरून बाण मागें घेतल्यामुळें " सर्वथा चक्रवर्तिनं पुत्रमवाप्नुहि। " (शा. १, १२), असा त्यांनीं त्याला आशीर्वाद देणें येथपासून आरंभ करून, पुढें दुष्यन्त व शकुन्तला यांचा विवाह झाल्यावर दुर्वासाचा शकुन्तलेला शाप होणें, शकुन्तलेला निरोप देऊन कण्वानें ऋषिकुमारांबरोबर तिला दुष्यन्ताकडे पाठविणें, त्यापुढें अंगठी सांपडल्यावर

दुष्यन्तानें शकुन्तलेच्या चित्राकडे पाहून शोक करणें, मारीचाश्रमांत त्याला शकुन्तलेची सपुत्र भेट होऊन उभयतांचीं मनें सर्व स्पष्टीकरणानंतर परस्परांविषयीं अत्यंत शुद्ध होणें हे शाकुन्तलांतील प्रसंग अत्यंत मनोवेधक होत. चौथ्या अंकांतील कण्वाचीं भाषणें, सहाव्या अंकांतील दुष्यन्ताचा पश्चात्ताप, सातव्यांतील दुष्यन्ताच्या इन्द्रकृत सत्काराचें वर्णन आणि सर्वदमनाला पाहून तो आपलाच पुत्र आहे असें त्याला निश्चित समजेपर्यंतचे त्याचे उद्गार, इत्यादिकांनीं अनेकांना आजवर चटका लावून सोडिलें आहे. हे विविध प्रसंग सारेच अत्यंत हृदयंगम असल्यानें कोणी चौथ्या अंकांतील चार श्लोकांवर बोट ठेवून " काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्यं शकुन्तलम् । तत्रापि च चतुर्थोऽकस्तत्र श्लोकचतुष्टयम् ॥ " असें म्हणतो, तर शेझीसारखा पाश्चात्य पंडित " आलक्ष्यदन्तमुकुलाननिमित्तहासैः " (शा. ७,१७), इत्यादि श्लोकानें मोहून जातो, एवढेंच.

व्युत्पत्ति म्हणजे शास्त्रपरिशीलन. अर्थात् त्यांत अमुक एका शास्त्राचा किंवा विद्येचा अन्तर्भाव होत नाहीं असें नाहीं. कालिदासानें व्याकरण, छंदःशास्त्र, अलंकार, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, कामशास्त्र, ज्योतिष, वैद्यक, संगीत, चित्रकला, भूवर्णन, पुराणकथा इत्यादि अनेक शास्त्रें, कला व विद्या यांशीं परिचय करून घेतला होता, असें त्याच्या ग्रंथांवरून दिसून येतें. या विविध ज्ञानाचा उपयोग त्यानें यथाप्रसंग करून आपल्या काव्यांना वैचित्र्य व सरसत्व आणून विद्वद्रसिकांना तीं कौतुकपात्र केलीं.

छंदःशास्त्र

काव्याला छंदाची अवश्यकताच आहे असें नाहीं, ही गोष्ट साहित्यशास्त्रकारांनीं मान्य करून सामान्य काव्यलक्षणांत छंदोबद्धत्वाची अट घातलेली नाहीं. पण त्याच्या कित्येक प्रकारांना म्हणजे महाकाव्य, खंडकाव्य इत्यादिकांना छंदोबद्धत्व अवश्य आहे. काव्याच्या अनेकविध वर्गीकरणांतच गद्य व पद्य असें वर्गीकरण असून त्यांपैकीं पद्याला छंदःशास्त्राची अवश्यकता असते. पद्यमय काव्याला वैचित्र्य आणण्यासाठीं बहुविध वृत्तांची योजना

केलेली आहे, तशीच गद्यमय ललित लेखनांत वाक्यांच्या निरनिराळ्या प्रकारांचीं योजना प्रसंगानुसार कुशल लेखक करितात. परंतु या दृष्टीनें गद्याची चिकित्सा आणि तत्संबंधीं नियम पाश्चात्य साहित्यकोविदांनीं केल्याप्रमाणें पौरस्त्यांनीं केलेले आढळत नाहींत. छंदःशास्त्राचा विचार मात्र इकडे पुष्कळ झालेला आहे.

कालिदासानें आपल्या काव्यनाटकांत लहानमोठीं, समविषम अक्षरवृत्तें, मात्रावृत्तें अशीं मिळून सुमारें चाळिसांवर वृत्तें योजिलेलीं आढळतात. स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित, हरिणी, मन्दाक्रान्ता, शिखरिणी, पृथ्वी, मालिनी, शालिनी, इन्द्रवज्रा, उपेन्द्रवज्रा, विविध उपजाति, वसंततिलका, वंशस्थ, पुष्पिताग्रा, द्रुतविलंबित, स्वागता, रथोद्धता, रुचिरा, वैतालीय, मालभारिणी, अपरवक्त्र, प्रहर्षिणी, तोटक, औपच्छंदसिक, मत्तमयूर, आर्या, अनुष्टुभ्, आणि दुसरे कित्येक गीतप्रकार त्यानें उपयोजिलेले दिसून येतात. रसानुकूल छंदोयोजना करण्यांतहि तो कौशल्य दाखवितो. करुणरसाच्या प्रसंगीं तो वैतालीय किंवा वियोगिनी हा छंद योजितो; व त्याचा परिणाम कसा होतो हें रघुवंशाच्या आठव्या सर्गांतील अजविलाप आणि कुमारसंभवाच्या चौथ्या सर्गांतील रतिविलाप वाचल्यास कळून येईल. हरिणी वृत्ताची त्याची योजना अशीच अनुरूप आहे. शाकुन्तलाच्या सातव्या अंकांत शकुन्तला दुष्यन्तासमोर आल्यावर त्याचा ती कर्तव्यबुद्धीनें जयजयकार करून "आई, कोण ग हा?" या सर्वदमनाच्या प्रश्नाला "बाळा, आपल्या दैवाला विचार!" असें उत्तर देऊन रडूं लागली असतां, पश्चात्तापदग्ध दुष्यन्त तिचें सांत्वन करण्यासाठीं स्वकृतीचें जें "सुतनु हृदयात्प्रत्यादेशव्यलीकमपैतु ते । किमपि मनसः संमोहो मे तदा बलवानभूत् ॥" (शा. ७, २४) इत्यादि करुणरसपर वर्णन करितो, तें पाहिल्यास आपणांस रसानुकूल वृत्तयोजनेचें महत्व कळून येतें. कालिदास महाकाव्यांत विस्तृत अशा सृष्टिवर्णनाच्या प्रसंगी सामान्यतः इन्द्रवज्रा, उपेंद्रवज्रा व त्यांच्या मिश्रणानें बनलेल्या उपजाति योजितो. नाटकांत इतर वृत्तांच्या मानानें आर्यावृत्ताचा उपयोग तो विशेष करितो. मन्दाक्रान्ता

म्हटल्याबरोबर कालिदासाच्या मेघदूताची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. अनुष्टुभ् छंदावरहि त्याचें प्रभुत्व चांगलें दिसून येतें. रघुवंश व कुमारसंभव यांत कथानक झटपट सांगण्यासाठीं अनेक सर्गांत मुख्यतः अनुष्टुपाचाच उपयोग त्यानें केलेला आहे.

कालिदासाच्या वेळीं छंदःशास्त्रावर कोणते ग्रंथ होते हें सांगतां येत नाहीं. भरताचें 'नाट्यशास्त्र' सांप्रत आहे, त्याच स्वरूपांत कालिदासाला अवगत होतें असें धरिल्यास, त्याच्या चवदा व पंधरा या अध्यायांत छंदःशास्त्राचें सोदाहरण विवरण आहे. वेदांगछंदहि तेव्हां होतेच. कालिदासानें योजिलेल्या वृत्तांपैकीं वैतालीय व औपच्छंदसिक हीं नांवें ज्यांना देतात तीं सांप्रत अक्षरगणात्मक व मात्रागणात्मक अशीं दोन्ही प्रकारचीं कोणी मानितात. "प्रथमोपकृतं मरुत्वतः प्रतिपत्त्या लघु मन्यते भवान्।" (शा. ७,१), व "अथ तस्य विवाहकौतुकं ललितं बिभ्रत एव पार्थिवः।" (र. ८,१), यांना राघवभट्ट व मल्लिनाथ यांनीं वैतालीय म्हटलें आहे. परंतु या ठिकाणीं हें वृत्त अक्षरगणात्मक आहे आणि प्रस्तुत अर्धसमवृत्ताला वियोगिनी असें छंदःशास्त्रांत नांव दिलें असून "विषमे ससजा गुरुः समे। सभरा लोऽथ गुरुर्वियोगिनी॥," असें त्याचें लक्षण केलेलें आढळतें. याच लक्षणाच्या कुमारसंभवांतील रतिविलापाच्या वृत्ताला मल्लिनाथानेंहि वैतालीय न म्हणतां वियोगिनी म्हटलें आहे. "क्व नु ते हृदयंगमः सखा कुसुमायोजितकार्मुको मधुः।'- (कु. ४, २४), हे रतिविलापांतील चरण "गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ।" (र. ८, ६७) या अजविलापांतील अक्षरगणरचनेचेच आहेत. राघवभट्टानें रथोद्धता व स्वागता यांच्या नांवांच्यादेखील असाच घोटाळा केलेला दिसतो.

अलंकार

कालिदासानें शब्दालंकार व अर्थालंकार यांना योग्य तें प्रमाण व स्थान आपल्या ग्रंथांत दिलेलें आहे. केवळ शब्दचमत्कृति दाखविणारी चित्रकाव्यरचना त्याच्या कृतींत कोठेंच दिसत नाहीं. अनुप्रास व यमक यांचे सामान्य

प्रकार त्यानें बहुतेक ठिकाणीं साहजिकपणें व कांहीं ठिकाणीं हेतुपुरस्सरहि घातलेले आहेत. पण अर्थाची ओढाताण करून शब्दचमत्कृति साधण्याकडे त्याचें लक्ष विशेष नव्हतें. म्हणूनच प्रसाद व माधुर्य हे गुण त्याच्या नाटकांत भरलेले आहेत. द्व्यर्थी शब्दयोजना म्हणजे श्लेष त्यानें फारच अल्प प्रमाणांत योजिलेले आढळतात.

"सर्वदमन शकुन्तलावण्यं (किंवा 'शकुन्तलावर्णं') प्रेक्षस्व।" (शा. ७, २१), असा केवळ शब्दश्लेष, म्हणजे 'शकुन्त-लावण्यं' व 'शकुन्तलावर्णं' असा अक्षरविभक्तीकरणावरच अवलंबून असणारा श्लेष, हा त्याच्या ग्रंथांत अगदींच विरळा. अर्थश्लेषाचीं उदाहरणें याहून अधिक आहेत. ताटकावधाच्या वर्णनांत "राममन्मथशरेण ताडिता दुःसहेन हृदये निशाचरी। गन्धवद्रुधिरचंदनोक्षिता जीवितेशवसतिं जगाम सा॥" (र. ११, २०), या श्लोकाच्या उत्तरार्धांतील पदें श्लिष्ट आहेत. 'गंधवत्' म्हणजे सुगंधि किंवा घाणेरडें, 'रुधिर' म्हणजे तांबडें किंवा रक्त, 'जीवितेश' म्हणजे प्रियतम किंवा यम. प्रथमार्धांतील रामरूपी मन्मथ या रूपकामुळें एकंदर वर्णनावरून, सुगंधी चंदनाची उटी लावून आपल्या प्रियतमाकडे जाणाऱ्या कामशरव्यथित अशा अभिसारिकेची कल्पना होत असल्यामुळें त्यांत समासोक्ति नामक अलंकारहि साधिलेला आहे. शिवाय ताटकेला यमाकडे जाणारी अभिसारिका कल्पिल्यामुळें विनोदाची छटा उमटलेली आहे ती वेगळीच. असो. "अंगना इव रजस्वला दिशो नो बभूवुरवलोकनक्षमाः।" (र. ११, ६०), यांतील 'रजस्वला' शब्द श्लिष्ट असून ऋतुमती व धुळीनें व्याप्त झालेली असे त्याचे अर्थ आहेत. "प्रियवचनशतोऽपि योषितां दयितजनानुनयो रसादृते। प्रविशति हृदयं न तद्विदां मणिरिव कृत्रिमरागयोजितः॥" (वि. २, २२), यांतहि 'रस' व 'राग' हीं पदें श्लिष्ट आहेत. शाकुन्तलांतील कोळ्याच्या तोंडीं घातलेल्या "इतोऽर्धं युष्माकं सुमनो मूल्यं भवतु।" (अं. ६, १), या शब्दांतील 'सुमनस्' शब्दहि फूल व चांगलें मन अशा दोन्ही अर्थांनीं योजिलेला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. अनुप्रास व यमक या शब्दा-

लंकारांचा उपयोग अर्थासमवेत नादमधुरी उत्पन्न करणें हा होय व तेवढ्याच-पुरता तो कालिदासानें केला आहे. शाकुन्तलावरील राघवभट्टाच्या टीकेंत कालिदासाच्या रचनेंतील अनुप्रासाचे विविध प्रकार दाखविले आहेत; परंतु कवीनें ते बुद्धिपुरस्सर घातले आहेत असेंच कांहीं म्हणतां येत नाहीं. " प्रस्थितायां प्रतिष्ठेथाः स्थितायां स्थितिमाचरेः । निषण्णायां निषीदास्यां पीताम्भसि पिबेरपः ॥ " (र. १, ८९), यांतील अनुप्रासाला कृत्रिम कसें म्हणतां येईल? तशींच आणखी उदाहरणें पाहा. " ततो मृगेन्द्रस्य मृगेन्द्र-गामी वधाय वध्यस्य शरं शरण्यः । जाताभिषंगो नृपतिर्निषंगादुद्धर्तुमैच्छत् प्रसभोद्धृतारिः ॥ " (र. २, ३०), "तमार्यगृह्यं निगृहीतधेनुर्मनुष्यवाचा मनुवंशकेतुम् । विस्माययन् विस्मितमात्मवृत्तौ सिंहोरुसत्त्वं निजगाद सिंहः ॥" (र. २, ३३), " स मानसीं मेरुसखः पितॄणाम् कन्यां कुलस्य स्थितये स्थितिज्ञः । मेनां मुनीनामपि माननीयामात्मानुरूपां विधिनोपयेमे ॥" (कु. १, १८), यांतील अनुप्रास कोणत्याहि रीतीनें अर्थहानि करणारे नसून माधुर्यो-त्पादक मात्र आहेत.

यमकासंबंधानें रघुवंशाचा नववा सर्ग सुप्रसिद्ध आहे. त्यांत " **यमवता-मवतां** च धुरि स्थितः " (र. ९, १), " **तिलकजालकजालकमौक्तिकैः** " (र. ९, ४४) अशीं तीनअक्षरी यमकें पहिल्या ५४ श्लोकांतील प्रत्येकाच्या चौथ्या चरणांत साधलेलीं आहेत. थोडक्यांत सांगावयाचें तर शब्दालंकारांत अनुप्रासापलीकडे कालिदास फारसा गेलेला नाहीं; व केवळ शब्दचमत्कृतीवर त्याचा भर एकंदरींत नाहींच म्हटलें तरी चालेल.

भरताच्या नाट्यशास्त्रांत उपमा, दीपक, रूपक, व यमक असे अर्थालंकार आणि शब्दालंकार मिळून चारच अलंकार सांगितले आहेत. परंतु कालि-दासाच्या ग्रंथांत यमकाबरोबर श्लेष व अनुप्रास हे शब्दालंकारहि स्पष्ट स्वरूपांत आलेले आहेत हें वर दाखविलेंच आहे. चित्रबंधादि जे प्रकार पुढील साहित्य-शास्त्रकारांनीं सांगितले आहेत, त्यांचाहि मागमूस कालिदासाच्या काव्यांत नाहीं. अर्थालंकारांपैकीं बरेचसे अलंकार त्यानें योजिलेले असून त्यांत

उपमामूलक अलंकारांचा विशेष भरणा आहे. काव्यांत अलंकारांचा उपयोग किती असतो व ते अलंकार कशानें साधतात यांविषयींचा विचार कालिदासानें पार्वतीच्या वर्णनांत ध्वनित केलेला दिसतो. "व्याकरणादिकांच्या अभ्यासानें संस्कार पावलेली जी वाणी तीमुळें विद्वान् पुरुष जसा शुद्ध व अलंकृत होतो, तसा हिमालय त्या पार्वतीमुळें पवित्र व अलंकृत झाला"* असें तें वर्णन आहे. काव्याला शुद्धि व शोभा आणण्यांत व्याकरणादि संस्कार उपयुक्त होतात असा त्यांत भावार्थ दिसतो. अलंकारांतील पारिभाषिक शब्दांपैकीं 'उपमान' ("जातास्तदूर्वोरुपमानबाह्याः।" कु. १. ३६), 'निदर्शन' ("नलिनी पूर्वनिदर्शनं मता।" र. ८, ४५), 'इत्यादि शब्द कालिदासानें योजिलेले आहेत. 'उपमाना 'ला तो 'उपमाद्रव्य' ("सर्वोपमाद्रव्यसमुच्चयेन।" कु. १, ४९) असेंहि म्हणतो.

कालिदासानें उपमा, अतिशयोक्ति, उत्प्रेक्षा, अपह्नुति, व्यतिरेक, दृष्टान्त, निदर्शना, संदेह, व्याजस्तुति, काव्यलिंग, अर्थान्तरन्यास, स्वभावोक्ति, प्रतीप, अन्योन्य, विभावना, विरोध, सहोक्ति, इत्यादि अलंकार यथोचित स्थळीं योजिलेले आढळतात. त्या सर्वांचीं उदाहरणें देऊन जागा न अडवितां कित्येकांचे स्थलनिर्देश मात्र येथें करितों. "पार्वतीच्या भुवयांची कान्ति पाहून मदनानें आपल्या सौन्दर्याचा अभिमान सोडून दिला" (कु. १, ४७), यांत अतिशयोक्ति; "शुद्ध पोंवळ्यांच्या रांगांत जर मोतीं बसविलीं तरच तीं पार्वतीच्या स्मितासारखीं दिसूं शकतील" (कु. १, ४४), यांत प्रतीप; "वायुप्रवाहांत ठेविलेल्या नीलकमलासारखे जे पार्वतीचे नेत्र ते तिनें हरिणीपासून घेतले कीं हरिणींनी पार्वतीपासून घेतले कांहीं कळेना" (कु. १, ४६), यांत संदेह; "शंकराचा गंभीर ध्वनि करणारा नंदी आपल्या खुरांनीं हिमालयावरील बर्फाच्या शिला खरडीत असतां भ्यालेल्या गव्यांच्या दृष्टी पडतांच मोठ्यानें डुरकण्या फोडी" (कु. १, ५६). यांत स्वभावोक्ति; "शकुन्तलेला आश्रमांतील कामाला लावणें म्हणजे कमलपत्रानें समिधा तोडू

* "संस्कारवत्येव गिरा मनीषी तया स पूतश्च विभूषितश्च।" कु. १, २८

पाहणेंच होय " (शा. १, १८), यांत निदर्शन; " पार्वतीचा गळा आणि त्यांतील मोत्यांचा हार यांनीं एकमेकांना शोभा आणिली " (कु. १, ४२), यांत अन्योन्य; " रघूच्या वक्षःस्थलावर वज्रप्रहार झाला असतां तो आपल्या सैनिकांच्या अश्रूंबरोबर भूमीवर पडला" (र. ३, ६१), यांत सहोक्ति; इत्यादि.

‘ उपमा कालिदासस्य ’

परंतु अलंकारदृष्ट्या कालिदासाचें वैभव ‘ उपमा कालिदासस्य ’ या सुप्रसिद्ध प्रशस्तिवचनावरून दिसून येत असून उपमामूलक अलंकारांची त्याच्या काव्यनाटकांत खरोखरच रेलचेल आहे. कालिदासाच्या उपमेसंबंधानें अनेकांनीं आतांपर्यंत लिहिलें आहे. त्याच्या सर्व उपमांचें विषयवारीनें वर्गीकरण केल्यास त्याचें सूक्ष्म निरीक्षण व कल्पकता यांची चांगली जाणीव होईल. परंतु त्यासाठीं स्वतंत्र प्रबंधाचीच योजना करावी लागेल. त्याच्या उपमानांचें क्षेत्र पराकाष्ठेचें विस्तृत आहे. सृष्टिव्यापार, लोकव्यवहार, पुराणकथा, धर्मशास्त्र, शिक्षण, ललितकला, भौतिक शास्त्रें इत्यादि विविध विषयांतून त्यानें आपलीं उपमानें घेतलीं आहेत. ‘ शब्द आणि अर्थ यांप्रमाणें संलग्न असे पार्वती-परमेश्वर ’ (र. १, १), ‘ उंच झाडावरचें फळ हात वर करून काढूं बघणाऱ्या ठेंगू माणसासारखा महाकवि होऊं पाहणारा मन्दबुद्धि पुरुष ’ (१, ३), ‘ प्रणवश्छंदसामिव ’ (१, ११), ‘ विद्यामभ्यसनेनेव प्रसादयितुमर्हसि। ’ (१, ८८), ‘ श्रुतेरिवार्थं स्मृतिरन्वगच्छत् ’ (२, २), ‘अवाकिरन्बाललताः प्रसूनैराचारलाजैरिव पौरकन्याः। ’ (२, १०), ‘ राजा स्वतेजोभिरदह्यतान्तर्भोगीव मंत्रौषधिरुद्धवीर्यः। ’ (२, ३२), ‘ लिपेर्यथावद्ग्रहणेन वाङ्मयं नदीमुखेनेव समुद्रमाविशत् ’ (३, २८), ‘ अवेहि तनयां ब्रह्मन्नग्निगर्भां शमीमिव। ’ (शा. ४, ४), ‘ ययातेरिव शर्मिष्ठा भर्तुर्बहुमता भव। ’ (४, ७), ‘ भ्रमर इव विभाते कुन्दमन्तस्तुषारं न च खलु परिभोक्तुं नैव शक्नोमि हातुम्। ’ (५, १९), ‘ उन्मीलितं तूलिकयेव चित्रं सूर्यांशुभिर्भिन्नमिवारविन्दम्। बभूव तस्याश्चतुरस्रशोभि वपुर्विभक्तं नवयौवनेन॥ ’ (कु. १, ३२), ‘ उमारूपेण ते यूयं संयमस्तिमितं मनः। शंभोर्यतध्वमा

कृष्टमयस्कान्तेन लोहवत् ।' (२,५९), 'पंकच्छिदः फलस्येव निकषणाविलं पयः ।' (मा. २, ७), 'नातिश्रमापनयनाय यथा श्रमाय । राज्यं स्वहस्तधृतदण्डमिवातपत्रम्' ॥ (शा. ५, ६), 'गङ्गा रोधःपतनकलुषा गृह्णतीव प्रसादम् ।' (वि. १, ७), 'एताः सुतनु मुखं ते सख्यः पश्यन्ति हेमकूटगताः प्रत्यागतप्रसादं चन्द्रमिवोपप्लवान्मुक्तम् ।' (वि. १, १०), 'वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं (मेघं) ददर्श । (मे. १, २), 'साभ्रेऽह्नीव स्थलकमलिनीं न प्रबुद्धां न सुप्ताम् ॥' (मे. २, ३२) इत्यादि उपमा पाहिल्यास त्या कशा निरनिराळ्या विषयांतून घेतल्या आहेत हें दिसून येईल. कालिदासाची उपमाविषयक प्रसिद्धि त्या उपमांच्या औचित्यावरून किंवा सरसत्वावरून झाली असली तरी त्याच्या उपमांचें प्राचुर्यहि तितकेंच महत्त्वाचें आहे. उदाहरणार्थ रघुवंशाचा पहिला सर्ग घेतला तर त्यांत निदान वीस उपमा आढळतात, इतकेंच नव्हे तर यांशिवाय उत्प्रेक्षा, दृष्टान्त इत्यादि उपमामूलक अलंकारहि आणखी तितकेच सांपडतात.

कालिदासाचे अर्थान्तरन्यास व दृष्टान्त हेहि असेच समर्पक असून विपुल आहेत. 'मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेतः । कण्ठाश्लेषप्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे ॥' (मे. १, ३), 'याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ।' (१, ६), 'रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय ।' (१, २०), 'मन्दायन्ते न खलु सुहृदामभ्युपेतार्थकृत्याः ।' (१, ४०), 'आपन्नार्त्तिप्रशमनफलाः संपदो ह्युत्तमानाम् ।' (१, ५९), 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ।' (२, ४९), 'हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा ।' (र. १, १०), 'तेजसां हि न वयः समीक्ष्यते ।' (११, १), 'शैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य ।' (५, ५४), 'काले खलु समारब्धाः फलं बध्नन्ति नीतयः ।' (१२, ६९), 'आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया ।' (१४, ४६), 'सुखोपरोधि वृत्तं हि राज्ञामुपरुद्धवृत्तम् ।' (१८, १८), 'भिन्नरुचिर्हि लोकः ।' (६, ३०), 'महदपि परदुःखं शीतलं सम्यगाहुः ।' (वि. ४, १३), 'तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम् ।' (१, १६),

'स्वार्थात्सतां गुरुतरा प्रणयिक्रियैव।' (४, १५). 'मनोरथानामगतिर्न विद्यते।' (कु. ५, ६४), 'न कामवृत्तिर्वचनीयमीक्षते।' (५, ८२), 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते।' (५,८६); 'स्तोत्रं कस्य न तुष्टये।' (१०, ९), 'विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः।' (१, ५९), 'विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम्।' (२, ५५), 'क ईप्सितार्थस्थिरनिश्चयं मनः पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत्।' (५, ५), 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्।' (५, ३३), 'कामी स्वतां पश्यति।' (शा. २, २), 'स्वभाव एवैष परोपकारिणाम्' (५, १२), इत्यादि अर्थान्तरन्यासात्मक व दृष्टान्तात्मक वचनें म्हणीसारखीं रूढ होऊन बसलीं आहेत.

गुण, रीति व दोष

कालिदासाची भाषा एकंदरींत सुलभ असून तींत क्लिष्टपणा कोठेंहि नाहीं. प्रसाद व माधुर्य हे तिचे विशेष गुण असून वैदर्भी ही तिची रीति होय. व्याकरणदृष्टीची शुद्धताहि त्यानें तशीच राखिली आहे. 'सुभ्रूः'च्या जागीं 'सुभ्रु' पाहिजे (विक्रमो.), 'आसमुद्रक्षितीशानाम्'च्या जागीं 'आसमुद्रं क्षितीशानाम्' असावें (र. १, ५), असे किरकोळ दोष टीकाकारांनीं दाखविले आहेत. तसेंच साहित्यशास्त्रदृष्ट्या प्रक्रमभंगादि दोषहि राघवभट्टासारख्यांनीं दाखवून ते टाळण्यासाठीं पाठान्तरें सुचविलीं आहेत. परन्तु तीं पाठान्तरें नीरस असून मूळ वचनेंच सरस असल्यामुळें त्यांना सदोष म्हणतां येणें कठीण आहे. तथापि दोष असलेच तरी गुणांचा सांठा कालिदासापाशीं इतका मोठा आहे कीं, त्यानेंच स्वतः 'एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः।' (कु. १, ३), या श्लोकांत सुचविल्याप्रमाणें त्याच्या गुणसमुच्चयांत ते दोष लपून गेले आहेत यांत शंका नाहीं.

उपास्य देवतेचा शृंगार वर्णन करणें हा दोष म्हणून साहित्यशास्त्रांत मानिला आहे, तथापि तो कालिदासाच्या हातून घडला आहे. हा दोष त्याच्या माथीं येऊं नये म्हणूनच कित्येक पंडित कुमारसंभवाचे सातच सर्ग कालिदासाचे होत, असें म्हणूं लागले कीं काय समजत नाहीं. कांहीं अपाणिनीय

प्रयोग व्याकरणदोष म्हणून कालिदासाच्या काव्यांत दाखविण्यांत येतात. 'बभूव' बद्दल 'आस' ('... विधातुर्लावण्य उत्पाद्य इवास यत्नः।' कु. १, ३५), तसेंच लिट् लकारांत म्हणजे परोक्षभूतांत 'पातयामास' म्हणण्याच्या ऐवजीं 'तं पातयां प्रथममास पपात पश्चात्।' (र. ९,६१), असे त्याचे भाग तोडून मध्यें दुसरा शब्द घुसडणें, असे ते दोष होत. कालविपर्यासाचा दोषहि दुष्यन्ताची राजधानी हस्तिनापुरांत आणून कालिदासानें केला आहे. कारण, हस्तिनापुर स्थापणारा हस्तिन् नामक सोमवंशीय राजा दुष्यन्तापासून (दुष्यन्त-भरत-भुमन्यु-सुहोत्र-हस्तिन्) पांचवा वंशज म्हणून महाभारतांत सांगितला आहे (आदिपर्व अ. ९५, २९-३४). शेक्स्पियरनेंहि बोहेमिया या मध्ययूरोपांत जर्मनीला लागून असलेल्या देशाला समुद्रकिनारा जोडून त्यावर सिसिलींतील जहाज आणून सोडिलें आहे (वुइन्टर्स टेल, अं. ३, प्र. ३)! परंतु असल्या स्थलकालांच्या दोषांनीं काव्याचें रमणीयत्व कांहीं फारसें बिघडत नाहीं, असें रसिकांचें म्हणणें पडतें.

स्वतंत्र वृत्ति

संस्कृत साहित्यशास्त्राचा इतिहास पाहिल्यास, भरतप्रणीत नाट्यशास्त्राशिवाय उपलब्ध साहित्यग्रंथांतील जुन्यांत जुन्या ग्रंथाच्या पूर्वी कालिदास होऊन गेला असल्यामुळें, ते प्राचीन साहित्यशास्त्रविषयक ग्रंथ लिहितांना कालिदासाच्या ग्रंथांचा उपयोग सहजच केलेला आहे. असा उपयोग कोणत्या साहित्यशास्त्रकारानें किती केला आहे, याचें सविस्तर वर्णन श्री. हरिचंद शास्त्री यांनीं 'कालिदास' या विषयावरील आपल्या फ्रेंच भाषेंतील प्रबंधांत केलें आहे. कालिदासाच्या काळींहि साहित्यशास्त्राची चांगली प्रगति झालेली असली पाहिजे, हें या प्रकारणांतील विवेचनावरून सहज दिसून येईल. परंतु कालिदासानें कोणत्याहि ग्रंथाचा दास होऊन आपलीं काव्यें लिहिलेलीं नाहींत. महाकाव्य, खंडकाव्य, नाटक, अलंकार, गुण, दोष, इत्यादिकांच्या ग्रंथोक्त व्याख्या पुढें ठेवून त्यांना जुळेल असेंच लिहावयाचें, अशी त्याची दृष्टि नसून एकंदरींत कलाविलासाबरोबर सदभिरुचि व प्रमाण-

वद्धता हीं तत्त्वें पुढें ठेवून त्यानें आपली स्वतंत्र बुद्धि चालविलेली आहे. अशी बुद्धि चालवून सिद्ध केलेल्या काव्यपाकाचा बरेवाईटपणा ठरविण्याचें काम कालिदासानें विद्वान् रसिकांवर आदरपूर्वक सोंपविलें आहे. 'पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम् । सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥' (मा. १, २), 'आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् । ' (शा. १, २), व 'तं सन्तः श्रोतुमर्हन्ति सदसद्व्यक्तिहेतवः । ' (र. १, १०), या त्याच्या वचनांत तसा अभिप्राय व्यक्त केलेला दिसून येतो.

विनोद व कोटिप्रियता

साहित्यशास्त्रदृष्ट्या कालिदासाच्या काव्यांचा विचार करतांना दुसऱ्या एका गोष्टीकडेहि लक्ष गेल्याशिवाय राहत नाहीं. ती म्हणजे त्याची विनोदप्रियता ही होय. त्याचें 'मालविकाग्निमित्र' हें सारें नाटकच विनोदप्रचुर आहे. धारिणी राणीला चकवून राजाची व मालविकेची गांठ घालून देण्याच्या विदूषक गौतमाच्या खटपटींत चांगला विनोद दिसून येतो. इतर नाटकांतील विदूषकहि थोडेंबहुत हास्य उत्पन्न करितात. शाकुन्तलांतील पहिल्या दोन अंकांतील विनोद, विदूषकाचें काम करणारें पात्र चांगलें असल्यास फार खुलून दिसण्यासारखा आहे. 'कुमारसंभव' व 'रघुवंश' यांतहि पार्वती-बटुसंवाद, दिलीप-सिंहसंवाद, इंदुमती-स्वयंवरवर्णन यांत विनोदाची छटा दिसून येते. कालिदास हा मोठा कोटिप्रियहि दिसतो. उमा, अपर्णा, राम, भरत, सुदाक्षिणा, दशरथ, रघु, अज इत्यादि नांवांवर, त्याचप्रमाणें रघुवंशांतील शेवटच्या बऱ्याच राजांचें ओझरतें वर्णन करतांना त्यांपैकीं बहुतेकांच्या नांवांवर त्यानें कोट्या लढविल्या आहेत. 'निग्रहोऽप्ययमनुग्रहीकृतः । ' (र. ११, ९०), म्हणजे, 'केला निग्रह (दंड, शिक्षा) पण झाला अनुग्रह' किंवा 'श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः । ' (१४, ७०) म्हणजे, 'ज्याचे शोकपूर्ण शब्दच श्लोकरूप पावले', इत्यादि ठिकाणींहि त्याची कोटिप्रियता दृष्टोत्पत्तीस येते.

व्युत्पत्ति

कालिदासाच्या व्युत्पत्तीविषयीं म्हणजे शास्त्रें, विद्या, कला इत्यादिकांच्या अभ्यासाविषयीं सविस्तर विवेचन करावयाचें तर त्याला बरीच जागा लागेल. यासाठीं त्याविषयीं अल्पसें दिग्दर्शन मात्र येथें करूं.

'धातोः स्थान इवादेशं सुग्रीवं सन्यवेशयत्।' (र. १२, ५८), 'पश्चादध्ययनार्थस्य धातोरधिरिवाभवत्।' (१५, ९), 'सोऽभवद्वरवधूसमागमः प्रत्ययप्रकृतियोगसंनिभः।' (११, ५६), इत्यादि उपमा व्याकरणमूलक असून 'तं पातयां प्रथममास पपात पश्चात्' (९, ६१), 'प्रभ्रंशयां यो नहुषं चकार।' (१३, ३६), 'संयोजयां विधिवदास समेतबन्धुः।' (१६, ८६), इत्यादि प्रयोग कवीचा पाणिनिपूर्वकालीन भाषापद्धतीशीं परिचय असल्याचे द्योतक होत. 'सोढुं न तत्पूर्वमवर्णमीशे आलानिकं स्थाणुमिव द्विपेन्द्रः।' (१४, ३८), यांतील संधीचा अभाव 'नित्या समासे......वाक्ये तु सा विवक्षामपेक्षते' या नियमाची कवीची जाणीव दाखवितो.

'प्रणवश्छन्दसामिव।' (र. १, ११), 'अध्वरस्येव दक्षिणा।' (१, ३१), 'स्वाहयेव हविर्भुजम्।' (१, ५६), 'उद्घातः प्रणवो यासां न्यायैस्त्रिभिरुदीरणम्। कर्म यज्ञः फलं स्वर्गस्तासां त्वं प्रभवो गिराम्॥' (कु. २, १२), 'श्रुतेरिवार्थं स्मृतिरन्वगच्छत्' (र. २, २), 'उत्पत्तये हविर्भोक्तुर्यजमान इवारणिम्' इत्यादि उपमांत व वर्णनांत त्याचा श्रौत विधींशीं असलेला परिचय दिसून येतो. 'अथात्मनः शब्दगुणं गुणज्ञः पदं विमानेन विगाहमानः।' (र. १३, १), यांतील 'शब्दगुणं पदं' म्हणजे आकाश, ही परिभाषा सांख्य किंवा न्याय या दर्शनांतील आहे. याशिवाय प्रकृतिपुरुषांचें ऐक्य स्थापणारा वेदान्त ('त्वामामनन्ति प्रकृतिं पुरुषार्थप्रवर्तिनीम्। तद्दर्शिनमुदासीनं त्वामेव पुरुषं विदुः॥' (कु. २, १३), समाधीनें जीवात्म्याला परमात्म्याचें दर्शन करून देणारा योग ('न च योग-

विधेर्नेवेतरः स्थिरधीरापरमात्मदर्शनात् । ' र. ८, २२) इत्यादिकांचाहि परिचय कालिदासानें केलेला आढळून येतो.

भारत व रामायण यांतील कथा कालिदासानें ' शाकुन्तल ' व ' रघुवंश ' यांना आधारभूत म्हणून घेतलेल्या असल्यामुळें त्यांचें परिशीलन त्यानें केलें होतें हें उघड आहे. तथापि यांखेरीज त्याचें इतर पुराणकथांचेंहि ज्ञान विस्तृत दिसतें. मत्स्याशिवाय कृष्णापर्यंतच्या सर्व अवतारांचे उल्लेख, समुद्रमंथनाची कथा, यक्षयज्ञविध्वंसाची कथा, सूर्यवंश व सोमवंश यांचीं वृत्तें इत्यादि अनेक कथांचे संबंध त्यानें प्रसंगानुसार आणिले आहेत. ' ऋषिदेवगणस्वधा-भुजां श्रुतयागप्रसवैः स पार्थिवः । अनृणत्वमुपेयिवान्... ॥' (र. ८,३०), या रघूच्या वर्णनांत, तसेंच ' ननु गर्भः पित्र्यं रिक्थमर्हति । ' (शा. ६,२२) इत्यादिकांत त्यानें आपला धर्मशास्त्राशीं असलेला परिचय दाखविला आहे.

कालिदासाच्या ग्रंथांवर व विशेषतः रघुवंशावर भगवद्गीतेचीहि बरीच छाप पडलेली दिसून येते. ' धर्मसंरक्षणायैव प्रवृत्तिर्भुवि शार्ङ्गिणः ।' (र. १५, ४), ' अनवाप्तमवाप्तव्यं न ते किंचन विद्यते । लोकानुग्रह एवैकः हेतुस्ते जन्म-कर्मणोः ॥ ' (१०, ३१), ' विपदुत्पत्तिमतामुपस्थिता । ' (८, ८३), ' चतुर्वर्णमयो लोकस्त्वत्तः सर्वं चतुर्मुखात् । ' (१०, २२), ' सहजं किल यन्विनिन्दितं न खलु तत्कर्म विवर्जनीयम् । ' (शा. ६, १), इत्यादि त्याच्या वचनांत ' धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे । ' (भ. गी. ४, ८), ' न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन । नानवाप्तमवाप्तव्यंवर्त एव च कर्मणि ॥ ' (३, २२), ' जातस्य हि ध्रुवो मृत्युः । ' (२, २७), ' सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् । ' (१८, ४८), या गीतावचनांची छाया चांगली दिसून येते.

याशिवाय ' विद्यामभ्यसनेनेव प्रसादयितुमर्हसि । ' (र. १, ८८), ' सम्यगागमिता विद्या प्रबोधविनयाविव । ' (१०, ७१), ' शिष्टा क्रिया कस्यचिदात्मसंस्था संक्रान्तिरन्यस्य विशेषयुक्ता । यस्योभय साधु स शिक्षकाणां धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ॥ ' (मा. १,१६), ' सर्वज्ञस्याप्येका-

किनो निर्णयाभ्युपगमो दोषाय।' (१, १७) इत्यादि वचनें त्याच्या शिक्षण-कलेच्या अवलोकनाची साक्ष देतात. संगीत, चित्रकला, राजनीति,* ज्योतिष, वैद्यक इत्यादि विषयांचेहि उल्लेख त्यानें मधून मधून केले असून त्यांवरून त्याची विस्तृत व्युत्पत्ति दिसून येते. या विषयांवर प्रस्तुत लेखकानें अन्यत्र निबंधांत विवेचन केलें असून या ठिकाणीं स्थलाभावास्तव त्याचा विस्तार केला नाहीं.

प्रकरण सहावें

कालिदासकालीन समाज

१ समाजरचना: चातुर्वर्ण्य

समाज हा चतुर्वर्णात्मक असतो असें कालिदासानें आपलें मत "चतुर्वर्ण-मयो लोकस्त्वत्तः सर्वं चतुर्मुखात्।" (र.१०, २२) या विष्णुस्तुतींतील वचनांत सांगितलें आहे. समाजरचना कोणत्याहि प्रकारची असली तरी तिचें नियंत्रण करण्याचें काम राजाचें असतें व तदनुसार कालिदासानें चातुर्वर्ण्याचें नियंत्रण राजाकडून होतें असेंच म्हटलें आहे. "नृपस्य वर्णाश्रमपालनं यत्स एव धर्मो मनुना प्रणीतः।" (र. १४, ६७) असा मनूचा हवाला त्याविषयीं त्यानें दिला असून तदनुसार दुष्यन्ताला 'वर्णाश्रमाणां पालयिता' (शा. ५, १२), रामाला 'वर्णाश्रमावेक्षणजागरूकः' (र. १४, ८५), आणि रघूला 'वर्णाश्रमाणां गुरुः' (र. ५, १९), अशीं विशेषणें त्यानें लाविलेलीं आहेत

---

* "सामदानविधिभेदनिग्रहाः सिद्धिमन्त इव तस्य भूपतेः।" (र. १, ५५), "त्रिसाधना शक्तिरिवार्थमक्षयम्।" (३, १३), "इति क्रमात्प्रयुञ्जाने राजनीति चतुर्विधाम्।" (१७, ६८) इ०

व त्यांत अंतर्भूत झालेलें राजकर्तव्य दुष्यन्त योग्य रीतीनें बजावीत असल्यामुळें त्याच्या राज्यांत वर्णांपैकीं अगदीं खालच्या पायरीचा माणूसहि भलत्या मार्गानें जात नाहीं" ("न कश्चिद्वर्णानामपथमपकृष्टोऽपि भजते।" शा.५,१०), असें प्रशस्तिपत्रहि त्याला दिलें आहे. चातुर्वर्ण्यांकित समाजाच्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार अंगांपैकीं ब्राह्मण व क्षत्रिय यांचाच संबंध कालिदासाच्या काव्यनाटकांत विशेषतः आलेला असून इतरांचा अगदीं थोडा आहे.

ब्राह्मण

वसिष्ठ, वरतन्तु, कौत्स, वाल्मीकि, च्यवन, कण्व इत्यादि ब्राह्मण्याचे आदर्श कालिदासानें वर्णिले असून केवळ भोजनभाऊ खुषमस्करे असे ब्राह्मणहि विदूषकाच्या रूपानें त्यानें दाखविले आहेत. शिष्ट ब्राह्मणवर्ग पुरोहित, कुलगुरु, कुलपति या नात्यांनींच आलेला बहुधा आढळतो. विदूषक हे केवळ जातिब्राह्मण असून विद्या आणि आचरण या दृष्टीनें त्यांची योग्यता शून्यच आहे. अध्ययन-अध्यापन, दान-प्रतिग्रह, यजन-याजन या षडविध कर्तव्यांपैकीं एका प्रतिग्रहाचा मात्र त्यांनीं अवलंब केलेला असून इतरांवर कडकडीत बहिष्कार घातलेला आढळतो. च्यवन, कण्व, मारीच, वसिष्ठ, वरतन्तु, विश्वामित्र, अगस्त्य, परशुराम आणि वाल्मीकि हे आश्रमाधिपति ब्राह्मण कालिदासानें वर्णिले आहेत. पण या सर्व व्यक्ति असामान्य व प्राचीन असल्यामुळें त्यांच्या वर्णनावरून कालिदासकालीन सर्वसामान्य ब्राह्मणवर्णासंबंधानें स्वतः त्याचा अभिप्राय समजण्यासारखा नाहीं. तथापि या आश्रमाधिपतींच्या आश्रमांच्या वृत्तकथनावरून समाजशास्त्रदृष्ट्या बराच बोध मिळण्यासारखा आहे.

च्यवनाच्या आश्रमाचा संबंध विक्रमोर्वशीयांत आला असून पुरूरव्याचा पुत्र आयु याचें तेथें जन्मापासून पालन व शिक्षण झाल्याचें दाखविलें आहे. आश्रमांत वेदविद्येबरोबर राजपुत्रांना धनुर्विद्येचेंहि शिक्षण देण्याची व्यवस्था होती व तदनुसार त्याचे जातकर्मादि संस्कार करून च्यवनानें त्याला दोन्ही प्रकारचें शिक्षण दिलें (वि. ५, ११).

शाकुन्तलांत दोन आश्रमांचें वर्णन आहे. एक आश्रम कुलपति कण्वाचा व दुसरा प्रजापति मारीचाचा. पहिल्यांतील व्यक्ति थोर असल्या तरी मानवांसारख्याच दिसतात; पण मारीचाश्रमांतील सर्वच प्रकार दिव्य व अतिमानुष आहे. कण्व हा कुलपति, म्हणजे हजारों विद्यार्थ्यांना अन्नदानपूर्वक विद्यादान करणारा आहे. त्याच्या आश्रमांत वेदविद्येबरोबर व्यावहारिक व सामाजिक असें योग्य प्रकारचें शिक्षण देण्याची व्यवस्था होती. हें शिक्षण मुलगे व मुली अशा दोघांनाहि मिळत असे. लिहिणेंवाचणें, चित्रकलादि कला, आणि शेतकीबागाइतांसारखीं उपयुक्त कामें यांचा त्या शिक्षणांत समावेश होत असे. प्रजापति मारीचाचा आश्रम म्हणजे वैराग्यपूर्ण अशा गृहस्थाश्रमाचा उत्कृष्ट आदर्श म्हणून कालिदासानें दाखविला आहे.

रघुवंशांतील कथानकांत वसिष्ठ, वरतन्तु, विश्वामित्र व वाल्मीकि यांच्या आश्रमांचा संबंध आला असून त्यांचें स्वरूप सामान्यतः शाकुन्तलांतील कण्वाश्रमासारखेंच दिसतें. त्यांत पहाटे उठून वेदपठन करणाऱ्या शिष्यांचा समुदाय आढळून येतो. त्यांतील ऋषि संन्यासी नसून गृहस्थाश्रमी आहेत व तदनुसार ते यज्ञयाग व अतिथिसत्कार करीत असलेले आढळतात. त्यांत वृक्षलतांची जोपासना मुलांप्रमाणेंच प्रेमानें होत असलेली आढळते. थोडक्यांत सांगावयाचें तर हे आश्रम म्हणजे समाजाला आदर्शभूत अशीं शिक्षणकेन्द्रेंच होत.* तथापि ही स्थिति कालिदासकालीं होतीच असें मात्र नाहीं.

क्षत्रिय

कालिदासानें विशेष वर्णन असें क्षत्रियांचेंच केलें असून उत्तम क्षत्रिय कसें असावें हें रघुवंशीय राजांच्या ‘ आजन्मशुद्धानाम् ’ इत्यादि वर्णनांत

---

* प्रस्तुत विधानांस आधारभूत वचनें अशीं:— “ यत्क्षत्रियकुमारस्य जातकर्मादि विधानं तदस्य भगवता च्यवनेनाशेषमनुष्ठितम् । गृहीतविद्यो धनुर्वेदेऽभिविनीतः ” (वि. ५, ११), “ तच्छिष्याध्ययननिवेदितावसानां संविष्टः कुशशयने निशां निनाय । ” (र. १, ९५), “ यतस्त्वया ज्ञानमशेषमाप्तं लोकेन चैतन्यमिवोष्णरश्मेः । ” (र. ५, ४). अतिथिसत्काराविषयींचे उल्लेख येणेंप्रमाणें:—

(र. १, ५-८) सांगितलें आहे. "आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि।" (शा. १. ११), किंवा "क्षतात्किल त्रायत इत्युदग्रः क्षत्रस्य शब्दो भुवनेषु रूढः।" (र. २, ५३), असें क्षत्रियांचें ब्रीद कालिदास सांगतो. 'रघुवंश' काव्य लिहिण्यांत कालिदासाचा हेतु उत्तम राजे कसे असावे तें दाखविणें हा होता; व त्याप्रमाणें दिलीप, रघु, अज, दशरथ, राम, अतिथि, यांच्या कारभाराचें वर्णन त्यानें केलें आहे. परंतु या बाबतींत एकच बाजू न दाखवितां कालिदासानें अग्निवर्णासारख्या अत्यंत विषयासक्त राजाचें वर्णन करून तशा जीवितक्रमाचे दुष्परिणामहि दाखविले आहेत.

क्षत्रियांना जातकर्म, उपनयन इत्यादि संस्कार करून शिक्षण देण्यांत येत असे. त्यांच्या शिक्षणांत धनुर्वेद म्हणजे लष्करी शिक्षण हा विशेष होता. निरनिराळया विषयांतील गुरूंकडून हें शिक्षण मिळे. ऋषींच्या आश्रमांतहि सर्व प्रकारचें शिक्षण मिळण्याची व्यवस्था असे. जातकर्म, उपनयन, विवाह, राज्याभिषेक इत्यादि संस्कार क्षत्रियांचे करीत. शिकारीसारखे पौरुष खेळ त्यांना अर्थात् प्रिय असत. अनेक स्त्रिया करण्याची चाल त्यांच्यांत होती. "बहुवल्लभा राजानः श्रूयन्ते।" (शा. ३, १८), "अवरोधे महत्यपि" (र. १, ३२), इत्यादि ठिकाणीं कालिदासानें ही गोष्ट सांगितली आहे. क्षत्रियांमध्यें मद्यपानहि चालू होतें. अग्निमित्राची इरावती राणी, रघूचे सैनिक यांच्या वर्णनांत ही गोष्ट नमूद आहे.

वैश्य

वैश्यांचे उल्लेख कालिदासाच्या काव्यांत फारच थोडे आहेत. व्यापाऱ्यांना

"अभ्युत्थिताग्निपिशुनैरतिथीनाश्रमोन्मुखान्। पुनानम्.....॥" (र. १, ५३), "राजन् प्रविश्य प्रतिगृह्यताम् आतिथेयः सत्कारः।" (शा. १, १२), इत्यादि. गृहस्थाश्रमी ऋषींसंबंधीं:— "आकीर्णमृषिपत्नीनामुटजद्वाररोधिभिः। अपत्यैरिव नीवारभागधेयोचितैर्मृगैः॥" (र. १, ५०). वृक्षलतांच्या जोपासनेविषयीं:— "आधारबन्धप्रमुखैः प्रयत्नैः संवर्धितानां सुतनिर्विशेषम्।" (र. ५, ६), "अस्ति मे सोदरस्नेहोऽपि एतेषु (आश्रमवृक्षेषु)।" (शा. १, १६) इ०

व्यापाराच्या कामीं रस्त्यांसारख्या सोई करून देणें, बंदोबस्त करून त्यांचें रक्षण करणें हें राजांचें कर्तव्य असे. अतिथीनें आपल्या नमुनेदार राज्यकारभारानें तशा सोई करून वैश्यांना निर्भयपणें व्यापार करतां येईल अशी व्यवस्था केली होती, त्यामुळें नद्यांतून जातांना आपण जणूं आपल्या दारच्या विहिरींत आहों व अरण्यांतून किंवा डोंगरांतून प्रवास करतांना जणूं आपल्या बागेंत किंवा घरांत हिंडत आहों, असें व्यापाऱ्यांना वाटे. (र. १७, ६४). शाकुन्तलांत समुद्रावरून व्यापार करणाऱ्या धनमित्र वाण्याचा उल्लेख आहे. तो श्रीमंत असल्यामुळें त्याला पुष्कळ स्त्रिया असाव्या असा तर्क दुष्यन्त करितो. व्यापाऱ्यांच्या नफ्या-पैकीं षष्ठांश राजाला कर म्हणून दिला जाई (र. १७, ६५). राजांकडून बंदोबस्त होत असला तरी सामान्यतः वैश्यांना तांडे करून प्रवास करावा लागे व स्वसंरक्षणासाटीं शस्त्रें बाळगून कधीं कधीं लढण्याचाहि प्रसंग येई. अशा एका प्रसंगाचें वृत्त कालिदासानें मालविकाग्निमित्रांत (अं. ५) सांगितलें आहे. वैश्यांचें शिक्षण, संस्कार इत्यादिकांचे उल्लेख करण्याचा प्रसंग कालिदासानें आणिलेला नाहीं.

शूद्र

शूद्रांचेंहि वर्णन कालिदासानें थोडेंच केलेलें दिसतें. शाकुन्तलांतील कोळ्याच्या प्रवेशांतील पात्रांवरून शूद्रवर्गाच्या परिस्थितीची कल्पना होते. त्या वर्गांत लिहिण्यावाचण्याचा संबंध नव्हता. पण नगररक्षकांच्या तुकडीवरील श्यालासारखे अधिकारी र ट फ करूं शकत. श्याल या शब्दावरून राजाच्या कनिष्ठ वर्गातील स्त्रियांच्या भाईबंदांचा बोध होतो. त्यांना असल्या हडेलहप्पी जागांवर नेमण्याची वहिवाट होती असें दिसतें. नगररक्षकांवरील हे अधिकारी प्राकृत बोलणारे असेच कालिदासानें दाखविले आहेत, यावरून त्यांच्या संस्कृतीची कल्पना येईल. नगररक्षकांच्या नीतिमत्तेची पदवी आजच्या-सारखीच होती. पकडलेल्या आरोपींना तडाखे द्यावे व त्यांच्याकडून कबूल-जबाब घ्यावे, तसेंच त्यांच्यापासून साधल्यास पैसे उकळावे व त्यांतून मद्यपान करावें, या गोष्टीहि कालिदासानें या प्रवेशांत दाखविल्या आहेत.

चार आश्रम

चार वर्णांनीं बनलेल्या चातुर्वर्ण्यांत चार आश्रमांचें स्थान अत्यंत महत्त्वाचें असलें तरी प्रस्तुत बाबतींत प्रत्यक्ष कालिदासकालीं व्यवस्था कशी होती, हें सांगतां येणें कठीण आहे. कालिदासानें चारहि आश्रमांचें जें वर्णन केलें आहे तें सामान्यपणें स्मृतींत सांगितल्याप्रमाणें आहे; व त्यावरून त्याच्या आश्रमांविषयींच्या कल्पना दिसून आल्या, तरी तशी स्थिति प्रत्यक्ष त्याच्या वेळीं होती असेंच अनुमान कांहीं निघत नाहीं. कारण, त्यानें हें वर्णन बोलून चालून प्राचीन व्यक्तींचें म्हणूनच केलें आहे.

ब्रह्मचर्याश्रम म्हणजे विद्याभ्यासाश्रम हें सांगावयास नकोच. शाकुन्तलांतील ऋषिपुत्र, रघुवंशांतील वरतन्तुशिष्य कौत्स, रघु, अज, रामादि बंधु, तसेच दुसरे कांहीं राजपुत्र यांच्या वर्णनांत ब्रह्मचर्याश्रमाचा नमुना कालिदासानें दाखविला आहे. सर्व मानसिक व शारीरिक शक्तींची योग्य वाढ होऊन संसाराचा भार उचलण्याची शक्ति येईपर्यंतचा अवधि म्हणजे ब्रह्मचर्याश्रम, असें त्यानें त्यांत दर्शविलें आहे. कौत्साची विद्या पूर्ण झाल्यावर त्यानें गुरुदक्षिणा देऊन गृहस्थाश्रमाची तयारी केली. रघुराजाकडे तो आला तेव्हां राजानें त्याला विचारिलें, “ महर्षींनीं तुला योग्य शिक्षण देऊन प्रसन्नान्तःकरणानें गृहस्थाश्रमी होण्याला अनुज्ञा दिली आहे ना? त्या पायरीवर चढण्याचा तुझा आतां समय आलेला दिसतो” (र. ५, १०). कुशानें अतिथीला कुल-विद्यांचें शिक्षण दिल्यावरच त्याच्या विवाहाचा विचार केला (र. १७, ३).

चार आश्रमांपैकीं क्षत्रियांना पहिल्या दोहोंचाच अधिकार आहे, असें सांप्रत प्राचीनमताभिमान्यांचें म्हणणें दिसतें; व त्याला अनुसरून भगवद्गीतेंत युद्धाचा जो उपदेश कृष्णानें अर्जुनाला केला तो अर्जुन क्षत्रिय असल्या-मुळेंच होय, असाहि कोटिक्रम त्यांतील कित्येक करितात. पण कालिदासानें क्षत्रियांना चारहि आश्रम सोदाहरण लावून दाखविले आहेत. प्रथमच रघु-वंशीय राजांच्या प्रास्ताविक सामान्य वर्णनांत “ शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् । वार्द्धके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ॥” (र. १, ८).

अशा त्यांच्या चारहि आश्रमांचा तो स्पष्ट निर्देश करितो. त्या राजांपैकीं दिलीपादि अनेक राजे वानप्रस्थ झाले, रघु यति झाला, पुष्य योगी झाला, अशीं वर्णनें त्यानें केलीं आहेत. शूद्रांना मात्र या पुढील आश्रमांची बंदी असल्याचें कालिदास दर्शवितो. यासंबंधाची शंबुकाची कथा रामायणांत असून तिचाच अनुवाद कालिदासानें केला आहे (र. १५, ५०–५३). दशरथाच्याहातून चुकून मरण पावलेला यतीसुद्धां ब्राह्मण नव्हता ("द्विजेतर-तपस्विसुतम्" र. ९, ७६), व म्हणून त्याचा वध म्हणजे कांहीं ब्रह्महत्या नव्हे, असें त्यानें सूचित केलें आहे.

संस्कार

कालिदासानें जातकर्म, नामकरण, चौल, उपनयन, गोदान, विवाह आणि अंत्य इतके संस्कार उल्लेखिलेले आढळतात.* मनुष्यावर करावयाच्या या संस्कारांचें महत्त्व कालिदासाला विशेष वाटत होतें. रघूच्या जातकर्माचें वर्णन करतांना तो म्हणतो, "स जातकर्मण्यखिले तपस्विना तपोवनादेत्य पुरोधसा कृते। दिलीपसूनुर्मणिराकरोद्भवः प्रयुक्तसंस्कार इवाधिकं बभौ॥" (र. ३, १८). खाणींतून हिरा काढल्यावर ज्याप्रमाणें त्याला घांसून पैलू पाडण्याचा संस्कार त्यावर केल्यानें त्याचें स्वाभाविक तेज खुलून दिसतें, तसाच प्रकार जातकर्मादि संस्कारांचा आहे, असें कालिदास सुचवितो. हिरा घांसून पैलू पाडणें व जातकर्म या दोन्हीं गोष्टींना त्यानें 'संस्कार' हाच साधारण शब्द लावून धार्मिक संस्कारांचें महत्त्व दाखविलें आहे. शिक्षणाला आरंभ करतांना करावयाच्या उपनयनाचा तो स्पष्ट निर्देश ठिकठिकाणीं करितो. रघूचें उपनयन झाल्यावर रुरुमृगाचें चर्म अंगावर धारण करून त्यानें वेदादि विद्या व अस्त्रविद्या यांचें अध्ययन केलें (र. ३, २९–३१).

विवाह

विवाहसंस्काराचें सविस्तर वर्णन कालिदासानें कुमारसंभवांत व रघुवंशांत अनुक्रमें शिव-पार्वती व अज-इन्दुमती यांच्या विवाहप्रसंगानें केलें असून

* र. ३, १८; १०, ७८; १५, ३१; वि. ५, ११; शा. ७, २१ इ०

दोन्ही ठिकाणीं (कु. व र. सर्ग ७) बहुतेक तेंच तेंच शब्दशः वर्णन आहे. त्यावरून कालिदासकालीं विवाहविधीचें स्वरूप सामान्यतः आजच्या-सारखेंच होतें असें आढळून येतें. विवाहाच्या अनेक प्रकारांपैकीं गांधर्व व ब्राह्म हेच प्रकार कालिदासानें वर्णिले आहेत. शकुन्तला व दुष्यन्त यांचा विवाह शुद्ध गांधर्व होय. पण असे विवाह फार विचारपूर्वक केले पाहिजेत, असें कालिदासानें " अतः परीक्ष्य कर्तव्यं विशेषात्संगतं रहः । अज्ञातहृदयेष्वेवं वैरीभवति सौहृदम् ॥ " (शा. ५, २४), या वचनांत शार्ङ्गरवाच्या तोंडून वदविलें आहे. अज-इन्दुमती, राम-सीता, यांचे विवाह स्वयंवराच्या वर्गांतील होत. पण विधीच्या दृष्टीनें ते ब्राह्मासारखेच होते. पुरूरवा आणि उर्वशी यांचा तर विवाहच खरोखर नव्हता व त्या संबंधाला विवाह म्हटलेंच तर तो गांधर्व जातीचा होता असें म्हटलें पाहिजे. मुलींची निवड करण्याकरितां त्यांचीं चित्रें मागविण्याच्या पद्धतीचा उल्लेख कालिदासानें अग्निवर्णाच्या विवाहप्रसंगानें केला आहे (' प्रतिकृतिरचनाभ्यो ' इ० र. १८, ५३).

विवाहाच्या बाबतींतील गोत्रप्रवरांचा निर्बंध कितपत होता हें सांगतां येत नाहीं. बधूवरांचीं गोत्रें व प्रवर भिन्न असावे (" असमानार्षगोत्रजाम् .... स्त्रियमुद्वहेत् । ") असें स्मृति सांगतात व वैदिककालापासून तशी वहिवाट दिसते. तथापि क्षत्रियांच्या बाबतींत हा नियम कितपत लागू होता याची शंकाच आहे. कालिदासानें उल्लेखिलेल्या विवाहामध्यें ब्राह्मणाचा विवाहच नाहीं, सर्व क्षत्रियांचे आहेत, व एक देवाचा म्हणजे शंकर-पार्वतींचा आहे; आणि यांत गोत्र व प्रवर यांचा संबंध कोठेंहि आलेला नाहीं. परंतु कालि-दासानें सवर्ण विवाहावर थोडा जोर दिलेला दिसतो. दुष्यन्तानें शकुन्तले-संबंधीं विचार करतांना ती क्षत्रियाची असेल तर बरें असें मनांत म्हटलें, व चौकशीअंतीं ती विश्वामित्राची म्हणजे क्षत्रियाची कन्या आहे, असें समजून आल्यावर त्याला समाधानहि वाटलें. तथापि असवर्ण विवाहसुद्धां तेव्हां रूढ होते असें दिसतें. शकुन्तला ही कण्वाची कन्या, असें प्रथमच ऐकल्यावर त्याच्या असवर्ण स्त्रीपासून झालेली ती आहे कीं काय अशी शंका दुष्यन्ताला

आली, ती या रूढीमुळेंच असावी; व ब्राह्मणहि असवर्ण विवाह तेव्हां करीत असले पाहिजेत. क्षत्रिय तर करीत होतेच. मालविकाग्निमित्रांतील अग्निमित्राच्या धारिणी राणीचा वीरसेन नांवाचा सावत्र भाऊ तशा संबंधाचा होता, असें " अस्ति देव्या वर्णावरो भ्राता वीरसेनो नाम। " (मा. १, ६), या शब्दांनीं कालिदासानें सांगितलें आहे. पण असवर्ण विवाह होत असले तरी ते अनुलोमच होते, प्रतिलोम नव्हते, असें दुष्यन्ताच्या शकुन्तलाविषयक विचारावरून म्हणावें लागतें.

स्त्रियांची स्थिति

कालिदासानें वर्णिलेल्या स्त्रियांमध्यें बऱ्याच राजस्त्रिया असून कित्येक ऋषिपत्न्या, कांहीं ऋषिकन्या, थोड्याशा स्वर्गीय अप्सरा, कांहीं दासी, तर कांहीं तपस्विनी, अशा बहुविध स्त्रियांचा समावेश झालेला आहे. त्यांत सुशिक्षित व अशिक्षित असेहि प्रकार दिसतात.

स्त्रियांच्या बाबतींत विवाहाशिवाय इतर संस्कारांचा संबंध फारसा कालिदासानें दाखविलेला नाहीं. पार्वतीच्या वर्णनांत मात्र तिच्या नामकरणाचा उल्लेख आहे. सर्वसामान्य स्त्रीवर्गाला त्या काळीं लिहिण्यावाचण्याचें शिक्षण मिळत होतें असें म्हणतां येत नाहीं. पण कालिदासानें पार्वतीच्या शिक्षणाचा निर्देश केला असून शकुन्तला व तिच्या सख्या प्रियंवदा आणि अनसूया, त्याचप्रमाणें मालविका, उर्वशी, मेघदूतांतील यक्षपत्नीप्रभृति स्त्रिया सुशिक्षित, म्हणजे लिहिणाऱ्यावाचणाऱ्या, चित्रकला, गायन इत्यादि कला जाणणाऱ्या अशा दाखविल्या आहेत. कालिदासानें वाल्मीकीच्या आश्रमांतील मुलींना 'उदारवाचः' (र. १४, ७७), म्हणून त्यांच्या सुशिक्षणाचा परिणाम सुचविला आहे.

स्त्रियांना विवाह हा सामान्यतः अवश्य होता, असें कालिदास दर्शवितो. " अर्थो हि कन्या परकीय एव। " (शा. ४, २२), किंवा "इमे अपि प्रदेये।" (शा. ४, १८), यावरून हा अभिप्राय उघड होतो. पण स्त्रियांनीं जन्मभर अविवाहित राहणें ही गोष्ट त्याला अगदींच अपरिचित होती असें नाहीं.

दुष्यन्तानें शकुन्तलेविषयीं तिच्या मैत्रिणींपाशीं चौकशी करतांना "ही लग्न होईपर्यंतच तपस्वी वृत्तीनें राहणार कीं, जन्मभर अविवाहित राहणार?" (शा. १,२२), असा प्रश्न विचारिला. शाकुन्तलांतील गौतमीआत्या ही अविवाहित प्रौढ स्त्री दिसते.

मुलींचें उपवर वय म्हणजे आपल्याला अनुरूप वर पसंत करण्याइतकें प्रौढ वय, असा कालिदासाचा अभिप्राय स्पष्ट दिसतो. पण मुलींच्या पसंतीला मातापित्यांची संमति पाहिजे, असें शंकर-पार्वतींच्या संबंधांत दिसून येतें. हिमालयाची संमति घेऊन मग तो विवाह झाला, असें कालिदासानें वर्णिलें आहे. "अष्टवर्षा भवेत्कन्या" या वचनांत जो अर्थ आहे असें म्हणतात, त्याचा संबंध स्त्रियांच्या लग्नाच्या बाबतींत कालिदास कोठेंहि दाखवीत नाहीं. विशेषतः "थोर मनाची कन्या उपवर झाली असतांहि जशी पित्याच्या अनुज्ञेची इच्छा करिते, तशी राज्यश्रीहि रघुराजाच्या अनुज्ञेची वाट पाहूं लागली",* या उपमेंत कालिदासानें कन्याविवाहाच्या वयाची मर्यादा सांगितलेली दिसते.

स्त्रियांना कुटुंबांत व समाजांत बहुमानाचें स्थान असल्याचें कालिदास दाखवितो. पण ही मान्यता सहानुभूतीची किंवा प्रेमोद्भव होती; म्हणजे, पुरुष सहृदय व प्रेमळ असतील तर ठीक, नाहींतर स्त्रियांना कोणी वाल नाहीं, असें चित्र कालिदासानें शाकुन्तलांत प्रत्यादिष्ट शकुन्तलेच्या रूपानें चितारलें असून तें तत्कालीन व बहुतेक आजच्याहि स्त्रीसमाजाचें यथार्थ स्वरूप दाखवितें. पति किंवा दुसरे बांधव यांच्या सहानुभूतीच्या किंवा प्रेमाच्या अभावीं स्त्रियांची स्थिति कशी असहाय होती व आहे, हें त्यावरून चांगलें दिसून येतें. एक स्त्री जिवंत असतांना व तिला बाजूला सारण्यासारखें कांहीं कारण नसतांहि पुरुषानें आणखी स्त्रिया कराव्या आणि मागील स्त्रियांनीं मनांत चुरमुरे खात राहावें अशी स्थिति होती; व शाकुन्तलांतील

---

* "श्रीः साभिलाषापि गुरोरनुज्ञां धीरेव कन्या पितुराचकांक्ष।" र. ५,३८

" अभिनवमधुलोलुपो भवांस्तथा परिचुम्ब्य चूतमञ्जरीम्। कमलवसतिमात्रनिर्वृतो मधुकर विस्मृतोऽस्येनां कथम्॥ " (शा. ५,१), या हंसपदिका राणीच्या तोंडीं घातलेल्या श्लोकांत प्रस्तुत स्थिति कालिदासानें चांगली रेखाटली आहे. स्त्रियांची धर्मशास्त्रदृष्ट्या कुटुंबांतील व समाजांतील स्थिति " सतीमपि ज्ञातिकुलैकसंश्रयां जनोऽन्यथा भर्तृमतीं विशंकते। अतः समीपे परिणेतुरिष्यते प्रियाप्रिया वा प्रमदा स्वबन्धुभिः॥ " (शा. ५,१७) व " उपपन्ना हि दारेषु प्रभुता सर्वतोमुखी। " (शा. ५, २६) या वचनांवरून स्पष्ट होते; म्हणजे पुरुषांच्या मानानें स्त्रियांची स्थिति अगदीं गौणपणाची होती.

पतिमरणानंतर स्त्रियांनीं सती जाण्याच्या रूढीचा निर्देश कालिदासानें केला आहे. रामाचा पुत्र कुश युद्धांत मारिला गेला तेव्हां त्याची स्त्री कुमुद्वती सती गेली असें वर्णन आहे (र. १७, ६). मदनदहनानंतर शोकदग्ध रति सती जात होती; पण मदन पुनः जिवंत होणार, या आकाशवाणीच्या अभिवचनामुळें ती थांबली (कु. ४, ४५). दशरथाच्या स्त्रिया सती गेल्या नाहींत व अग्निवर्णाच्या अकालिक मृत्यूनंतर तर त्याच्या राणीनें गर्भस्थ पुत्राच्या नांवानें अमात्यांच्या साह्यानें राज्यहि चालविलें (र. १९, ५७).

स्त्रीवर्गामध्यें कित्येकप्रकारचीं व्रतवैकल्यें असत असें आढळतें. शकुन्तलेचें सौभाग्यदेवतार्चन (आजची मंगलागौर ?), धारिणीचें पुत्रकल्याणार्थ व्रत, औशीनरीचें प्रियप्रसादनव्रत इत्यादिकांचा याविषयीं निर्देश करण्यासारखा आहे. कालिदासकालीं विवाहित स्त्रिया ' अवगुंठन ' म्हणजे तोंड झांकणारें वस्त्र वापरीत असें दिसतें. शकुन्तला आश्रमांत वृक्षलतांना पाणी घालीत असतां मोकळी होती; पण विवाहानंतर दुष्यन्ताकडे आली ती अवगुण्ठन घेऊन आली होती (शा. ५, १३).

स्त्रियांच्या बाबतींत आणखी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. सांप्रत विवाहानंतर मुलीचें नांव सासरीं कांहीं निराळें ठेवितात व तत्प्रीत्यर्थ एक लहानसा विधीहि होतो. परंतु कालिदासकालीं तसा प्रकार नव्हता. मुलींचें

माहेरचें नांव एक व विवाहोत्तर सासरचें दुसरें कांहीं, असा प्रकार कोणत्याच प्रसंगीं दिसत नाहीं. पार्वती, वैदेही, जानकी, इन्दुमती, हीं सर्व नांवें माहेराहूनच आलेलीं होतीं व तींच सर्वत्र पुढें चाललीं. परंतु आज मात्र प्रकार असा आहे कीं, पार्वती, जानकी इत्यादि कित्येक स्पष्ट पैतृक नांवें सासरचीं म्हणून राखून ठेविलेलीं आहेत, तीं प्रथम आपल्या मुलींना कोणी ठेवीत नाहींत.

समाजाचें धोरण

समाजनियंत्रणाचें कार्य राजसत्तेकडे असतें व तसेंच कालिदासाचें प्रतिपादन आहे, हें पूर्वी दाखविलेंच आहे. हें आपलें कार्य राजसत्ता ज्या अनेक साधनांनीं करीत असते त्यांतील दंड हें मुख्य साधन खरें; तथापि त्या दंडावर सर्वस्वीं अवलंबून कोणाला राहणें शक्य नसतें. एकप्रकारच्या विशिष्ट विचारसरणीचें व तदनुसार सर्वसामान्य माणसांना लहानापासून वागावयास लावण्याचें वळण देणें, हेंहि यासंबंधीं बरेंच महत्त्वाचें साधन आहे. या साधनांत धर्म व नीति यांविषयींच्या कल्पनांचा प्रसार आणि शिक्षणसंस्था यांचा अंतर्भाव होतो. या गोष्टी राजसत्तेच्या साह्यानें ब्राह्मणवर्ग चालवीत असे. राजसत्तेचीं कर्तव्यें कालिदासानें " प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणादपि। स पिता पितरस्तासाम् केवलं जन्महेतवः ॥ " (र. १, २४), या दिलीपाच्या वर्णनांत उत्तम रीतीनें सांगितलीं आहेत. धार्मिक आचरणाचे आदर्श तयार करणें, देशांत दळणवळणाचीं साधनें उत्पन्न करून व तीं नीट राखून व्यापाराला साह्य करणें, ठराविक वळणाच्या बाहेर जाऊन समाजघातक असा अतिक्रम करणाऱ्यांस शिक्षा देणें इत्यादि गोष्टी या कर्तव्यांत येतात, आणि राजेलोक या गोष्टीकडे कमीअधिक प्रमाणांत लक्ष देत, असें कालिदासानें निरनिराळ्या प्रसंगांनीं दाखविलें आहे.

करमणुकीचीं साधनें

कालिदासानें वसंतोत्सवासारखे (शा. ६) उत्सव, नाटकप्रयोग, चित्रें, संगीत, शिकारीसारखे खेळ इत्यादि मनोविनोदनाचे प्रकार सांगितले आहेत.

उत्सवप्रसंगीं, सार्वजनिक ठिकाणीं, विवाहसमारंभानंतर किंवा इतरहि प्रसंगीं केवळ करमणुकीसाठीं म्हणून नाटकप्रयोग करीत असत. कालिदासाचीं नाटकें विद्वान् प्रेक्षकवर्गापुढें होत असत असें दिसतें. शाकुन्तलांत प्रेक्षकवर्गाला त्यानें 'अभिरूपभूयिष्ठा परिषद्' म्हणजे, जींत बहुतेक मंडळीं विद्वान् आहेत अशी सभा म्हटलें आहे. राजवाड्यास चित्रशाला व संगीतशाला अशीं दोन कलाविषयक करमणुकीचीं स्थानें बहुधा जोडलेलीं असत. राजेदेखील या कलांचा अभ्यास करीत. कालिदासाचा दुष्यन्त व पुरूरवा हे चित्रकार होते व अग्निवर्ण राजा स्वतः गायनवादन करीत असे. धार्मिक प्रवचनांचाहि उल्लेख कालिदास करितो. दुष्यन्त मारीचाश्रमांत गेला तेव्हां मारीच मुनि इतर ऋषि-स्त्रियांसमवेत अदितीला पतिव्रताधर्मावर व्याख्यान देत होता. इतर खेळ वगैरेचा उल्लेख कालिदास करीत नाहीं; पण गोष्टी सांगण्याच्या पद्धतीचा निर्देश तो करितो.*

ऐषआरामाचे प्रकार

विवाहादि समारंभप्रसंगी मिरवणुकी (र. ७ व कु. ७) काढण्याचा प्रचार कालिदासानें सांगितला आहे. त्या प्रसंगीं समारंभाच्या नायकावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या घरांतील अविवाहित मुली लाह्या फेंकीत (र. २, १०). ऋतुसंहारांत ग्रीष्मऋतूचें वर्णन करतांना विलासाचे प्रकार कालिदासानें वर्णिले आहेत. संगमरवरी दगडांच्या गार फरशा, तलम रेशमी वस्त्रें, वाळ्याचे पंखे, जलयंत्र-मंदिरें, चंदनादि उट्या, जलक्रीडा इत्यादिकांचे उल्लेख तो करितो. रघुवंशांत (१६, ४९) व मेघदूतांतहि 'यंत्रधारागृह' म्हणजे टाकींतून येणाऱ्या पाण्याच्या फवाऱ्यांत स्नान करण्याची जागा त्यानें सांगितली आहे (१, ६३). पण्य स्त्रिया म्हणजे वेश्या यांचाहि उल्लेख तो करितो. उज्जयिनीच्या वर्णनांत, तसेंच पुढें अलकेच्या वर्णनांत कालिदासानें श्रीमंत लोकांच्या व त्यांच्या स्त्रियांच्या विलासांचे बरेच प्रकार वर्णिले आहेत.

---

* "उदयनकथाकोविदग्रामवृद्धान्"-मे. १, ३०

स्त्रियांच्या भूषणांपैकीं नूपुर, मेखला, रसना किंवा काञ्ची, हिऱ्या-मोत्यांचे हार, कर्णकुंडलें, बाहुवलयें, कंकणें इत्यादि भूषणें, दुकूलें, कौशेयें (रेशमी लुगडीं), कूर्मासक (चोळी) इत्यादि वस्त्रें, व डोकींतील फुलें, अभ्यंजन (काजळ), कुंकुमतिलक, लाक्षारसानें पाय रंगविणें इत्यादि गोष्टी या काळींहि प्रचारांत होत्या. आश्रमांतील ऋषिकन्या व ऋषिपत्न्या यांचीं वस्त्रें म्हणजे वल्कलें आणि अलंकार म्हणजे विविध फुलें, दूर्वा वगैरे होतीं.

नगररचनेची कालिदासाची कल्पना अयोध्या (र. सर्ग १६), उज्जयिनी व अलका ('मेघदूत') या नगरींच्या वर्णनांवरून कळून येते. प्रशस्त रस्ते, अनेकमजली वाडे, त्यांवरील लाकडाचें आणि दगडाचें कोरीव काम, मनोहर उद्यानें, मयूरादि क्रीडापक्षी इत्यादि गोष्टी त्यांत दिसून येतात; व त्यांवरून त्या त्या गोष्टी सिद्ध करणारे शिल्पी म्हणजे गवंडी, पाथरवट, चित्रकार, सोनार, सुतार इत्यादि कारागिरांचा व त्यांच्या उच्च कारागिरीचा बोध होतो. रस्त्याच्या बाजूला कढया मांडून फराळाचें सामान विकण्याच्या पद्धतीचाहि कालिदासानें मालविकाग्निमित्रांत ('विपणिकन्दुः' २, १४) निर्देश केलेला आढळतो. वैद्यशास्त्राची चांगली प्रगति त्या काळांत झालेली असून त्याच्या विशिष्ट शाखा बनल्या होत्या; व तदनुसार विषवैद्य (मा. ४), गर्भवैद्य (र. ३, १२) असे भेद कालिदासानें सांगितले आहेत.

ग्रहांचीं इष्टानिष्ट फलें, अदृश्य होण्याची विद्या ('तिरस्करिणी', शा. ६), आकाशवाणी, शाप व वर यांचें सत्यत्व, मंत्र, तोडगे, इत्यादि काल्पनिक गोष्टींवरील विश्वास लोकांत तेव्हां होता असेंहि दिसतें. पूज्य वस्तु किंवा व्यक्ति यांच्याजवळून जातांना प्रदक्षिणा करून जाणें (शा. ४, र. १, इ.), बाहेर कामाला जातांना ब्रह्मदेवाची पूजा करणें (र. १), एखाद्या मोठ्या व्यक्तीला भेटावयास जातांना कांहीं भेट म्हणून हातांतून नेणें (मा० ३) इत्यादि चालीरितींचाहि उल्लेख कालिदासानें केला आहे.

त्रि. ५५१

प्रकरण सातवें

कालिदासीय जीवितादर्श व तत्त्वज्ञान

कालिदासाचा काळ हा भारतीय आर्यांच्या इतिहासांतील नाना कला, विविध विद्या, अनेक दर्शनें, शास्त्रें इत्यादिकांचा उत्कर्षकाळ होय; व तदनुसार त्या काळच्या सर्वांगीण परिणतीचें प्रतिबिंब त्याच्या काव्यनाटकांत पडलेलें चांगलें दिसून येतें. प्राचीन वैदिक कर्मकांड व ज्ञानकांड यांविरुद्ध झालेली प्रतिक्रिया जशी बौद्ध आणि जैन या धर्मपंथांत आढळून येते, तशी त्या पंथांविरुद्ध झालेली प्रतिक्रिया त्या काळांतील वाङ्मयांत दिसून येते. हे पंथ तत्त्वज्ञानदृष्ट्या निराशावादी आहेत, तर कालिदासाच्या वाङ्मयाचें धोरण आशावादी आहे. आशावाद हाच कालिदासाच्या दृष्टीनें जीविताचा आदर्श होय; आणि त्याचा उठाव दिसून येईल अशीच तत्त्वज्ञानाची भूमिका त्यानें मांडलेली आढळते.

कालिदासाचें चरित्र प्रत्यक्ष प्रमाणांवरून माहीत झालेलें असें मुळींच नसल्यामुळें त्याच्या जीवितांतील ध्येयासंबंधीं मुद्दां त्याच्या ग्रंथांतील अंतः-प्रमाणांवरूनच शक्य तीं अनुमानें काढलीं पाहिजेत, हें उघड आहे. अशीं अंतःप्रमाणें नाटकापेक्षां काव्यांतच अधिक मिळूं शकतात. कारण, नाटकांतील पात्रें कांहीं झालें तरी त्या त्या भूमिकेवरून बोलत असल्यामुळें कवीचे स्वतःचे विचार त्याच्या सगळ्या भाषणांत ग्रथित झालेले असणें अशक्य आहे. यांतहि मुख्य नायक आणि त्याच्या पदवीचींच दुसरीं पात्रें यांच्या द्वारा कवीचें हृदय थोडेंबहुत जाणतां येईल. पण तें काव्यांत अधिक दृष्टीस पडेल. कारण, काव्यांत कवि स्वतःचें म्हणून पुष्कळसें बोलणें करीत असतो. काव्यांतील दृष्टान्त, अर्थान्तरन्यास, सुभाषितसदृश सामान्य विचार हीं स्थानें विशेषतः कवीचें हृद्गत दाखविणारीं होत. या दृष्टीनें पाहतां ‘ ऋतुसंहार ’,

' मेघदूत ' व ' रघुवंश ' यांतील सामान्य उद्गारांवरून त्याच्या जीवितादर्शाची कल्पना स्थूल मानानें करतां येण्यासारखी आहे. ऋतुसंहाराच्या स्वरूपावरून पाहिल्यास हा कवि सामान्यतः विलासप्रिय असावा एवढें दिसतें. त्यानें निदाघाला म्हणजे उन्हाळ्याला शाकुन्तलांत 'उपभोगक्षम' (१, ३) म्हटलें असून त्याचाच अनुवाद ऋतुसंहारांतहि पुष्कळ प्रकारांनीं केला आहे.* वर्षाकालाला तो ' कामिजनप्रिय ' (ऋ. २, १) म्हणतो, तर शरदृतूचें " प्राप्ता शरन्नववधूरिव रूपरम्या। "(३, १) अशा शब्दांनीं अभिनंदन करितो. शिशिराला पुनः ' प्रमदाजनप्रिय ' (५, १) असें विशेषण तो लावितो आणि वसंतासंबंधानें तर " सर्वं प्रिये चारुतरं वसन्ते। " (६, २) असे उद्गार काढून आपला तत्संबंधींचा अभिप्राय व्यक्त करितो. थोडक्यांत सांगावयाचें तर सर्व ऋतूंकडे तो या विलासी दृष्टीनें पाहतो. परंतु त्याची ही दृष्टि सर्वस्वीं एकांडेपणाची नाहीं. सुखविलासाबरोबर दुसरी दुःखदायक बाजूहि दाखवून तो तिचा विसर पडूं देत नाहीं. उन्हाळ्यांतील वणवे, वर्षाकालांतील विरही कामिजनांची स्थिति इत्यादिकांचाहि तो निर्देश करून जग हें सुखदुःखात्मक आहे, पण त्यांतून सुख काढून घेण्याचा शक्य तो प्रयत्न करावा व समाधान मानावें, असेंच जणूं तो दर्शवितो. सुखदुःखांचें चक्र जगांत फिरतें आहे, केव्हां कोणाला एक मिळेल, तर दुसऱ्याला दुसरें मिळेल, नित्य सुखी किंवा नित्य दुःखी असें कोणी नसतें, असा त्याविषयीं त्याचा अभिप्राय असून " कस्यैकान्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा। नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण॥" (मे. २, ४९) या वचनांत तो ग्रथित केलेला आहे. दुःखाचे दिवस आले तर ते जाऊन सुखाचेहि येतील, अशी त्याची विचारसरणि असून यक्षानें आपल्या पत्नीला पाठविलेल्या संदेशांत ती आढळून येते. " तत्कल्याणि त्वमपि नितरां मागमः कातरत्वम् । " (मे. २, ४९), " मासानन्यान्गमय चतुरो लोचने मीलयित्वा ॥ पश्चादावां विरहगुणितं तं

*" जनस्य चित्तं क्रियते समन्मथम् । " (ऋ १, ५), " प्रकुर्वते कस्य मनो न सोत्सुकम् । " (१, ६), इ०

तमेवाभिलाषम्। निर्वेक्ष्यावः परिणतशरच्चंद्रिकासु क्षपासु ॥" (मे. २, ५०), असें म्हणून तो पत्नीला धीर देतो आणि पुढें येणाऱ्या चांगल्या दिवसांकडे लक्ष ठेवण्यास सांगतो.

कालिदासाच्या व्यावहारिक कल्पना उज्ज्वल नीतिमत्तेच्या आहेत. श्रेष्ठ पुरुष आपल्या संपत्तीचा विनियोग दुःखितांचें दुःख दूर करण्याकडेच करितात, "आपन्नार्तिप्रशमनफलाः संपदो ह्युत्तमानाम्।" (मे. १,५५), "आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि।" (शा. १,११) म्हणजे, "तुमचें शस्त्र दुःखितांचें रक्षण करण्यासाठीं असून निरपराध्यावर प्रहार करण्यासाठीं नाहीं" इत्यादि वचनांत त्यानें परोपकारित्वाचें स्वरूप सांगितलें आहे. सामान्यतः स्त्रीवर्गाविषयीं पुरुषांची वृत्ति कशी असावी यासंबंधीं "अनिर्वर्णनीयं परकलत्रम्।" (शा. ५), म्हणजे, "परस्त्रीसंबंधानें चिकित्सा करूं नये", या शब्दांनीं त्यानें आपला अभिप्राय व्यक्त केला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. काम हा पुरुषार्थ आहे आणि भगवद्गीतेंत* सांगितल्याप्रमाणें तो धर्मानुकूल असावा, ही गोष्ट त्यानें "अप्यर्थकामौ तस्यास्तां धर्म एव मनीषिणः।" (र. १,२५), या दिलीपाच्या वर्णनांत सांगितली आहे.

धर्माचें ध्येय 'अभ्युदय' आणि 'निःश्रेयस्' म्हणजे ऐहिक उत्कर्ष आणि पारलौकिक आत्यंतिक सुख हें असल्यामुळें त्यांत अविरोध असला पाहिजे, म्हणजे अर्थ आणि काम ह्या मानवी प्रवृत्ति धर्माच्या पायावर उभारलेल्या असल्या पाहिजेत, असें तो सुचवितो. सुखसाधनें म्हणजे अर्थ व त्या साधनांचा अवश्य तो उपभोग म्हणजे काम. या दोन्ही गोष्टी पुरुषार्थांतच मोडतात; पण पुरुषार्थ म्हणजे तेवढाच नव्हे, त्याच्या जोडीला धर्म घातला म्हणजेच खऱ्या सुखाची जोड होते, ही गोष्ट कालिदासानें अनेक प्रसंगीं दर्शविली आहे. दिलीपाच्या वर्णनांत तो म्हणतो, "अनाकृष्टस्य विषयैर्विद्यानां पारदृश्वनः। तस्य धर्मरतेरासीद्वृद्धत्वं जरसा विना।" (र. १, २३). अर्थात्

* "धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ।" भ. गी. ७, ११

"दिलीप विषयभोग घेत असला तरी त्याच्या आहारीं तो जात नसे. विद्यांचें आलोडन त्यानें केलें होतें आणि तो अत्यंत कर्तव्यदक्ष होता; त्यामुळें वयानें वृद्ध होण्यापूर्वीच तो ज्ञानवृद्ध झाला होता." तसेंच "असक्तः सुखमन्वभूत्।" (र. १, २१) म्हणजे, " आसक्ति न ठेवितां तो सुखाचा उपभोग घेई." सारांश, राजा कसा असावा हें सांगतांना त्यानें दिलीपवर्णनाच्या रूपानें आदर्शभूत जीवितक्रमाचेंहि चित्र रेखाटलें आहे. " शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्। " (कु. ५, ३३), "शरीर हेंच धर्माचें मुख्य साधन होय", या शब्दांनीं त्यानें जीवितक्रमांतील शरीराचें महत्त्व जसें सांगितलें आहे, तसें आदर्शभूत पुरुष प्रसंगविशेषीं शरीरावर तुळशीपत्र ठेवितो; कारण, कांहीं झालें तरी हें भौतिक शरीर नाशवंत असून उज्ज्वल यश ही वस्तु चिरकाल टिकणारी असल्यामुळें तिचीच तो अधिक काळजी करितो, ही गोष्टहि "एकान्तविध्वंसिषु मद्विधानां पिण्डेष्वनास्था किल भौतिकेषु।" (र. २, ५७), म्हणजे, " माझ्यासारख्यांना नश्वर अशा स्थूल शरीराविषयीं तादृश आस्था वाटत नाहीं," असे शब्द दिलीपाच्या तोंडीं घालून त्यानें नमूद केली आहे. थोडक्यांत सांगावयाचें तर दिलीपाच्या वर्णनांत कालिदासानें आदर्शभूत पुरुष दाखविण्याचा प्रत्यन केलेला दिसून येतो. उत्तम कमावलेलें शरीर, विद्याध्ययन, शरीराची सामान्यपणें चांगली निगा राखून परोपकारार्थ तें सिद्ध ठेवणें व प्रसंग पडल्यास त्यावर उदक सोडण्यास मुळींच कांकूं न करणें, कोणाशीं निष्कारण द्वेष किंवा लघळपणा न करतां करारी बाण्यानें वागणें, सुखोपभोग त्याज्य न मानतां त्यांचा उचित तोच उपयोग करणें, कर्तव्य करावयाचें तें भीतीनें न करतां अवश्य म्हणून करणें, इत्यादि गोष्टी या प्रसंगानें आदर्शभूत म्हणून त्यानें सांगितल्या आहेत. अतिथि राजाच्या वर्णनांतहि अशाच कांहीं गोष्टी आल्या आहेत. नित्य प्रसन्नमुख राहून कोणाशीं बोलणें तें स्मितपूर्वक बोलून त्याचा विश्वास संपादन करणें (र. १७, ३१), दिलेलें वचन मिथ्या न करणें (१७, ४२), मनोविकारांचें नियमन करणें, केवळ मऊपणा किंवा केवळ कठोरपणा यांचा अवलंब न करणें (१७, ४७), वाम मार्गाचा

स्वीकार कधीं न करणें, कार्य हातीं घेतांनाच त्याच्या शक्याशक्यतेचा नीट विचार करणें (१७, ५६), "द्रव्येण सर्वे वशाः।" हें तत्त्व लक्षांत ठेवून योग्य मार्गानें अर्थसंचय करणें (१७, ६०)– तात्पर्य, धर्म, अर्थ आणि काम यांची उत्तम जुळणी करून चालणें (१७, ५७), असा आदर्श अतिथि-वर्णनांत मांडलेला असून पूर्वींच्या दिलीपवर्णनाची ती पुरवणीच आहे.

कालिदासानें समाजव्यवस्थेची किल्ली वर्णाश्रमरचनेंत दाखविली असून त्यासंबंधींचें विवेचन मागील प्रकरणांत केलेंच आहे. वर्णव्यवस्थेंत एक-प्रकारच्या सहकारी तत्त्वाचा पुरस्कार केलेला असून कालिदासानें कित्येक ठिकाणीं त्याचें स्पष्टीकरण केलेलें आढळतें. "पवनाग्निसमागमो ह्ययं सहितं ब्रह्म यदस्त्रतेजसा।" (र. ८, ४), म्हणजे, "ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा संयोग होईल तर तो सामर्थ्यानें वायु व अग्नि यांचाच जणूं संयोग होय," असे उद्गार त्यानें अजाच्या वर्णनांत काढिले असून अतिथिवर्णनांत "वसिष्ठस्य गुरोर्मंत्राः सायकास्तस्य धन्विनः। किं तत्साध्यं यदुभये साधयेयुर्न सङ्गताः॥" (र. १७, ३८), म्हणजे, "वसिष्ठ ऋषीचे मंत्र आणि धनुर्धर अतिथीचे बाण या दोहोंचा संयोग झाल्यावर कोणती गोष्ट असाध्य राहील?" असा त्याचा अनुवाद केला आहे.

आश्रमव्यवस्था ही मानवी जीविताची आदर्शभूत जुळणी आहे, असें कालिदासानें रघुवंशीय राजांच्या वर्णनांत ठिकठिकाणीं सुचविलें आहे. प्रास्ताविक वर्णनांत "शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम्। वार्द्धके मुनि-वृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम्॥" (र. १,८), अशी जीविताच्या चार भागांत चार आश्रमांची मांडणी स्मृतींनीं केल्याप्रमाणेंच त्यानें केली असून पुढें "न हि सति कुलधुर्ये सूर्यवंश्या गृहाय॥" (र. ७, ७१), म्हणजे, "पुत्र कुलाचा भार उचलण्यास समर्थ असा झाल्यावर सूर्यवंशीय राजे गृहाचा त्याग करीत," असें रघुराजाच्या वानप्रस्थाश्रमाच्या प्रसंगानें म्हटलें आहे. शाकुन्तलांत* दुष्यन्ताच्या तोंडीं असेच शब्द घातले आहेत. या आश्रमांपैकीं गृहस्थाश्रमाला

* "अस्त्येतत्पौरवाणामन्त्यं कुलव्रतम्। 'भवनेषु रसाधिकेषु पूर्वं इ.' ॥" ७,२०

कालिदास विशेष महत्त्व देतो. गृहस्थाश्रम हा सर्वांवर उपकार करण्यास समर्थ आहे. 'सर्वोपकारक्षम' (र. ५, १०) अशी त्याची योग्यता असल्यानें सप्तर्षींसारखे थोर पुरुष शंकरानें गृहस्थाश्रमी होण्याचा निश्चय केल्यामुळें आनंदित झाले. अशा पुरुषांनीं विवाहित होणें ही गोष्ट कित्येकांना लज्जावह वाटत होती. परंतु प्रत्यक्ष शंकराचें उदाहरण पाहून सप्तर्षींसारखे प्रजापति निर्धास्त झाले व आपल्या वैवाहिकत्वाविषयीं लाज बाळगण्याचें कारण त्यांना उरलें नाहीं. "तस्मिन्संयमिनामाद्ये जाते परिणयोन्मुखे। जहुः परिग्रहव्रीडां प्राजापत्यास्तपस्विनः ॥" (कु. ६,३४). संन्यासी पंथाचा कडेलोट होऊन प्रतिक्रिया चालू होण्याच्या प्रसंगींचा हा विचार दिसतो. तपश्चर्या, वैराग्य, अनासक्ति आणि गृहस्थाश्रम यांचें परस्पर वांकडें नसून त्यांचा उत्कृष्ट मिलाफ होऊं शकतो, हें कालिदासाला दाखवावयाचें होतें असें दिसतें. शाकुन्तलाच्या सातव्या अंकांतील प्रजापति मारीचाच्या वर्णनांत हाच आशय त्यानें व्यक्त केलेला आढळतो. मारीचाश्रमांतील मुनींना काय कमी होतें? इच्छित वस्तु देणारे कल्पवृक्ष इतस्ततः पसरलेले, सुवर्णकणांनीं मिश्रित असें भरपूर उदक, बसावयाला रत्नांच्या शिला आणि सेवेला अप्सरा! पण त्या आश्रमांत तपस्वी मुनि वायुभक्षण करीत सुवर्णजलानें विधिपूर्वक स्नानच उरकीत, रत्नशिलांवर बसून ईश्वरध्यान करीत, आणि अप्सरांच्या सन्निध राहूनसुद्धां इन्द्रियांचें नियमन करीत; म्हणजे, ज्यासाठीं इतरांची जन्मभर धडपड चालते, त्या सर्व वस्तु आयत्या सिद्ध असतां हे मुनि त्यांकडे ढुंकूनहि न पाहतां तपश्चर्या करीत! अर्थात् या केवळ शरीरसुख देणाऱ्या वस्तूंहून श्रेष्ठ अशा कशासाठीं तरी त्यांचा यत्न चाललेला होता; आणि थोरपणाचें हेंच लक्षण होय. "उत्सर्पिणी खलु महतां प्रार्थना।" (शा. ७, १३), थोरांची इच्छाहि थोरच असणार! मारीच प्रजापति गृहस्थाश्रमी होता हें सांगावयास नकोच. सर्व सृष्टीचाच तो जनक. महर्षींच्या पत्न्यांसमवेत बसलेल्या स्वपत्नी अदितीला पतिव्रताधर्माचा उपदेश करून तिच्या द्वारा सर्व स्त्रीवर्गाला तो पोंचावा, अशा उच्च

वातावरणांत शकुन्तलेचीं कित्येक वर्षे गेल्यामुळें तिला आदर्शभूत गृहिणीत्व प्राप्त झालें, आणि " यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः । " (शा. ४, १८), या कण्वाच्या उपदेशांत ध्वनित केल्याप्रमाणें वाटणाऱ्या भीतिपासून कण्वाची मुक्तता झाली. स्त्रीपुरुषांच्या जीविताचा असा हा आदर्श कालिदासानें पुढें ठेविला आहे.

या बाबतींत कालिदासानें आणखी एक गोष्ट सुचविलेली दिसते. ती म्हणजे तडजोडीचें धोरण हीं होय. " असंशयं क्षत्रपरिग्रहक्षमा यदार्यमस्यामभिलाषि मे मनः । " (शा. १, १९), असा तर्क लढवून आपल्या धोरणाचें समर्थन करण्याइतका आत्मविश्वास बाळगणारा दुष्यन्त शकुन्तलेचा प्रत्यादेशपूर्वक त्याग करावयास सिद्ध झाला असतां, अकल्पित अडचणींत सांपडलेल्या शकुन्तलेकडे पाहून द्रवला नाहीं; तथापि अशाहि स्थितींत पुरोहितानें काढिलेल्या तोडीस त्यानें मान्यता दिली व शकुन्तला प्रसूत होऊन तिला होणाऱ्या पुत्राच्या ठिकाणीं चक्रवर्तिचिन्हें दिसल्यास तिचा स्वीकार करावयास तो सिद्ध झाला. तडजोडीच्या दृष्टीनें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. कारण, ही तडजोड जशी शकुन्तलेला अपमानास्पद होती, तशी त्याला स्वतःलाहि होती; पण सन्मान्य पुरोहिताच्या वचनाचा धिक्कार करण्याऐवजीं त्यानें ती मान्य केली, असा त्याचा थोरपणा कालिदासानें दाखविला आहे. तडजोडीचे असेच आणखी एकदोन प्रश्न कालिदासानें चितारून आपला याविषयींचा अभिप्राय स्पष्ट केला आहे. एक प्रसंग सिंह आणि दिलीप यांमधील (र. २) व दुसरा रघु आणि इंद्र यांमधील (र. ३). सिंह आपलाच हेका न चालवितां गाईला सोडून राजाच्या शरीरानें पारणा करण्यास सिद्ध झाला. वस्तुतः त्याला तसें करण्यास भाग पाडण्याचें सामर्थ्य राजामध्यें नव्हतें. पण या प्रसंगीं सिंहानें आपलें तत्त्व सोडूनहि तडजोडीसाठीं राजाचें म्हणणें मान्य केलें. रघु आणि इन्द्र यांच्यामधील लढ्यांतहि रघु शक्याशक्यतेच विचार करून मिळेल तेवढें घेऊन तडजोडीला तयार झाला. या प्रसंगीं त्याला थोडासा अपमानहि सोसावा लागला; कारण, त्याचा घोडा परत देण्याचें

इन्द्रानें साफ नाकारिलें. अशा स्थितींत त्यांतल्या त्यांत सन्मान्य तडजोड करून घोडा नाहीं तर नाहीं, पण अश्वमेधाचें फळ मिळणार एवढें तरी बरें, म्हणजे सगळा तपशील मिळाला नाहीं तरी तत्त्व मिळालें, असें समजण्यास रघु तयार झाला. अतिथीच्या वर्णनांत शक्याशक्य पाहून कार्य हातीं घेण्याचें जें तत्त्व " परात्मनोः परिच्छिद्य शक्त्यादीनां बलाबलम् । ययावेभिर्बलिष्ठश्चेत्परस्मादास्त सोऽन्यथा ॥ " (र. १७, ५९), या शब्दांनीं सांगितलें, त्याचें रघूची कृति हें उदाहरणच होय. तात्पर्य, कालिदासाच्या दृष्टीनें कोणत्याहि टोंकाला जाणें हें आदर्शभूत वर्तन नसून सारासारविचारपूर्वक मधला मार्ग स्वीकारणें हेंच आदर्शभूत आचरण होय. दृष्टि मुख्यतः कार्याकडे ठेविली पाहिजे; कारण, "कातर्यं केवला नीतिः क्रौर्यं श्वापदचेष्टितम् ।", म्हणजे, "केवळ नमून वागणें हें जसें भ्याडपणाचें लक्षण, तसें उठल्यासुटल्या दणगटपणा दाखविणें हेंहि पशूचेंच वर्तन होय." म्हणून, अतिथीसारखा सुज्ञ पुरुष " सिद्धिं समेताभ्यामुभाभ्यामन्वियेष । " (र. १७, ४७), म्हणजे, प्रसंग पाहून दोहोंच्या जोडगोळीनें आपलें कार्य साधितो, असें कालिदास ध्वनित करितो.

मानवी जीविताचें ध्येय ऐहिक व पारलौकिक असें द्विविध धरिल्यास पहिल्यांत धर्म, अर्थ आणि काम यांचा समावेश होतो. अभ्युदयसाधक धर्म म्हणजे या तिहींचा योग्य मिलाफ. ऐहिक जीविताचा हाच आदर्श होय. पण कालिदास आर्यसंस्कृतीला व तत्त्वज्ञानाला अनुसरून पारलौकिक जीवितहि मानितो. त्या जीविताचें ध्येय म्हणजे निःश्रेयस् अर्थात् आत्यंतिक सुख. हें आत्यंतिक सुख कर्मांचे बंध तोडल्यानें प्राप्त होतें, असेंच कालिदासाचें म्हणणें आहे.* ' महोदय ' म्हणजे ऐहिक अभ्युदय साधणारा धर्म आणि ' अपवर्ग ' म्हणजे मोक्ष किंवा निःश्रेयस् साधणारा धर्म हे दोन्ही स्वरूपतः भिन्न असले, तरी त्यांचा विरोध नसून ते पुत्र व पिता यांप्रमाणें संबद्ध आहेत, ही गोष्ट कालिदासानें अज व रघु या जोडीच्या वर्णनांत मोठ्या खुबीनें सुचविली आहे. त्यानें त्या दोघांविषयीं " अपवर्गमहोदयार्थयोर्भुवमंशाविव धर्मयोर्गतौ ॥ "

---

* " कर्मबन्धच्छिदं धर्मं भवस्येव मुमुक्षवः ॥ " कु. २,५१

(र. ८,१६), म्हणजे, “रघु व अज हे अनुक्रमें मोक्षधर्म आणि अभ्युदयधर्म यांचे पृथ्वीवरील अवतारच होत”, असें म्हटलें असून आठव्या सर्गाच्या १६ पासून २३ पर्यंतच्या श्लोकांत दोघांचें उत्कृष्ट वर्णन समान्तर कल्पनांनीं केलें आहे.

अभ्युदय व निःश्रेयस् म्हणजेच ऐहिक व पारलौकिक सुख हें मानव-जीविताचें दुहेरी ध्येय साधण्यासाठीं चोखाळावयाचा जो मार्ग, त्याची उपपत्ति म्हणजे तत्त्वज्ञान हें कालिदासानें मुख्यतः ब्रह्मा, विष्णु व महेश या तिघांच्या स्तोत्रप्रसंगानें सांगितलें आहे. कुमारसंभवांतील दुसऱ्या सर्गांत देवांनीं ब्रह्मदेवाकडे जाऊन त्याचें स्तोत्र गाऊन त्याला विनविलें. तसेंच पुढें सहाव्या सर्गांत सप्तर्षींनीं शंकराची स्तुति केली व रघूच्या दहाव्या सर्गांत रावणाच्या त्रासांतून मुक्तता करावी, अशी प्रार्थना करण्यासाठीं विष्णूकडे जाऊन देवांनीं त्याचें स्तवन केलें. मुख्यतः या तीन ठिकाणीं, तसेंच रघु-वंशाच्या आठव्या सर्गांत वसिष्ठानें आपल्या शिष्यांबरोबर दुःखित अज-राजाला पाठविलेल्या संदेशांत, कालिदासाचीं तत्त्वज्ञानविषयक मतें आढळून येतात. ब्रह्मा, विष्णु आणि महेश हे तीन तत्त्वतः वेगळे नसून कार्यभेदानें मात्र त्यांना वेगळेपण येतें. सर्व विश्व त्यांच्यापासून उत्पन्न होतें, तेच त्याचें रक्षण करितात आणि त्यांच्यांतच तें शेवटीं लीन होतें. या तिहींचें तात्त्विक स्वरूप जो परमेश्वर तो कोणापासून उत्पन्न झालेला नसून तो स्वयंसिद्ध व अनादि आहे. प्रकृति व पुरुष हीं दोन्ही त्याचींच स्वरूपें होत. त्यानें प्रथम उदक उत्पन्न करून त्यांत बीज टाकिलें व तेणेंकरून चराचर सृष्टि उत्पन्न झाली. प्रथम त्याची मूर्ति भिन्न होऊन तिचे स्त्री व पुरुष असे दोन भाग झाले आणि मग त्यांपासून पुढील सृष्टि झाली. तो वस्तुतः जन्मरहित असून लोकांवर अनुग्रह करण्यासाठीं जन्म घेतो. दिसण्यांत परस्परविरोधीं अशीं द्वंद्वें त्याच्या ठिकाणीं एकवटलेलीं असतात. त्याच्या प्राप्तीचे उपाय आगम-भिन्नतेमुळें भिन्नसे वाटले, तरी गंगेचे विविध ओघ जसे एका समुद्रांतच मिळतात, तसे ते सर्व उपाय त्या एकाशींच जाऊन भिडतात. जे कोणी

त्याच्यावर चित्त ठेवून सर्व कर्मे त्यालाच अर्पण करितात, त्या वैराग्य-शीलांना त्याची प्राप्ति होते व ते पुनः भवचक्रांत सांपडत नाहींत. परमेश्वराचें स्वरूप, त्याचा व विश्वाचा संबंध, मानवी जीविताचें तदनुसार ध्येय व त्याच्या प्राप्तीचे उपाय यांविषयीं कालिदासाच्या विचाराचें सार अशा प्रकारचें आहे.

तत्त्वज्ञानविषयक विचारांतहि पुष्कळ वेळां लौकिक व पुराणकथा यांचें मिश्रण झालेलें असतें, त्यामुळें कित्येक ठिकाणीं त्यांचें निश्चित स्वरूप समजणें कठीण होतें. परंतु शुद्ध तत्त्वज्ञान आणि सांप्रदायिक तत्त्वज्ञान यांत असा भेद नेहमींच असतो. सांप्रदायिक तत्त्वज्ञानांत गृहीत गोष्टींचें मिश्रण तर्कसिद्ध तत्त्वांशीं केलेलें असतें. उदाहरणार्थ, ब्रह्मदेव, शंकर व विष्णु हे तीन एकाच अनादि परमेश्वराचीं रूपें जर आहेत, तर त्यांत भेद कसला? पण कालिदास उदारमतवादी झाला तरी संप्रदायाच्या छायेंतून सर्वस्वीं सुटलेला नाहीं. यास्तव त्या तिघांना तत्त्वतः एक* म्हणूनहि ब्रह्मदेव व विष्णु यांपेक्षां शंकराची थोरवी अधिक, असें तो प्रतिपादन करितोच. कुमारसंभवांतील देवकृत ब्रह्मस्तुतीला उत्तर देतांना ब्रह्मदेव म्हणतो, "त्या तारकासुराशीं युद्ध करून जय मिळविण्याला त्या नीललोहिताच्या पुत्राशिवाय कोण समर्थ आहे? तो नीललोहित देवच परमात्मा असून त्याच्या प्रभावाची कल्पना मला नाहीं आणि विष्णूलाहि नाहीं."‡ तारकासुराचा प्रभाव वर्णितांना देवांच्या तोंडींहि हाच आशय घातलेला आढळतो. "तारकासुरानें चंद्राला आपल्या सर्व कलांनिशीं प्रकाशून सदासर्वदा आपली सेवा करावयाला लाविलें आहे, शंकराच्या मस्तकावरील एक कला मात्र त्यानें वगळली आहे. अशा स्थितींत आमची सर्व जयाशा काय ती त्या विष्णूच्या सुदर्शनावर. पण त्या

* "एकैव मूर्तिर्बिभिदे त्रिधा सा।" कु. ७, ४४

‡ "संयुगे सांयुगीनं तमुद्यतं प्रसहेत कः। अंशादृते निषिक्तस्य नीललोहित-रेतसः॥ स हि देवः परं ज्योतिस्तमःपारे व्यवस्थितम्। परिच्छिन्नप्रभावर्द्धिर्न मया न च विष्णुना॥" कु. २, ५७–५८

सुदर्शनाची काय दशा? तें त्या असुराच्या गळ्यांत अलंकार होऊन बसलें आहे!" (कु. २, ३४, ४९). अशा रीतीनें कालिदासानें सामान्यतः उदार दृष्टि ठेवूनहि आपली शिवविषयक विशिष्ट भावना अनेक ठिकाणीं व्यक्त केली आहे. ही त्याची विशिष्ट भावना रघुवंशाच्या मंगलाचरणांत, नाटकांच्या नान्द्यांत व शाकुन्तलाच्या भरतवाक्यांत,* आणि विशेषतः "या नः प्रीतिर्विरूपाक्ष त्वदनुध्यानसंभवा। सा किमावेद्यते तुभ्यमन्तरात्मासि देहिनाम्॥" (कु. ६,२१), म्हणजे, "हे विरूपाक्षा, तुझें ध्यान करण्यांत जें प्रेम आम्हांला वाटतें, तें तुला आम्हीं सांगावयाला कशाला पाहिजे? तूं तर प्राण्यांचा अंतर्यामीच आहेस," या सप्तर्षींच्या तोंडीं घातलेल्या वचनांत ग्रथित झालेली आढळते. पण संप्रदायानुसार त्यानें प्रसंगीं शिवाला इतरांहून वर्चस्व दिलें असलें तरी एकंदरींत "बहुधाप्यागमैर्भिन्नाः पन्थानः सिद्धि-हेतवः। त्वय्येव निपतन्त्योघा जाह्नवीया इवार्णवे॥" (र. १०, २६), या वाक्यांत कालिदासाचें उदार मत चांगलें दिसून येतें यांत शंका नाहीं.

धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांच्या सुंदर मिलाफानें प्राप्त होणारा अभ्युदय हें ऐहिक जीविताचें ध्येय असलें, तरी अंतिम ध्येय मोक्ष म्हणजे जन्ममरणाचा फेरा चुकविणें हें होय, हें कालिदासानें अनेक ठिकाणीं दर्शविलें आहे. यज्ञादि कर्में करून मिळणारा स्वर्ग किंवा एखाद्या विशिष्ट पदवीचें सुख हा अभ्युदयाचाच भाग होय व मोक्ष हा स्वतंत्र आत्यंतिक सुखाचा ठेवा होय. 'अजन्मने'-जन्ममरणांतून सुटण्यासाठीं (र. १८, ३३), 'अदेह-बन्धाय'-देहबंधांतून मुक्त होण्यासाठीं (र. १८, ७) व "ममापि च क्षपयतु नीललोहितः पुनर्भवम्" (शा. ७, ३५), या शब्दांनीं तें ध्येय कालिदास सांगतो. हें ध्येय गांठण्याचे मार्ग योगधारणा,§ उपास्य देवतेवर श्रद्धा व

---

* "ममापि च क्षपयतु नीललोहितः पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभूः॥"
शा. ७, ३५

§ "तस्मात्स योगादधिगम्य योगमजन्मनेऽकल्पत जन्मभीरुः।" र. १८, ३३

भक्ति÷, गंगायमुनांच्या संगमावर स्नान¶ इत्यादि हांत असें कालिदास सांगतो. परंतु 'तत्त्वावबोधेन' म्हणजे, तत्त्वज्ञान हेंच मोक्षाचें खरें साधन होय. योगिजनांची संगति, आसनप्राणायामादिकांचा अभ्यास, पंचप्राणांचें वशीकरण, ज्ञानाग्नीनें कर्मांचा दाह करणें, सत्त्वादि तीन गुणांवर म्हणजे प्रकृतीवर विजय मिळविणें, योगभ्रष्ट न होण्याची काळजी घेणें, इन्द्रियांचें दमन करून नित्य जागृत राहणें, आणि शेवटीं योगसमाधीनें देहविसर्जन करणें, अशा निवृत्तिमार्गांतील मोक्षसाधनाच्या पायऱ्या रघुराजाच्या वर्णनांत कालिदासानें सांगितल्या आहेत (र. ८, १६-२४). त्यांतील "अपरो दहने स्वकर्मणां ववृते ज्ञानमयेन वह्निना।", "रघुरप्यजयद्गुणत्रयम्।", "तमसः परमापदव्ययं पुरुषं योगसमाधिना रघुः।" इत्यादि वचनांवरून त्याचे विचार कळून येतील. थोडक्यांत सांगावयाचें तर या बाबतींत वैदिक कर्मकाण्ड व ज्ञानकाण्ड यांचें जें समाजनियामक मिश्रण स्मृतींनीं सिद्ध केलेलें आढळतें, तेंच तत्त्वतः कालिदासानेंहि सांगितलें आहे. त्याच्या वेळीं विष्णुभक्ति व शिवभक्ति अशा दोहींचा प्रसार झालेला होता, यज्ञमार्गाचें महत्त्व प्रस्थापित झालें होतें, यज्ञांतील हिंसा ही हिंसा नव्हे असें प्रतिपादिलें जात होतें,* मूर्तिपूजा अस्तित्वांत आलेली होती, विष्णूचे अवतार मान्य झालेले होते—पण बुद्धाला त्यांत स्थान मिळालेलें नव्हतें, शंकराच्या कुटुंबांत गणपतीचा समावेश होत नव्हता, तत्त्वज्ञानदृष्टीनें सांख्य, योग व वेदान्त यांचें एकप्रकारचें मिश्रण रूढ झालेलें होतें, गृहस्थाश्रमाचा धिक्कार बंद झालेला होता, इत्यादि गोष्टी स्पष्टपणें आढळून येतात.

÷ "तत्र व्यक्तं दृषदि चरणन्यासमर्धेन्दुमौलेः। शश्वत्सिद्धैरुपहृतबलिं भक्तिनम्रः परीयाः॥ यस्मिन्दृष्टे करणविगमादूर्ध्वमुद्धूतपापाः। कल्पिष्यन्ते स्थिरगणपदप्राप्तये श्रद्दधानाः॥" मे. १, ५७

¶ "समुद्रपत्न्योर्जलसन्निपाते पूतात्मनामत्र किलाभिषेकात्। तत्त्वावबोधेन विनाऽपि भूयस्तनुत्यजां नास्ति शरीरबन्धः॥" र. १३, ५८

* "पशुमारणकर्मदारुणोऽनुकंपामृदुरेव श्रोत्रियः।" शा. ६, १

पंडित लक्ष्मीधर कल्ला यांनीं काढलेल्या अनुमानानुसार कालिदास हा मूळचा काश्मीरनिवासी होता असें मानिल्यास तेथील धर्मपंथ व तत्त्वज्ञान यांचा परिणाम त्याच्यावर झालेला असला पाहिजे. काश्मिरांत एकप्रकारचा शैवधर्म प्राचीन काळापासून चालत आला असून त्याच्या स्पन्दशास्त्र व प्रत्यभिज्ञाशास्त्र अशा दोन शाखा होत्या. त्यांपैकीं कालिदास प्रत्यभिज्ञावादी होता, असें पंडित कल्ला यांचें म्हणणें आहे. पण हे पंथ प्रस्तुत ' सर्वदर्शन-संग्रहा 'त सांगितलेल्या स्वरूपांत इतक्या प्राचीन काळीं होते कीं काय, हें निश्चित सांगणें कठीण आहे. त्या ग्रंथांचे उपलब्ध मूळ ग्रंथ सातव्याआठव्या शतकानंतरचे दिसतात, असें विद्वानांचें मत आहे. ' नीलमत ' पुराणांत या पंथांचे उल्लेख आहेत; पण तें पुराणहि राजतरंगिणीपूर्वीचें असलें तरी कालिदासाहून प्राचीन आहे कीं काय हा प्रश्नच आहे.

प्रत्यभिज्ञादर्शनाप्रमाणें पाहतां ईश्वर हा सृष्टीपासून स्वतंत्र असून आपल्या स्वतःच्या केवळ इच्छाशक्तीनें सर्व विश्व निर्माण करितो. आरशांत दिसणारीं घरेंदारें किंवा नगरोपनगरें यांच्यापासून आरसा जसा अगदीं भिन्न असतो, व त्यांचा परिणाम त्यावर कांहींच घडत नसतांहि तीं घरें व नगरें जशीं त्या आरशांतच दिसतात, तोच प्रकार ईश्वर व विश्व यांचा आहे. म्हणजे, ईश्वर विश्वाचें उपादानकारण नाहीं व त्याला विश्वोत्पत्तीची प्रेरणा करणारें कर्मासारखें कांहीं कारणहि लागत नाहीं. विश्व हें मायानिर्मित आभासहि नव्हे, तर प्रत्यक्ष असून ईश्वरानें इच्छामात्रें करून अस्तित्वांत आणिलेलें आहे. ईश्वर स्वतःच असंख्य जीवात्म्यांच्या रूपानें व्यक्त होतो, अर्थात् जीवात्मा व ईश्वर यांचें तादात्म्य आहे. पण जीवात्म्यावरील अज्ञानरूपी मलामुळें त्याला तें कळून येत नाहीं. तें कळण्याचें साधन म्हणजे ' प्रत्यभिज्ञा ' होय. गुरूचा विशिष्ट उपदेश मिळाल्यानें प्रत्यभिज्ञा होते. ' सर्वदर्शनसंग्रह '-कारानें म्हटल्याप्रमाणें या एकत्वाची ओळख पटावयास प्राणायामादि योग-क्रियेची किंवा ध्यानधारणादिकांची अवश्यकता नाहीं. परंतु प्रत्यक्ष कालिदासानें योगादिकांचा समावेश पूर्वी दाखविल्याप्रमाणें मोक्षसाधनांत

केलेला असल्यामुळें तो स्वतः प्रत्यभिज्ञावादी होता असें म्हणवत नाहीं; तथापि कालिदासाच्या काव्यनाटकांमध्यें ‘ ओळख पटविण्याचें साधन ’ या अर्थानें ‘अभिज्ञान’ व ‘प्रत्यभिज्ञान’ हे शब्द अनेकदां योजिलेले आढळतात, एवढी गोष्ट खरी. शाकुन्तलाचें पूर्ण नांव ‘ अभिज्ञानशाकुन्तल ’ असें आहे. मारुतीबरोबर रामानें सीतेला आपली अंगठी पाठविली तेव्हां सीतेनें उलट आपल्याजवळील एक रत्न खूण म्हणून पाठविलें त्याला ‘ प्रत्यभिज्ञानरत्न ’च म्हटलें आहे.[१] मेघाबरोबर यक्षानें खुणेचे शब्द पाठविले त्या संबंधानेंहि ‘अभिज्ञान’ हाच शब्द आढळतो.[२] तसेंच “ राजा तुला जर न ओळखील तर त्याच्या नांवाची ही अंगठी त्याला दाखव ” असें शकुन्तलेच्या सखीनें तिला सांगितलें त्यांतहि हाच शब्द आला आहे.[३] परंतु कालिदास प्रत्यभिज्ञावादी नसला तरी तें शास्त्र त्याला परिचित असून त्यांतील पारिभाषिक शब्दांची त्यानें योजना केली असणें मात्र शक्य आहे.

---

१ “ प्रत्यभिज्ञानरत्नं च रामायादर्शयत्कृती ॥ ” र. १२, ६४

२ “ एतस्मान्मां कुशलिनमभिज्ञानदानाद्विदित्वा । ” मे. २, ५२

“ साभिज्ञानं प्रहितवचनैः ” मे. २. ५३

३ “ यदि नाम स राजा प्रत्यभिज्ञानमन्थरो भवेत् । ” शा. ४, २०

प्रकरण आठवें

भारतीय व जागतिक वाङ्मयांत कालिदासाचें स्थान

'प्रसन्नराघव'-कार जयदेवानें त्या नाटकाच्या प्रस्तावनेंत कालिदासाला 'कविकुलगुरु' अशी यथार्थ पदवी दिली असून तीविषयीं आतांपर्यंत रसिक पंडितांमध्यें मतभेद असा क्वचितच झाला असेल. "कवयः कालिदासाद्याः" इत्यादि सुभाषितांतहि कालिदासाला भारतीय कविमंडळांत तेंच आद्य स्थान दिलेलें आढळतें. श्री. अरविन्द घोष यांनीं कालिदास हा एका युगाचा प्रतिनिधि होय असें म्हटलें आहे. त्यांच्या मतें भारतीय इतिहासाच्या प्राचीन कालांत जसे वाल्मीकि आणि व्यास, तसा मध्यकालांत कालिदास हा होय. या कवींच्या काव्यांत त्या त्या काळाचें वास्तविक व सत्कल्पनामय असें दोन्ही प्रकारचें समाजस्वरूप पाहावयास मिळतें. अरविंदबाबूंनीं या तीन कवींच्या कालांना भारतीय इतिहासांतील नैतिक युग, बौद्धिक युग व आर्थिक युग अशा संज्ञा अनुक्रमें दिल्या आहेत. नीति, बौद्धिक विचार आणि धार्मिक आचार यांना ठाम स्वरूप येऊन त्यांत एकप्रकारची प्रतिक्रिया बौद्धधर्मानें चालू केली, अशा विशिष्ट कालाचा कालिदास हा प्रतिनिधि होय. आर्थिक दृष्टीनें समाज सुसंपन्न झालेला, नीतिबंधनांचें उच्च स्वरूप पूर्वीच कळसास जाऊन त्यांच्या गांठी किंचित् ढिल्या होऊं लागलेल्या, परदेशांशीं आणि त्यांतील शूर, विद्वान् व धाडशी लोकांशीं संबंध येऊन दृष्टि व्यापक होत चाललेली, समाजाचे आचारविचार कडक नियमांनीं बद्ध झालेले असल्यामुळें ते शिथिल व्हावे अशी कित्येक ठिकाणीं इच्छा व तदनुसार प्रवृत्ति उत्पन्न झालेली, इत्यादि परिस्थितींतील समाजाच्या सुखावलेल्या भागांत कालिदासाचे दिवस गेल्यामुळें तत्कालीन पुढारलेल्या समाजाचा तो उत्तम प्रतिनिधि बनला आहे. तो विद्वान्, चौकस, मनुष्यस्वभावनिरीक्षक, सृष्टि-

शोभेचा भोक्ता, रसिक कलाभिज्ञ व व्यवहारज्ञानी, असा विविधगुणसंपन्न होता, हें त्याच्या काव्य-नाटकांच्या वरवरच्या वाचनानेंहि दिसून येण्यासारखें आहे. त्याच्या ग्रंथांच्या सूक्ष्म निरीक्षणानें तत्कालीन समाजाचें प्रत्यक्ष व सत्कल्पनामय चित्र बऱ्याच प्रमाणांत प्रतीत होतें. तो राजांच्या राज्यकारभागचें जसें सूक्ष्म वर्णन करितो, तसेंच ऋषींच्या आश्रमांचेंहि करितो; उत्तम नगराचें करितो, तसेंच हिमालयासारख्या नगाधिराजाचेंहि करितो; त्याला प्राण्यांचे खेळ पाहण्याची जशी आवड दिसते, तशी वनस्पतींचें कौतुक करण्याचीहि दिसते; पौराणिक कथांचें जसें त्याचें ज्ञान विस्तृत होतें, तसें तत्कालीन देशपरिस्थितीचें त्याचें अवलोकनहि व्यापक होतें. अशा रीतीनें नैसर्गिक प्रतिभेबरोबर अभ्यास व व्युत्पत्ति यांचीहि सांगड पडल्यामुळें कालिदासाच्या ठिकाणीं साहित्यशास्त्रकारांनीं सांगितल्याप्रमाणें सर्व प्रकारचे काव्यहेतु एकत्रित होऊन रसिकमनोहरिणी अशी सर्वांगसुंदर काव्यनिर्मिति त्याच्याहातून झाली.

कालिदासानें आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या कवींचा " प्रथितयशसां भाससौमिल्लककविपुत्रादीनाम् " (मा. १, २), किंवा " अथवा कृतवाग्द्वारे वंशेऽस्मिन्पूर्वसूरिभिः । मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गतिः ॥ " (र. १,४), तसेंच " वृत्तं रामस्य वाल्मीकेः कृतिस्तौ किन्नरस्वनौ । किं तद्येन मनो हर्तुमलं स्यातां न शृण्वताम् ॥ " (र. १५, ६४), इत्यादि शब्दांनीं जसें गौरव केलें आहे, तसें कालिदासाचें गौरव आतांपर्यंतच्या अनेक कवींनीं व साहित्यशास्त्रकारांनीं केलें आहे. "पुरा कवीनां गणनाप्रसङ्गे कनिष्ठिकाधिष्ठितकालिदासा। अद्यापि तत्तुल्यकवेरभावादनामिका सार्थवती बभूव॥ " किंवा " उपमा कालिदासस्य । " इत्यादि असाधारणव्यक्तिस्तुतिपर वचनें, तशींच " काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्यं शकुन्तलम् । तत्रापि च चतुर्थोऽङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम् ॥ " अथवा " क इह रघुकारे न रमते । " इत्यादि विशिष्टग्रंथस्तुतिपर वचनें तज्ज्ञ रसिकगणांत विख्यात झालेली असून त्यांविषयीं कोठेंहि मतभेद आढळत नाहीं; आणि त्यावरून आजपर्यंत कालिदासाचें स्थान कसें अढळ राहिलें आहे तें समजून येतें.

भारतीय कविकुलपरंपरेंत ललामभूत झालेल्या बाणप्रभृति कवींनीं कालिदासाच्या ग्रंथांसंबंधानें अत्यंत जिव्हाळ्याचे उद्गार काढिलेले आढळतात. बाणभट्ट हर्षचरिताच्या प्रस्तावनेंत म्हणतो, " निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु। प्रीतिर्मधुरसार्द्रासु मंजरीष्विव जायते ॥ " म्हणजे, कालिदासाच्या वाणींतून निघालेल्या सुंदर उक्तींवर, मधुरसानें थबथबलेल्या मंजरींवर जशा (भुंग्यांच्या) उड्या पडाव्या, तशाच रसिकांच्या पडतात." 'आर्यासप्तशती'-कार गोवर्धनाचार्यानें " साकूतमधुरकोमलविलासिनीकण्ठकूजितप्राये। शिक्षासमयेऽपि मुदे रतलीला कालिदासोक्ती ॥ ," या आर्येत रतलीला आणि कालिदासाचें काव्य यांमध्यें साभिप्रायत्व, माधुर्य, कोमलता इत्यादि गुणांच्या दृष्टीनें सारखेंच आनंददायित्व कल्पिलें आहे. 'प्रसन्नराघव'-कार जयदेवानें कवितेला कामिनी कल्पून तिचा "कविकुलगुरुः कालिदासो विलासः।", असें म्हटलें आहे. दुसऱ्या पुलकेशी राजाच्या ऐहोळे येथील कोरींव लेखांत कालिदासाचा कीर्तिमान् कवि म्हणून उल्लेख केलेला असून राजशेखर व 'विश्वगुणादर्शचंपू'-कार वेंकटाध्वरि यांनींहि कालिदासाची स्तुति केलेली आढळते. "येनाऽयोजि न वेश्म स्थिरमर्थविधौ विवेकिना जिनवेश्म। स विजयतां रविकीर्तिः कविताश्रितकालिदासभारविकीर्तिः ॥," असें ऐहोळेच्या शिलालेखकानें म्हटलें असून " एकोऽपि जीयते हन्त कालिदासो न केन चित्। शृंगारे ललितोद्गारे कालिदासत्रयी किमु॥", अशी महती राजशेखरानें वर्णिली आहे ('सूक्तिमुक्तावलिः'). वेंकटाध्वरीनें माघादि कवींची नामावलि देऊन त्यांत कालिदासाचें नांव घातलें आहे व हे सर्व कवि आपल्या काव्यांनीं पृथ्वीला आल्हादित करीत आहेत, असें म्हटलें आहे (वि. गु. श्लो. ५४९).

हिंदुस्थानांत मुसलमानी राजवटी चालू झाल्यापासून वाङ्मयाला दोन स्पष्ट वेगळाल्या शाखा फुटल्या. गीर्वाण भाषेकडे ज्यांचा सर्व ओढा, त्यांचें काव्य-नाटकांकडे किंवा न्याय-वेदान्त-साहित्य-ज्योतिषादि शास्त्रांकडे लक्ष लागून त्यांनीं परंपरेचेंच कां होईना, पण शास्त्रीय वाङ्मय सिद्ध केलें. दुसरी शाखा देशी भाषांच्या अभिमान्यांनीं वाढविली व तींत केवळ भक्तिमार्गीय

असेंच वाङ्मय निर्माण झालें. या वाङ्मयाचा व कालिदासासारख्याच्या काव्य-नाटकांचा सलोखा फारसा नव्हता. अर्थात् देशी भाषांतील जुन्या वाङ्मयांत कालिदासाची योग्यता पारखण्याचा प्रसंगच नाहीं. परंतु पुढें इंग्रजी राजवटी झाल्यावर शिक्षणाची दृष्टि व्यापक होऊन रसायनादि भौतिक शास्त्रांबरोबर साहित्यादि रसिक शास्त्रांचाहि अभ्यास होऊं लागला व कालिदासादि कवींच्या कृतींकडे सामान्य जनतेचेंहि लक्ष वेधण्याचे प्रयत्न झाले. रघुवंशादि काव्यें व शाकुन्तलादि नाटकें गद्यपद्यमय भाषान्तररूपानें देशी भाषांत प्रकट झालीं व कालिदास म्हणजे काय चीज आहे, हें लोकांना कळावयास लागून त्याच्या मधुर कृतींचा आस्वादहि थोड्याबहुत प्रमाणांत त्यांना मिळूं लागला. या बाबतींत आपल्याकडे पितापुत्र चिपळूणकरशास्त्री यांनीं अनुक्रमें मेघदूताच्या सरस भाषांतरानें व कविपंचकांतील उद्बोधक निबंधानें कालिदासाची योग्यता साक्षर जनतेच्या प्रथम निदर्शनास आणून दिली. त्यानंतर गणेशशास्त्री लेले-कृत 'रघुवंश' व कृ. शा. दातारकृत 'कुमारसंभव' यांचीं भाषांतरें, विस्तृत टीपा, अन्वयार्थ भावार्थ, इत्यादिसह 'काव्यार्थप्रकाशां'तून प्रसिद्ध झालेले रघु-कुमारांचे कित्येक सर्ग, तसेंच परशुरामपंत गोडबोले, अण्णा किर्लोस्कर, कृष्णशास्त्री राजवाडे प्रभृतींचीं शाकुन्तल-विक्रमोर्वशीयादि नाटकांचीं गद्य-पद्यात्मक रूपांतरें आणि 'विविधज्ञानविस्तार' मासिकांतून प्रसिद्ध झालेलीं मा. व्यं. लेलेकृत 'सार व विचार' नांवाचीं कालिदासीय नाटकांसंबंधीं पुस्तकें यांनीं कालिदासाचा बराचसा परिचय महाराष्ट्रास करुन दिलेला आहे. शिवाय हिंदुस्थानांतील विद्यापीठांतून अध्ययन करणाऱ्या छात्रगणांच्या साहाय्यार्थ म्हणून ठिकठिकाणीं निघालेल्या कालिदासीय काव्यनाटकांच्या इंग्रजी भाष्य-भाषांतरान्वित ग्रंथांच्या विविध आवृत्त्यांच्या द्वारें कालिदासाच्या सूक्ष्म अभ्यासास उत्तेजन मिळाल्यामुळें आपल्या या कविकुलगुरूचें सांगोपांग व मोहक असें चित्र भरतखंडांतील शिक्षित जनतेपुढें उभें राहिलें आहे.

परंतु आतां कालिदास हा एकट्या भरतखंडाचाच कवि राहिलेला नाहीं, त्याला आतां जागतिक कविमंडळांत बहुमानाचें स्थान मिळालें आहे. ईस्ट

इंडिया कंपनीच्या हातीं हिंदुस्थानाच्या कांहीं भागांचीं राज्यसूत्रें आल्याबरोबर आंग्ल व भारतीय वाङ्मयांचा जो परस्पर विनिमय होऊं लागला, त्यांतील एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर वुइल्यम् जोन्स यानें केलेलें कालिदासाच्या शाकुन्तलाचें इंग्रजी भाषान्तर ही होय. हें भाषान्तर इ. स. १७८९त प्रसिद्ध झालें व त्याच्या द्वारें कालिदासाच्या कीर्तीनें यूरोपखंड आक्रमण करून पुढें सर्व भूमंडळहि व्यापिलें! तथापि या बाबतींत त्याच्या काव्यांपेक्षां नाटकांनीं, किंबहुना एका शाकुन्तलानेंच मोठी कर्तबगारी दाखविली आहे. सर वुइल्यम् जोन्स यानें कालिदासाला 'भरतखंडाचा शेक्स्पियर' या पदवीनें उल्लेखिलें आहे. शाकुन्तलांत आढळणारी त्याची उज्ज्वल प्रतिभा, जोमदार कल्पनाशक्ति, मनुष्यस्वभावाचें सखोल ज्ञान, तीव्र आणि नाजूक भावना, मनोविकारांच्या झगड्यांची यथार्थ जाणीव, इत्यादि गुणांनीं सर वुइल्यम् अगदीं मोहून गेला व 'भरतखंडाचा शेक्स्पियर' ही पदवी त्याला यथार्थपणें लागते, असे उद्गार त्यानें शाकुन्तलाच्या प्रस्तावनेंत काढिले.

कालिदासाची तुलना शेक्स्पियर या जगन्मान्य आंग्ल कवीशीं करण्यांत येते ती अर्थात् नाटकांपुरतीच होय. परंतु त्यांत एक गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं, रूपकांत उपमान हेंच केव्हां झालें तरी उपमेयाहून वरचढ असतें. नाटककार या नात्यानें कालिदास फार मोठा असला तरी शेक्स्पियरशीं तुलना करतांना दोघांमधील भेद लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीं. एक तर केवळ नाटकांची संख्या घेतली तरी कालिदासाच्या तीन नाटकांसमोर शेक्स्पियरची जवळजवळ चाळीस नाटकें उभीं राहतात! त्या चाळीसहि नाटकांतील संविधानकांचा भिन्नपणा, पात्रांचें वशिष्ट्य, मनुष्यस्वभावाचा विस्तृत देखावा इत्यादि गोष्टी पाहिल्याबरोबर शेक्सपियरच्या भव्यपणाची चांगलीच कल्पना येते. तथापि नाटकाचा विषय बाजूला ठेविला तर इतर विषयांत कालिदास शेक्स्पियरचा बलवान् प्रतिस्पर्धी होऊं शकतो, यांत कांहीं संशय नाहीं. श्राव्य काव्याच्या दृष्टीनें कालिदासाची काव्यनिर्मिति शेक्स्पियरच्याहून निःसंशय श्रेष्ठ आहे.

अशा रीतीनें नाटककार म्हणून शेक्स्पियरच्या तुलनेनें कालिदासाचें स्थान अंशतः खालच्या प्रतीचें ठरलें, तरी जागतिक कविमंडळांत त्याला बरेंच वरचें स्थान देण्यांत अनेक पाश्चात्त्य कविश्रेष्ठांनीं व पंडितांनीं अहमहमिका दाखविलेली आढळते. सुप्रसिद्ध जर्मन् महाकवि गटे यानें सर वुइल्यम् जोन्सकृत शाकुन्तलाचें रूपान्तरहि वाचून आनंदाच्या भरांत काढलेले उद्गार प्रसिद्धच आहेत. त्याला शाकुन्तलांत अन्तरात्म्याला अमृतपान करवून मोहून टाकणारें विश्वांतील सारें निसर्गसौन्दर्य एकवटलेलें दिसून आलें ! त्याचे मूळ उद्गार इंग्रजींत रूपान्तरित केलेले आहेत ते असेः—

" Wouldst thou the young year's blossoms and the fruits of its decline,
And all by which the soul is charmed, enraptured, feasted, fed ?
Wouldst thou the Earth and Heaven itself in one sole name combine ?
I name thee, O Sakuntala, and all at once is said !"

शाकुन्तलानें व मेघदूतानें गटेला जशी मोहिनी घातली तशी विक्रमोर्वशीयानें अलेक्झँडर फॉ हंबोल्ट याला घातली आणि त्यानें कालिदासाला सार्वराष्ट्रीय कविमंडळांत उच्च स्थान दिलें[1]. विक्रमोर्वशीयांतील भ्रमिष्ट पुरूरव्याच्या अरण्यांत शोक करीत हिंडण्याच्या प्रवेशासंबंधानें हंबोल्ट म्हणतो कीं, कोणत्याहि काळांत निर्माण झालेल्या अत्यंत रमणीय कृतींपैकीं तो एक आहे.[2]

यांशिवाय शेझी, श्लेगेल्, लासेन, सिल्वांय् लेव्ही, वुइंटरनिट्झ, वुइल्सन्, मोनियर वुइल्यम्स, मॅक्डोनेल्, कीथ, रायडर इत्यादि अनेक सुप्रसिद्ध पाश्चात्त्य संस्कृतज्ञांनींहि कालिदासाचें योग्य गुणगौरव केलेलें आहे.

---

1 "Tenderness in the expression of feeling and richness of creative fancy, have assigned to him his lofty place among the poets of all nations."

2 " The scene in the forest which he introduced in the drama of Vikrama and Urvashi, is one of the most beautiful productions which have appeared in any time."

प्रो. लासेननें कालिदासाला " भारतीय काव्यनभोमंडळांतील अत्यंत देदीप्यमान तारा* " असें म्हटलें आहे, तर "भारतीय काव्यसृष्टींत कालिदासाचें नांव अग्रगण्य असून तिचें उत्कृष्ट सार त्यांत उतरलेलें आहे ", अशा शब्दांनीं लेव्हीनें कालिदासाचें वर्णन केलें आहे.§

वाल्मीकि, व्यास, होमर, व्हर्जिल्, डँटे, शेक्स्पियर, मिल्टन्, गटे, इत्यादि जागतिक कविमंडळांत बसण्याची कालिदासाची पात्रता याप्रमाणें सर्वांनीं मान्य केली आहे. पण कालिदासाचा सर्वांहून एक विशेष गुण दिसून येतो. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें शेक्स्पियर नाटककार म्हणून अग्रगण्य आहे, तर मिल्टन् हा महाकाव्यकार म्हणून प्रसिद्ध आहे. तथापि कालिदासानें नाटक, महाकाव्य व खंडकाव्य या तिन्ही काव्यशाखांत उत्तम नांव मिळविलें आहे. अशा रीतीनें तिन्ही प्रकारच्या काव्यशक्ति एकत्र झालेल्या क्वचित् आढळतात; व या समुच्चित गुणानेंहि कालिदासाच्या थोरवींत भर टाकिली आहे. डॉ. रायडर यानें कालिदासाच्या रघुवंशाची रामायणाशीं तुलना करून रामायणांतील बराचसा सुंदर कथाभाग कालिदासानें कसाबसा झटकन् आटोपून वाल्मीकीशीं स्पर्धा करण्याचा मोहच टाळिला आहे, असें म्हणून कालिदासाच्या वर्णनशक्तीचा कांहींसा गौणपणा दाखविला आहे. अर्थात् एकेका गुणाचा विचार केल्यास कालिदासाला इतर अनेक कवींहून त्या त्या विषयांत थोडेबहुत उणे गुण मिळतील हें खरें: म्हणजे, नाट्यरचनेची विविधता व स्वभावपरिपोष यांत शेक्स्पियरला बरेच अधिक गुण द्यावे लागतील; वर्णनाच्या व कल्पनेच्या भव्यतेंत बाण, डँटे, मिल्टन् व गटे हे कालिदासाला मागें सारतील; सुरस कथाकथनाच्या दृष्टीनें व्यास, वाल्मीकि, होमर यांना वरची पदवी द्यावी लागेल; खंडकाव्यांत वर्ड्स्वर्थ, टेनिसन् हे कदाचित् वरचढ असतील; परंतु सर्व प्रांतांत उच्च प्रकारची नामांकित कामगिरी

---

* " The brightest star in the firmament of Indian artificial poetry. "

§ " The name of Kalidas overtops Indian poetry and sums it up brilliantly."

कालिदासानें प्रकट करून आपलें असाधारण वैशिष्ट्य जगाच्या निदर्शनास आणिलें आहे यांत तिळमात्र शंका नाहीं.

शेक्स्पियर हा सर्व जगांत अप्रतिम नाटककार म्हणून अलीकडे मान्य झाला आहे; पण शेंदीडशें वर्षांपूर्वी फ्रान्समध्यें त्याला गांवढळ मानीत होते! ग्रीक नाट्यशास्त्राचे सिद्धान्त कसे अपुरे आहेत याची जाणीव शेक्स्पियरच्या मार्मिकांनीं फ्रान्समध्यें उत्पन्न केली, तेव्हां कोठें त्याचें मर्म तेथील लोकांना पटूं लागलें. कालिदासाला मात्र वादाशिवायच युरोपखंडांत उत्तम नाटककार म्हणून वरची पदवी मिळाली. नाटककार या नात्यानें शेक्स्पियरची योग्यता जर्मनींत फार काळ मान्य झालेली आहे; आणि योगायोग असा विलक्षण कीं, ज्या जर्मन् पंडितांनीं ती योग्यता दाखवून शेक्स्पियरविषयीं त्या देशांत औत्सुक्य उत्पन्न केलें, त्यांतील गटेसारख्यांनींच कालिदासाविषयींदेखील तीच भावना जर्मनींत पसरविली! अर्थात् शेक्स्पियरच्या नाट्यरसाचें आकंठ पान करून आनंदानें डोलणाऱ्या गटेसारख्या स्वतः जगन्मान्य अशा कविवर्यानें कालिदासाचें गौरव केलें, या एकाच गोष्टीवरून आमच्या या भारतीय कविकुलगुरूचें जागतिक वाङ्मयांतील स्थान किती उच्च आहे, हें स्पष्टपणें कळून येतें.

परिशिष्ट

कालिदासीय सुभाषितें

रघुवंश

हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा । १,१०
सहस्रगुणमुत्स्रष्टुमादत्ते हि रसं रविः । १,१८
सन्ततिः शुद्धवंश्या हि परत्रेह च शर्मणे । १,६९
प्रतिबध्नाति हि श्रेयः पूज्यपूजाव्यतिक्रमः । १,७९
न पादपोन्मूलनशक्ति रंहः शिलोच्चये मूर्च्छति मारुतस्य । २,३४
शस्त्रेण रक्ष्यं यदशक्यरक्ष्यं न तद्यशः शस्त्रभृतां क्षिणोति । २,४०
महीतलस्पर्शनमात्रभिन्नमृद्धं हि राज्यं पदमैन्द्रमाहुः । २,५०
क्षतात्किल त्रायत इत्युदग्रः क्षत्त्रस्य शब्दो भुवनेषु रूढः । २,५३
स्थातुं नियोक्तुर्न हि शक्यमग्रे विनाश्य रक्ष्यं स्वयमक्षतेन । २,५६
सम्बन्धमाभाषणपूर्वमाहुः । २,५८
क्रिया हि वस्तूपहिता प्रसीदति । ३,२९
पथः श्रुतेर्दर्शयितार ईश्वरा मलीमसामाददते न पद्धतिम् । ३,४६
पदं हि सर्वत्र गुणैर्निधीयते । ३,६२
प्रणिपातप्रतीकारः संरम्भो हि महात्मनाम् । ४,६४
आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव । ४,८६
सूर्ये तपत्यावरणाय दृष्टेः कल्पेत लोकस्य कथं तमिस्रा । ५,१३
पर्यायपीतस्य सुरैर्हिमांशोः कलाक्षयः श्लाघ्यतरो हि वृद्धेः । ५,१६
निर्गलिताम्बुगर्भं शरद्घनं नार्दति चातकोऽपि । ५,१७
किमत्र चित्रं यदि कामसूर्भूर्वृत्ते स्थितस्याधिपतेः प्रजानाम् । ५,३३
उष्णत्वमग्न्यातपसंप्रयोगाच्छैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य । ५,५४
नक्षत्रताराग्रहसंकुलापि ज्योतिष्मती चन्द्रमसैव रात्रिः । ६,२२

भिन्नरुचिर्हि लोकः । ६,३०
न हि प्रफुल्लं सहकारमेत्य वृक्षान्तरं कांक्षति षट्पदाली । ६,६९
रत्नं समागच्छतु काञ्चनेन । ६,७९
मनो हि जन्मान्तरसङ्गतिज्ञम् । ७,१५
पवनाग्निसमागमो ह्ययं सहितं ब्रह्म यदस्त्रतेजसा । ८,४
बलमार्तभयोपशान्तये विदुषां सत्कृतये बहु श्रुतम् । ८,३१
प्रतिकारविधानमायुषः सति शेषे हि फलाय कल्पते । ८,४०
अभितप्तमयोऽपि मार्दवं भजते कैव कथा शरीरिषु । ८,४३
विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया । ८,४६
धिगिमां देहभृतामसारताम् । ८,५१
विपदुत्पत्तिमतामुपस्थिता । ८, ८३
वसुमत्या हि नृपाः कलत्रिणः । ८,८३
परलोकजुषां स्वकर्मभिर्गतयो भिन्नपथा हि देहिनाम् । ८,८५
स्वजनाश्रु किलातिसन्ततं दहति प्रेतमिति प्रचक्षते । ८,८६
मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः । ८,८७
द्रुमसानुमतां किमन्तरं यदि वायौ द्वितयेऽपि ते चलाः । ८,९०
अपथे पदमर्पयन्ति हि श्रुतवन्तोऽपि रजोनिमीलिताः । ९, ७४
कृष्यां दहन्नपि खलु क्षितिमिन्धनेद्धो बीजप्ररोहजननीं ज्वलनः करोति। [९,८०
अव्याक्षेपो भविष्यन्त्याः कार्यसिद्धेर्हि लक्षणम् । १०,६
स्वयमेव हि वातोऽग्नेः सारथ्यं प्रतिपद्यते । १०,४०
तेजसां हि न वयः समीक्ष्यते । ११,१
किं महोरगविसर्पिविक्रमो राजिलेषु गरुडः प्रवर्तते । ११,२७
सद्य एव सुकृतां हि पच्यते कल्पवृक्षफलधर्मि कांक्षितम् । ११,५०
पावकस्य महिमा स गण्यते कक्षवज्ज्वलति सागरेऽपि यः । ११,७५
खातमूलमनिलो नदीरयैः पातयत्यपि मृदुस्तटद्रुमम् । ११,७६
केवलोऽपि सुभगो नवाम्बुदः किं पुनस्त्रिदशचापलाञ्छितः । ११,८०

निर्जितेषु तरसा तरस्विनां शत्रुषु प्रणतिरेव कीर्तये । ११,८९
अत्यारूढो हि नारीणां अकालज्ञो मनोभवः । १२,३३
काले खलु समारब्धाः फलं बध्नन्ति नीतयः । १२,६९
अपि स्वदेहात्किमुतेन्द्रियार्थाद्यशोधनानां हि यशो गरीयः ।१४,३५
छाया हि भूमेः शशिनो मलत्वेनारोपिता शुद्धिमतः प्रजाभिः। १४,४०
अमर्षणः शोणितकांक्षया किं पदा स्पृशन्तं दशति द्विजिह्वः । १४,४१
आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया । १४,४६
धर्मसंरक्षणार्थैव प्रवृत्तिर्भुवि शार्ङ्गिणः १५,४
संमुखीनो हि जयो रन्ध्रप्रहारिणाम् । १५,१७
प्रह्वेष्वनिर्बन्धरुषो हि सन्तः । १६,८०
वयोरूपविभूतीनामेकैकं मदकारणम् । १७,४३
न हि सिंहो गजास्कन्दी भयाद्गिरिगुहाशयः । १७,५२
वृद्धौ नदीमुखेनैव प्रस्थानं लवणाम्भसः । १७,५४
समीरणसहायोऽपि नाम्भःप्रार्थी दवानलः । १७,५६
अम्बुगर्भो हि जीमूतश्चातकैरभिनन्द्यते । १७,६०
सक्रुद्विविग्नानपि हि प्रयुक्तं माधुर्यमीष्टे हरिणान्ग्रहीतुम् । १८,१३
वृत्तं हि राज्ञामुपरुद्धवृत्तम् । १८,१८
स्वादुभिस्तु विषयैर्हृतस्ततो दुःखमिन्द्रियगणो निवार्यते । १९,४९

कुमारसंभव

एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः । १,३
क्षुद्रेऽपि नूनं शरणं प्रपन्ने ममत्वमुच्चैःशिरसां सतीव । १,१२
अनन्तपुष्पस्य मधोर्हि चूते द्विरेफमाला सविशेषसङ्गा । १,२७
ऋते कृशानोर्नहि मन्त्रपूतमर्हन्ति तेजांस्यपराणि हव्यम् । १,५१
अभ्यर्थनाभङ्गभयेन साधुर्माध्यस्थमिष्टेऽप्यवलम्बतेऽर्थे । १,५२
विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः । १,५९
शाम्येत्प्रत्यपकारेण नोपकारेण दुर्जनः । २,४०

विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं च्छेत्तुमसांप्रतम् । २,५५
प्रयोजनापेक्षितया प्रभूणां प्रायश्चलं गौरवमाश्रितेषु । ३,१
व्यादिश्यते भूधरतामवेक्ष्य कृष्णेन देहोद्वहनाय शेषः । ३,१३
अप्यप्रसिद्धं यशसे हि पुंसामनन्यसाधारणमेव कर्म । ३,१९
समीरणो नोदयिता भवेति व्यादिश्यते केन हुताशनस्य । ३,२१
वर्णप्रकर्षे सति कर्णिकारं दुनोति निर्गन्धतया स्म चेतः ।
प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः ॥ ३,२८
आत्मेश्वराणां न हि जातु विघ्नाः समाधिभेदप्रभवो भवन्ति । ३,४०
नहीश्वरव्याहृतयः कदाचित्पुष्णन्ति लोके विपरीतमर्थम् । ३,६३
कठिनाः खलु स्त्रियः । ४,५
स्वजनस्य हि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते । ४,२६
दयितास्वनवस्थितं नृणां न खलु प्रेम चलं सुहृज्जने । ४,२८
अनपायिनि संश्रयद्रुमे गजभग्ने पतनाय वल्लरी । ४,३१
शशिना सह याति कौमुदी सह मेघेन तडित्प्रलीयते ।
प्रमदाः पतिवर्त्मगा इति प्रतिपन्नं हि विचेतनैरपि ॥ ४,३३
अशनेरमृतस्यचोभयोर्वशिनश्चाम्बुधराश्च योनयः । ४,४३
रविपीतजला तपात्यये पुनरोघेन हि युज्यते नदी । ४,४४
प्रियेषु सौभाग्यफला हि चारुता । ५,१
पदं सहेत भ्रमरस्य पेलवं शिरीषपुष्पं न पुनः पतत्रिणः । ५,४
क ईप्सितार्थस्थिरनिश्चयं मनः पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् । ५,५
न षट्पदश्रेणिभिरेव पङ्कजं सशैवलासंगमपि प्रकाशते । ५,९
न धर्मवृद्धेषु वयः समीक्ष्यते । ५,१६
भवन्ति साम्येऽपि निविष्टचेतसां वपुर्विशेषेष्वतिगौरवाः क्रियाः ।
[५,३१
शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् । ५,३३
कः करं प्रसारयेत्पन्नगरत्नसूचये । ५,४३
न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत् । ५,४५

मनोरथानामगतिर्न विद्यते । ५,६४
अपेक्ष्यते साधुजनेन वैदिकी श्मशानशूलस्य न यूपसत्क्रिया। ५,७३
अलोकसामान्यमचिन्त्यहेतुकं द्विषन्ति मन्दाश्चरितं महात्मनाम् । [५,७५
न कामवृत्तिर्वचनीयमीक्षते। ५,८२
न केवलं यो महतोऽपभाषते शृणोति तस्मादपि यः स पापभाक्। [५,८३
क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते । ५, ८६
स्त्रीपुमानित्यनास्थैषा वृत्तं हि महितं सताम्। ६,१२
क्रियाणां खलु धर्म्याणां सत्पत्न्यो मूलकारणम् । ६,१३
प्रायः प्रत्ययमाधत्ते स्वगुणेषूत्तमादरः । ६,२०
विक्रियायै न कल्पन्ते सम्बन्धाः सदनुष्ठिताः । ६,२९
यदध्यासितमर्हद्भिस्तद्धि तीर्थं प्रचक्षते । ६,५६
विनियोगप्रसादा हि किंकराः प्रभविष्णुषु । ६,६०
अशोच्या हि पितुः कन्या सद्भर्तृप्रतिपादिता । ६,७९
प्रायेण गृहिणीनेत्राः कन्यार्थेषु कुटुम्बिनः । ६,८५
भवन्त्यव्यभिचारिण्यो भर्तुरिष्टे पतिव्रताः । ६,८६
स्त्रीणां प्रियालोकफलो हि वेषः। ७,२२
कालप्रयुक्ताः खलु कार्यविद्भिर्विज्ञापना भर्तृषु सिद्धिमेति । ७,९३
भर्तृवल्लभतया हि मानसीं मातुरस्यति शुचं वधूजनः । ८,१२
धिङ्महत्त्वमसतां हृतान्तरम् । ८, ५७
विक्रिया न खलु कालदोषजा निर्मलप्रकृतिषु स्थिरोदया । ८,६५
नूनमात्मसदृशी प्रकल्पिता वेधसा हि गुणदोषयोर्गतिः । ८,६६
परितोषयन्ति गीर्भिर्गिरीशा रुचिराभिरीशम्। ९,१२
स्तोत्रं कस्य न तुष्टये। १०,९
कार्येष्ववश्यकार्येषु सिद्धये क्षिप्रकारिता । १०,२५
विपदा परिभूताः किं व्यवस्यन्ति विलंबितुम्। १०,३५
रत्नाकरे युज्यत एव रत्नम्। ११,११

पुत्रोत्सवे माद्यति का न हर्षात् । ११,१७
नन्दनालोकनमंगलेषु क्षणं क्षणं तृप्यति कस्य चेतः । ११,२०
मुदे न हृद्या किमु बालकेलिः । ११,४०
कस्य मनो न हि क्षुभ्यति धामधाम्नि । १२,२२
प्रभुप्रसादो हि मुदे न कस्य । १२,३२
दावानलप्लोषविपत्तिमन्यो महाम्बुदात्किं हरते वनानाम् । १२,४१
भवन्ति वाचोऽवसरे प्रयुक्ता ध्रुवं फलाविष्टमहोदयाय । १२,४३
सुतविक्रमे सति न नन्दति का खलु वीरसूः । १२,५९
ध्रुवमभिमते पूर्णे को वा मुदा न हि माद्यति । १२,६०
महतां वृथा भवेदसद्ग्रहान्धस्य हितोपदेशनम् । १५,२६
युयुत्सुभिः किं समरे विलम्ब्यते । १५, ४७
न कस्य वीर्याय वरस्य संगतिः । १५, ५१

मेघदूत

मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेतः ।
कण्ठाश्लेषप्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे ॥ १,३
कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु । १,५
याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा । १,६
आशाबन्धः कुसुमसदृशं प्रायशो ह्यंगनानाम् ।
सद्यःपाति प्रणयिहृदयं विप्रयोगे रुणद्धि ॥ १,९
न क्षुद्रोऽपि प्रथमसुकृतापेक्षया संश्रयाय प्राप्ते मित्रे भवति विमुखः । [१,१७
रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय । १,२०
स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमो हि प्रियेषु । १,२८
मन्दायन्ते न खलु सुहृदामभ्युपेतार्थकृत्याः । १,४०
आपन्नार्तिप्रशमनफलाः संपदो ह्युत्तमानाम् । १,५३
केषां न स्युः परिभवपदं निष्फलारम्भयत्नाः । १,५६
सूर्यापाये न खलु कमलं पुष्यति स्वामभिख्याम् । २,२३

प्रायः सर्वो भवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा । २,३३
कान्तोपान्तात्सुहृदुपगमः संगमात्किंचिदूनः । २,४०
कस्यैकान्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा ।
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥ २, ४९
स्नेहानाहुः किमपि विरहे ह्रासिनस्तेऽप्यभोगा-।
दिष्टे वस्तुन्युपचितरसाः प्रेमराशीभवन्ति ॥ २,५२
प्रत्युक्तं हि प्रणयिषु सतामीप्सितार्थक्रियैव । २,५४

अभिज्ञानशाकुन्तल

आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् ।
बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः ॥ १,२
आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि । १,११
भवितव्यानां द्वाराणि भवन्ति सर्वत्र । १,१६
किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् । १,२०
सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः । १,२२
न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात् । १,२५
अनियन्त्रणानुयोगस्तपस्विजनो नाम । १,२६
मिथ्यैव व्यसनं वदन्ति मृगयामीदृग्विनोदः कुतः । २,५
सर्वः कान्तमात्मीयं पश्यति । २,८
पिण्डखर्जूरैरुद्वेजितस्य तिन्तिण्यामभिलाषो भवेत् । २,९
विकारं खलु परमार्थतोऽज्ञात्वाऽनारंभः प्रतीकारस्य । ३,९
स्निग्धजनसंविभक्तं हि दुःखं सह्यवेदनं भवति । ३,१०
सागरमुज्झित्वा कुत्र वा महानद्यवतरति । ३,१२
किमत्र चित्रं यदि विशाखे शशांकलेखामनुवर्तेते । ३,१२
लभेत वा प्रार्थयिता न वा श्रियं श्रिया दुरापः कथमीप्सितो भवेत्।
ग्लपयति यथा शशाङ्कं न तथा हि कुमुद्वतीं दिवसः । ३,१६ [३,१३
विवक्षितं ह्यनुक्तमनुतापं जनयति । ३,१८

बहुवल्लभा राजानः श्रूयन्ते । ३,१९
विघ्नवत्यः प्रार्थितार्थसिद्धयः । ३,२४
न तादृशा आकृतिविशेषा गुणविरोधिनो भवन्ति । ४,१
कोऽन्यो हुतवहाद्दग्धुं प्रभवति । ४,२
को नामोष्णोदकेन नवमालिकां सिञ्चति । ४,२
इष्टप्रवासजनितान्यबलाजनस्य दुःखानि नूनमतिमात्रसुदुःसहानि । [४,३
पीडयन्ते गृहिणः कथं नु तनयाविश्लेषदुःखैर्नवैः । ४,५
गुर्वपि विरहदुःखमाशाबन्धः साहयति । ४,१६
न खलु धीमतां कश्चिदविषयो नाम । ४,१७
अतिस्नेहः पापशङ्की । ४,१९
शिवास्ते पन्थानः सन्तु । ४,२०
अर्थो हि कन्या परकीय एव । ४,२१
रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्
पर्युत्सुकीभवति यत्सुखितोऽपि जन्तुः ।
तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वम्
भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि ॥ ५,२
अविश्रमोऽयं लोकतन्त्राधिकारः । ५,३
सर्वः प्रार्थितमर्थमधिगम्य सुखी संपद्यते जन्तुः । राज्ञां तु चरितार्थता दुःखोत्तरैव । ५,६
नातिश्रमापनयनाय यथा श्रमाय राज्यं स्वहस्तधृतदण्डमिवातपत्रम् । [५,६
अनुभवति हि मूर्ध्ना पादपस्तीव्रमुष्णम् ।
शमयति परितापं छायया संश्रितानाम् ॥ ५,७
अतनुषु विभवेषु ज्ञातयः सन्तु नाम । ५,८
भवन्ति नम्रास्तरवः फलागमैर्नवाम्बुभिर्दूरविलम्बिनो घनाः ।
अनुद्धताः सत्पुरुषाः समृद्धिभिः स्वभाव एवैष परोपकारिणाम् ॥ ५,१२
अनिर्वर्णनीयं परकलत्रम् । ५,१४

तमस्तपति घर्मांशौ कथमाविर्भविष्यति । ५,१४
सतीमपि ज्ञातिकुलैकसंश्रयां जनोऽन्यथा भर्तृमतीं विशङ्कते ।
अतः समीपे परिणेतुरिष्यते प्रियाप्रिया वा प्रमदा स्वबंधुभिः ।। ५,१७
सर्वः सगन्धेषु विश्वसिति । ५,२२
आत्मकार्यनिवर्तिनामनृतमयवाङ्मधुभिराकृष्यन्ते विषयिणः । ५,२२
स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु संदृश्यते किमुत या प्रतिबोधवत्यः ।
प्रागन्तरिक्षगमनात्स्वमपत्यजातमन्यैर्द्विजैः परभृताः खलु पोषयन्ति ।।
अतः परीक्ष्य कर्तव्यं विशेषात्संगतं रहः । [५,२२
अज्ञातहृदयेष्वेवं वैरीभवति सौहृदम् ।। ५,२४
उपपन्ना हि दारेषु प्रभुता सर्वतोमुखी । ५,२६
वशिनां हि परपरिग्रहसंश्लेषपराङ्मुखी वृत्तिः । ५,२८
सहजं खलु यद्विनिन्दितं न खलु तत्कर्म विवर्जनीयम् ।
पशुमारणकर्मदारुणोऽनुकंपामृदुरेव श्रोत्रियः ।। ६,१
अवसरोपसर्पणीया राजानः । ६,२
एष नामानुग्रहो यच्छूलादवतार्य हस्तिस्कंधे प्रतिष्ठापितः । ६,२
उत्सवप्रियाः खलु मनुष्याः । ६,५
सर्वास्ववस्थासु रमणीयत्वमाकृतिविशेषाणाम् । ६,६
रन्ध्रोपनिपातिनोऽनर्था इति यदुच्यते तदव्यभिचारि वचः । ६,८
भवितव्यता खलु बलवती । ६,९
कदाऽपि सत्पुरुषा शोकपात्रात्मानो न भवन्ति । ६,९
प्रवातेऽपि निष्कंपा गिरयः । ६,९
न खलु मातापितरौ भर्तृवियोगदुःखितां दुहितरं द्रष्टुं पारयतः। ६,१०
मनोरथा नाम तटप्रपाताः । ६,१०
हंसो हि क्षीरमादत्ते तन्मिश्रा वर्जयत्यपः । ६,२८
ज्वलति चलितेन्धनोऽग्निर्विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते ।
प्रायः स्वं महिमानं क्षोभात्प्रतिपद्यते जन्तुः ।। ६,३१

सिध्यन्ति कर्मसु महत्स्वपि यन्नियोज्याः ।
संभावनागुणमवेहि तमीश्वराणाम् ॥
किं वा भविष्यदरुणस्तमसां विभेत्ता ।
तं चेत्सहस्रकिरणो धुरि नाकरिष्यत् ॥ ७,४
अनतिक्रमणीयानि श्रेयांसि । ७,१०
उत्सर्पिणी खलु महतां प्रार्थना । ७,१३
पूर्वावधीरितं श्रेयो दुःखं हि परिवर्तते । ७,१३
आलक्ष्यदन्तमुकुलाननिमित्तहासैरव्यक्तवर्णरमणीयवचःप्रवृत्तीन् ।
अङ्काश्रयप्रणयिनस्तनयान्वहन्तो धन्यास्तदंगरजसा मलिनीभवन्ति ॥ [७,१७
अनार्यः परदारव्यवहारः । ७,२१
प्रबलतमसामेवंप्रायाः शुभेषु हि वृत्तयः ।
स्रजमपि शिरस्यन्धः क्षिप्तां धुनोत्यहिशङ्कया ॥ ७,२४
किमीश्वराणां परोक्षम् । ७,२६
छाया न मूर्च्छति मलोपहतप्रसादे शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा । [७,३२

विक्रमोर्वशीय

वसुधाधरकंदराद्विसर्पी प्रतिशब्दोऽपि हरेर्भिनत्ति नागान्। १,१५
अनुत्सेकः खलु विक्रमालंकारः । १,१६
विविक्तादृते नान्यदुत्सुकस्य शरणमस्ति । २,४
अतिस्नेहः खलु कार्यदर्शी । २,९
नास्त्यगतिर्मनोरथानाम् । २,१२
तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम् । २,१६
सेव्यो जनश्च कुपितः कथं नु दासो निरपराधः । २,२१
लोप्त्रेण गृहीतस्य कुम्भीलकस्यास्ति वा प्रतिवचनम् । २,२१
न खलु अक्षिदुःखितोऽभिमुखे दीपशिखां सहते । २,२३
सर्वः कल्ये वयसि यतते लब्धुमर्थान्कुटुम्बी ।
पश्चात्पुत्रैरपहृतभरः कल्पते विश्रमाय ॥ ३,१

भवितव्यतानुविधायीनीन्द्रियाणि । ३,१
सर्वत्रौदरिकस्याभ्यवहार्यमेव विषयः । ३,७
अन्यसंक्रान्तप्रेमाणो नागरिका अधिकं दक्षिणा भवन्ति । ३,१४
छिन्नहस्तो मत्स्ये पलायिते धीवरो भणति धर्मो मे भविष्यतीति ।
नोच्छ्वसिति तपनकिरणैश्चन्द्रस्यैवांशुभिः कुमुदम् । ३,१६ [३,१४
विरुद्धार्थसंपादयिता ईप्सितलाभो नाम । ३,२०
यदेवोपनतं दुःखात्सुखं तद्रसवत्तरम् ।
निर्वाणाय तरुच्छाया तप्तस्य हि विशेषतः ॥ ३,२१
नास्ति विधेरलंघनीयं नाम । ४,१
दूरारूढः खलु प्रणयः असहनः । ४,१
परावृत्तभागधेयानां दुःखं दुःखानुबन्धि । ४,३
राजा कालस्य कारणम् । ४,४
प्रभुता रमणेषु योषितां न हि भावस्खलितान्यपेक्षते । ४,१२
महदपि परदुःखं शीतलं सम्यगाहुः । ४,१३
स्वार्थात्सतां गुरुतरा प्रणयिक्रियैव । ४,१५
अनिर्वेदप्राप्याणि श्रेयांसि । ४,३०
परिभवास्पदं दशाविपर्ययः । ४,३१
अहो सुखप्रत्यर्थिता दैवस्य । ५,१६
न खलु वयसा जात्येवायं स्वकार्यसहो भरः । ५,१८
सूर्यः समेधत्यग्निमग्निः सूर्यं च तेजसा । ५,२०

मालविकाग्निमित्र

पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ।
सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥ १,२
आकृतिविशेषेष्वादरः पदं करोति । १,३
पात्रविशेषे न्यस्तं गुणान्तरं व्रजति शिल्पमाधातुः ।
जलमिव समुद्रशुक्तौ मुक्ताफलतां पयोदस्य ॥ १,६

अतिमात्रभासुरत्वं पुष्यति भानोः परिग्रहादनलः ।
अधिगच्छति महिमानं चन्द्रोऽपि निशापरिगृहीतः ॥ १,१३
पत्तने विद्यमानेऽपि ग्रामे रत्नपरीक्षा । १,१६
अन्योन्यकलहितयोर्मत्तहस्तिनोरेकतरस्मिन्ननिर्जिते कुत उपशमः ।
शिष्टा क्रिया कस्यचिदात्मसंस्था संक्रातिरन्यस्य विशेषयुक्ता । [१,१५
यस्योभयं साधु स शिक्षकाणां धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ॥ १,१६
विनेतुरद्रव्यपरिग्रह एव बुद्धिलाघवं प्रकाशयति । १,१७
सर्वज्ञस्याप्येकाकिनो निर्णयाभ्युपगमो दोषाय । १,१८
सुशिक्षितोऽपि सर्व उपदेशदर्शने न निपुणो भवति । १,१९
सर्वास्ववस्थासु चारुता शोभान्तरं पुष्यति । २,५
मन्दोऽप्यमन्दतामेति संसर्गेण विपश्चितः ।
पङ्कच्छिदः फलस्येव निकषेणाविलं पयः ॥ २,७
दरिद्र आतुरो वैद्येनोपनीयमानमौषधमिच्छति । २,१२
निसर्गनिपुणाः स्त्रियः । ३,२
न हि कमलिनीं दृष्ट्वा ग्राहमवेक्षते मतङ्गजः । ३,९
भ्रमरसंबाधो भविष्यतीति वसन्तावतारसर्वस्वं किं न चूतप्रसवो-
न शोभते प्रणयिजने निरपेक्षता । ३,१० [ऽवतंसयितव्यः । ३,१४
कर्मगृहीतेन कुम्भीरकेन सन्धिच्छेदने शिक्षितोस्मीति वक्तव्यं भवति।
कुम्भीरकैः कामुकैश्च परिहरणीया खलु चन्द्रिका । ४,६ [३,१९
कुतूहलवानपि निसर्गशालीनः स्त्रीजनः । ४,७
रमणीयः खलु नवाङ्गनानां मदनविषयावतारः । ४,१४
किं नु खलु दर्दुरा व्याहरन्तीति देवः पृथिवीं विस्मरति । ४,१५
सर्वोऽपि नववरो लज्जातुरो भवति । ५,१७
प्रतिपक्षेणापि पतिं सेवन्ते भर्तृवत्सलाः साध्व्यः ।
अन्यसरितां शतानि हि समुद्रगाः प्रापयन्त्यब्धिम् ॥ ५,१९

कालिदासीय संदर्भ-साहित्य

कालिदासाचे ग्रंथ व त्याच्यासंबंधींचें संशोधनपर व टीकात्मक साहित्य अनेक युरोपीय व एतद्देशीय भाषांतून प्रसिद्ध झालें असल्यामुळें येथें मुख्यत्वें मराठी व इंग्रजी भाषांतील कांहीं निवडक ग्रंथ व लेख यांचाच फक्त उल्लेख करणें शक्य आहे. अर्थात पुढील यादी केवळ मार्गदर्शक समजली पाहिजे.

कालिदासकृत ग्रंथांचीं मराठी भाषांतरें

काव्यें

रघुवंश–गणेशशास्त्री लेले. **कुमारसंभव** (सर्ग १ ते ६)–कृष्णाजी लक्ष्मण दातार. **मेघदूत**–या खंडकाव्याचीं अनेक मराठी रूपांतरें उपलब्ध असून त्यांपैकीं कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचें साकीबद्ध व लक्ष्मणशास्त्री लेले यांचें समवृत्त भाषांतर विशेष उल्लेखनीय आहे.

नां. शं. नवरेकृत '**मराठी रघुवंशकथा**' (संक्षिप्त गद्य रघुवंश)–विशेषतः बालवाचकांस उपयोगी आहे.

नाटकें

शाकुन्तल नाटकाचीं रूपांतरें खुद्द मराठींत सुमारें दहा उपलब्ध आहेत. त्यांपैकीं जुन्या पिढींतील परशुरामपंत गोडबोले, कृष्णशास्त्री राजवाडे, व रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचीं तीन व गेल्या दहा वर्षांत प्रसिद्ध झालेलीं केशव विनायक गोडबोले (समवृत्त), बाळकृष्ण लक्ष्मण अंतरकर (तुल्यवृत्त), व लक्ष्मणशास्त्री लेले यांचीं तीन गद्यपद्यात्मक भाषांतरें विशेष वाचनीय आहेत. यांशिवाय अण्णा किर्लोस्कर यांचें 'संगीत शाकुन्तल' सर्वतोमुखी आहेच.

विक्रमोर्वशीय नाटकाचीं दोन भाषांतरें (गद्यपद्यात्मक)–एक कृष्णशास्त्री राजवाडे यांचें व दुसरें भास्कर अनंतशास्त्री ताह्मणकर आणि अभ्यंकर यांचें उपलब्ध असून गोविंद बल्लाळ देवल यांची संगीत कृति प्रसिद्ध आहे.

मालविकाग्निमित्र नाटकाचें भाषांतर गणेशशास्त्री लेले यांनीं केलें असून वामन गणेश जोशी यांची संगीत आवृत्ति उपलब्ध आहे.

वरील तीनहि नाटकांचीं '**सार आणि विचार**' या नांवाचीं तीन पुस्तकें माधव व्यंकटेश लेले यांनीं 'विविधज्ञानविस्तार' मासिकांतून काढलीं आहेत.

ऐतिहासिक व टीकात्मक वाङ्मय

मराठी ग्रंथ

संस्कृत कविपंचक (कालिदास)–विष्णुशास्त्री चिपळूणकर
संस्कृत भाषेचा इतिहास– नारायण भवानराव पावगी
संस्कृत वाङ्मयाचा इतिहास–चिंतामण विनायक वैद्य
,, (मॅक्डोनेलच्या ग्रंथाचें भाषांतर)–सीताराम वासुदेव पेंडसे

निबंध व चर्चा

आतांपर्यंत वेगवेगळ्या मराठी नियतकालिकांतून कालिदासविषयक बरीच चर्चा प्रसिद्ध झाली आहे. '**विविधज्ञानविस्तार**' मासिकांतील लेख येणेंप्रमाणेः—

कालिदास आणि विक्रमादित्य यांच्या कालनिर्णयाची दिशा (१९२२)–का. कृ. लेले व शि. का. ओक; **कालिदासाच्या कालनिर्णयाची एक नवीन दिशा** (१९२५)–प्रो. ह. बा. भिडे; **कालिदासाच्या ग्रंथांतील शंकास्थलें** (१९१९)–प्रो. ह. बा. भिडे; **भास आणि कालिदास** (१९२०)–रा. धों. देशपांडे; त्याच विषयाची **दुसरी बाजू** (१९२०)–भा. ब. महाबळ; **अभिज्ञानशाकुंतल नाटक** (१९१९)-ग. ज. आगाशे; **अभिज्ञानशाकुन्तलाची पाठपरंपरा** (१९२०)–डॉ. श्री. कृ. बेलवलकर; **कालिदासीय वर्णवैचित्र्य** (१९२१)–दु. आ. तिवारी; **कालिदासीय ज्योतिष व तत्त्वज्ञान**–प्रो. पां. वा. काणे.

प्रो. शि. म. परांजपे यांनीं वेगवेगळ्या स्थळीं कालिदासविषयक मार्मिक चर्चा केली आहे. **रघुवंशाविषयीं कांहीं विचार** ('राष्ट्रोदय', १९१०); **ब्रह्मचर्यांत लग्न** (लोकशिक्षण, शके १८४०); **मेघदूतावरून कालिदासाविषयीं** (साहित्यसंग्रह, भाग १); **कालिदासानें न लिहिलेलें नाटक** (चित्रमयजगत् १९२५); **शाकुन्तल नाटकांतील चौथा अंक** (लोकशिक्षण, १९२९).

कालिदासाचा काळ (लोकशिक्षण, शके १८४०)– चिं. वि. वै; **कालिदास आणि त्याचा विक्रमादित्य** (रत्नाकर, १९३०)–माधव केशव काटदरे ; **कालिदासाच्या ग्रंथांतील साम्यस्थळें** (रत्नाकर, १९२९)-वि. अ. गिजरे ; '**उपमा कालिदासस्य।**' ('इंद्रधनुष्य' ग्रंथ)–दा. ना. आपटे.

केशव लक्ष्मण ओगले यांचे कालिदासविषयक लेख

कालिदासीय राज्यें व राजकारण (लोकमान्य मासिक, धुळें. १९२३)
कालिदासाचे शिक्षणविषयक विचार (लोकमान्य हिंदुस्थान अंक, १९२४)
कालिदास आणि ललितकला: संगीतशास्त्र (वि. ज्ञा. विस्तार, १९२६)
कालिदास आणि चित्रकला (वि. ज्ञा. विस्तार, १९२७)
कालिदासीय शब्दव्युत्पत्ति व कोट्या (महाराष्ट्रसाहित्यपत्रिका, १९२८)
कालिदासीय विनोद (लोकशिक्षण, १९३२)
कालिदासीय स्त्रीसमाज (मनोरंजन, १९३२)
कालिदास आणि वैद्यक (भारतसेवक, ठाणें. १९३३)
कालिदास आणि समाजशास्त्र (पारिजात, १९३४)
कालिदास आणि विष्णूचे अवतार (,, ,,)
कालिदासाच्या उपमा ... (,, ,,)

इंग्रजी ग्रंथ

Macdonell—*History of Sanskrit Literature*; Keith—*History of Sanskrit Literature*; Keith—*The Sanskrit Drama*; Dr. Bhau Daji—*Literary Remains*; G. R. Nandargikar—*Raghuvamsa* (Preface); R. N. Apte—*Date of Kālidas and a Historic Survey of His Works*; Khetresha Chandra Chattopadhyaya–*The Date of Kālidas*; Pandit Lachhmidhar Kalla–*The Birth-place of Kālidas*; Akhil Chandra Chatterjee—*Kālidas, His Poetry and Mind*; K. S. Ramaswami Shastri—*Kālidas, His Period, Personality and Poetry*.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१२	२	मभ्याधि	मभ्यधिः
१५	२१	दानद्रभरितेन	दानन्दभरितेन
२४	११	आढवत	आढळत
२४	२२	श्यामायतेन	श्यामायते नः
३१	२०	यानंतरच्या	या नंतरच्या
४१	१२	इतरत्र	इतर
६९	४ पासून नवा परिच्छेद पाहिजे.		
८५	८	मद्राक्रान्ता	मन्दाक्रान्ता
८८	१६	मौक्तिकः	मौक्तिकैः
८९	९	पूर्वविदर्शनं	पूर्वनिदर्शनं
९९	३ (टीप)	निवदित	निवेदित
१००	४ (,,)	तैम्रृगः	तैर्मृगैः
१०९	२५	ग्रावन्वृद्धान्	ग्रामवृद्धान्
११०	२	डुकूलें	दुकूलें
११३	१६	निःश्रेबस्	निःश्रेयस
११४	१२	रिध्वंसिषु	विध्वंसिषु
१३५	४	गरीयिः	गरीयः

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
५००१